# अस्पृश्य मूळचे कोण?

## THE UNTOUCHABLES


**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

M.A., PH.D., D.sc., LL.D., D.LITT., BARRISTER-AT-LAW



प्रकाशक

**प्रबुद्धभारत पुस्तकालय**

**आणि**

**प्रकाशन व्यवसाय**

नागपूर-१७



**अस्पृश्य मूळचे कोण**

**The Untouchables**

**लेखक :**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

**प्रकाशक/संपादक :**

**प्रबुद्धभारत पुस्तकालय**

**आणि प्रकाशन व्यवसाय**

१८१/बी, बाळाभाऊ पेठ,
महात्माफुले शाळेजवळ, वैशालीनगर रोड,
कमाल चौक, नागपूर-१७
दूरभाष क्र. ०७१२-६५४ ० ६५४, मो.क्र. : ०९८५०३३२२९६
email - bharat_waghmare1978@rediffimail.com

**संगणक जुळणी :**
मीरा कॉम्प्युटर, नागपूर.

**मुद्रण :**
श्रीसमर्थ प्रिंटर्स, नागपूर.

**प्रथम आवृत्ती :**
१३ ऑक्टोबर, २०१३

**द्वितीय आवृत्ती :**
३ ऑक्टोबर २०१४

**किंमत : ₹ ८०/-**

# भूमिका

‘आजचे शूद्र पूर्वीचे कोण? आणि त्यांना हिंदू आर्य समाजामध्ये चौथ्या क्रमांकाच्या वर्णाचे स्थान कसे प्राप्त झाले?’ या माझ्या १९४६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रबंधाचाच हा ग्रंथ म्हणजे उत्तरार्ध होय. शूद्राशिवाय हिंदू संस्कृतीने आणखी तीन सामाजिक वर्गांना जन्म दिला असून त्यांच्याकडे जेवढे लक्ष द्यावयास पाहिजे होते तेवढे देण्यात आलेले नाही. ते तीन वर्ग असे :

१. गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जमाती. यांची लोकसंख्या सुमारे दोन कोटींच्या जवळपास आहे.

२. आदिवासी जमाती. यांची लोकसंख्या अंदाजे दीड कोटीच्या जवळपास आहे.

३. अस्पृश्य मानलेल्या जाती. यांची लोकसंख्या अंदाजे पाच कोटी आहे.

या जमातीचे अस्तित्व ही एक तिरस्करणीय बाब होऊन बसलेली आहे. हिंदू संस्कृतीची ही उपज आहे आणि ही बाब लक्षात घेऊन कोणी तिचे मूल्य ठरविण्याचा प्रयत्न केल्यास हिंदू संस्कृतीला संस्कृती म्हणता येणे कठीण आहे. मानवतेवर बंधने लादून तिला गुलाम बनविण्याचा हा एक अधमपणाचा कावा आहे, असेच तिच्यासंबंधी म्हणावे लागेल. ‘बदफैलीपणा’ हेच नाव तिला शोभून दिसेल. जीवननिर्वाहाचे एकमेव साधन म्हणून केवळ दरोडेखोरीचा लोकसमूह धंदा करण्याची शिकवण देऊन व ज्या संस्कृतीने एक मोठा दरोडेखोरांचा लोकसमूह रानटी अवस्थेतच प्राचीन पशुतुल्य जीवन जगण्यासाठी मोकाट सोडून दिला आणि जिने तिसरा एक लोकसमूह असा करून ठेवला की त्यांच्याशी कोणताही मानवी व्यवहार शक्य होऊ नये आणि केवळ त्यांच्या स्पर्शानेही मानव भ्रष्ट होऊन जावा, अशा संस्कृतीला बदफैलीपणाशिवाय दुसरे काय म्हणता येऊ शकेल?

अन्य एखाद्या देशात जर हे लोकसमूह असते तर आत्मपरीक्षण करून हे लोक असे का राहिलेत याचे संशोधन करण्यास ते सरसावले असते. परंतु हिंदूंच्या डोक्यात मात्र यांपैकी कोणतीही गोष्ट आली नाही. याचे कारण अगदी साधे आहे. या लोकसमूहांचे अस्तित्व ही एक लज्जेची बाब असल्याची व काही चूक झाल्याची



भावना हिंदूंच्या मनात येत नाही. याचे उत्तरदायित्व आपणावर आहे, असे समजून त्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याची व त्याच्या उगमाचा व वाढीचा शोध घेण्याची आवश्यकता त्यांना भासत नाही. याउलट हिंदू संस्कृती ही केवळ अत्यंत पुरातनच नाही तर अनेक बाबतीत ती वैशिष्ट्यपूर्ण आहे, यावर दृढ श्रद्धा ठेवण्याची शिकवण प्रत्येक हिंदूला देण्यात येते. हा आपला दावा पुनः पुन्हा करताना कोणत्याही हिंदूला कधीही थकवा वाटत नाही. हिंदू संस्कृती ही अत्यंत पुरातन असल्याचे कोणीही समजू शकतो व ते मान्यही होऊ शकते. परंतु हिंदू संस्कृती वैशिष्ट्यपूर्ण असल्याचा दावा कोणत्या आधारावर केला जातो हे समजून घेणे फारसे सापे नाही. हिंदूंना कदाचित पसंत पडणार नाही; परंतु अहिंदूंना आश्चर्यचकित करणारी ही बाब लक्षात घेतली तर या त्यांच्या दाव्याचा आधार एकच असू शकतो. तो म्हणजे या लोकसमूहांचे अस्तित्व हा असून त्याला हिंदू संस्कृतीच पूर्णतः जबाबदार आहे. अशा प्रकारचे लोकसमूह अस्तित्वात असणे ही निश्चित वैशिष्ट्यपूर्ण बाब असून ती इतकी ठळक आहे की कोणत्याही हिंदूला तिच्याबद्दल पुनः पुन्हा सांगण्याची गरज नाही. कारण ही बाब कोणी अमान्य करू शकत नाही. ही गोष्ट अभिमान बाळगण्याची नसून लज्जास्पद आहे, एवढे हिंदूंना कळावे अशीच अपेक्षा कोणीही बाळगील !

हिंदू संस्कृतीच्या खोट्या श्रद्धा, शहाणपणा, श्रेष्ठता व पावित्र्याबद्दल वारंवार सांगून त्या लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न होतो. याचे मूळ कारण समाजाच्या धारणेसंबंधी हिंदू विद्वानांच्या चमत्कारिक मनोरचनेमध्ये आहे.

आज सर्व प्रकारची विद्वत्ता केवळ ब्राह्मणांपर्यंत मर्यादित झालेली आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी ही व्हॉल्टेअरप्रमाणे बौद्धिक प्रामाणिकतेचे पालन करण्याची भूमिका पार पडण्यासाठी कोणताही ब्राह्मण पंडित पुढे सरसावला नाही. व्हॉल्टेअर हा कॅथॉलिक पंथीय चर्चच्या छायेखालीच वाढला होता तरीसुद्धा बौद्धिक प्रामाणिकपणाला जागून त्याने कॅथॉलिक पंथाच्या विरुद्ध बंड उभारले. अशी प्रामाणिकता येथील ब्राह्मणांमध्ये सध्या तर नाहीच, परंतु भविष्यामध्येही असा कोणी उद्यास येईल, असा मुळीच संभव नाही. ब्राह्मणांमध्ये एखादाही व्हॉल्टेअर निर्माण होऊ नये, ही ब्राह्मणाच्या पांडित्यातील गंभीर त्रुटी आहे. ब्राह्मण पंडित हा केवळ पढीक विद्वान असतो, ही बाब लक्षात घेतली तर याबद्दल फारसे आश्चर्य वाटणारे नाही. तो बुद्धिवादी नसतो. पढीक माणूस आणि बुद्धिवादी विद्वान यामध्ये जमीन आस्मानचे अंतर असते, यापैकी पहिला, आपल्या वर्गासंबंधी सतर्क असतो व केवळ आपल्या वर्गाच्या हितासाठीच जीवन जगत असतो. दुसरा मुक्त मानव असून कोणत्याही वर्गाच्या दाबाखाली न येता स्वतंत्रपणे आचरण करणारा असतो. ब्राह्मण केवळ पढीक विद्वान असल्यामुळेच ते व्हॉल्टेअर निर्माण करू शकेल नाहीत.

ब्राह्मण असा व्हॉल्टेअर का निर्माण करू शकेल नाहीत? या प्रश्नाचे उत्तर केवळ दुसऱ्या प्रश्नांनीच दिले जाऊन शकते. तुर्कच्या सुलेमानाने मुसलमानी जगतातला धर्म रद्द का केला नाही? घाऱ्या डोळ्यांची सर्व मुले ठार मारण्यात यावी, असा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने का पास केला नाही? ज्या कारणासाठी सुलतानाने, पोपने किंवा ब्रिटिश पार्लमेंटने वरील प्रकारची कार्यवाही केली नाही त्याच कारणाने असा एखादा व्हॉल्टेअर निर्माण  करण्यास ब्राह्मणही असमर्थ ठरले.हे ध्यानात घेतले पाहिजे की एखाद्या व्यक्तीच्या स्वतःच्या किंवा स्ववर्गाच्या स्वार्थाच्या हेतूची आंतरिक बंधने नेहमीच त्याच्या बौद्धिक व्यवहारावर पडून तो त्या हेतूनी नियंत्रित होत असतो. ब्राह्मणांना जी सत्ता व उच्च स्थिती प्राप्त झालेली आहे ती पूर्णतः हिंदू संस्कृतीमुळेच प्राप्त झालेली असून तिनेच त्यांना उच्च प्रकारचा दर्जा बहाल केला आहे. याउलट खालच्या वर्णाच्या सर्व वर्गांसाठी तिने नानाप्रकारच्या असुविधा निर्माण करून ठेवल्या असून ब्राह्मणांच्या विरोधात बंड करून त्यांच्या वर्चस्वाला त्यांना कधीही आव्हान देता येऊ नये अशी व्यवस्था या संस्कृतीत करून ठेवण्यात आली आहे. परिणामतः प्रत्येक ब्राह्मणाला, मग तो पुराणमतवादी असो, तो उपाध्याय असो की गृहस्थ असो, विद्वान असो की नसो, ब्राह्मणांचे वर्चस्व रक्षण करण्यात आनंद वाटतो. एखादा ब्राह्मण व्हॉल्टेअर होण्यासाठी परवडेल तरी कसा? ब्राह्मणामध्ये असा एखादा व्हॉल्टेअर निर्माण झाला तर ब्राह्मणांचे वर्चस्व कायम राखण्यासाठी हिंदू संस्कृतीच्या नावाने जो कावा रचण्यात आला आहे त्यालाच त्याच्यापासून खराखुरा धोका निर्माण होईल. माझा मुख्य मुद्दा असा की ब्राह्मणांच्या पांडित्याला त्यांनी स्वतःच्या वर्गाचे हित रक्षण करण्याच्या दुर्लंघ्य मर्यादा पडलेल्या आहेत. प्रामणिकपणा आणि सचोटीसाठी ज्या प्रकारची बुद्धिमत्ता आवश्यक असते तशा प्रकारची मुक्त बुद्धिमत्ता कोणताही ब्राह्मण मुक्तपणे वापरू शकत नाही. कारण त्याच्या बुद्धिमत्तेवर स्वार्थाची मर्यादा पडलेली असते. यामुळे त्याच्या वर्गाच्या व पर्यायाने त्याच्या स्वतःच्या स्वार्थाला हानी पोचेल, अशी त्याला भीती वाटत असते.

परंतु कोणी एखाद्या ब्राह्मणी साहित्यातील कावा उघड करून सांगण्याचा प्रयत्न केला, तर ब्राह्मण पंडित मुळीच सहनशीलता दाखवीत नाहीत, ही बाब चीड आणणारी आहे. ब्राह्मण पंडित जेथे आवश्यक आहे तेथे स्वतःही मूर्तिभंजकाची भूमिका बजावीत नाही आणि ज्या अब्राह्मणांमध्ये अशी भूमिका पार पाडण्याची पात्रता असते त्यालाही हे ब्राह्मण पंडित तसा प्रयत्न करू देत नाही, एखाद्या अब्राह्मण विद्वानाने असा प्रयत्न सुरू केला तर ब्राह्मण पंडित त्याच्याविरुद्ध गुप्तपणे कट उभारतात, त्याची उपेक्षा करतात, एखाद्या गौण स्वरूपाच्या कारणावरून त्याची निंदा करतात किंवा त्याचे कार्य निरर्थक असल्याचा शिक्का मारून टाकतात. ब्राह्मणी



साहित्यातील दोष उघड करून सांगण्याचा प्रयत्न करणारा एखादा लेखक या नात्याने अशा प्रकारच्या नीच कटाला मी नेहमीच बळी पडत आलेलो आहे.

ब्राह्मण पंडितांची वृत्ती अशी असली तरीही मी अंगीकारलेल्या कार्याचा पाठपुरावा मला केलाच पाहिजे. कारण या वर्गाच्या मुळाचे संशोधन अजूनही तसेच वाट पाहात पडलेले आहे. हे पुस्तक अशाच दुर्दैवी वर्गांपैकी एकाच्या मुळासंबंधी ऊहापोह करते, तो वर्ग म्हणजे अस्पृश्य वर्ग होय. या तीन वर्गांपैकी अस्पृश्यांची संख्या सर्वांत जास्त आहे आणि त्याचे अस्तित्वसुद्धा अतिशय अस्वाभाविक आहे. असे असूनही आजपर्यंत त्यांच्या मुळासंबंधी कोणत्याही प्रकारचे संशोधन झालेले नाही. हिंदूंनी अशा प्रकारचे संशोधन कधीही हाती घेतले नाही. ही बाब पूर्णतः समजण्यासारखी आहे. जुन्या सनातनी हिंदूला अस्पृश्यता पाळण्यात काही चूक आहे असे वाटत नाही. त्यांच्या मते ही सर्वसामान्य व नैसर्गिक अशी बाब आहे, असे असल्यामुळे तिचा नायनाट केला पाहिजे किंवा तिच्याबद्दल स्पष्टीकरण दिले पाहिजे, असे त्याला वाटत नाही. नवीन आधुनिक हिंदू, अस्पृश्यता ही चूक आहे हे मान्य करतो; परंतु तिच्याबद्दल चारचौघात चर्चा करण्याची त्याला लाज वाटते. कारण तसे करण्याचे हिंदू संस्कृतीत अस्पृश्यतेसारख्या नीच व बदफैली पद्धती किंवा सामाजिक बंधने चालू आहेत हे परराष्ट्रीय लोकांना माहीत होईल, अशी त्याला भीती वाटते. परंतु नवलाची गोष्ट अशी की, सामाजिक संस्थांचा अभ्यास करणाऱ्या परदेशी विद्वानांचेही लक्ष या अस्पृश्यतेकडे गेले नाही. हे असे का घडले हे समजणे कठीण आहे. तथापि वस्तुस्थिती मात्र अशीच आहे.

म्हणून सर्वांनी पूर्णतः दुर्लक्षिलेल्या या क्षेत्रातील संशोधनाचा प्रयत्न करणारा हा पाहिला ग्रंथ आहे, असे समजावयास हरकत नाही. पुस्तकात अस्पृश्य मूळचे कोण, या प्रश्नाचा सर्व बाजूंनी शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहेच; परंतु त्यासोबतच त्या प्रश्नाशी संबंधित अन्य बाबीचाही सांगोपांग ऊहापोह झालेला आहे, असे मला वाटते. त्यातील काही विषय तर असेही आहेत की बऱ्याच लोकांना त्यांची जाणीवही नाही आणि ज्यांना त्यांची जाणीव आहे ते गोंधळून गेलेले असून ते प्रश्न कसे सोडवावेत हे त्यांना कळत नाही. या पुस्तकात चर्चिलेल्या काही प्रश्नांचा उल्लेख करावयाचा झाल्यास ते असे अस्पृश्य लोक गावाच्या बाहेर का राहतात? गोमांस भक्षणाने अस्पृश्यतेचा उदय का झाला? हिंदूंनी गोमांस कधीच खाल्ले नाही काय? अब्राह्मण लोकांनी गोमांस खाणे का सोडून दिले? कोणत्या कारणामुळे ब्राह्मण शाकाहारी बनले? इत्यादी यांपैकी प्रत्येकाचे उत्तर या ग्रंथात सुचविलेले आहे. या ग्रंथामध्ये सुचविलेली या प्रश्नांची उत्तरे सर्व सामावेशक नसूही शकतात. तरीसुद्धा जुन्या विषयाकडे एका नवीन दृष्टिकोनाचा निर्देश या ग्रंथाने केला आहे, असे दिसून येईल.

अस्पृश्यतेच्या उत्पत्तीबद्दल मांडण्यात आलेली या ग्रंथातील उपपत्ती पूर्णतः नवीन आहे. तिच्यामध्ये पुढील सिद्धांताचा समावेश झालेला आहे.

१. अस्पृश्य आणि सवर्ण हिंदू यांच्यामध्ये वंशभेद नाही.

२. अस्पृश्यतेचा उदय होण्यापूर्वी हिंदू लोक आणि अस्पृश्य यांच्यातील.

**मूळ भेद :–** टोळ्यांमध्ये संघटित असलेले लोक (Tribesmen) आणि बाह्य आक्रमणामुळे पराभूत होऊन वाताहत झालेले लोक (Broken Men) अशा स्वरूपाचा होता. या इतस्ततः विखुरलेल्या जित लोकांनाच पुढे कालाच्या ओघात अस्पृश्य समजण्यात येऊ लागले.

३. अस्पृश्यतेला जसा वंशभेदाचा आधार नाही तसाच तिला उद्योगाचाही आधार नाही.

४. अस्पृश्यतेच्या उगमाची दोन कारणे आहेत :

अ) ब्राह्मण लोक बौद्धांचा जसा तिरस्कार व द्वेष करीत होते तसाच तिरस्कार व द्वेष या जित लोकांचाही होत होता.

ब) इतरांनी गोमांस भक्षणाचा त्याग केल्यानंतरही या जित लोकांनी गोमांस भक्षण सुरू ठेवले.

५. अस्पृश्यतेच्या उगमाचा शोध घेताना अस्पृश्य आणि चांडाळ या शब्दांची परस्परात गल्लत होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. सर्व सनातनी हिंदू लेखकांनी चांडाळ आणि अस्पृश्य या शब्दांना परस्परांचे पर्याय मानलेले आहे. असे करणे चुकीचे आहे. अस्पृश्य लोक चांडाळ लोकांहून वेगळे आहेत.

६. चांडाळाचा वर्ग धर्मसूत्राच्या काळामध्ये निर्माण झाला; परंतु अस्पृश्यांचा वर्ग त्यानंतर कितीतरी काळानंतर म्हणजे इ.स. ४०० नंतर निर्माण झाला. इतिहासाचे जेवढे संशोधन मला शक्य झाले त्यावरून हे निष्कर्ष निघालेले आहेत. इतिहासकाराने आपल्यासमोर कोणते आदर्श ठेवावेत याचे दिग्दर्शन गोथे (Goethe) या लेखकाने अचूक शब्दांत केलेले आहे. तो म्हणतो :

''असत्यापासून सत्याचा निवाडा करणे, अनिश्चितापासून निश्चिताला वेगळे काढणे आणि निश्चयात्मकपणे अमान्य होण्यासारख्या बाबीपासून शंकास्पद बाबी वेगळ्या करणे, हेच इतिहासकाराचे कर्तव्य हेय. संशोधकासमोर जी माहिती उपलब्ध असेल तिच्याकडे साकल्याने न्यायधीशाच्या निष्पक्षपाती दृष्टिकोनातून त्याने पाहिले पाहिजे. एखाद्या घटनेविषयी केलेले विधान पुराव्यानुसार पाहता कितपत परिपूर्ण व स्पष्ट आहे याचा त्याने विचार करावयास हवा आणि त्याबद्दल नंतरच आपला निष्कर्ष काढून आपला अभिप्राय द्यावयास पाहिजे– मग तो निष्कर्ष पूर्वीच्या इतिहासतज्ज्ञाने नोंदविलेल्या मताशी जुळणारा असो की नसो, सुसंबद्ध व आवश्यक घटना उपलब्ध



झाल्यास गोथेचे मार्गदर्शन अमलात आणण्यास काहीच अडचण पडत नाही. अर्थातच हा सर्व सल्ला अत्यंत मोलाचा व आवश्यकही आहे. परंतु जेव्हा घटनांच्या जंत्री मागील तुटलेल्या दुव्याजवळ एखादा संशोधक येऊन अडखळतो आणि जेव्हा दोन महत्त्वाच्या घटनांमधील संबंध दाखवणारा प्रत्यक्ष असा पुरावा उपलब्ध असतो तेव्हा त्या इतिहास संशोधकाचे काय करावे हे गोथे सांगत नाही. मी याचा उल्लेख करण्याचे कारण असे की, अस्पृश्यतेचे मूळ शोधण्याचा व त्याच्याशी संबंधित अनेक प्रश्नांचा शोध घेत असताना अशा अनेक तुटलेल्या दुव्यांशी मला झटपट करावी लागली आहे. त्यांच्याशी अशी झटापट करणारा मी एकटाच नाही, हे खरे आहे. भारताच्या प्राचीन इतिहासाच्या सर्वच विद्यार्थ्यांना अशा प्रसंगांना तोंड द्यावे लागते. कारण माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन म्हणतो त्याप्रमाणे ''अलेक्झांडर येण्यापूर्वीच्या भारताच्या इतिहासातील कोणत्याही सार्वजनिक घटनेची तारीख निश्चित करणे कठीण आहे आणि मुसलमानांच्या आधिपत्यापूर्वीच्या काळातील नैसर्गिक उत्क्रांतीचा सुसंबद्ध क्रम लावण्याचा प्रयत्न करता येणे शक्य नाही.'' ही एक खेदजनक कबुली आहे. परंतु त्याला इलाज नाही. प्रश्न असा की, इतिहासाच्या विद्यार्थ्याने करावे तरी काय? ऐतिहासिक घटनेचा गळलेला दुवा सापडेपर्यंत त्याने स्वतःला 'आराम' चा हुकूम द्यावा काय? मला तसे वाटत नाही. अशा प्रसंगी त्याने शक्य त्या कल्पनाशक्तीचा व प्रतिभेचा उपयोग करून घ्यावा व त्याद्वारे अजून असंशोधित असलेल्या ऐतिहासिक दुव्यांची साखळी जोडावी आणि ज्या घटनांचे दुवे सापडत नाहीत ते उपलब्ध घटनांद्वारे पाहता कसे असू शकतील याचे अनुमान प्रस्तुत करावे. संशोधनाचे कार्य खोळंबून ठेवण्यापेक्षा या युक्तीद्वारे तुटलेल्या दुव्यामुळे निर्माण झालेल्या अडचणीतून मार्ग काढणेच मी पसंत केले आहे, हे मी मान्य करतो.

या माझ्या त्रुटीचा आधार घेऊन माझ्या या प्रबंधावर कदाचित कठोर टीका होईल आणि ऐतिहासिक संशोधनाची पद्धती झुगारून दिल्याचा आरोप करून कदाचित त्याची निंदाही होईल. माझ्या टीकाकारांची भूमिका जर हीच असेल तर त्यांना मी आठवण करून दिलीच पाहिजे की ऐतिहासिक घडामोडींच्या निष्कर्षावर नियंत्रण ठेवणारा असा एखादा नियम असेल व तो प्रत्यक्ष घटनेचा पुरावा पाहिल्याशिवाय बाकी कशाचाच स्वीकार तयार नसेल तर तो नियमच दुष्ट आहे. प्रत्यक्ष पुरावा विरुद्ध अनुमानित पुरावा किंवा अनुमानित पुरावा विरुद्ध तर्कजन्म पुरावा अशा बाबीवर टीकाकारांनी आपले लक्ष केंद्रित करण्याऐवजी पुढील बाबींवर आपले लक्ष केंद्रित करावे. त्या बाबी अशा : १) हा सिद्धांत विशुद्ध अनुमानावर उभारलेला आहे की नाही? आणि २) हा सिद्धांत शक्य कोटीतील आहे की नाही व जर तो तसा असेल तर मी काढलेल्या निष्कर्षापेक्षा प्रत्यक्ष घटनांशी अधिक चपखल मेळ बसू शकणारा

दुसरा सिद्धांत काढता येईल की काय?

पहिल्या मुद्यासंबंधी मी असे म्हणू शकेन की केवळ काही भाग अनुमानावर उभारलेला असल्यामुळे हा संबंध फुसका ठरणार नाही. भूतकाळाच्या पोटात जिची पाळेमुळे गडप झालेली आहेत अशा एक संस्थेचा आपण ऊहापोह करीत आहोत, ही बाब माझ्या टीकाकारांनी ध्यानात बाळगावयास हवी. अस्पृश्यतेच्या उगमाचे स्पष्टीकरण करण्याचा हा प्रयत्न म्हणजे ऐतिहासिक घटनांची निश्चित नोंद असलेली बाडे चाळून इतिहासाचे पुस्तक लिहिणे नव्हे. तर जेथे लिखित स्वरूपाची सामग्री उपलब्ध नाही आणि काही असलीच तर तिचा समोर असलेल्या प्रश्नाशी कसलाच संबंध नाही, अशा विषयाच्या इतिहासाची पुनर्रचना करण्याचा हा प्रयत्न आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध ग्रंथांनी काय लपवून ठेवले किंवा त्यावरून काय सूचित होते, याबद्दल कोणालाही अनुमान बांधण्याचा प्रयत्न करावा लागतो आणि त्यातही सत्य गवसल्याचे त्याला पूर्णतः समाधान लाभत नाही. भूतकाळाचे अवशेष गोळा करणे, त्याची क्रमवार एकत्रित मांडणी करणे आणि त्यांच्या जन्माची कथा त्यांनाच सांगावयास लावणे अशा स्वरूपाचे हे काम आहे. ज्याप्रमाणे एखादा पुराणवस्तुसंशोधक फुटक्या तुटक्या दगडामधून एक संपूर्ण शहर रचून त्यांचा इतिहास सांगतो किंवा एखादा भूगर्भशास्त्रज्ञ विखुरलेली हाडे व दात गोळा करून एखाद्या विर्वंश झालेल्या भूतकाळातील प्राण्याची कल्पना आणून देतो किंवा एखादा चित्रकार क्षितिजावरील रेखांचे वाचन करून व टेकड्यांच्या उतारावरील सूक्ष्म सौंदर्यखुणा टिपून एक सौंदर्यपूर्ण दृश्य तयार करतो, त्याप्रमाणेच हेही कार्य पुनर्निर्माणाचे आहे. या अर्थाने हा ग्रंथ केवळ इतिहासापेक्षा कलात्मकच अधिक आहे. अस्पृश्यतेची पाळेमुळे कोणालाही माहीत नसलेल्या गहन भूतकाळात गडप झालेली आहेत. ती पुन्हा जिवंत करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे अनंतकाळापर्यंत लुप्तप्राय झालेल्या एखाद्या शहराचा पुनरुद्धार करून त्याला त्याच्या ऐतिहासिक मूळ रूपात सादर करणेच होय. अशा कार्यामध्ये कल्पना व गृहीत पक्षाचा फार मोठा वाटा असल्याशिवाय राहू शकत नाही. तथापि हा काही या प्रबंधाच्या टीकेचा मुख्य आधार होऊ शकत नाही. कारण सुजाण कल्पनेशिवाय कोणतेही वैज्ञानिक संशोधन यशस्वी होऊ शकत नाही. आणि गृहीत पक्ष हा तर विज्ञानाचा आत्मा आहे. मॅक्झिम गॉर्की या बाबतीत म्हणतो :

विज्ञान आणि वाङ्मय यामध्ये बऱ्याच बाबी समान आहेत. दोन्हीमध्ये निरीक्षण, तुलना आणि अध्ययन यांना पायाभूत महत्त्व आहे. वैज्ञानिकाप्रमाणेच कलाकारालाही कल्पना आणि प्रतिभा या दोहोंचीही गरज असते. अजूनपावेतो असंशोधित असलेल्या घटनांचा दुवा जोडून मधली खिंड भरून काढण्याचे कार्य कल्पनाशक्ती व प्रतिभा करतात व त्याद्वारे वैज्ञानिकाला गृहीत पक्ष उभारण्यास साहाय्य करतात. या गृहीत



पक्षामुळेच त्यांना प्राकृतिक घटनांचा एका विशिष्ट दिशेने अभ्यास करून त्याचे मन कमी–अधिक प्रमाणात प्राकृतिक घटनांच्या अभ्यासावर एका विशिष्ट दिशेने आपले मन केंद्रित करण्यात यश प्राप्त होते. हा गृहीत पक्ष म्हणजे एक वाङ्मयीन निर्मिती असते. मनुष्य स्वभावाचे नमुने निर्माण करण्याच्या सृजनात्मक कलेसाठी कल्पनाशक्ती, प्रतिभा आणि नवीन वस्तूंची निर्मिती स्वतःच्या मनामध्ये प्रथम तयार करण्याचे सामर्थ्य असावे लागते.''

म्हणून जेथे जेथे घटनांचे दुवे सापडले नाहीत तेथे तेथे असे दुवे अनुमानाद्वारे तयार केल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करणे मला अनावश्यक वाटते. इतकेच नव्हे, तर केवळ एवढ्याच कारणासाठी माझा हा प्रबंध विकृत आहे, असे म्हणता येऊ शकत नाही. कारण निव्वळ तर्काच्या आधारे कोठेही तुटलेल्या कड्या जोडून दिलेल्या नाहीत. हा प्रबंध बऱ्याच मोठ्या प्रमाणात घटनांवर आणि घटनांद्वारे निष्पन्न अनुमानावर आधारलेला आहे आणि जेथे कोठे हे निष्कर्ष घटनांवर किंवा घटनांवरील अनुमानावर नाहीत, तेथे ते परिस्थितिजन्य गृहीत पक्षावर आधारलेले असून ते बऱ्याच प्रमाणात संभवनीय स्वरूपाचेच आहेत. माझ्या सिद्धांताच्या पुराव्यादाखल कोणत्याही बाबीवर अंधविश्वास ठेवण्याची मी वाचकांना गळ घातली नाही. मी जी विधाने केली आहेत ती पूर्ण विचार केल्यास संभवनीय आहेत, एवढे तरी मी दाखवून दिलेले आहे. खंबीर निष्कर्षासाठी विचारपूर्वक निश्चित केलेल्या संभवनीय बाबीही योग्य पुरावा ठरू शकत नाहीत, असे म्हणणे म्हणजे कर्मठपणाशिवाय अन्य काही नव्हे. या प्रबंधाचे परीक्षण करण्याबाबत मी जो दुसरा मुद्दा माझ्या टीकाकारांना सुचविला आहे, त्याबाबत मला एवढेच सांगावयाचे आहे की, माझा हा प्रबंध निर्णायक स्वरूपाचा असल्याचा दावा करण्याइतपत मी दुराग्रही नाही. अंतिम स्वरूपात सिद्धांत म्हणून याला मान्य करावे, असे माझे म्हणणे नाही किंवा त्यांच्या परीक्षणावर काही प्रभाव पाडावा, अशीही माझी इच्छा नाही. त्यांना त्यांचे निष्कर्ष मांडण्याचे अर्थातच पूर्ण स्वातंत्र्य आहे. मला एवढेच म्हणावयाचे आहे की गृहीतपक्ष सभोवतालच्या घटनांशी सुसंगत असावा, त्या घटनांचे स्पष्टीकरण त्यात असावे आणि त्यांचा त्याने अन्वयार्थ लावावा अशी जर अपेक्षा असेल तर माझी उपपत्ती एक खंबीर उपपत्ती म्हणून निदान सध्यापुरती तरी टिकाव धरू शकेल की नाही याचा विचार त्यांनी करावा. माझ्या टीकाकारांकडून या प्रबंधाचे निष्पक्ष व पूर्वग्रहरहित परीक्षण व्हावे एवढीच माझी अपेक्षा आहे.

१ जानेवारी, १९४८ **– बी. आर. आंबेडकर**

१, हॉर्डिंग अव्हेन्यू,
नवी दिल्ली.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **भाग एक** | |
| १. | अहिंदूंतील अस्पृश्यता | १३ |
| २. | हिंदूंतील अस्पृश्यता | २१ |
| | **भाग दोन** | |
| | **वसतिस्थानाचा प्रश्न** | |
| ३. | अस्पृश्य लोक गावाबाहेर का राहतात? | ३५ |
| ४. | अस्पृश्य हेच वाताहत झालेले लोक आहेत काय? | ४३ |
| ५. | अन्यत्र अशी उदाहरणे आहेत काय? | ४६ |
| ६. | अशा विभक्त वसाहती अन्य देशांतून नष्ट कशा झाल्या? | ५० |
| | **भाग तीन** | |
| | **अस्पृश्यतेच्या उगमाच्या जुन्या उपपत्ती** | |
| ७. | अस्पृश्यतेचे मूळ-वंशभेद | ५२ |
| ८. | अस्पृश्यतेचे मूळ-उद्योगधंदे | ७० |
| | **भाग ४** | |
| | **अस्पृश्यतेच्या उगमाबदलच्या नवीन उपपत्ती** | |
| ९. | अस्पृश्यतेचे मूळ-बौद्ध धर्माचा तिरस्कार | ७३ |
| १०. | अस्पृश्यतेचे मूळ-गोमांस भक्षण | ८१ |
| | **भाग पाच** | |
| | **नवीन उपपत्ती व काही प्रश्न** | |
| ११. | हिंदूंनी गोमांस कधीही खाल्ले नाही काय? | ८४ |
| १२. | ब्राह्मणेतरांनी गोमांस भक्षणाचा त्याग का केला? | ९१ |
| १३. | ब्राह्मण शाकाहारी कशामुळे बनले? | ९९ |
| १४. | गोमांस भक्षणाने वाताहत झालेले लोक अस्पृश्य कसे बनले? | १२४ |
| | **भाग ६** | |
| | **अस्पृश्यता आणि तिच्या उगमाचा काळ** | |
| १५. | अशुद्ध आणि अस्पृश्य | १३० |
| १६. | वाताहत झालेले लोक अस्पृश्य केव्हा बनले? | १४१ |

भाग एक

# १. अहिंदूंतील अस्पृश्यता

## १.

अस्पृश्य लोक कोण आहेत आणि अस्पृश्यतेचे मूळ कारण काय? या दोन मुख्य विषयांचे संशोधन या प्रबंधाच्या पुढील पानांमध्ये करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. संशोधनाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यापूर्वी काही प्राथमिक प्रश्नांचा ऊहापोह करणे आवश्यक आहे. त्यातील पहिला प्रश्न असा : संपूर्ण जगामध्ये केवळ हिंदू लोकच अस्पृश्यता पाळतात काय? दुसरा असा : जर अहिंदू लोकही अस्पृश्यता पाळत असतील, तर अहिंदूतील अस्पृश्यता व हिंदूतील अस्पृश्यता यातील तुलनात्मक अध्ययनातून कोणत्या गोष्टी निष्पन्न होतात? दुर्दैवाची गोष्ट अशी की आजपर्यंत अशा प्रकारच्या तुलनात्मक अध्ययनाचा प्रयत्न करण्यात आला नाही. याचा परिणाम असा झाला की हिंदूतील अस्पृश्यतेच्या अस्तित्वाबद्दल बऱ्याच लोकांना जाणीव असली तरी तिची खास वैशिष्ट्ये त्यांना माहीत नाहीत. तथापि तिच्या खास वैशिष्ट्यांच्या अद्‌भुत स्वरूपाची जाणीव केवळ अस्पृश्य लोकांची स्थिती समजून घेण्यासाठीच आवश्यक नाही, तर त्यांच्या मुळाचा शोध घेण्याची गरज पटवून देण्यासाठीही आवश्यक आहे.

प्राचीन व आदिम समाजामध्ये या बाबतीत कशी स्थिती होती हे तपासून पाहण्यासाठी सुरुवात केल्यास अधिक चांगले होईल. त्यांची अस्पृश्यतेला मान्यता होती काय? या बाबतीत अस्पृश्यता म्हणजे काय याची नीट कल्पना आपणास सुरुवातीस असणे आवश्यक आहे. या मुद्यावर मतभेद असू शकत नाहीत. विटाळ, भ्रष्टता, बाटणे आणि अशा प्रकारच्या विटाळातून मुक्त होण्याची भावना हीच अस्पृश्यतेमध्ये अंतर्भूत आहे, हे सर्वजण मान्य करतील.

वर उल्लेखलेल्या अर्थाने आदिम समाज अस्पृश्यतेला मान्यता देत होता की नाही हे पाहण्यासाठी आदिम लोकांचे सामाजिक जीवन तपासून पाहिले तर त्यांचा अशा प्रकारच्या विटाळाच्या कल्पनेवर विश्वास होता. एवढेच नव्हे तर या विश्वासापोटी त्यांनी धार्मिक कर्मकांडेही निर्माण केली होती याबद्दल शंका उरत नाही.

पुढील गोष्टींमुळे विटाळ होतो अशी प्राचीन मनुष्याची कल्पना होती.[२]

१. काही विशिष्ट घटना घडल्यामुळे

२. काही विशिष्ट वस्तूंचा स्पर्श झाल्यामुळे आणि



३. काही विशिष्ट व्यक्तींचा स्पर्श झाल्यामुळे

एका माणसापासून दुसऱ्या माणसात स्पर्शामुळे अपवित्रता संचार करते अशीही प्राचीन मनुष्याची श्रद्धा होती. अपवित्रतेचे असे संक्रमण होण्यासाठी खाणे, पिणे इत्यादी स्वाभाविक प्रसंग विशेषतः अधिक धोकादायक आहेत, असे त्याला वाटत होते. ज्या प्रसंगी हुकमी अपवित्रता निर्माण होऊ शकेल अशा घटनांमध्ये आरंभिक मनुष्याच्या मते पुढील प्रसंगाचा समावेश होत असे :

१. जन्म

२. संस्कार

३. स्त्रियांचा रजस्वला होण्याचा काळ

४. लग्न

५. संभोग

६. मृत्यू

गर्भवती स्त्रिया अपवित्र असून त्या अपवित्रता पसरविण्यास कारणीभूत ठरतात, असे मानले जात असे. आईची अपवित्रता बालकापर्यंतही विस्तारित करण्यात आली होती.

स्त्री किंवा पुरुषाच्या सामाजिक व वैवाहिक जीवनास सुरुवात झाल्याची लक्षणे म्हणजेच पुरुषांचा संस्कारविधी व स्त्रियांची रजस्वला होण्याची स्थिती होय. त्यांना एकांतवासात राहावे लागत असे, विशेष प्रकारचे भोजन घ्यावे लागत असे आणि सुंतेप्रमाणेच अंगविच्छेदनही करून घ्यावे लागत असे. अमेरिकेतील टोळ्यांतील लोकांमध्ये अशा संस्काराचे वेळी केवळ विशेष प्रकारचे भोजन घ्यावे लागत नसे, तर ठरावीक वेळेच्या अंतराने वांतीकारक औषधही घ्यावे लागत असे.

विवाहाच्या वेळी जे विधी करण्यात येत असत त्यावरून लग्न ही एक अपवित्र बाब आहे, असा आदिम मनुष्याचा समज होता, असे दिसते. ऑस्ट्रेलियातील पद्धतीप्रमाणे कधी कधी वधूला आपल्या टोळीतील पुरुषांशी शरीरसंबंध करावा लागे किंवा अमेरिकेतील रिवाजाप्रमाणे टोळीतील वैद्यांशी किंवा पूर्व आफ्रिकेतील प्रघाताप्रमाणे वराच्या मित्रमंडळींशी तिला संभोग व्यवहार करावा लागत असे. काही टोळ्यांमध्ये वराने वधूला तलवारीने हळूच ओरखडण्याची प्रथा होती. कुंडासारख्या काही लोकांत वराशी लग्न होण्यापूर्वी प्रथम वधूचे लग्न एका झाडाशी करण्याची रूढी होती. विवाहातील हे सर्व रीतिरिवाज लग्नातील अपवित्रता घालवून तिच्यापासून व्यक्तींचे रक्षण करण्यासाठीच पाळण्यात येत असत.

आदिम मनुष्यासाठी विटाळचा सर्वांत वाईट प्रकार म्हणजे मृत्यू हा होता. केवळ प्रेतच नव्हे, तर मृत मनुष्याच्या वस्तूही अपवित्रतेच्या वाहक मानण्यात येत

असत. मृत मनुष्याच्या शवाबरोबरच त्याची वस्त्रे, शस्त्रे इत्यादी वस्तू पुरण्याच्या सार्वत्रिक प्रघातावरूनही हेच सूचित होते की, त्याच्या वस्तूंचा इतरांनी वापर करणे हे धोकादायक व दुर्भाग्याचे लक्षण मानले जात असे.

वस्तूच्या स्पर्शामुळे होणाऱ्या विटाळाकडे पाहिले तर असे दिसून येते की, प्राचीन माणसे काही वस्तूंना पवित्र मानत होती आणि काही विशिष्ट वस्तूंना अपवित्र मानत होती. एखाद्या मनुष्याने पवित्र वस्तूला स्पर्श करणे म्हणजे ती वस्तू बाटवून अपवित्र करणे होय, असे ते समजत. अपवित्र वस्तू वेगवेगळ्या ठेवण्याचे प्राचीन समाजातील अत्यंत ठळक उदाहरण टोड लोकांमध्ये आढळून येते. त्यांच्या सर्व धार्मिक विधींचा आणि सामाजिक संघटनेचा मुख्य आधार (यात मुळीच अतिशयोक्ती नाही) त्यांच्या गुरांचे, डेअरीचे, दुधाच्या भांड्याचे, दुधाचे व दुग्ध व्यवसायाशी संबंधित असलेल्या लोकांचे विधियुक्त पावित्र्य हाच होता. दुधाची पवित्र भांडी एका वेगळ्या खोलीमध्ये ठेवलेल्या वेगळ्या भांड्याद्वारेच त्यांना दुधाचे वाटप करण्यात येत असे. दुग्धालय सांभाळणारा मनुष्य बहुधा पुरोहितच असे आणि एका सुदीर्घ संस्कारानंतरच त्याच्याकडे हे काम सोपविण्यात येत असे. हा संस्कार म्हणजे शुद्धीकरणाचाच एक प्रकार होता व यामुळे तो सर्वसामान्य मनुष्यांपासून वेगळा होऊन पवित्र कर्तव्य सांभाळण्यास पात्र ठरत असे. त्याच्या वर्तनावर नियंत्रण घालण्यात येत असत. त्याला काही विशिष्ट प्रसंगीच गावामध्ये झोपण्याची परवानगी असे आणि तो जर एखाद्या प्रेतयात्रेत सामील झाला, तर वरील पवित्र कर्तव्य करण्यास तो अपात्र समजून त्याचे ते काम बंद करण्यात येत असे. यावरून हेच अनुमान निघते की, या सर्व विधींचा उद्देश अपवित्रता टाळण्याचाच होता आणि अशा रीतीने पवित्र वस्तूंचे पावित्र्य कायम राखून स्वतः अशुद्ध असलेल्या लोकांच्या उपभोगासाठी त्या वस्तू उपलब्ध करून देण्याचा त्यांचा हेतू होता.

पावित्र्याची कल्पना केवळ वस्तूपुरतीच मर्यादित नव्हती. काही विशिष्ट लोकांचे वर्गही पवित्र मानले जात असत. कारण त्यांना दुसऱ्या एखाद्या माणसाने स्पर्श करणे म्हणजे त्यांना बाटविण्यास कारणीभूत ठरत होते. पोलिनेशिअन लोकांमध्ये अशी रूढी होती की त्यांच्या प्रमुखाला एखाद्या खालच्या दर्जाच्या माणसाने स्पर्श केल्यास अपवित्र समजले जात असे. तथापि त्याचा दंड मात्र त्या हीन दर्जाच्या माणसाला भरावा लागत असे. याउलट 'इफात' मध्ये अशी प्रथा होती की पवित्र माणसाचा संबंध जर 'नामिन'शी (संस्कारासंबंधी अपवित्रता) आला, तर त्याचे पावित्र्य नष्ट होत असे. युगांडामध्ये नवीन देऊळ बांधणयापूर्वी लोकांना स्वतःला शुद्ध करून घेण्यासाठी चार दिवसांचा अवधी देण्यात येत असे. काही अन्य ठिकाणी गटप्रमुख आणि त्याच्या वस्तू बहुधा इतक्या पवित्र मानण्यात येत असत की खालच्या दर्जाच्या



लोकांनी त्यांना स्पर्श केल्यास त्यांना त्या धोकादायक ठरत असत. टांगा बेटामध्ये जो मनुष्य प्रमुखाला स्पर्श करील तो भ्रष्ट झाला असे समजण्यात येत असे आणि हा दोष केवळ उच्च दर्जाच्या प्रमुखाच्या तळपायाला स्पर्श केल्याने नष्ट होत असे. मलाया पेनिन्सुलाध्ये प्रमुखाचे पावित्र्य राजचिन्हामध्ये असते अशी समजूत होती आणि त्याला स्पर्श करणाऱ्यास गंभीर स्वरूपाचा आजार किंवा मृत्यू येतो, अशी समजूत होती.

विदेशी माणसांचा स्पर्श विटाळाला कारणीभूत ठरतो, अशी आदिम लोकांची समजूत होती. दक्षिण आफ्रिकेतील बायोग या लोकांची अशी श्रद्धा होती की, परदेशात प्रवास करणाऱ्यांना परदेशी भूतात्म्याची भूतबाधा होण्याचा विशेष धोका असतो. परदेशी माणसे भ्रष्ट असतात, कारण ती विचित्र देवांची पूजा करून चमत्कारिक प्रभाव प्राप्त करून घेत असतात, असा त्यांचा समज होता. म्हणून त्यांना धूप देण्यात येत असे किंवा अन्य उपायांनी त्यांचे शुद्धीकरण करण्यात येत असे. डीयरी आणि लगतच्या जमातीमध्ये त्या जमातीचाच एखादा माणूस परदेशाचा असे. प्रवास करून परत आला तर त्याला परका समजण्यात येत असे आणि जोपर्यंत तो खाली बसत नाही तोपर्यंत त्याच्याकडे मुळीच लक्ष देण्यात येत नसे.

परदेशातून आलेल्या माणसापासून जेवढी धास्ती बाळगण्यात येत असे, तितकीच धास्ती परदेशात जाण्याबद्दलची बाळगण्यात येत असे. ऑस्ट्रेलियामध्ये जेव्हा एक टोळी दुसऱ्या टोळीजवळ असे तेव्हा त्या टोळ्यांतील लोक हवेच्या शुद्धीकरणासाठी हाती पेटत्या मशाली घेऊन जात असत. त्याप्रमाणेच स्पार्टा देशातील राजा जेव्हा युद्धासाठी जात असे तेव्हा त्याच्यासमोर वेदीतील पवित्र अग्नी घेऊन काही सैनिक सरहद्दीकडे जात असत.

अशाच प्रकारे बाह्य देशातून येऊन घरात प्रवेश करणाऱ्याला केवळ पायातून जोडे काढण्यासाठीही काही ना काही धार्मिक विधी करावा लागत असे. त्यामुळे बाहेरून येणारा शुद्ध होतो, नाहीतर त्याच्या स्पर्शाने तो आतील लोकांनाही अपवित्र करील, असा त्यांचा समज होता. जेव्हा जमातीतील एखादा माणूस भ्रष्ट झालेला असे तेव्हा घरातील माणसे त्याच्यापासून अपवित्र होऊ नयेत म्हणून घराच्या उंबरठ्यावर, दरवाजावर व चौकटीवर रक्त अथवा पाणी शिंपडण्यात येत असे किंवा भ्रष्टता बाहेरच राहावी व भाग्य उजळावे म्हणून दरवाजावर घोड्याची नाल टांगून देत असत. ते सापेक्षतः केवळ अपवित्रतेचेच द्योतक होते, असे अर्थातच म्हणता येण्यासारखे नाही. परंतु स्पष्टपणे अपवित्रतेचे द्योतक असलेल्या अन्य प्रसंगावरून पाहता अन्य हेतूमध्ये ही अपवित्रता घालविण्याचाही एक हेतू या धार्मिक विधीमध्ये होता हेच त्यातून सूचित होते. जन्म, मृत्यू, संस्कारविधी, विवाह आणि पवित्र पुरुषासंबंधीच्या व अपरिचित व्यक्तीच्या व्यवहारात समाजापासून त्यांना वेगळे

ठेवण्याची व विभक्ततेची प्रथा होती.

मुलांच्या जन्माच्या वेळी आईला समाजापासून पृथक ठेवण्यात येत असे. मुलगी वयात आल्यानंतर व संस्कारविधीच्या वेळी पुरुषाला काही काळासाठी अन्य लोकांपासून पृथक राहावे लागत असे. विवाहाचे वेळी, साक्षगंधाच्या वेळेपासून तर लग्नाच्या विधीपर्यंत वधू - वर परस्परांना भेटत नव्हते. मासिक धर्माच्या काळात स्त्रीला अन्य लोकांपासून विभक्त राहावे लागत असे. मृत्यूच्या प्रसंगातील पृथकत्व विशेष लक्षात भरण्याजोगे आहे. केवळ मृत व्यक्तीचे शवच नव्हे, तर त्याच्या नातेवाइकांनाही जमातीतील अन्य लोकांपासून वेगळे राखण्यात येत असे.

या पृथकत्वाची स्पष्ट खूण अशी की, मृताच्या नातेवाइकांचे केस व नखे वाढलेली असत आणि त्यांच्या अंगावील कपडे मळलेले असत. यावरून हेच सिद्ध होते की, त्यांची समाजाकडून होणारी न्हावी, धोबी इत्यादी प्रकारची कामे बंद करण्यात येत असत. मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या घनिष्ठ नात्याच्या प्रमाणात या पृथकत्वाचा काळ व तीव्रता कमी - अधिक होत असे, परंतु पृथकत्व पाळण्यात येत असे, ही वस्तुस्थिती शंकातीत आहे. जर एखाद्या पवित्र व्यक्तीला एखाद्या अशुद्ध व्यक्तीने स्पर्श करून बाटविले किंवा एखाद्यावर जातिजन्य विटाळ असेल किंवा परजातीशी व्यवहार केल्यामुळे एखाद्यावर विटाळ आला असेल तरीसुद्धा तेथे बहिष्काराचा प्रश्न निर्माण होत असे. यामुळे अशुद्ध व्यक्तींना पवित्र व्यक्तीपासून व एका जमातीच्या लोकांना दुसऱ्या जमातीपासून पृथकपणा पाळावाच लागत असे. यावरून हे स्पष्ट होते की, आदिम समाजामध्ये अपवित्रतेला कारणीभूत होणाऱ्या व्यक्तीला विभक्त ठेवण्यात येत असे.

अपवित्रतेच्या भावनेच्या वृद्धीबरोबर आदिम समाजामध्ये शुद्धीकरणाची भावनाही वाढीस लागली आणि अशुद्धता घालविण्यासाठी शुद्धीकरणाचे विधीही निर्माण झाले.

अशुद्धता घालविण्याच्या अनेक साधनांपैकी रक्त आणि पाणी ही दोन साधने होत. विटाळ झालेल्या व्यक्तीवर पाणी किंवा रक्त शिंपडल्यास त्याच्या शुद्धीकरणासाठी पुरेसे ठरत होते. शुद्धीकरणाच्या विधीमध्ये कपडे बदलविणे, केस, नखे इत्यादी कापणे, घाम काढणे, आगीत तापविणे, धूर देणे, सुगंधी द्रव्य जाळणे आणि एखाद्या झाडाच्या डहाळीने वारा घालणे इत्यादींचा समावेश होत होता.

विटाळ घालविण्याची ही साधने होत. परंतु विटाळापासून मुक्त होण्याची आदिम समाजाची आणखीही एक पद्धत होती. ती म्हणजे हा विटाळ दुसऱ्या व्यक्तीमध्ये संक्रमित करण्याची पद्धती होय. जी व्यक्ती आधीच बहिष्कृत असेल अशा व्यक्तीला स्पर्श केल्यामुळे हा विटाळ त्या बहिष्कृत व्यक्तीमध्येच शिरतो असा



त्यांचा समज होता.

न्यूझीलंडमध्ये असा प्रघात होता की, एखाद्याने जर दुसऱ्याच्या डोक्याला स्पर्श केला तर डोके हा शरीराचा 'खास' अशा पवित्र भाग असल्यामुळे त्या स्पर्श करणाऱ्या माणसाला विटाळ होत होता. अशावेळी त्याला वेखंडाच्या मुळीवर (नेचा) आपले हात घासून शुद्धीकरण करून घ्यावे लागत असे. ही मुळी स्त्रियांपैकी जी कुटुंबप्रमुख असेल तिने खाण्याची पद्धत होती टोंगामध्ये, जर एखाद्याने विटाळलेले अन्न खाल्ले तर त्याच्या दुष्परिणामांपासून वाचण्यासाठी टोळीनायकाचा पाय आपल्या पोटावर ठेवावा लागत असे.

अपवित्रतेच्या संक्रमणाची कल्पना बकरा बळी देण्याच्या पद्धतीमध्येही दिसून येते. फिजी बेटामध्ये विटाळलेली व्यक्ती आपले हात टोळी नायकाच्या दृष्टीने पवित्र असलेल्या डुकराला पुसत असे. तर युगांडामध्ये एखाद्या राजासाठी शोक समारंभ असला म्हणजे त्या समारंभाच्या शेवटी एका गाईसोबत एक बळीचा बकरा, एक कुत्रा, एक कोंबडा आणि राजाच्या घरातील थोडी माती व विस्तव शिवेवर नेऊन पोचविण्यात येत असे. राजा आणि राणीची सर्व अपवित्रता घालविण्यासाठी ही उपाययोजना करण्यात येत असे. आदिम समाजात विटाळाच्या भावनेसंबंधी प्रचलित असलेल्या बाबी अशा होत्या.

## २.

आदिम समाजानंतर आपण पुरातन समाजाकडे पाहिले तर असे दिसू येते की, पुरातन समाजाती विटाळाच्या कल्पना आदिम समाजाच्या कल्पनांपेक्षा फारशा भिन्न नव्हत्या. केवळ विटाळाच्या कारणांमध्येच भिन्नता वगळली तर विटाळाच्या कल्पनेचा व शुद्धीकरणाच्या कल्पनेचा ढाचा आदिम समाजामध्ये व पुरातन समाजामध्ये सारखाच होता.

इजिप्तमध्ये भ्रष्टतेसंबंधी जी पद्धती अस्तित्वात होती तिची तुलना आदिम सामाजातील पद्धतीशी करून पाहिली, तर त्यामध्ये फारसा फरक दिसत नाही. इजिप्तमध्ये विस्तृत प्रमाणात ही पद्धती सुरू होती, एवढा एकच फरक आहे.

ग्रीक लोकांमध्ये रक्तपात, भूतबाधा, प्रेतस्पर्श, संभोग, बालकाचा जन्म, मलमूत्र त्याग, वाटाण्याचा रस्सा, लसूण किंवा खवा खाणे, पवित्र स्थळी अनधिकृत मनुष्याचा प्रवेश आणि काही विशिष्ट परिस्थितीत शिव्या देणे व भांडणे ही विटाळाची कारणे मानण्यात येत असत. शुद्धीकरणाच्या साधनांना ग्रीक लोक 'कापोईया' म्हणत असत. ती अशी : मंत्रित पाणी, गंधक, कांदे, विस्तव व धूर देणे, सुगंधी द्रव्ये, झाडाच्या फांद्या, काही झुडपे, राळ, लोकर, विशिष्ट प्रकारचे दगड, ताईत, सोने व

सूर्यप्रकाशासारख्या चकचकीत वस्तू. बळीचे पशू विशेषतः डुक्कर व त्यातही बियाचे रक्त आणि चामडी आणि काही विधी व उत्सव या उत्सवात बळी देण्याच्या व शाप देण्याच्या समारंभांना विशेष महत्त्व असे. शुद्धीकरणाचा एक फारसा प्रचलित नसलेला प्रकार म्हणजे विटाळलेल्या व्यक्तीचे केस कापणे किंवा त्याचा बळी देऊन देवाशी त्याचे सख्य जोडून देणे, असाही होता.

रोमन लोकांच्या विटाळासंबंधीच्या व शुद्धीकरणाच्या कल्पनेतील लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे त्यांच्या एका संपूर्ण भूभागासंबंधीच्या व पूर्ण जातीच्या विटाळासंबंधीच्या कल्पना होत. एखाद्या घराचे शुद्धीकरण करावे त्याप्रमाणे एका संपूर्ण प्रदेशाचे (पागी) शुद्धीकरण करण्याचाही त्यांचा एक विधी होता आणि एका ठरावीक काळाच्या अंतराने त्या संपूर्ण भूप्रदेशाचे शुद्धीकरण या विधीद्वारे करण्यात येत असे. या भूभागाचे शुद्धीकरण करण्यासाठी त्याच्या सीमावरून एक धार्मिक मिरवणूक काढण्यात येत असे आणि बळी दिल्यानंतर हा विधी पूर्ण होत असे. पुरातनकाळी शहराभोवती असलेल्या 'ॲम्बरबियम' नावाच्या भिंतीभोवती अशीच मिरवणूक काढीत असल्याचे दिसून येते. ऐतिहासिक युगामध्येही एखाद्या घोर संकटानंतर अशाच शहराचा शुद्धीकरणाचा विधी करण्यात येत असे. दुसऱ्या प्युनिक युद्धानंतर असे नगराचे शुद्धीकरण करण्यात आले होते. या सर्व प्रायश्चित्त विधीची हेतू देवतांची अनुकूलता प्राप्त करणे हाच होता. नवीन मोहल्ला वसवितानाही असा प्रकाराचा शुद्धीकरण विधी होत असे. सीमेवरील रक्षक 'थर्मिनालिया' आणि शहरातील रस्त्यावरील 'कॉपिटालिया' यांचा उद्‌भवही अशाच विधीतून झाला असला पाहिजे. अगदी अलीकडच्या काळापर्यंत 'लुपसो' नावाचा पुजाऱ्याचा एक वर्ग पॅलेटिनेट नावाच्या रोममधील वस्तीच्या सीमाभोवती प्रदक्षिणा घालीत होता. याच्या काही काळापूर्वी प्राचीन नगराच्या जुन्या सीमाभोवती अशी प्रदक्षिणा दरवर्षी घालण्यात येत असे. यामध्ये अवरल नावाचे पादरी नेतृत्व करीत असत. या समारंभाला 'ॲम्बव्हालिया' असे म्हणण्यात येत असे आणि तो वैशिष्ट्यपूर्ण होता. जेव्हा रोमन राज्याच्या सीमा वृद्धिंगत झाल्या तेव्हा या शुद्धीकरणाच्या विधीचा विस्तार झाल्याचे दिसत नाही. प्रदक्षिणेची वैशिष्ट्यपूर्ण पद्धती इटालीत व इटालीबाहेर आणि विशेषतः ग्रीसमध्येही प्रचलित होती. परंपरागत मंत्रयुक्त प्रार्थना व तिच्यातील शब्द, उच्चाराची कोणतीही चूक न करता म्हणण्याने त्यांच्यावर जादूसारखा प्रभाव पडत होता, असे दिसते. ज्याप्रमाणे रोमच्या कायद्यामध्ये अशी तरतूद होती की प्रचलित कायद्यांच्या शब्दांच्या उच्चारात जर चूक झाली तर त्या वकिलाची बाजू हरली असे समजण्यात येत असे, त्याप्रमाणेच या प्रार्थनांच्या शब्दांच्या उच्चारात काही चूक झाली, तर प्रार्थना म्हणणाऱ्याला प्रायश्चित्त घ्यावे लागत असे.



प्राचीन धार्मिक विधीचे अन्य विचित्र प्रकार दैवी कल्पनांशी निगडित होते. 'साली' नावाचे प्राचीन पादरी काही विशेष प्रसंगी शहरातील अनेक स्थळांची परिक्रमा करीत असत. ते आपल्या शस्त्रांचे व सनयांचे शुद्धीकरण करून घेत असत यावरून हेच दिसून येते की सैन्याची शस्त्रास परिणामकारी ठरण्यासाठी त्यांच्या शुद्धीकरणाची आवश्यकता आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. सरकारी शिरगणतीचा शेवटही एका विधीने होत असे. एका अर्थाने हीसुद्धा एक सैनिकी प्रक्रियाच असे. कारण नागरी वेशामध्ये असलेल्या 'कमिटीया सेन्चुरिआटा' या संस्थेशीच हा विधी संबंधित होता. जेव्हा सैन्य प्रत्यक्ष युद्धाच्या मैदानावर असे तेव्हा जर सैन्य भुताटकीच्या भीतीने भयग्रस्त झालेले असेल तर ती भीती नष्ट करण्यासाठी असा विधी करण्यात येत असे. अन्य समयी हा विधी केवळ रोगप्रतिबंधक उपाय म्हणून करण्यात येत असे. नाविक सैन्याचेही तसेच शुद्धीकरण होत असे.

सर्व आदिम लोकांप्रमाणेच हिंदू लोकही विटाळाची कल्पना मानत असत. त्यांच्या विटाळाच्या कल्पनेचे विशेष म्हणजे घाणेरड्या प्राण्यांच्या प्रेताला स्पर्श झाला किंवा मृत प्राण्याचे मांस खाण्यात आले अथवा सर्व सरपटणाऱ्या प्राण्याला स्पर्श झाला तर विटाळ होतो, अशी त्याची श्रद्धा होती. त्याचप्रमाणे सरपटणाऱ्या प्राण्याचे मांस खाण्यात आले किंवा घाणेरड्या प्राण्यांना स्पर्श झाला तर माणूस अपवित्र होतो, असे ते समजत. ''खूर दुभागलेली सर्व जनावरे, ज्यांचे खूर विभागलेले नाहीत. जे रवंथ करीत नाहीत, जे पंजावर चालतात आणि चार पायांवर चालणाऱ्या सर्व पशूंना ते अपवित्र मानत असत. एखाद्या घाणेरड्या माणसाचा स्पर्शही हिंदूला अपवित्र मानीत असत. हिब्रू लोकांच्या अपवित्रतेच्या कल्पनेसंबंधी आणखी दोन वैशिष्ट्ये सांगण्यासारखी आहेत. मूर्तिपूजेमुळेही मनुष्य अपवित्र होतो व लोकांच्या लैंगिक अपवित्रेमुळे संपूर्ण प्रदेश अपवित्र होऊन जातो, असा त्यांचा समज होता.

या सर्व निरीक्षणावरून आपण सहज असा निष्कर्ष काढू शकतो की आदिम समाजामध्ये किंवा पुरातन सामाजामध्ये विटाळाची कल्पना अमान्य करणारे लोक फारसे नव्हते.

◆◆◆

# २. हिंदूतील अस्पृश्यता

अपवित्रतेच्या बाबातीत आदिम लोक किंवा पुरातन लोक यांच्यापेक्षा हिंदूमध्ये भिन्न अशी कोणतीही बाब नाही. त्यांना अपवित्रतेची कल्पना मान्य होती, याचे विपुल पुरावे मनुस्मृतीमध्ये आहेत. शरीरिक अपवित्रता. मानसिक अपवित्रताही मनूला मान्य आहे.

मनूने जन्म, मृत्यू आणि मासिर धर्म यांना अपवित्रतेचे जनक मानलेले आहे. मृत्यूसंबंधीची अपवित्रता विस्ताराने फराच व्यापक होती. रक्ताच्या नात्याप्रमाणे तिचा विस्तार कमी अधिक होत असे. मृत व्यक्तीच्या परिवारातील सर्व व्यक्तींना सपिंड व समानोदक म्हणण्यात येत असे. सुतक (अपवित्रता) येते. त्याच केवळ आई-वडील, नातेवाइकांचाच -उदा मामा-समावेश होत असे- असे नव्हे, तर दूरच्या नात्यातील लोकांचाही समावेश होत असे. इतकेच नव्हे, तर त्याचा विस्तार

१) गुरू,
२) गुरुपुत्र
३) गुरुपत्नी
४) शिष्य
५) सहपाठी
६) श्रोत्रीय
७) राजा
८) मित्र
९) कुटुंबातील लोक
१०) आणि शववाहक लोक अशा गैरनातेवाईक लोकांपर्यंतही पोचत असे.

अपवित्रतेच्या टप्प्यामध्ये येणारी कोणतीही व्यक्ती त्यापासून सुटू शकत नसे. काही विशिष्ट व्यक्तीनाच त्यातून सूट मिळत असे. पुढील श्लोकांमध्ये मनूने त्यांना वगळले असून त्यांना वगळण्याची कारणेही त्यात दिलेली आहेत.

**अध्याय ५ श्लो. ९६ :** ''राजा व अन्य व्रतधारी लोक आणि यज्ञ कार्यात रत असलेले लोक सुतकातून मुक्त राहतात. कारण राजा हा इंद्रासनावर बसलेला असतो आणि अन्य दोन्ही प्रकारचे लोक सदैव ब्राह्मणांप्रमाणे पवित्रच असतात.

**श्लोक ९४ :** ''राजा महान सिंहासनावर आरूढ झालेला असल्यामुळे व प्रजेचे रक्षण करण्यासाठीच तो सिंहासनावर आरूढ झालेला असल्यामुळे त्याला पवित्र करून घेण्याची तातडीची व्यवस्था करण्यात आली आहे.''



**अध्याय ५ श्लोक ९५ :** जे लोक युद्धात किंवा बंडामध्ये ठार झाले त्यांच्या नातेवाइकांनाही हाच नियम लागू आहे. त्याप्रमाणे वीज पडून मरण पावलेल्यांच्या नातेवाइकांना, राजाने देहदंड दिलेल्या व्यक्तीच्या नातेवाइकांना, गोब्राह्मणाच्या रक्षणासाठी मरण पावलेल्यांच्या नातेवाइकांना हाच नियम लागू असून ज्यांना त्वरित शुद्ध करून घ्यावे अशी राजाची इच्छा असेल त्यांनाही हा सद्यःशौचाचा नियम लागू आहे.''

**अध्याय ५ श्लोक ९६ :** जगाच्या आठ संरक्षक देवांत- चंद्र, अग्नी, सूर्य, वायू, इंद्र, कुबेर, वरुण आणि यम यांचा राजा हा अवतार आहे.

**अध्याय ५ श्लोक ९७ :** वरील देवतांची अधिष्ठापना राजाच्या ठायी असल्यामुळे ऐहिक जगातील पवित्रता, अपवित्रता त्याला बाधत नाही. कारण मृत्युलोकांतील मानवाची पवित्रता व अपवित्रता यांना देवताच निर्माण व नष्ट करतात.

यावरून हे स्पष्ट दिसून येते की, मनूच्या मताप्रमाणे उदात्त कार्यासाठी ज्यांना मृत्यू आला त्यांच्या नातेवाइकांना, राजाला व राजाने तशी कोणाला सवलत दिल्यास त्यांना सुतकाच्या सर्वसामान्य नियमांची बाधा होत नसे. 'ब्राह्मण सदैव पवित्र असतो' हे मनूचे विधान सर्वापेक्षा श्रेष्ठ असे पद ब्राह्मणांना असल्याचे दर्शविण्यासाठी सर्वसामान्य अर्थाने वारलेले आहे, हे ध्यानात घ्यायला हवे. ब्राह्मण अपवित्रतेपासून सदैव मुक्त होता, असा त्याचा अर्थ नाही. कारण तो तसा नव्हता. अब्राह्मणांना लागू नसलेले जन्म आणि मृत्यूव्यतिरिक्त अपवित्रतेचे अनेक नियम ब्राह्मणाला लागू होते. केवळ ब्राह्मणांनाच लागू होणाऱ्या निषेधांनी व अशुद्धतेबद्दलच्या आज्ञांनी मनुस्मृती पुरेपूर ठासून भरलेली असून ब्राह्मणाला त्यांचे पालन करणे अनिवार्य होते व त्यांचे पालन करण्यास तो चुकला तर तो अपवित्र होत असे.

अशुद्धतेसंबंधी मनूच्या ज्या कल्पना होत्या त्या केवळ काल्पनिक नसून प्रत्यक्ष व्यवहरात चालू होत्या. अशुद्ध व्यक्तीद्वारा देण्यात आलेले भोजन त्याने अग्राह्य ठरविले आहे.

याशिवाय मनूने सुतकाचा काळही ठरवून दिलेला आहे. तो विभिन्न आहे. सपिंडाच्या मृत्यूबद्दल हा काळ दहा दिवसाचा आहे. लहान बालकांसाठी तीन दिवसांचा व सहपाठी मित्रासाठी एक दिवसांचा अवधी त्याने सांगितला आहे. केवळ नेमून दिलेला काळ लोटण्याने अपवित्रता जात नाही, तर या काळाच्या शेवटी प्रसंगानुरूप विधीही करावा लागतो.

शुद्धीकरणाच्या हेतूसाठी मनू व्यक्तीकडे तीन दृष्टिकोनांतून पाहतो :

१) शारिरीक अपवित्रता २) भावनिक किंवा मानसिक अपवित्रता आणि ३) नैतिक अपवित्रता. वाईट विचार केल्यामुळे नैतिक अपवित्रता येते आणि या

अपवित्रतेचे शुद्धीकरण करण्याचा उपाय म्हणजे त्याला आग्रहपूर्वक उपदेश करणे एवढाच आहे. परंतु मानसिक व शारीरिक अपवित्रता घालविण्यासाठी सांगितलेले विधी अन्य देशांतील लोकांसारखेच आहेत. या विधीमध्ये पाणी, माती, गोमूत्र, दूर्वा (कुश) आणि राख यांचा समावेश असे. निर्जीव अशा वस्तूंचा स्पर्श झाल्यामुळे जी अपवित्रता येत असे, ती शारीरिक अपवित्रता घालविण्यासाठी माती, दूर्वा, गोमूत्र आणि राख या वस्तूंचा उपयोग करण्यात येई. मानसिक अपवित्रता घालविण्याचे पाणी हे प्रमुख साधन आहे. त्याचा उपयोग तीन प्रकारे करण्यात येतो. (१) आचमन, (२) आंघोळ आणि (३) शिंपडणे. पुढील काळात मानसिक अपवित्रचा घालविण्यासाठी पंचगव्य विशेष महत्त्वाचे मानण्यात येऊ लागले. गाईपासून मिळणाऱ्या पाच वस्तूंच्या- म्हणजे दूध, गोमूत्र, शेण, दही आणि लोणी यांच्या मिश्रणाने हे तयार होते

अपवित्रतेचे संक्रमण करून तिच्यापासून मुक्त होण्याची व्यवस्थाही मनूने करून ठेवली आहे. उदा . गाईला स्पर्श केल्यामुळे किंवा पाण्याचे आचमन करून सूर्याकडे पाहिल्यानेही अपवित्रता नष्ट होते, असे त्याचे म्हणणे आहे.

व्यक्तिगत अपवित्रतेशिवाय प्रादेशिक व जातीय अपवित्रतेवरही हिंदूचा विश्वास असून ही अपवित्रता दूर करण्याचे उपाय जुन्या रोमरासी लोकांच्या उपायाप्रमाणेच आहे. प्रत्येक खेड्यामध्ये एक वार्षिक जत्रा भरतच असते. एक जनावर-बहुधा एक हेला खेड्याच्यावतीने विकत घेण्यात येतो. त्या हेल्याची गावाभोवती मिरवणूक काढण्यात येते आणि नंतर त्याचा बळी देण्यात येतो. त्याचे रक्त गावाभोवती शिंपडण्यात येते आणि शेवटी त्याच्या पायाचे मांस गावकऱ्यांमध्ये वाटून देण्यात येते. प्रत्येक हिंदू व प्रत्येक ब्राह्मणाने तो गोमांस खाणारा नसला तरीही त्याला आपला मांसाचा वाटा घेणे भाग पडत असे. याचा उल्लेख कोणत्याही स्मृतीत नसला तरीही त्याला रूढीची मान्यता होती. आणि हिंदू धर्मात रूढींना एवढी अधिक मान्यता आहे की त्या लिखित नियमापेक्षा नेहमीच वरचढ ठरतात.

येथेच थांबून विचार केला तर आदिम समाजामध्ये व पुरातन समाजामध्ये प्रचलित असलेल्या अपवित्रतेच्या बद्दलच्या कल्पना व हिंदू समाजातील त्यासंबंधातील कल्पना यात काही फरक नाही असेच कोणीही म्हणेल. परंतु येथेच थांबता येण्यासारखे नाही. कारण हिंदू पाळत असलेला अस्पृश्यतेचा दुसराही एक प्रकार असून त्याचा ऊहापोह अजून झालेला नाही. काही विशिष्ट जातीतील वंशपरंपरागत अस्पृश्यतेचा हा प्रकार होय. अशा जातींची यादी तयार करणे कोणाही एकट्यादुकट्या व्यक्तीला सहज शक्य होण्यासारखे नाही. सुदैवाने भारत सरकाने अशी यादी १९३५ साली तयार केलेली असून भारत सरकारनेच तयार केलेल्या



भारत सरकारच्या १९३५ च्या कायद्याला जे आज्ञापत्र जोडलेले आहे त्यात परिशिष्टाच्या रूपाने ती समाविष्ट करण्यात आली आहे. हे परिशिष्ट नऊ भागांत विभागलेले आहे. एका भागाचा संबंध एका प्रांताशी असून त्यामध्ये त्या प्रांतातील जाती, वंश, टोळ्या किंवा अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकसमूहांचा समावेष करण्यात आला आहे. या जाती त्या संपूर्ण प्रांतभर पसरलेल्या आहेत किंवा त्याच्या काही भागांत आहेत. ही यादी सर्वसमावेशक व अधिकृतही मानता येण्यासारखी आहे. हिंदूंनी वंशपरंपरागत अस्पृश्य मानलेल्या जातीच्या विशाल संख्येची कल्पना करून देण्यासाठी त्या आज्ञापत्रामध्ये दिलेली यादी मी खाली देत आहे.

### विभाग १ : मद्रास

### (१) सर्व प्रातभर विद्यमान असलेल्या अनुसूचित जाती

| | | |
|---|---|---|
| आदि-आंध्र | बंडी | बेल्लोर |
| आदि-द्रविड | बकुड | बैरा |
| आदिकर्नाटक | | बारिकी |
| असंघतीय | बवुरी | चचाटी |
| अजिल | वत्तड | चक्किलियन |
| चलवादी | कूसा | पैण्डा |
| चमार | कोरगा | पाकी |
| चांडाळ | कुडुम्बन | पल्लन |
| चेरुमन | कुरवन | पम्बड |
| डंडासि | मदारी | पामिदी |
| गोडगली | मादिगा | पंचम |
| गोदरी | मैला | पनियन |
| गोड्डा | माला | पन्निआनदी |
| गोसंगी | मालादासू | परैयान |
| हड्डी | मातंगी | परवन् |
| हसल | मोगर | पुलयन् |
| होलेया | मुची | पुथिराई वण्णन् |
| जग्गली | मुंदल | रनेयर |
| जमम्बुवुल | नलकेयावा | रेल्ली |
| कल्लाडी | नयादी | समगर |
| कनक्कन | पगदाई | सम्बन् |

| | | |
|---|---|---|
| कोडालो | पैदी | सपारी |
| सेम्मन | थोटी | तिरुवल्लुवर |
| वल्लुवन | वाल्मिकी | वेतुवन |

**(२) मागासवर्गीय प्रदेश व मागसवर्गीय जातीचा प्रतिनिधी प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर निवडून घेण्यासाठी भारत सरकारच्या १९३५ च्या कायद्यान्वये उभारण्यात आलेल्या राखीव मतदार संघाशिवाय प्रातांच्या अन्य सर्व भागांत उपलब्ध असलेल्या अनुसूचित जातीची नावे :**

| | | |
|---|---|---|
| अरनादन | कट्टनायन् | कुरुमन |
| डेम्बो | कुडिया | मालासर |
| कदन | कुडुबी | मविलन् |
| करिम्पालन | कूरिच्छन | पानो |

## विभाग २ : मुंबई

**(१) संपूर्ण प्रांतातील अनुसूचित जाती**

| | | |
|---|---|---|
| असोदा | चांभार किंवा मोची | धेगू मेगू |
| बकड | समगर | ढोर |
| भाम्बी | चेना–दासरु | गारोडी |
| भंगी | चुहर किंवा चुहरा | हाल्लीर |
| चक्रवद्य–दासर | डकलेरु | हलसर किंवा हसरल |
| चलवादी | धेड | हुलसावार |
| होलया | महार | शेणवा किंवा सिंघवा |
| खालपा | मघवाल किंवा मेघवार | शिंघरव किंवा शिंगद्या |
| कोलचा किंवा कोलघा | मांग गारुडी | सोची |
| कोळी ढेर | मिनी मादिग | तिमाली आणि तुरी |
| लिंगादेर | मुकुरी | वनकर |
| मादगी किंवा मांग | नदिया | विठोलिया |

**२) अहमदाबाद, खेड, भडोच, पंचमहाल आणि सुरत जिल्हे वगळून बाकी सर्व प्रांतभर मोची**

**३) कन्नड जिल्ह्यात – कोटगर**



## विभाग ३ : बंगाल

**सर्व प्रांतभर असलेल्या अनुसूचित जाती**

| | | |
|---|---|---|
| अगरिया | हारा | महर |
| बागडी | हो | मल्ल |
| बहेलिया | जालिया कैवर्त | माछ |
| बैती | कादर | मेहतर |
| बौरी | कालपहाडिया | मुची |
| बेदिया | कान | मुंडा |
| बेलदार | कान्ध | मुसावर |
| बरुआ | कंदर | नागासया |
| भाटिया | कावरा | नामशुद्र |
| भुईमाली | कपूरिया | नट |
| भुईया | करैया | नूनिया |
| भुमीज | कासा | ओरावँ |
| बिंद | काउर | पालिया |
| बिंझिआ | खैरा | पान |
| चमार | खटिक | पासी |
| धोबा | कौरा | पटनी |
| दोआई | कोनाई | पोद |
| डोम | कोनवार | राभा |
| दुसांध | कोरा | राजवंशी |
| गारो | कोतल | रजवार |
| घासी | लालबेगी | सन्ताल |
| गोनऱ्ही | लोधा | सुनरी |
| हाडी | लहोर | तियार |
| हजंग | माहली | तुरी |
| हलालखोर | माल | धेनूनार |
| झालोमालो किंवा मालो | | |

## विभाग ४ : संयुक्त प्रांत

**१) संपूर्ण प्रांतभर असलेल्या अनुसूचित जाती**

| | | |
|---|---|---|
| अगरिया | बेरिया | करवाल |
| अहेरिया | चमार | खारोट |
| बडी | चेरी | खारवार (बेनबंसी सोडून) |
| बधिक | दबगर | खाटिक |
| बहेलिया | धनगर | कोल |
| बजनिया | धनुक (भंगी) | कोखा |
| बाजगी | धारकर | लालबेगी |
| बलहार | धोबी | मझवार |
| वाल्मीकी | डोम | नट |
| बनमानूस | डोमास | पंखा |
| बांसफोड | घरामी | पराहिया |
| बरवार | घासिया | पासी |
| बसोर | ग्वाल | पटारी |
| बावरिया | हाबुरा | राऊत |
| बेलदार | हारी | सहरिया |
| बंगाली | हेला | सन्हौडिया |
| बेडिया | खैराह | सासिया |
| भान्तु | कलाबाज | शिल्पकार |
| भुईया | कंजर | थारु |
| भुईयार | कापडिया | तुरैहा |

**२) आग्रा, मीरत आणि रोहीलखंड प्रदेश सोडून बाकीच्या प्रांतांत कोरी**

## विभाग ५ : पंजाब

**संपूर्ण प्रांतभर असलेल्या अनूसूचित जाती**

| | | |
|---|---|---|
| आदिधर्मी | मरिजा किंवा मारेचा | गंधील |
| बावरिया | बंगाली | खाटिया |
| चमार किंवा वाल्मीकी | बरर | कोरी |



| | | |
|---|---|---|
| दागी आणि कोळी | वाजोगर | नट |
| डमना | भांजरा | पासी |
| ओड | चनल | पेरना |
| सांसी | धानक | सपेला |
| | गगड | सिरकीबंद |
| सराढे | मेघ | रामदासी |

## विभाग ६ : बिहार

**१) संपूर्ण प्रांतात असलेल्या अनुसूचित जाती**

| | | |
|---|---|---|
| चमार | हलालखोर | मोची |
| चौपाल | हारी | मुसाहर |
| धोबी | कंजर | नट |
| दुसाध | कुरारिअर | पासी |
| डोम | लालबेगी | |

**२) पाटणा व तिरहूट प्रदेश आणि भागलपूरस, मोंघीर पालमाऊ आणि पूर्णिआ जिल्ह्यात–**

| | | |
|---|---|---|
| बौरी | भूमजी | रजवाड |
| भोगता | घासी | तूरी |
| भुईया | पान | |

**३) मानभूम जिल्ह्यातील धनबाद प्रदेशात, केंद्रीय मानभूम सार्वजनिक खेडे विभाग मतदार संघ पुरुलिया आणि रघुनाथपूर नगरपालिकामधील अनुसूचित जाती–**

| | | |
|---|---|---|
| बौरी | घासी | रजवाड |
| भोगता | पान | तुरी |
| भुईया | | |

## विभाग ७ : मध्यप्रदेश आणि वऱ्हाड

अनुसूचित जाती : प्रदेश
बसोर किंवा बुरुड
चामार किंवा चमार
डोम

| | |
|---|---|
| गंडा | संपूर्ण प्रांतभर |
| मांग | |
| मेहतर किंवा भंगी | |
| मोची | |
| सतनामी | |
| औधोलिया | बिलासपूर जिल्ह्यात |
| बहना | अमरावती जिल्ह्यात |
| बलाही किंवा बलाई | वऱ्हाड, बालाघाट, भंडारा, बैतूल, चंद्रपूर, छिंदवाडा, हुशंगाबाद, जबलपूर, मंडला, नागपूर, नेमाड, सागर आणि वर्धा जिल्ह्यात. |
| बेडर | अकोला, अमरावती व बुलडाणा जिल्ह्यात |
| चदर | भंडारा व सागर जिल्ह्यात |
| चौहान | द्रुग जिल्ह्यात |
| दाहायट | सागर जिल्ह्यात दमो तालुक्यात |
| देवार | बिलासपूर, दुर्ग आणि रायपूर जिल्ह्यात |
| धानुक | दमो तालुका सोडू सागर जिल्ह्यात |
| धोवर | भंडारा जिल्ह्यात |
| धोबी | भंडारा, बिलासपूर, रायपूर, सागर जिल्ह्यात व हुशंगाबाद जिल्ह्यातील शिवनी, मालवा तालुक्यात |
| डोहोर | वऱ्हाड, बालाघाट, भंडारा, चांदा, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात. |
| घासिया | वऱ्हाड, बालाघाट, भंडारा, बिलासपूर, चांदा, दुर्ग, नागपूर, रायपूर आणि वर्धा जिल्ह्यात |
| होलिया | बालाघाट व भंडारा जिल्ह्यात |
| जंगम | भंडारा जिल्ह्यात |
| कैकाडी | वऱ्हाड, भंडारा, चांदा,नागपूर व वर्धा जिल्ह्यांत |
| काटिया | वऱ्हाड, बालाघाट, बैतुल, भंडारा, बिलापूर, चांदा, दुर्ग, नागपूर, नेमाड, रायपूर आणि वर्धा जिल्ह्यात, हुशंगाबाद शहर आणि हुशंगाबाद जिल्ह्यातील शिवनी, माळवा तहसिलीत, शिवनी तालुका सोडून छिंडवाडा जिल्ह्यात आणि दमो तालुका सोडून सागर जिल्ह्यात. |



| | |
|---|---|
| | खनगर भंडारा, बुलडाणा सागर जिल्ह्यात आणि हुशंगाबाद शहर व हुशंगाबाद जिल्ह्यातील शिवनी माळवा तहसिलीत. |
| खाटिक | वऱ्हाडात, बालाघाट, भंडारा, चांदा, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात, हुशंगाबाद तहसिलीत, शिवनी तहसील, बाकीच्या छिंदवाडा जिल्ह्यात आणि दमो तालुका सोडून बाकीच्या सागर जिल्ह्यात. |
| कोळी | भंडारा आणि चांदा जिल्ह्यात |
| कोरी | अमरावती, बालाघाट, बैतुल, भंडारा, बुलडाणा, छिंडवाडा, जबलपूर, मंडला, नेमाड, रायपूर आणि सागर जिल्ह्यात आणि हर्दा व सोहागपूर तहसील सोडून बाकीच्या हुशंगाबाद जिल्ह्यात. |
| कुंभार | भंडारा आणि सागर जिल्ह्यात आणि हुशंगाबाद व शिवनी आणि माळवा तहसिलीत. |
| मादगी | वऱ्हाडात व बालाघाट, भंडारा, चांदा, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात. |
| माला | बालाघाट, बैतुल, छिंदवाडा, हुशंगाबाद, जबलपूर, |
| मंडला | नेमाड आणि सागर जिल्ह्यात. |
| मेहरा किंवा महार | हुशंगाबाद जिल्ह्याचे हर्दा व सोहगपूर तालुके वगळून संपूर्ण प्रांतामध्ये. |
| नगारची | बालाघाट, भंडारा, छिंदवाडा, मंडला, नागपूर आणि रायपूर जिल्ह्यात. |
| ओझा | बालाघाट, भंडारा आणि मंडला जिल्ह्यात व हुशंगाबाद तहसिलीत. |
| पंका | वऱ्हाडात व बालाघाट, भंडारा, बिलासपूर, चांदा, दुर्ग, नागपूर, रायपूर, सागर आणि वर्धा जिल्ह्यात आणि शिवनी तहसील वगळून छिंदवाडा जिल्ह्यात. |
| पारधी | हुशंगाबाद जिल्ह्यातील नरसिंगपूर तहसिलीत. |
| परधान | वऱ्हाडात भंडारा, चांदा, नागपूर, नेमाड, रायपूर आणि वर्धा जिल्ह्यात आणि शिवनी तहसील वगळून छिंडवाडा जिल्ह्यात |
| रुज्झर | हुशंगाबाद जिल्ह्यातील सोहागपूर तालुक्यात. |

## विभाग ८ : आसाम

### १) आसाम खोऱ्यातील अनुसूचित जाती

| | | |
|---|---|---|
| नामसूद्र | हिरा | मेहतर किंवा भंगी |
| कैवर्त | लालबेगी | बंसफोड |
| बनिया किंवा ब्रिट्टियल बनिया | | |

### २) सर्मा खोऱ्यातील अनुसूचित जाती

| | | |
|---|---|---|
| माळी किंवा भुईमाळी | सूत्रधार | कैवर्त किंवा जालिया |
| धूपी किंवा धोबी | मुची | लालबेगी |
| दुगल किंवा ढोली | पाटनी | मेहतर किंवा भंगी |
| झाली किंवा मालो | नामसुद्र | बंसफोड |
| महरा | | |

## विभाग ९ : ओरिसा

### १) सर्व प्रांतभर असलेल्या अनुसूचित जाती

| | | |
|---|---|---|
| आदि आंध्र | चचाटी | धोबा किंवा धोबी |
| औधेलिया | चमार | गंडा |
| बारिकी | चांडाल | घुसूरिया |
| बसीर किंवा बुरुड | दंडासी | गोडगली |
| बुवरी | देवार | गोदरी |
| गोदरा | मादिगा | पैन्डा |
| गोखा | माहुरिया | पमिदी |
| हाड्डी किंवा हारी | माला | पंचम |
| इरिका | मांग | पंका |
| जग्गाली | मांगन | रेल्ली |
| कंद्र | मेहर किंवा महार | सपारी |
| कटिआ | मेहतर किंवा भंगी | सतनामी |
| केला | मोची किंवा मुची | सियाल |
| काडाली | पैदी | वाल्मीकी |

### २) खोडमाल जिल्हा, संबलपूर जिल्हा आणि १९३६ च्या भारत सरकारच्या आदेशानुसार, विजागापट्टममधून व मद्रासच्या गंजाम भागातून ओरिसामध्ये समाविष्ट करण्यात आलेला प्रदेश वगळून शेष प्रांतभर आढळणाऱ्या



**अनुसूचित जाती**

**पान किंवा पानी**

### ३) खोडमाल जिल्हा व वर उल्लेखलेला नवीन जोडण्यात आलेला प्रदेश वगळून शेष प्रांतात आढळणाऱ्या अनुसुचित जाती

**डोम किंवा डम्बो**

### ४) संबलपूर जिल्हा सोडून शेष प्रांतभर आढळणाऱ्या अनुसूचित जाती

**बौरो भूमजी तुरी**
**भुईया घासी किंवा घासिया**

### ५) संबलपूरच्या नवपारा या तहसिलीमध्ये

**कोरी नगारची तुरी**

ही अतिशय भयानक यादी आहे. तिच्यात ४२९ जातींचा समावेश झालेला आहे. त्यांच्या लोकसंख्येचा हिशेब केला तर या पाच ते सहा कोटी लोकांचा केवळ स्पर्शही हिंदूंना अपवित्र करण्यास कारणीभूत ठरतो. आदिम आणि प्राचीन समाजातील अस्पृश्यता या भारतव्यापी वंशपरंपरागत कोट्यवधी लोकांच्या अस्पृश्यतेसमोर प्रभावाच्या दृष्टीने निश्चितच फिकी पडते. हिंदूतील ही अस्पृश्यता बेजोड असून तिच्यासारखी तीच आहे. जगाच्या इतिहासात तिला तोड नाही. आशिया आणि युरोपातील अनेक देशांच्या लोकसंख्येहून मोठी लोकसंख्या असल्यामुळे व त्याची जनसंख्या पाच हजार कोटींच्या वर जाईल इतकी अवाढव्य असल्यामुळेच ही अस्पृश्यता बेजोड ठरते असे नाही, तर त्याला इतरही कारणे आहेत.

या ४२९ जातींना अस्पृश्य बनवून सोडणाऱ्या हिंदूंच्या या पद्धतीमध्ये इतक्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी आहेत की अहिंदूंच्या प्रारंभिक अथवा प्राचीन समाजांमध्ये अशा प्रकारच्या अस्पृश्यतेची प्रथा मुळीच आढळत नाही. अपवित्रतेपासून रक्षण करण्यासाठी अहिंदू समाजामध्ये जे पृथक्करणाचे नियम सांगितलेले आहेत, ते तर्कसंगत नसले तरी निदान समजून घेण्यासारखे आहेत. ते केवळ जन्म, मृत्यू, विवाह इत्यादी विशिष्ट कारणांसाठीच आहेत. (परंतु हिंदू समाजामध्ये) जे पृथकत्व नेमून दिलेले आहेत त्यामागे कोणतेही कारण नाही, हे उघड आहे.

प्रारंभिक समाजामध्ये जी अपवित्रता पाळण्यात येत होती, ती तात्पुरती असून फारच थोड्या कालावधीसाठी असे. ती केवळ खाणे, पिणे इत्यादी प्राकृतिक कार्यकालापर्यंत किंवा जीवनामध्ये निसर्गतः उद्‌भवणाऱ्या जन्म, मृत्यू, मासिक धर्म इत्यादी प्रसंगांपुरतीच मर्यादित असे आणि हा अपवित्रतेचा अवधी निघून गेला म्हणजे

व शुद्धीकरणाचा विधी पार पाडला म्हणजे ती अपवित्रता नष्ट होत असे व ती व्यक्ती पुन्हा समाजात वावरण्याजोगी स्पृश्य होत असे. परंतु भारतातील या पाच – सहा कोटी लोकांची १) अस्पृश्यता जन्म, मृत्यू इत्यादींनी उद्भवणाऱ्या अस्पृश्यतेपेक्षा पूर्णतः भिन्न असून ती कायमस्वरूपाची आहे. जे हिंदू त्यांना स्पर्श करण्यामुळे बाटतात, ते शुद्धीकरण विधी करून शुद्ध होऊ शकतात. परंतु अस्पृश्यांना शुद्ध करून घेण्याचे कोणतेही साधन नाही. २) ते जन्मजात अपवित्र आहेत, ते जन्मभर अपवित्रच राहतात, अपवित्र म्हणूनच ते मरतात आणि ते ज्या मुलांना जन्म देतात ते आपल्या कपाळावर अपवित्रतेचा कलंक घेऊन जन्माला येतात. वंशपरंपरागत कायमस्वरूपाच्या कलंकाची ही बाब असून कोणत्याही उपायाने ती विशुद्ध होऊ शकत नाही. ३) तिसरी गोष्ट अशी की ज्या अहिंदू समाजात अपवित्रतेची कल्पना प्रचलित होती ते तिचा संसर्ग झालेल्या व्यक्तींना वेगळे ठेवीत होते किंवा जास्तीत जास्त त्या व्यक्तीशी घनिष्ठपणे संबंधित असलेल्यांना पृथक ठेवीत होते. परंतु हिंदूतील अस्पृश्यतेमध्ये एका वर्गाचा– अशा वर्गाचा की ज्याची आज पाच ते सहा कोटी लोकसंख्या आहे – अंतर्भाव आहे.

४) चौथी बाब अशी ही की अहिंदू समाज केवळ दूषित व्यक्तींनाच पृथक करीत असत. परंतु त्यांना ते वेगळ्या निवासस्थानात कायमचे विभक्त करून टाकीत नसत. हिंदू समाज अस्पृश्यांच्या कायम विभक्तपणाचा आग्रह धरतो. अस्पृश्यांच्या निवासस्थानी हिंदू वास करणार नाही आणि हिंदूंच्या घरात प्रवेश करण्यासाठी अस्पृश्यालाही परवानगी देणार नाही. हिंदू लोकांमध्ये प्रचलित असलेल्या अस्पृश्यतेचे हे मूलभूत लक्षण आहे. केवळ सामाजिक बहिष्काराची ही बाब नव्हे किंवा काही काळासाठी तात्पुरता सामाजिक व्यवहार बंद करणे नव्हे. ही प्रादेशिक विभक्तपणाची बाब अस्पृश्यांना एका काटेदार परकोट असलेल्या पिंजऱ्यामध्ये बंद करण्यासारखे आहे. प्रत्येक हिंदू खेड्यामध्ये असा एक घेट्टो (यातनाघर) आहे. हिंदू गावात राहतात आणि अस्पृश्य या घेट्टोमध्ये राहतात.

हिंदूंची अस्पृश्यतेची पद्धत ही अशी आहे. अहिंदू समाजामध्ये आढळणाऱ्या प्रकारापेक्षा ती निखालसपणे वेगळी नाही असे कोणी तरी म्हणू शकेल काय? हिंदूतील अशपृश्यता ही एकमेवाद्वितीय अशी बाब आहे, हे निर्विवाद आहे. अहिंदू समाजात व्यक्तींना अशुद्ध मानण्यात येत असले तरी त्यांना व्यक्तिशः तसे मानण्यात येते. एखादा संपूर्ण वर्ग अशुद्ध असल्याची वागणूक कधीही देण्यात आली नाही. शिवाय त्यांचे अशुद्धत्व तात्कालिक असे. आणि काही शुद्धीकरणाचा विधी करून ती अशुद्धता घालविण्यात येण्यासारखीही होती. 'एकदा अशुद्ध तो नेहमीसाठी अशुद्ध' या नियमाप्रमाणे कायम अशुद्ध मानल्याचे कधीही एकही उदाहरण घडले नाही. अहिंदू



जमातीमध्ये व्यक्तींना अशुद्ध मानण्यात येत असे आणि त्यांच्याशी सामाजिक व्यवहारही तोडून टाकण्यात येत असे. परंतु कायमस्वरूपाच्या विभक्त गटांमध्ये व्यक्तींना घातल्याचा प्रसंग मुळीच आढळत नाही. कधी कधी अहिंदू समाजामध्ये सर्वच्या सर्व लोक अशुद्ध समजण्यात येत असत. परंतु ते स्वजनांपेक्षा वेगळे परदेशी लोक असत. आपल्याच लोकांपैकी एका गटाला कायमपणे व वंशपरंपरागत अशुद्ध मानल्याचे कोठेही उदाहरण नाही.

अशा तऱ्हेने हिंदूतील अस्पृश्यताही एक विचित्र व जगाच्या अन्य भागांतील मानवतेला अपरिचित अशी बाब आहे. प्रारंभिक, पुरातन किंवा आधुनिक अशा कोणत्याही समाजामध्ये तिला तोड सापडण्यासारखी नाही. या अस्पृश्यतेचा अभ्यास करताना जे अनेक प्रश्न उद्भवतात, ज्यांच्या संशोधनाची निकड भासते, त्यांचे स्वरूप पुढील दोन प्रश्नांद्वारे सांगता येईल :

(१) अस्पृश्य लोक गावाच्या बाहेर का राहतात?

(२) त्यांची अशुद्धता स्थायी व निर्मूलन न होण्यासारखी कशामुळे बनली?

पुढील पृष्ठांमध्ये या दोन प्रश्नांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

◆◆◆

प्रबुद्ध भारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवस्थापन नागपूर-१७

## भाग दोन

## वसतिस्थानाचा प्रश्न

# ३. अस्पृश्य लोक गावाबाहेर का राहतात?

अस्पृश्य गावाबाहेर राहतात, ही इतकी कुप्रसिद्ध बाब आहे की, ज्यांना त्यांच्यासंबंधी विशेष माहिती नाही, त्यांच्याही ही गोष्ट लक्षात आली असली पाहिजे. तथापि, त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करण्याइतका हा गंभीर प्रश्न आहे, असे कोणालाही वाटले नाही. गावाच्या बाहेर अस्पृश्य काय म्हणून राहू लागले? त्यांना प्रथम अस्पृश्य म्हणून घोषित करण्यात येऊन नंतर त्यांना गावाबाहेर हाकलण्यात आले व तेथे राहण्यास भाग पाडण्यात आले काय? की सुरुवातीपासूनच ते गावाबाहेर राहात होते व म्हणून त्यांना अस्पृश्य म्हणून घोषित करण्यात आले? ते अगदी सुरुवातीपासूनच गावाबाहेर राहात होते असे जर उत्तर असेल तर त्यातून दुसरा प्रश्न निर्माण होतो. तो म्हणजे, त्याचे कारण काय असावे ?

अस्पृश्यांच्या विभक्त वसाहतीचा प्रश्न यापूर्वी कधीही उपस्थित करण्यात आला नसल्यामुळे अस्पृश्य लोक गावाबाहेर का राहतात याबद्दल कोणतीही उपपत्ती समजून अर्थातच एखाद्याला त्याचे उदात्तीकरणही करता येईल. या शास्त्रांचा असा निर्देश आहे की अंत्यजांनी गावाबाहेर घर बांधून राहावे. उदाहरणार्थ मनू म्हणतो :

*चाण्डाल शवपचानान्तु बहिर्ग्रामात् प्रतिश्रयः।*
*अपपात्राश्चे कर्तव्या धनमेषा श्वगर्दभम् ।। (१०-५१)*

*वासांसि मृतचेलानी भिन्न भाण्डेषु भोजनम्।*
*कार्ष्णाय समलंकारः परिव्रज्या च नित्यशः ।। (१०-५२)*

*न तै समय मन्विच्छेत पुरुषो धर्माचरण् ।*
*व्यवहारो मिथस्तेषां विवाहः सदृशैः सह ।। (१०-५३)*

*अन्नमेषां पराधीनं देयं स्याद् भिन्नभाजने।*
*रात्रौ न विचरेयुस्ते ग्रामेषु नगरेषु च।। (१०-५४)*

*दिवा चरेयुः कार्यार्थ चिन्ता राजशासनैः।*
*अबान्धव शवंचैव निर्हरीयुरिती स्थितीः ।। (१०-५५)*

*बंध्याश्च हन्युः सततं यथाशास्त्रं नृपाज्ञया।*
*बन्ध्यवासांसि गृहणोयुः शय्याश्चभरणानि च।।(१०-५६)*



**अर्थ –** चांडाल व शवपच यांनी गावाबाहेर घर बांधून राहावे. त्याने ज्या भांड्यामध्ये काही खाल्ले असेल ते भांडे अग्निसंस्कार करूनही ब्राह्मणांनी घेऊ नये. कुत्रे व गाढवे हे त्यांचे धन होय. प्रेतावरील वस्त्रे त्यांनी वापरावीत. शंख वगैरेसारख्या फुटक्या भांड्यात त्यांनी जेवण करावे, लोखंड कंकणादी अलंकार त्यांनी वापरावेत आणि नेहमी फिरस्ती असावे. धर्मानुष्ठान करण्याचेवेळी चांडाळ व शवपच यांचे दर्शन घेऊ नये किंवा त्यांच्याशी बोलू नये. या लोकांनी कर्ज देणे घेणे, लग्न इत्यादी व्यवहार स्वजातीतच करावेत. त्यांना अन्न द्यावयाचे असल्यास फुटक्या भांड्यात नोकराच्या हस्ते द्यावे. त्यांनी गावामध्ये व नगरामध्ये फिरू नये. दिवसासुद्धा केवळ राजाची परवानगी घेऊन व विशिष्ट चिन्हे घेऊन गावामध्ये शिरावे, अनाथ प्रेतास गावाबाहेर न्यावे अशी शास्त्रमर्यादा आहे. गुन्ह्यात जे वध्य ठरले असतील त्यांना त्यांनी भूपाज्ञेनुसार यथाशास्त्र मारावे. त्यांची वस्त्रे, शय्या, अलंकार इत्यादी स्वतःसाठी घ्यावीत. (१०, ५१, ५४)

परंतु शास्त्राच्या या आदेशावरून कोणाला काय निष्कर्ष काढता येण्यासारखा आहे? त्याचे दोन प्रकारे स्पष्टीकरण होऊ शकते. अस्पृश्य गावाबाहेर राहावेत असे ज्याअर्थी म्हणतात, त्याअर्थी त्याचा अर्थ एवढा होऊ शकतो की हे अस्पृश्य जेथे राहात होते तेथेच म्हणजे गावाच्या बाहेर त्यांनी राहावे. हे एक स्पष्टीकरण झाले. दुसरे स्पष्टीकरण असे की, ज्यांना अस्पृश्य म्हणून घोषित करण्यात आले, त्यांनी गावामध्ये राहू नये, तर त्यांनी राहण्यासाठी गावाबाहेर निघून जावे. शास्त्रांच्या या परस्परविरोधी स्पष्टीकरणावरून विचाराच्या दोन वेगवेगळ्या दिशा निर्माण होतात. एक अशी की, या लोकांच्या गावाबाहेर राहण्यामागे अस्पृश्यतेचा कसलाही संबंध नव्हता. अगदी सुरुवातीपासूनच ते गावाबाहेर राहात असत. त्यानंतर जेव्हा अस्पृश्यतेचा कलंक त्यांच्यावर लादण्यात आला तेव्हा त्यांना गावात येऊन राहण्यास मनाई करण्यात आली. संभवनीय असलेले दुसरे स्पष्टीकरण असे की, या लोकांच्या गावाबाहेर राहण्यामध्ये अस्पृश्यतेचा हात होता. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे हे अस्पृश्य लोक सुरुवातीला गावात राहात होते आणि जेव्हा अस्पृश्यतेचा कलंक त्यांना लावण्यात आला तेव्हा त्यांना जबरदस्तीने गाव सोडून बाहेर राहण्यास भाग पाडण्यात आले.

या दोन संभवनीय स्पष्टीकरणांपैकी अधिक स्वीकारणीय कोणते? यातील दुसरे स्पष्टीकरण स्पष्टपणे हास्यास्पद व बिनबुडाचे आहे. त्यांच्यातील विसंगती उघड करण्यासाठी केवळ युक्तिवाद पुरेसा आहे. आपण ज्या प्रश्नाची चर्चा करीत आहोत तो एका खेड्यापुरता किंवा केवळ एका प्रदेशापुरता मर्यादित प्रश्न नाही. ही प्रथा संपूर्ण भारतभर अस्तित्वात आहे. अस्पृश्यांना गावातून हाकलून देऊन त्यांना गावाबाहेर

वस्ती करावयास लावण्याची प्रक्रिया फार मोठ्या स्वरूपाची आहे. अशा प्रकारच्या अवाढव्य कार्याची कार्यवाही कोण व कशी करू शकला असेल? सर्व भारतावर ज्यांचे साम्राज्य आहे अशा सम्राटावाचून ही कार्यवाही कोणीही करू शकला नसता. त्यालासुद्धा हे पुनर्वसनाचे कार्य अशक्य झाले असते. तथापि, शक्य होवो की न होवो परंतु हे कार्य मात्र सम्राटानेच हाती घेण्याजोगे आहे. त्याचे श्रेय किंवा यश अशा कोणत्या सम्राटाला देता येण्यासारखे आहे? अशा प्रकारचे कार्य तडीस नेण्यासाठी भारतात असा कोणीही सम्राट झाला नाही, हे उघड आहे. हे पुनर्वसन करण्यासारखा सम्राटच जर भारतात झाला नाही, तर दुसऱ्या स्पष्टीकरणाची शक्यता सोडून देणे भाग पडते.

अस्पृश्य मानले गेलेले लोक त्यांना अस्पृश्यतेचा शिक्का लावण्यापूर्वीच सुरुवातीपासून गावाबाहेर राहात असत आणि त्यांच्यावर नंतरच्या काळात अस्पृश्यता लादल्यानंतरही त्यांनी गावाबाहेर राहणे सुरूच ठेवले, अशीच शक्यता अधिक विचारार्ह आहे. परंतु यातून एक अतिशय कठीण प्रश्न निर्माण होतो, तो असा, ते गावाबाहेर का राहात होते?असे करण्यासाठी त्यांना कोणी भाग पाडले किंवा जबरदस्ती केली? सर्व जगामध्ये आदिम समाजाचे रूपांतर आधुनिक समाजामध्ये कोणत्या कारणामुळे झाले हे समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना माहीत आहेच. त्याच कारणांमुळे हे अस्पृश्य लोकही सुरुवातीपासूनच गावाबाहेर राहात होते. असे गृहीत धरणेच या प्रसंगी स्वाभाविक ठरते व हेच या प्रश्नाचे उत्तर होय.

प्रारंभिक समाजाचे रूपांतर आधुनिक समाजामध्ये कोणत्या कारणामुळे झाले हे कदाचित स्पष्ट करून सांगितल्यावाचून बऱ्याच लोकांच्या ध्यानात येणार नाही व त्यामुळे वरील निष्कर्ष स्वाभाविक कसा आहे हे त्यांना कळणार नाही. या विषयाची योग्य जाण येण्यासाठी प्रारंभिक समाज हा आधुनिक समाजाहून दोन बाबींमध्ये वेगळा होता हे ध्यानात बाळगले पाहिजे. प्रारंभिक समाजामध्ये भटक्या जमातींचा समावेश असे. परंतु आधुनिक समाजामध्ये स्थायी जमातींचा समावेश आहे. दुसरी गोष्ट अशी की आदिम समाजातील जमाती रक्ताच्या नात्यावर आधारलेल्या टोळ्यांनी बनलेल्या होत्या, तर आधुनिक समाजात प्रादेशिक संबंधावर आधारित स्थानिक जमातीचा अंतर्भाव असतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, प्रारंभिक समाजाची उत्क्रांती होऊन त्याचे आधुनिक समाजात रूपांतर होत असताना दोन दिशांनी त्याचा विकास झाला. एका दिशेच्या उत्क्रांतीमधून भटक्या जमातीऐवजी प्रादेशिक जमातीचा उदय झाला. अशा प्रकारचा बदल घडून आला याबद्दल शंकेला जागा असू शकत नाही. राजांच्या अधिकारप्रणालीमध्ये या बदलाचे स्पष्ट प्रत्यंतर पाहावयास मिळते. इंग्लिश राजांची कार्यालय पद्धती उदाहरणादाखल घेऊ या. स्वतःला 'इंग्लंडचा राजा'



संबोधणारा कंग जॉन हा पहिला पुरुष होय. त्याच्या पूर्वीचे राजे स्वतःला सामान्यतः 'इंग्लिश लोकांचा राजा' असे संबोधत असत. पहिल्या विधानात प्रादेशिक प्रतिनिधित्व निहित आहे. एकेकाळी इंग्लंड हा एक असा देश होता की त्यात इंग्लिश लोक वास्तव्य करून होते. परंतु आता इंग्लिश लोक हे एक राष्ट्र असून ते इंग्लंडमध्ये वास्तव्य करून आहेत. अशाच प्रकारचा बदल फ्रेंच राजांच्या पद्धतीतही घडून आलेला दिसून येईल. एकेकाळी फ्रेंच राजांना 'फ्रेंच लोकांचा राजा' असे संबोधण्यात येत असे. परंतु नंतर 'फ्रांसचा राजा' असे त्यांना संबोधण्यात येऊ लागले. प्रारंभिक समाजामध्ये असलेल्या भटक्या जमातींच्या जागी उत्क्रांतीच्या दुसऱ्या प्रवाहाने स्थायी जमाती निर्माण केल्या. याशिवाय हा बदल इतका निश्चित व प्रभावी आहे की त्याचे प्रत्यक्षातील अस्तित्व पटवून देण्यासाठी कोणत्याही स्पष्टीकरणाची आवश्यकता उरत नाही.

आपल्यासमोर असलेल्या उद्दिष्टांच्या सिद्धीसाठी केवळ उत्क्रांतीच्या या दुसऱ्या प्रवाहावरच आपला विचार आपणाला मर्यादित करणे आवश्यक आहे. प्रारंभिक समाज स्थायी समाज कसा बनला? आदिम, भटका समाज स्थायी करून बनला, याची कथा एका प्रकरणात सांगण्यासाठी बरीच लांब ठरेल आणि त्याच्या एका भागासाठी तर आणखीच मोठी ठरेल. केवळ दोन गोष्टींची नोंद घेतल्यास पुरेसे होईल. पहिली गोष्ट म्हणजे कोणत्या कारणामुळे आदिम समाजाने भटके जीवन सोडून दिले आणि दुसरी : भटक्या जीवनातून स्थायी जीवनात बदल होत असताना कोणकोणत्या अवस्थांतून त्यांना जावे लागले.

प्रारंभिक समाज निःसंदेहपणे भटक्या होता. परंतु एखाद्या भटकंती करण्याच्या सहज प्रवृत्तीमुळे तो भटक्या बनला नव्हता किंवा त्यांच्यात एखादी मानसिक विकृती होती म्हणूनही नव्हे. आदिम समाजाच्या संपत्तीचे मुख्य रूप त्यांची गुरे हे होते व त्यामुळेच तो समाज तसा बनला होता. प्रारंभिक समाज स्थलांतर करणारा होता. याचे कारण त्यांचे धन म्हणजे गुरे हे स्थलांतकारी होते. नवनवीन कुरणाच्या शोधात गुरांना फिरावे लागे आणि आपल्या गुरांवरील प्रेमाखातर जिकडे गुरे जातील तिकडे या प्रारंभिक समाजासही जावे लागत असे. संपत्तीचे नवे प्रकार जेव्हा शोधून काढण्यात आले तेव्हा आदिम समाज आपल्या घरामध्ये स्थिर झाला म्हणजेच दुसऱ्या शब्दांत स्थायी बनला. संपत्तीचा हा दुसरा प्रकल्प जमीन हा होता. शेती करण्याची कला जेव्हा या आदिम समाजाला अवगत झाली तेव्हा हे घडले. जेव्हा गुरांऐवजी जमीन असे संपत्तीचे रूप बदलले तेव्हा त्याची संपत्ती एके जागी स्थिर झाली. यावरून आदिम समाज भटक्या का होता व नंतर तो स्थायी बनण्यास कोणती गोष्ट कारणीभूत झाली हे स्पष्ट होते.

स्थायी समाज बनण्याच्या मार्गावर असताना आदिम समाजामध्ये कोणकोणत्या घडामोडी झाल्या हे आता आपणास पाहावयाचे आहे. भटक्या अवस्थेतून आदिम समााजाची उत्क्रांती स्थायी समाजामध्ये होत असताना त्याला मुख्यतः दोन समस्यांना तोंड द्यावे लागले. पहिली समस्या स्थायी जमातीसमोर उद्‌भवली आणि दुसरी समस्या पराभूत होऊन इतस्ततःविखुरलेल्या लोकांसमोर होती. एके जागी स्थायी लोकांना भटक्या जमातीच्या टोळधाडीपासून स्वतःचे रक्षण करणे भाग होते. पराभूत होऊन विखुरलेल्या लोकांसमोर आश्रयाचा व स्वरक्षणाचा प्रश्न होता. या समस्या का निर्माण झाल्या याचे अधिक स्पष्टीकरण आता अपेक्षित ठरेल.

एके ठिकाणी स्थायी झालेल्या लोकांसमोरील समस्या समजून घेण्यासाठी पुढील बाबी ध्यानात बाळगणे आवश्यक आहे. सर्व भटक्या जमातीनी एकाच वेळी स्थायी जीवन स्वीकारले नाही. काही स्थायी झाल्या तर काही अजून भटक्याच राहिल्या. लक्षात घेण्याजोगी दुसरी बाब म्हणजे या टोळ्या परस्परात कधीही शांतिपूर्वक राहात नव्हत्या. त्यांच्यामध्ये नेहमीच लढाया होत असत. सर्व टोळ्या जेव्हा भटक्या अवस्थेच होत्या तेव्हा त्यांच्या परस्परातील युद्धाची कारणे :

१) गुरे चारणे २) स्त्रिया पळविणे आणि ३) दुसऱ्या टोळीच्या मालकीच्या कुरणात जबदस्तीने गुरे चारणे

अशा स्वरूपाची होती. जेव्हा काही जमाती स्थायी झाल्या तेव्हा त्यांच्यावर स्वारी करणे भटक्या अवस्थेत असलेल्या जमातींना अधिक सोईचे झाले. अन्य भटक्या जमातींशी युद्ध करण्यापेक्षा अशा स्थायी जमातीशी युद्ध करणे त्यांना अधिक फायद्याचे ठरत होते. स्थायी झालेल्या जमातीजवळ दुप्पट संपत्ती असते, हे या भटक्या जमातींनी हेरले होते. भटक्या जमातींप्रमाणे त्यांच्याजवळ गुरे तर होतीच; परंतु त्यांच्याशिवाय त्यांच्याजवळ भटक्या जमातीजवळ नसलेले धान्यही होते. त्याचा त्यांना जोरदार मोह वाटत होता. स्थायी झालेल्या जमातीजवळील संपत्ती लुटण्यासाठी भटक्या जमाती पद्धतशीरपणे संघटित होऊन त्यांच्यावर स्वाऱ्या करू लागल्या. तिसरी गोष्ट अशी की परकीयांच्या या स्वाऱ्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यास स्थायी झालेल्या जमाती अतिशय असमर्थ ठरत होत्या. नैतिकदृष्ट्या हितकारी उद्योगामध्ये रत असल्यामुळे स्थायी जमाती नांगर सोडून सारे दिवस तलवार हातात घेऊ शकत नसत किंवा आपली घरेदारे सोडून स्वारी करणाऱ्या लोकांचा ते पाठलागही करू शकत नव्हते. यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही. स्वरक्षणाची साधने नसलेले सुधारलेले समाज रानटी लोकांच्या हल्ल्यांना तोंड देण्यास असमर्थ ठरल्याचे पुरावे इतिहासात भरपूर दिसून येतात. संक्रमणाच्या काळामध्ये स्थायी झालेल्या समाजांना स्वरक्षणाच्या समस्येशी कसे तोंड द्यावे लागले, हे यावरून स्पष्ट होते. वाताहत झालेल्या



लोकांचा प्रश्न निर्माण झाला हे समजून घेणे फारसे कठीण नाही. समाजाच्या आदिम अवस्थेमध्ये वेगवेगळ्या टोळ्यांमध्ये सतत चालू असलेल्या युद्धाचाच तो परिणाम होता. टोळ्यांमधील या परस्पर युद्धामध्ये एखाद्या टोळीचा संपूर्ण नाश होण्याऐवजी तिचा पराभव होऊन तिची वाताहत होत असे. अनेक प्रसंगी पराभूत टोळीची वाताहत होऊन तिचे लहान लहान गट होत असत. याचा परिणाम असा होई की आदिम समाजामध्ये निराश्रित झालेल्या या पराभूत लोकांचे इतस्ततः भटकणारे लहान लहान समूह अस्तित्वात होते. या पराभूत लोकांचा प्रश्न निर्माण होण्याचे कारण समजून घेण्यासाठी हे लक्षात घेतले पाहिजे की, आदिम समाज, संघटनेच्या दृष्टीने मूलतः टोळ्यांनी बनलेला होता. प्रारंभिक समाज मूलतः टोळ्यांनी बनला होता, याचे दोन निष्कर्ष निघतात : आदिम समाजातील प्रत्येक व्यक्ती कोणत्या तरी टोळीतील असे. इतकेच नव्हे, तर त्याचे तसे असणे अपरिहार्य होते. टोळीच्या बाहेरील कोणतीही व्यक्ती अस्तित्वातच नव्हती. कारण अशा व्यक्तीला कसलेही धन बाळगता येणे अशक्य होते. दुसरी गोष्ट टोळ्यांचे संघटन रक्तसंबंधावर व नातेसंबंधावर होत असल्यामुळे एका टोळीत जन्मलेली व्यक्ती दुसऱ्या टोळीत सामील होऊन तिचा सभासद बनू शकत नव्हती. यामुळेच पराभूत होऊन वाताहत झालेल्या लोकांना एकट्या-दुकट्या व्यक्ती म्हणूनच जीवन जगावे लागे. प्रारंभिक समाजामध्ये जेथे टोळी विरुद्ध टोळीत युद्धे होत असत तेथे वाताहत झालेल्या अशा एकट्या दुकट्या व्यक्तींना हल्ला होण्याचा नेहमीच फार मोठा धोका असे. आश्रयासाठी कोठे जावे, हेही त्यांना कळत नव्हते. त्यांच्यावर कोण हल्ला करील व कोणाचा आश्रय घ्यावा, याबद्दलही ते साशंक होते. यामुळेच आश्रयस्थान व स्वसंरक्षण हीच या वाताहत झालेल्या लोकांसमोरील समस्या होती.

प्रारंभिक समाजाच्या उत्क्रांतीच्या वरील सारांशावरून दिसून येते की, आदिम समाजाच्या कार्यकालामध्ये दोन प्रकारचे लोक गट काही काळ अस्तित्वात होते. त्यांपैकी एक लोकसमूह एके ठिकाणी स्थायी झालेल्या लोकांचा असून भटक्या लोकांच्या हल्ल्यापासून रक्षण करण्यासाठी व टेहळणी करण्यासाठी त्यांना काही माणसे हवी होती आणि दुसरा गट पराभूत झालेल्या लोकांचा असून त्यांच्यासमोर आश्रयाचा व निर्वाहाच्या गरजा प्राप्त करण्याचा प्रश्न होता.

**पुढील प्रश्न असा : या दोन लोकसमूहांनी आपापले प्रश्न कसे सोडविले?**

आपणाजवळ कराराचा ऐतिहासिक लिखित पुरावा उपलब्ध नसला तरी या दोन लोकसमूहांनी परस्परात करार करून आपापले प्रश्न सोडविले असे म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाही. या करारान्वये वाताहत झालेल्या लोकांनी, स्थायी झालेल्या

लोकांनी, स्थायी झालेल्या जमातीचे संरक्षण व टेहळणी करण्याचे स्वीकारले व त्याच्या बदलीमध्ये त्याना अन्न आणि आश्रय देण्याचे स्थायी जमातीने मान्य केले. जेव्हा एकाच्या सहकार्याची गरज दुसऱ्याला इतकी निकडीची असताना अशा परिस्थितीतही जर त्यांनी अशी तडजोड केली नसती तर निश्चितच ती एक अस्वाभाविक गोष्ट घडली असती.

तथापि या देवाण- घेवाणीमध्ये एक अडचण निर्माण झाली असली पाहिजे. आणि ती म्हणजे आश्रयाची. या वाताहत झालेल्या लोकांनी राहावे कुठे? स्थायी जमातीमध्ये की त्या जमातीच्या बाहेर? या प्रश्नाचा निर्णय घेताना दोन बाबी निर्णयात्मक ठरल्या असाव्यात. एक बाब रक्ताच्या नात्याची असावी व दुसरी बाब डावपेचाची असावी. प्रारंभिक समाजाच्या श्रद्धेनुसार केवळ एका टोळीतील म्हणजे एक रक्ताचे लोकच एकत्र राहू शकत होते. एखाद्या टोळीच्या मालकीच्या असलेल्या मायभूमीमध्ये परक्या माणसाला वस्ती करण्यास परवानगी दिली जाऊ शकत नसे. हे वाताहत झालेले लोक परके होते. ते या स्थायी जमातीच्या टोळीपेक्षा दुसऱ्या टोळीतील होते. असे असल्यामुळे त्यांना स्थायी जमातीमध्ये वस्ती करण्यास अनुमती देता येणे शक्य नव्हते. डावपेचाच्या दृष्टिकोनातून पाहिले तरी या वाताहत झालेल्या लोकांनी गावाच्या सीमेवर राहणेच अधिक उपयुक्त होते. कारण त्यांनी शत्रू टोळ्यांच्या हल्ल्याला तोंड द्यावयाचे होते. हे दोनही विचार निर्णायक स्वरूपाचे असून त्यांची घरे गावाच्या बाहेर असावीत या मताला पोषकच होते.

आता आपण पुन्हा आपल्या मूळ प्रश्नाकडे म्हणजे अस्पृश्य लोक गावाबाहेर का राहतात? या प्रश्नाकडे वळू या. वर सुचविलेल्या विचारसरणीप्रमाणे या प्रश्नाचेही उत्तर शोधले जाऊ शकते. जेव्हा आदिम हिंदू समाजाचे रूपांतर भटक्या जमातीतून गावांमधील स्थायी समाजामध्ये झाले तेव्हा हीच प्रक्रिया भारततही घडून आली असली पाहिजे. आदिम हिंदू समाजामध्येही स्थायी जमाती आणि वाताहत झालेले लोक असले पाहिजे. स्थायी टोळ्यांनी गावे वसविली व ग्राम जमाती निर्माण केल्या आणि वाताहत झालेले लोक या खेड्याच्या बाहेर स्वतंत्र मोहल्ल्यांमध्ये राहू लागले. कारण ते वेगळ्या टोळ्यांतील व म्हणूनच वेगळ्या रक्ताचे होते. स्पष्ट शब्दांत सांगायचे म्हणजे अस्पृश्य लोक हे वाताहत झालेले लोक होत. ते वाताहत झालेले लोक असल्यामुळेच ते गावाबाहेर राहात होते.

अस्पृश्य लोक सुरुवातीपासून गावाबाहेर राहात होते व अस्पृश्यतेचा आणि त्यांच्या गावाबाहेर राहण्याचा कसलाही संबंध नाही ते गृहीत धरणे कसे स्वाभाविक आहे हे यावरून स्पष्ट होते.

ही उपपत्ती इतकी नवीन आहे की यावर आणखी प्रश्न विचारल्याशिवाय



टीकाकारांचे समाधान होणार नाही. ते विचारतील :

१) अस्पृश्य हे वाताहत झालेले लोक होते असे सुचविणारा प्रत्यक्ष घटनेचा काही पुरावा आहे काय?

२) वर सुचविलेली स्थायीकरणाची प्रक्रिया एखाद्या अन्य देशात प्रत्यक्षात घडली, असा पुरावा आहे काय?

३) वाताहत झालेले लोक गावाबाहेर राहात असत ही गोष्ट जर जगातील सर्व समाजांना लागू आहे, तर भारताबाहेरील वाताहत झालेल्या लोकांच्या स्वतंत्र वसाहती नष्ट झाल्या; परंतु भारतातील मात्र तशाच राहिल्या हे कसे?

◆◆◆

# ४. अस्पृश्य हे वाताहत झालेले लोक आहेत काय?

अस्पृश्य लोक हे मूलतः वाताहत झालेले लोक आहेत काय, या प्रश्नाला माझे उत्तर होकारार्थी आहे. होकारार्थी उत्तराच्या पाठोपाठ त्याचा पुरावा सादर करणे भाग आहे. हिंदू खेड्यातील स्पृश्य लोकांच्या व अस्पृश्य लोकांच्या कुळाचा अभ्यास केल्यास या मुद्याला पोषक असा प्रत्यक्ष पुरावा मिळू शकेल, दुर्दैवाने अजून मानववंश शास्त्राच्या विद्यार्थ्यांनी हिंदूच्या व अस्पृश्यांचा वंशगत संस्थांचा अभ्यास सुरू केलेला नाही. जेव्हा अशा प्रकारची सामग्री गोळा करण्यात येईल तेव्हाच या प्रकरणामध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नावर निर्णायक मत देणे शक्य होईल. एखाद्या विशिष्ट खेड्यातील हिंदूची वंशचिन्हे (यात कपाळ, डोक्याची कवटी, नाक, शरीराचा आकार व्यक्तीची नावे, रूढी इत्यादी अनेक बाबींचा समावेश होतो) आणि अस्पृश्यांची वंशचिन्हे यामध्ये फरक असतो असे मला तपासाअंती आढळून आले आहे व त्यावरच सध्यापुरते मी समाधान मानतो.

एखाद्या खेड्यामध्ये असलेल्या जमातीहून अस्पृश्य हे वेगळ्या टोळीचे म्हणजे वाताहत झालेले लोक आहेत ही उपपत्ती सिद्ध करण्यासाठी हिंदू आणि अस्पृश्य यांच्या वंशगत चिन्हांमध्ये फरक आढळून आला, तर तो उत्तम पुरावा ठरेल. परंतु अशा प्रकारच्या प्रश्नाशी संबंधित असलेला प्रत्यक्ष पुरावा अजून गोळा करण्यात आलेला नाही, हे मान्य केलेच पाहिजे. तथापि निर्देशक म्हणून उपयुक्त ठरणारी वस्तुस्थिती अजूनपर्यंत जिवंत असून तिच्यावरून अस्पृश्य हे वाताहत झालेले लोक आहेत, असे म्हणता येण्यासारखे आहे. अशा प्रकारच्या पुरावाजनक घटनांचे दोन प्रकार उपलब्ध आहेत.

अशा प्रकारच्या पहिल्या वस्तुस्थितिनिष्ठ पुराव्यांमध्ये हिंदू शास्त्रांनी काही विशिष्ट जमातींना दिलेल्या 'अंत्य, अंत्यज आणि अंत्यवासी' या नावाचा समावेश होतो. ही नावे अत्यंत पुरातन कालापासून चालत आलेली आहेत. लोकांच्या एका विशिष्ट वर्गाचा उल्लेख करण्यासाठी ही नावे का वापरण्यात येतात? या संज्ञांमागे काही अर्थ असावा, असे दिसते, निःसंदेहपणे हे 'साधित' शब्द आहेत. 'अन्त' या मूळ शब्दापासून ते तयार केलेले (साधित) आहेत. 'अन्त' या शब्दाचा अर्थ काय?

शास्त्रांमध्ये पारंगत असलेले हिंदू असा युक्तिवाद मांडतात की शेवटी जन्माला आला तो अंत्य होत; आणि हिदू धर्मशास्त्रांच्या मते देवाने मानव जात निर्माण केली तेव्हा अस्पृश्य सर्वांच्या शेवटी निर्माण करण्यात आला म्हणून 'अंत्य' म्हणजे अस्पृश्य



होय. हा युक्तिवाद हास्यापद असून हिंदू धर्मशास्त्रांनी सांगितलेल्या उपपत्तीच्या क्रमाशीही न जुळणारा आहे. हिंदू शास्त्रांप्रमाणे शेवटी जन्माला आलेला शूद्र होय. अस्पृश्य हा या निर्मितीच्या योजनेपलीकडचा प्राणी आहे. शूद्र हा सवर्ण आहे. याउलट अस्पृश्य 'अवर्ण' म्हणजे वर्ण पद्धतीच्या पलीकडील आहे. सृष्टिरचनेच्या बाबतीत 'प्रथम कोण शेवटचा कोण' हा नियम अस्पृश्याला लागू होत नाही व लागू केलाही जाऊ शकत नाही. माझ्या मते अंत्य या शब्दाचा अर्थ 'निर्मिताच्या शेवटचा' असा नसून 'गावाच्या शेवटचा' असा आहे. गावाच्या परकोटाच्या बाहेर जे लोक राहात होते त्यांना दिलेले हे नाव आहे. ही बाब असे सांगते की भूतकाळाच्यामध्ये एका भागात काही लोक गावामध्ये व काही गावाच्या बाहेर राहात असत. आणि जे लोक गावाच्या बाहेर म्हणजे गावच्या अंत्य भागात राहात असत त्यांना अंत्य किंवा अंत्यज म्हणण्यात येत असे.

काही लोक गावाच्या सीमेवर का राहात होते? हे लोक वाताहत झालेले व गावात राहणाऱ्या लोकांपेक्षा भिन्न टोळीतले व म्हणून परके असल्यामुळे गावाबाहेर राहात नसतील तर त्याचे दुसरे एखादे कारण असू शकते काय? मला तर कोणतेही दिसत नाही. त्यांना संबोधण्यासाठी उपयोगात आणलेले विशिष्ट शब्द लक्षात घेता हेच कारण खरे आहे, असे दिसते. 'अंत्य, अंत्यज आणि अंत्यवासी' या शब्दांचे दुहेरी महत्त्व आहे. वेगळ्या मोहल्ल्यामध्येच त्यांचे राहणे ही एक अशी विशिष्ट घटना होती की ती व्यक्त करण्यासाठी एक नवीन संज्ञा निर्माण करावी लागली. ही एक गोष्ट या शब्दांवरून सूचित होते. दुसरी गोष्ट म्हणजे निवडलेल्या शब्दांद्वारे संबंधित लोकांची स्थिती या निश्चित संज्ञेने व्यक्त होते आणि ती स्थिती म्हणजे ते परके लोक होते ही होय.

अस्पृश्य हे वाताहत झालेले लोक होते, हे दर्शविणाऱ्या पुराव्यांचा दुसरा गट महार नावाच्या जमातीशी संबंधित आहे. महार जमात ही महाराष्ट्रातील एक प्रमुख जमात आहे. महाराष्ट्रामध्ये आढळणाऱ्या अस्पृश्य जमातीमधील ही सर्वांत मोठी जमात आहे. स्पृश्य हिंदू आणि महार यांचे संबंध दर्शविणाऱ्या पुढील बाबी लक्षात घेण्याजोग्या आहेत. १) प्रत्येक गावामध्ये महार लोक आढळतात २) महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्याभोवती गावकूस असून महारांची वस्ती या गावकुसाबाहेर असते ३) त्या त्या गावाच्यावतीने खेड्यांची निगराणी करण्याचे काम आळीपाळीने महार करीत असतात आणि ४) हिंदू गावकऱ्यांकडून या महारांना ५२ प्रकारचे हक्क मिळालेले अहेत, असा त्यांचा दावा आहे. या ५२ हक्कांपैकी काही अत्यंत महत्त्वाचे असलेले पुढील हक्क आहेत :

१) गावकऱ्यांकडून अन्न गोळा करण्याचा हक्क;

२) हंगामाच्या वेळी प्रत्येक गावकऱ्याकडून धान्य गोळा करण्याचा हक्क आणि

३) गावकऱ्यांच्या मालकीच्या मेलेल्या जनावरांची विल्हेवाट लावण्याचा हक्क.

महारांच्या स्थितीपासून उपस्थित होणारा पुरावा अर्थातच महाराष्ट्रापुरता मर्यादित आहे. भारताच्या अन्य भागांतही अशीच स्थिती आहे की नाही याचे अजून संशोधन व्हावयाचे आहे. परंतु महारांचे हे उदाहरण भारतातील अस्पृश्यांमधील एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण म्हणून मान्य असेल तर हेही मान्य करावे लागेल की भारताच्या इतिहास काळात काही वाताहत झालेले लोकही होते आणि त्यांनी अन्य स्थायी झालेल्या टोळ्यांशी तडजोड करून त्यांची काही विशिष्ट कामे करण्याचे मान्य केले व त्यांच्या बदलीमध्ये त्यांना गावालगत राहू देण्याचे व काही हक्क प्रदान करण्याचे ग्रामवासीयांनीही मान्य केले. महारांमध्ये वंशपरंपरागत अशी समजूत आहे की गावकऱ्यांजवळून त्यांना जे ५२ हक्क मिळालेले आहेत ते बेदरच्या मुसलमान राजाने दिलेले आहेत. याचा अर्थ इतकाच आहे की, हे हक्क अत्यंत पुरातन आहेत आणि बेदरच्या मुसलमान राजाने त्याला केवळ मान्यता दिली.

अगदी सुरुवातीपासून अस्पृश्य लोक गावाच्या बाहेर राहात होते, या उपपत्तीच्या समर्थनासाठी या बाबी फारच तुटपुंज्या असल्या तरी त्यांच्यामुळे एक प्रकारचा पुरावा उपलब्ध होत आहे. त्यांना अस्पृश्य म्हणून घोषित केल्यामुळे हद्दपार करून गावाबाहेर राहण्यास भाग पाडण्यात आलेले नाही. ते सुरुवातीपासून गावाच्या बाहेर राहात होते. कारण ते वाताहत झालेले लोक होते आणि स्थायी झालेल्या टोळीपेक्षा ते लोक वेगवेगळ्या टोळ्यांतील होते.

अस्पृश्य लोक हे नेहमीसाठीच अस्पृश्य होते अशी धारणा असल्यामुळे वरील स्पष्टीकरण मान्य करण्यास अडचण येते. मागील काळात सध्याच्या अस्पृश्यांचे पूर्वज अस्पृश्य नव्हते. तर गावकऱ्यांच्या तंतोतंत बरोबरीचे होते व केवळ वाताहत झालेले लोक होते आणि त्यांच्यात व गावकऱ्यांमध्ये केवळ भिन्न टोळ्यांतील असण्याचाच फरक होता, ही गोष्ट ध्यानात बाळगली तर ही अडचण नष्ट होऊन जाईल.

◆◆◆



# ५. अन्यत्र अशी उदाहरणे आहेत काय?

## १

वाताहत झालेले अशा प्रकारचे गावाच्या बाहेर राहणारे लोक असल्याचे दुसरे उदाहरण जगाच्या इतिहासात अन्यत्र आढळते काय? या प्रश्नालाही होकारार्थी उत्तर देता येणे शक्य आहे. आपल्या सुदैवाने भारतात ते घडले तेच अन्यत्रही घडले असे दर्शविणारी दोन उदाहरणे नमूद आहेत. ज्या देशांमध्ये अशीच तंतोतंत घटना घडल्याचे सांगण्यात येते असे देश आयर्लंड आणि वेल्स आहेत. आद्यतन काळात आयर्लंडमधील खेड्यांची रचना कशी होती हे आयर्लंडच्या ब्रेहॉन कायद्यावरून दिसून येऊ शकते. या कायद्यामध्ये दिसून येणारी समाजरचनेची कल्पना सर हेन्री मेन यांनी दिलेल्या पुढील सारांशावरून दिसून येते. हेन्री मेन म्हणतो :

''जेव्हा ही टोळी बहुतकरून तिच्या मालकीच्या प्रदेशामध्ये स्थायिक झाली तेव्हाची तिची स्थिती या ब्रेहॉन कायद्यावरून स्पष्ट होते. तिचा आकार बराच मोठा असून स्वतंत्र राजकीय घटक बनण्याइतकी ती महत्त्वाची होती. आणि तिचा अधिकारी वर्गामध्ये सर्वोच्च पदावर एक प्रमुख असून आयर्लंडच्या कागदपत्रामध्ये त्याला 'राजा' असे संबोधण्यात आले आहे. त्या टोळीच्या मालकीच्या या भूप्रदेशावर संपूर्ण टोळीचा अधिकार होता, अशी मूलभूत कल्पना आहे. परंतु प्रत्यक्षात या भूप्रदेशाचा फार मोठा भाग त्या टोळीतील लहान लहान लोकसमूहांनी कायमचा बळकावलेला होता. एक भाग टोळीप्रमुखाच्या कार्यालयासाठी एका खास व्यवस्थेद्वारे विभागून दिलेला असे. आणि उत्तराधिकाराच्या एका खास नियमाद्वारे भूभाग एका प्रमुखाकडून दुसऱ्या प्रमुखाकडे जाईल असी व्यवस्था करण्यात आली होती. अन्य भाग त्या जमातीच्या लहान लहान गटाच्या ताब्यात असून त्यांपैकी काही भाग दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात असे, तर काही उघडपणे टोळीप्रमुखाच्या आधिपत्याखाली नसला तरी सरदार वर्गातील एखादा पुरुष टोळीप्रमुखाचा प्रतिनिधी म्हणून काम पाहात असे. ज्या भूप्रदेशावर कोणत्याही गटाची मालकी नाही अशा प्रदेशावर त्या संपूर्ण टोळीची मालकी असे आणि त्यापैकी कोणताही भाग तात्पुरत्या उद्योगासाठी एखाद्याला देण्यात येत असला तरी कायमपणे कोणालाही देण्यात येऊ नये असा नियम होता.या भूप्रदेशात अनेक उद्योग चालत असत; तथापि या जमिनी ठेक्याने घेणारे लोक स्वतःला त्याच जमातीचे म्हणून घेत असले तरी ते मुख्यतः आपल्या गुरांना चारण्यासाठी ठेक्याने कुरण घेण्याकरिता संघटित झालेले लोक असत.

टोळीच्या मालकीची बरीच जमीन कोणाही व्यक्तीच्या किंवा गटाच्या मालकीतून मुक्त असे आणि ती बहुधा पडीक असे. तथापि ही जमीन नेहमी शेतीच्या कामासाठी अगर कायम स्वरूपाचे कुरण म्हणून त्या जमातीच्या ग्रामवासीयांकडून उपयोगात आणली जाई. आणि त्या जमिनीची मशागत करण्यास व राहण्यास गुलाम लोकांना व शेतकऱ्यांना परवानगी देण्यात येई. अशी परवानगी विशेषतः पडीक जमिनीच्या सीमेवरील भागासाठी असे. हा असा भूभाग असे की यावर टोळीप्रमुखाचे जोरदार व वाढते नियंत्रण असे आणि त्यावरच तो आपल्या 'फ्यूधीर किंवा परकी लोक म्हणजे अत्यंत महत्त्वाचा अशा शेतकऱ्यांचा वर्ग होय. हे लोक स्थायी झालेल्या लोकांच्या सामाजिक चौकटीबाहेरचे व वाताहत झालेल्या अन्य टोळ्यांतील असून केवळ संरक्षणासाठी ते त्या टोळीप्रमुखाकडे आलेले होते. या स्थायी जमातीशी त्यांचा संबंध फक्त टोळीप्रमुखाद्वारेच आलेला असे आणि तो टोळीनायकच त्यांची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेत असे.

हे फ्यूधीर लोक कोण होते? सर हेन्री मेनच्या मते हे फ्यूधीर लोक वाताहत झालेले लोक होते. तो म्हणतो :

''हे परके किंवा शरणार्थी लोक दुसऱ्या भूप्रदेशातील असत. वस्तुतः त्यांचे मूळच्या टोळीशी असलेले सामाजिक नाते तुटलेले होते. त्यामुळे त्यांना नवीन टोळीमध्ये स्वतःसाठी सामाजिक स्थान व नवीन भूप्रदेश शोधावा लागे. मानवी सामाजामध्ये अव्यवस्था माजलेली होती. परिणामतः संपूर्ण देश अशा वाताहत झालेल्या लोकांनी भरून गेला होता. आणि असे लोक केवळ फ्यूधीर शेतकरी बनूनच स्वतःसाठी निवास व आश्रय प्राप्त करू शकत होते.''

''हे फ्यूधीर लोक त्या टोळीतील लोक नव्हते तर परके होते. जे समाज नात्याच्या बंधनांनी तयार होतात, त्यामध्ये जर एखाद्या व्यक्तीचे असे नाते नष्ट झाले किंवा नात्याच्या बंधनावर उभारलेले त्यांचे संघटन एखाद्या कारणामुळे नष्ट झाले तर त्याची अतिशय दुर्दशा होत असे. त्याचे त्या समाजातील स्वाभाविक स्थान नष्ट होत असे. एवढेच नव्हे, तर त्या समाजाजवळ त्यांच्यासाठी दुसरीकडे कोठेही स्थान शिल्लक राहात नव्हते.''

## २

आता वेल्स देशाकडे वळू या. वेल्स देशातील आद्यतन काळामधील खेड्याच्या रचनेसंबंधी मि. सीभोम यांनी वर्णन केलेले आहे. सीभोमच्या मताप्रमाणे वेल्समधील खेड्यात काही घरांचा समावेश असे, ही घरे दोन गटांमध्ये विभक्त करण्यात



आली होती. स्वतंत्र शेतकऱ्यांची घरे व स्वतंत्र नसलेल्या शेतकऱ्यांची सार्वत्रिक होती, असे सीभोमचे म्हणणे आहे. या स्वतंत्र नसलेल्या शेतकऱ्याची राहण्याची व्यवस्था वेगळ्या व पृथक जागेवर का करण्यात आली? सीभोमने याचे कारण पुढील शब्दांत दिले आहे :

'वेल्सच्या कायद्यात उल्लेख असलेल्या मानव जातीच्या समूहाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास त्यात अतिशय गोंधळ असल्याचे प्रथमतःच जाणवते. या समूहामध्ये मूळ टोळीच्या लोकांमध्ये अचेलोर ब्रायर आणि इन्नेअ बेनेडिंग्ज असे लोक होते. मूळ टोळीतील नसलेल्या लोकात टॅलोगो, ऐलटी आलट्यूड इत्यादी लोक होते. या लोकसमूहाच्या समाजरचनेमध्ये अंतर्निहित असलेले तत्त्व गवसले म्हणजे हा गोंधळ नाहीसा होता.

जयापजय, स्थायी प्रदेशावर वास्तव, बाह्य नियमांचे, रीतिरिवाजांचे व नामकरणाचे आक्रमण या बाबी जर वेगळ्या काढल्या तर हे तत्त्व फार सोपे आहे असे दिसून येईल. स्वतंत्र टोळीतील लोकांच्या समाजरचनेमागील पायभूत तत्त्व रक्ताचे नाते हेच होते. याबद्दल शंका नाही. जी व्यक्ती त्या टोळीशी रक्ताच्या नात्याने संबंधित नसे, ती त्या जमातीची सभासद होऊ शकत नसे. खरे पाहिले तर हा वेल्समधील समाज नात्यागोत्याच्या लोकांनीच बनलेला होता. ढोबळ मानाने पाहिले तर वेल्स समाज पद्धतीमध्ये लोकांचे दोन वर्ग होते : एक रक्ताच्या नात्याने बांधलेला व दुसरा या नात्याच्या दृष्टीने परका असलेला. जयापजयाचा व जमिनीचा प्रश्न बाजूला ठेवला तर त्या दोन गटांमध्ये दुर्लंघ्य नसली तरी अत्यंत खोल अशी दरी होती. रक्ताच्या आधारावर केलेले हे विभाग असून ज्या कठोरपणाने हा भेद पाळण्यात येत होता त्यावरून स्पष्ट होते की त्यांच्या समाजव्यवस्थेचे हे मुख्य लक्षण होते आणि तो त्यांच्या शक्तीच्या सुप्त स्रोतांपैकी एख मुख्य स्रोत होता.

## ३

आद्यतन काळातील आयर्लंड व वेल्समधील समाजरचनेच्या ऊहापोहावरून गावाबाहेर राहणाऱ्या भारतीय लोकांचे उदाहरण हे केवळ एकाकी नाही, याबद्दल शंका राहात नाही. समाजव्यवस्थेबाबत सर्व जगात लागू होणाऱ्या सार्वत्रिक घटनांचे वर्णन त्यात आहे हे त्यावरून सिद्ध होत असून त्यात पुढील लक्षणीय बाबी दिसून येतात :

१) आद्यतन काळात खेड्याच्या रचनेमध्ये दोन विभाग असत. एका भागात प्रमुख टोळीतील लोक वस्ती करीत असत आणि दुसऱ्या भागात अन्य वाताहत

झालेल्या टोळ्यांतील निराश्रित लोक राहात असत.

२) प्रमुख टोळीतील लोक ज्या विभागामध्ये राहात असत त्याला खरे गाव समजण्यात येई. वाताहत झालेले लोक या गावाच्या परीघाबरोबर राहात असत.

३) हे वाताहत झालेले लोक गावाच्या बाहेर राहण्याचे कारण म्हणजे ते परके होते आणि प्रमुख टोळीतील नव्हते.

भारतीतील अस्पृश्य, आयर्लंडमधील फ्यूधीर आणि वेल्समधील आलटच्यूड लोकांमध्ये पूर्णतः साम्य आहे. आयर्लंड आणि वेल्स या देशांतील फ्यूधीर आणि आलटच्यूड लोक ज्या कारणासाठी गावाबाहेर राहात होते त्याच कारणासाठी भारतातील अस्पृश्यही गावाबाहेर राहात होते. म्हणून अस्पृश्यांच्या बाबतीत त्यांच्या गावाबाहेर राहण्याबद्दल मी जे विधान केले ते दुसरीकडे कोणताच पुरावा नसलेले एकाकी नाही हे यावरून स्पष्ट होते.

◆◆◆

प्रबुद्धभारत पुस्तकालय आणि प्रकाशन
नागपूर-१७



# ६. अशा विभक्त वसाहती अन्य देशांतून नष्ट कशा झाल्या?

आयर्लंड देशातील फ्यूधीर व वेल्समधील आलटच्यूड लोक हे वाताहत झालेले लोक होते, हे खरे. ते वेगळ्या वसाहतीत राहात होते हीसुद्धा वस्तुस्थिती आहे. परंतु हेही तितकेच खरे आहे की या वाताहत झालेल्या लोकांच्या वसाहती कालांतराने नाहीशा झाल्या आणि ते त्या स्थायी टोळीचा एक भाग बनून तिच्यात समाविष्ट झाले, हे काहीसे चमत्कारिक वाटते. याआधी ऊहापोह केलेल्या उत्पत्तीप्रमाणे हे वाताहत झालेले लोक वेगळ्या वसाहतीत बसविण्यात आले होते. असे असताना नंतरच्या काळात त्यांना त्या स्थायी टोळीमध्ये कसे काय अंतर्भूत करून घेण्यात आले? अशीच प्रक्रिया भारतात का घडून आली नाही? हे प्रश्न स्वाभाविक असून त्यांची उत्तरे देणे भाग आहे.

ज्या प्रक्रियेने आद्यतन समाजाचे आजच्या आधुनिक समाजामध्ये परिवर्तन झाले त्या उत्क्रांतीच्या हा प्रश्न पूर्णतः संबंधित आहे. आधीच सांगितल्याप्रमाणे ही उत्क्रांतीची प्रक्रिया दोन भिन्न दिशांनी वृद्धिंगत झाली. आद्यतन समाजाचे भटक्या अवस्थेतून स्थायी जमातीमध्ये रूपांतर होण्याच्या प्रक्रियेत एक दिशा दिसून येते. आणि आद्यतन समाजाच्या टोळ्यांच्या रूपातून भूप्रदेशावर मालकी सांगणाऱ्या जमातीमध्ये झालेला बदल दुसऱ्या दिशेत दिसून येतो. दुसऱ्या दिशेने झालेल्या उत्क्रांतीशी आपल्या प्रश्नाचा निकटचा संबंध आहे. कारण तिच्यामध्ये टोळीच्या संघटनेसाठी आवश्यक असलेल्या रक्ताच्या नातेबंधनाऐवजी सर्वांच्या मालकीच्या एक भूप्रदेश अशा नव्या बंधनाचा पर्याय दिलेला असून त्यामुळेच वसाहत झालेल्या स्वतंत्र वसाहती नाहीशा झाल्या आहेत. संघटनेसाठी आवश्यक बंधन म्हणून रक्ताच्या नात्याच्या बंधनाचा पर्याय म्हणून आद्यतन समाजाने सामाईक भूप्रदेशाचे बंधन का स्वीकारले? हा असा प्रश्न आहे की त्यांच्याबद्दल पुरेसे स्पष्टीकरण उपलब्ध नाही. या रूपांतराची मूळ कारणे अत्यंत अंधूक आहेत. तथापि हा बदल कसा घडवून आणाल, हे मात्र सुस्पष्ट आहे.

आद्यतन समाजाची अशी एक अवस्था निर्माण झाली की त्या वेळी टोळीबाह्य लोक मूळ टोळीचे सभासद होऊ शकतील, आला असा एक नियम अस्तित्वात व मूळ टोळीमध्ये सामावून जाऊ शकतील हा नियम कुलीनीकरणाचा नियम म्हणून ओळखण्यात येतो. हा नियम असा की जर काही ठरावीक पिढ्यांच्या काळापर्यंत एखादा टोळीबाह्य मनुष्य त्या टोळीच्या आश्रयाने राहिला किंवा त्याने मूळ टोळीतील स्त्रीशी विवाह केला तर त्याला त्या टोळीतीलच एक व्यक्ती मानण्यात येत असे.

वेल्स देशातील ग्राम पद्धतीमध्ये आढळून आलेल्या टोळीबाह्य व्यक्तीला टोळीमध्ये सामावून घेण्याचा नियम मि. सीबोम पुढीलप्रमाणे असल्याचे सांगतो :

१. सिमरुमधील (वेल्स) रूढी अशी होती की एखाद्याच्या पिढ्यान् पिढ्यापर्यंतचे पूर्वज सिमरु देशामध्येच वास्तव्य करीत आले असतील तर त्याला सिमरु पुरुष म्हणजे मान्यता मिळत असे.

२. एखाद्या परकीय कुळामध्ये अनेक पिढ्यांपर्यंत जर सिमरु जमातीतील मुलीशी लग्न झाले असेल तर चौथ्या पिढीनंतरची संतती 'सिमरु' ठरत असे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे एखाद्या मूलतः परक्या टोळीतील पुरुषाचा पणतू ज्याचे रक्त जवळजवळ सात अष्टमांश हिस्से मिश्रण झालेले असे, मूळ टोळीच्या रक्ताच्या असण्याचा दावा करू शकत असे.

अशा घटना भारतामध्येही घडल्या नसाव्यात काय? त्या शक्य आहेत. निदान तसे घडावयास हवे होते. कारण या आयर्लंड व वेल्समधील नियमासारखाच एक नियम भारतामध्येही अस्तित्वात होता. मनूने त्याचा उल्लेख केला आहे. दहाव्या अध्यायाच्या ६४ ते ६७ श्लोकांमध्ये मनू म्हणतो, ''एखाद्या शूद्राच्या सात पिढ्यांनी ब्राह्मणाच्या मुलीशी लग्न केले, तर आठवी पिढी ब्राह्मण होऊ शकते.'' चातुर्वर्ण्याच्या सामान्य नियमाप्रमाणे शूद्र कधीही ब्राह्मण बनू शकत नव्हता. तो शूद्र म्हणूनच जन्माला येत होता व जन्मभर शूद्र राहूनच मरत होता. तो कधीही ब्राह्मण बनू शकत नव्हता. परंतु हा प्राचीन नियम इतका कठोर होता की मनूला तोही लागू करावा लागला. मनूचा नियम जर भारतात प्रचलित राहिला असता तर गावातील अन्य लोकामध्ये वाताहत अस्तित्वात राहिल्या नसत्या, हे स्पष्ट आहे.

तसे का घडू शकले नाही? याचे उत्तर असे : अस्पृश्यतेची भावना प्रबळ ठरली आणि 'आपले' व 'परके' जमातीतील व जमातबाह्य यांतील भेद दुसऱ्या रूपाने म्हणजे अस्पृश्य आणि स्पृश्यांच्या रूपाने चिरस्थायी झाला, या नवीन घटनेने आयर्लंड व वेल्समध्ये ज्याप्रमाणे सरमिसळ झाली तशी भारतात होण्यास अडथळा निर्माण केला. परिणामतः अस्पृश्यांसाठी विभक्त वसाहती असलेले भारतीय खेड्याचे वैशिष्ट्य तसेच कायम व चिरंतन राहिले.

◆◆◆



## भाग तीन

## अस्पृश्यतेच्या उगमाच्या जुन्या उपपत्ती

# ७. अस्पृश्यतेचे मूळ-वंशभेद

अस्पृश्यतेचे मूळ कोणते? आधीच सांगितल्याप्रमाणे हे क्षेत्र अजून असंशोधित आहे. समाजशास्त्राच्या एकाही अभ्यासकाने अजून त्याकडे मुळीच लक्ष दिलेले नाही. भारतासंबंधी व त्यातील लोकांसंबंधी लिहिणाऱ्या समाजशास्त्रज्ञाव्यतिरिक्त अन्य लेखकांनी केवळ अस्पृश्यतेच्या रूढीची नोंद घेण्यातच समाधान मानलेले आहे. त्यांनी या पद्धातीची कमी अधिक प्रमाणात निंदा केली व हा विषय तसाच सोडला. माझ्या संशोधनानुसार अस्पृश्यता कशी निर्माण झाली, या प्रश्नाचे स्पष्टीकरण करणारा केवळ एकच लेखक मला आढळला. तो मि. स्टॅनले राईस हा होय. स्टॅनले राईसचे मत पुढीलप्रमाणे आहे :

''बहिष्कृत लोक हे जित लोकांचे वंशज असण्याची दाट शक्यता असून जातींचा कल धंद्याचा मेळ घालण्याचा असल्यामुळे नगारे वाजविणे, चर्मकार आणि शेतमजुराची कामे त्यांना देण्यात आली. अगदी सुरुवातीच्या काळापासूनच त्यांना 'दासां'चा दर्जा देण्यात आला होता. आर्यांनी जिंकलेल्या टोळ्यांपैकी ते नव्हते. परैया लोक आदिवासींपैकी असून त्यांना द्रविड लोकांनी जिंकले आणि ते भिन्न वंशाचे असल्यामुळे त्यांना त्यांच्या टोळीमध्ये सामील करून घेण्यात आले नाही. टोळीमध्ये सामील करून घेण्याचा प्रश्न विवाहसंबंधाशी निगडित होता. जर अशा प्रकारचे मुक्त विवाहसंबंध घडू दिले असते तर द्रविड वंशाचा ऱ्हास झाला असता, तथापि हा प्रतिबंध परिपूर्ण स्वरूपात लागू होऊ शकला नाही. अशा प्रतिबंधांना नेहमीच अपवाद असतात. गेल्या काही शतकांच्या काळात संमिश्रीकरणाच्या अनिवार्यपणे ज्या चाळीस किंवा अधिक घटना घडल्या, त्यामुळे आदिवासी व द्रविड यांच्यामधील वांशिक भेद काहीसा नष्ट झाला. या लोकांना हिंदू समाजामध्ये अत्यंत खालचा दर्जा देण्यात आला असून अशा हीन स्थितीत ते इतक्या लांब काळापर्यंत राहिलेले आहेत. कारण हिंदू धर्म हा एकाच वेळी अत्यंत साहिष्णू व असहिष्णू धर्मतत्त्वे असलेला धर्म आहे. तो अन्य धर्मीयांचे धर्मांतर करून आपणात सामावून घेत नाही. ज्याप्रमाणे तुम्ही मुसलमान बनू शकता त्याचप्रमाणे तुम्ही हिंदू बनू शकत नाही. आणि जे हिंदू धर्माच्या चौकटीमध्ये आहेत त्यांच्यावरही कठोर निर्बंध असतात. तथापि या धर्माच्या नियमानुसार वागण्यास तयार असलेल्या आदिवासी लोकांना

सामावून घेण्यास तो तयार असतो. धर्मात प्रवेश करणाऱ्या आदिवासींना अत्यंत खालचे स्थान देण्यात येऊन त्यांना नेहमी दूरच ठेवण्यात येते आणि मंदिर प्रवेशासाठी त्यांना वर्ज्य मानण्यात येते. मूळच्या वंशगत वैशिष्ट्यांमध्ये गंभीर बदल घडवून त्यांचा तोंडवळाच बदलवून टाकणाऱ्या या घटना विचारात घेतल्यास मानववंशशास्त्राचे निष्कर्ष निर्णायक स्वरूपाचे नाहीत असे दिसून येईल. आर्यांनी येथील जित लोकांच्याबाबत जी वृत्ती अंगीकारली असे मानण्यात येते, तीच वृत्ती परैयांच्या बाबतीत द्रविड लोकांनी अशा प्रकारे लागू केली. त्यांनी त्यांचा दर्जा दास लोकांच्या बरोबरीला उतरविला आणि त्यांना जी कामे मानहानीकारक वाटत होती ती कामे त्यांनी पैरया लोकांवर सोपविली. केवळ लग्नविषयकच बंधने होती असे नाही तर परैयांवर लादण्यात आलेली बंधने त्याहीपेक्षा मोठ्या प्रमाणात म्हणजे एक प्रकारच्या गूढ अशा जन्मजात भ्रष्टाचाराच्या कल्पनेतून उगम पावली होती. अशा प्रकारच्या अंगभूत भ्रष्ट असलेल्या व्यक्तीला आपल्या वंशाच्या कुटुंबामध्ये सामील करून घेणे केवळ सामाजिक नियमांच्या विरुद्धच नव्हते, तर त्यामुळे त्यांच्या विशिष्ट देवाचा त्यांच्यावर रोष होईल, असा त्यांचा समज होता आणि त्याला जर देवळाच्या पवित्र सीमेच्या आत शिरून देवाची पूजा करू दिली तर स्वर्गातून अग्निवर्षाव होऊन त्यांचा विनाश होईल व 'कोरा', 'दयन' आणि 'अभिराम' यांनी अपवित्र यज्ञ करण्यासारखाच तो भ्रष्टाचार होईल असा त्यांचा समज होता. तथापि त्यांना पूजाकार्यामध्ये प्रत्यक्ष भाग घेण्यास मनाई असली तरी पूजेशी संबंधित हलक्या प्रकारची कामे परैया करू शकत होते. अशी कामे करताना पवित्र मंदिर भ्रष्ट होणार नाही एवढीच त्यांना काळजी घ्यावी लागे. ख्रिश्चनांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे परैया वेदीसंबंधी कामे करू शकत नसला, धर्मोपदेश करू शकत नसला, भक्त मंडळीत तो सामील होऊ शकत नसला तरी तो घंटा वाजवू शकत होता; मात्र एका अटीवर. ती अट अशी की, त्याने स्वतःला त्यांच्यापैकीच एक समजता कामा नये; कारण वस्तुतः तो बहिष्कृत होता. ही भ्रष्टता अशा प्रकारची होती की त्याचा कलंक स्नान करण्याने किंवा कोणत्याही शुद्धीकरणाच्या विधीने नाहीसा होऊ शकत नव्हता. त्याला स्पर्श करणे, मंजूर असलेल्या व्यवहाराशिवाय त्याच्याशी अन्य व्यवहार करणे, यांचा जादूप्रमाणे सांसर्गिक भ्रष्टाचार समजला जाई. त्याला शेतावर राबण्यासाठी नोकरीवर ठेवले जाऊ शकत होते. कारण यामध्ये त्याला स्पर्श करावा लागत नसे. कामासंबंधी हुकूम देण्यापली'कडे या कामात त्याच्याशी अधिक संबंध ठेवण्याची गरज नसे. रक्ताप्रमाणेच तोही जन्मजात मानण्यात आला होता. अशाप्रकारे जन्मतानुसार तो अपवित्र आणि पतित ठरल्यामुळे त्याला नीच प्रकारची कामे देण्यात आली व त्यामुळे तो अधिकच हीन व पतित ठरला.''



राईसच्या या उपपत्तीचे वस्तुतः दोन भाग पडतात. कारण त्याच्या मते अस्पृश्यतेचे मूळ दोन कारणांमध्ये आढळून येते. वंश आणि व्यवसाय ही ती दोन कारणे होत. या दोहोंचा स्वतंत्रपणे वेगळा विचार होणे आवश्यक आहे. अस्पृश्यतेचे मूळ कारण वंशभेद आहे. या त्याच्या मताचा ऊहापोह या प्रकरणात करावयाचा आहे.

मि. राईसच्या वंशभेदाच्या उपपत्तीमध्ये दोन मुद्दे विहित आहेत :

१. अस्पृश्य हे अनार्य व द्रविड लोकांपेक्षा वेगळे असे आदिवासी लोक आहेत आणि

२. द्रविडांनी त्यांना जिंकून दास बनविले.

या उपपत्तीचे परीक्षण करण्यासाठी परकीय आक्रमकांनी भारतावर केलेल्या स्वाऱ्या, त्यांचे विजय आणि या विजयाद्वारे अस्तित्वात आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक संस्था या सर्वांचा विचार करावा लागेल. मि. राईस यांच्या मते भारतावर दोनदा आक्रमण झाले. भारतावरील पहिले आक्रमण द्रविड लोकांद्वारे झाले. त्यांनी अद्रविड अशा येथील आदिवासी लोकांना– आजच्या अस्पृश्यांच्या पूर्वजांना जिंकले आणि त्यांना 'अस्पृश्य' बनविले. भारतावरील दुसरे आक्रमण आर्यांद्वारा झाले. आर्यांनी द्रविडांना जिंकले. जित द्रविडांना आर्यांनी कसे वागविले याबद्दल राईस काहीच सांगत नाहीत. याबाबत जर त्यांना गळ घातली तर त्यांना 'शूद्र' बनविण्यात आले, असे ते कदाचित सांगतील. अशा प्रकारे आपल्याजवळ एक शृंखला तयार होते. द्रविडांनी भारतावर स्वारी करून येथील आदिवासींना जिंकले व त्यांना अस्पृश्य बनविले. द्रविडांच्या नंतर आर्य आले. आर्यांनी द्रविडांना जिंकले आणि त्यांना शूद्र बनविले. ही उपपत्ती अत्यंत यांत्रिक स्वरूपाची व कोरा तर्क असून शूद्र व अस्पृश्य यांच्या मुळासंबंधीच्या गुंतागुंतीच्या घटना अतिशय सोप्या करून सोडते.

भारताच्या प्राचीन इतिहासाचा विद्यार्थी जेव्हा भूतकाळात खोलवर शिरतो तेव्हा त्याला आर्य, द्रविड, दास व नागलोक या चार नावांचा उल्लेख वारंवार आढळून येतो. ही नावे काय सुचवितात? हा प्रश्न कधीही विचारात घेण्यात आला नाही. आर्य, द्रविड, दास आणि नाग ही नावे वेगवेगळ्या वंशांची आहेत की एकाच वंशाच्या लोकांची केवळ वेगवेगळी दिलेली नावे आहेत? ते वेगवेगळे वंश आहेत, अशी सर्वसाधारण समजूत आहे. या समजुतीवरच हिंदू समाजाचे विशेषतः त्यांच्या वर्णपद्धतीचे स्पष्टीकरण करणाऱ्या मि. राईससारख्या उपपत्ती उभारलेल्या आहेत. ही अशी उपपत्ती स्वीकारण्यापूर्वी तिचा मूलभूत पाया तपासून पाहणे आवश्यक आहे.

आर्यांपासून सुरुवात करू या. आर्य हे एकजिनसी लोक नव्हते, ही गोष्ट निर्विवाद आहे. त्यांची विभागणी दोन गटांमध्ये आहे. त्यांची विभागणी दोन गटांमध्ये झाली होती, हेही शंकातीत आहे. हे दोन गट दोन भिन्न संस्कृतींचे होते, याबद्दलही

वाद नाही. यांपैकी एका गटास ऋग्वेदी आर्य व दुसऱ्या गटास अथर्ववेदी आर्य असे म्हणता येईल. त्यांच्यामधील सांस्कृतिक भेद विकोपास गेल्याचे स्पष्टपणे दिसून येते. ऋग्वेदी आर्यांचा यज्ञावर विश्वास होता. अथर्ववेदी आर्यांचा जादूटोण्यावर विश्वास होता. त्यांच्या पौराणिक कथाही वेगवेगळ्या होत्या. ऋग्वेदी आर्यांचा 'जलप्रलया'च्या कथेवर आणि मनूपासून त्यांचा वंश निर्माण झाला यावर विश्वास होता. अथर्ववेदी आर्यांचा जलप्रलयाच्या कथेवर विश्वास नव्हता.ते त्यांच्या वंशाची उत्पत्ती ब्रह्मा किंवा प्रजापतीपासून झाली असे समजत असत. त्यांच्या साहित्याचा विकासही भिन्न दिशांनी झाला. ऋग्वेदी आर्यांनी ब्राह्मणे, सूत्रे आणि आरण्यके रचली, तर अथर्ववेदी ब्राह्मणांनी उपनिषदे रचली. त्यांच्यामधील हा सांस्कृतिक संघर्ष इतका तीव्र होता की ऋग्वेदी आर्यांनी बराच काळपावेतो अथर्ववेदांचे किंवा उपनिषदांचे पावित्र्य मान्य केले नाही आणि जेव्हा त्यांना मान्यता देण्यात आली तेव्हा त्यांना वेदान्त म्हणजे वेदाच्या कक्षेबाहेरचे, असे त्यांना संबोधण्यात आले. आज 'वेदान्त' या शब्दाचा अर्थ 'वेदांचे सार' असा करण्यात येत असला, तरी त्या काळी तो याच्या उलट होता. म्हणूनच अथर्ववेदाचा किंवा उपनिषदांचा अभ्यास 'अनुलोम' (अधःपात) मानण्यात येत असे. आर्यांचे हे दोन गट दोन विभिन्न वंशांचे होते की काय हे आपणास माहीत नाही आणि 'आर्य' हा शब्द वंशाचा द्योतक होता की काय हेही आपणास माहीत नाही. म्हणूनच आर्य हे एका वेगळ्या वंशाचे लोक होते असे गृहीत धरून मार्ग काढण्यात इतिहासकारांनी चूक केली आहे.

दासांना नागलोकांपासून वेगळे करण्यात याहीपेक्षा दुसरी मोठी चूक इतिहासकारांनी केली आहे. दास आणि नाग हे एकच लोक आहेत. वैदिक वाङ्मयामध्ये नागलोकांनाच 'दास' असे का संबोधण्यात आले हे कळणे कठीण नाही. 'दहाक' या इण्डो – इरानियन या शब्दांचे संस्कृतीकरण केलेले रूप 'दास' हे होय. दहाक हे नागलोकांच्या राजाचे नाव होते. यामुळे त्यांच्या राजाच्या नावावरून आर्य लोक त्यांना दहाक म्हणू लागले. परंतु संस्कृतीमध्ये त्याचे रूप 'दास' असे बनले व संपूर्ण नागलोकांसाठी ते वापरण्यात येऊ लागले.

नागलोक कोण होते? निःसंशयपणे ते अनार्य होते. वैदिक वाङ्मयाचा बारकाईने अभ्यास केला तर या दोन लोकांमधील संघर्ष ,द्वैतभाव व या दोन संस्कृतींमध्ये वरचढपणासाठी चाललेली चढाओढ स्पष्टपणे दिसून येते. आर्यांच्या इंद्रदेवाचा 'अहिवित्र' नावाचा नागदेव विरोधी असल्याबद्दल ऋग्वेदामध्ये प्रथमतःच आपणास सांगण्यास येते. नंतरच्या काळात 'नागदेव' हे नाव बरेच प्रसिद्धीस आले असले तरी सुरुवातीच्या वैदिक वाङ्मयामध्ये 'नाग' हा शब्द आढळत नाही आणि जेव्हा 'सतपथ ब्राह्मणा'मध्ये (११ /२,७,१२) हे नाव सर्वप्रथम वापरण्यात आले तेथे ते मोठ्या



नागाबद्दल वापरण्यात आले की मोठ्या हत्तीबद्दल वापरण्यात आले आहे, हे स्पष्ट नाही. तथापि 'अहिवित्र' हा शब्दाचा खरा अर्थ त्यापासून लोप पावत नाही. कारण अहिवित्र हा साप असून तो नेहमी पाण्याभोवती किंवा पाण्यामध्ये लपून राहतो व त्याचा पृथ्वीवरील व स्वर्गातील समुद्रावर ताबा आहे, असे त्याचे ऋग्वेदामध्ये नेहमी वर्णन येते.

अहिवित्रची जी स्तोत्रे आहेत त्यावरूनही हे स्पष्ट दिसून येते की आर्यांकडून त्याची पूजा होत नव्हती आणि त्याला केवळ दुष्ट शक्ती मानून त्यांच्या पारिपत्यासाठी ते तयारीत राहत असत.

ऋग्वेदामधील नागांच्या उल्लेखावरून नाग हे फार पुरातन लोक होते, असे दिसते. त्याचबरोबर हेही ध्यानात बाळगले पाहिजे की कोणत्याही प्रकारे नागलोक असंस्कृत किंवा वन्यलोक नव्हते. भारतातील राजघराण्यांमध्ये त्यांचे विवाह संबंध होते, हे इतिहासावरून दिसून येते. कदंह राजा कृष्णवर्मा याच्या कदंब कुळाचा उगम नागांशी केलेल्या विवाह संबंधातून झाला, असा उल्लेख देवगिरी दप्तरात सापडतो. नवव्या शतकातील राजकोट दानपत्रामध्ये अश्वत्थाम्याचा विवाह एका नाग स्त्रीशी झाल्याचा उल्लेख आहे आणि त्यांच्याच स्कंदशिष्य नावाच्या पुत्राने पल्लव वंशाची स्थापना केली. नवव्या शतकातील दुसऱ्या एका पल्लव शिलालेखानुसार वीरकूर्च हा पल्लव वंशाचा राजा असून त्यानेही एका नाग स्त्रीशी विवाह केल्याचे व त्याच्यापासूनच त्याला राजचिन्हे प्राप्त झाल्याचे त्याच शिलालेखात नमूद आहे. वाकाटक राजा प्रवरसेन यांच्या गौतमीपुत्र नामक राजपुत्राने भारशिवनरेश भवनाग यांच्या मुलीशी केलेला विवाह ही एक इतिहासप्रसिद्ध घटना आहे. त्याचप्रमाणे द्वितीय चंद्रगुप्ताचा विवाह नाग कुळातील कुबेर नाग नावाच्या राजकन्येशी झाल्याचेही प्रसिद्धच आहे. एका तामिळ कवीचे असे म्हणणे आहे की कोक्किली नावाच्या प्राचीन चोल राजाने एका नाग कुमारीशी विवाह केला. राजेंद्र चोल यानेही आपल्या तेजस्वी सौंदर्यामुळे नागवंशातील तरुणीचे प्रेम जिंकून तिच्याशी विवाह केला, असे सांगण्यात येते. नवसाहसांक चरित्रामध्ये परमारनरेश सिंधुराज (दहाव्या शतकाच्या पहिल्या भागात याचे राज्य असावे असे दिसते.) आणि शशिप्रभा नावाच्या नागकन्येच्या विवाहाचे अत्यंत वास्तव्य असे वर्णन केले आहे.

त्यावरून या विवाहामागे ऐतिहासिक सत्य असले पाहिजे असे वाटत. १०३० –९७३ (विक्रम.सं.) च्या हर्षाच्या शिलालेखावरून दिसून येते की प्रथम गुवाह हा ''नाग आणि अन्य राजकुमारांच्या समूहामध्ये नेता म्हणून प्रसिद्ध होता.'' हा राजा विग्रहराज छहमान मागील सहाव्या पिढीतील होता. यावरून असे अनुमान निघते की तो नवव्या शतकाच्या मध्यामध्ये राज्य करीत असावा.

ओरिसाच्या भौमन वंशातील सनतिकार त्रिभुवन महादेवी नावाच्या नाग कुटुंबातील तरुणीशी लग्न केल्याचा उल्लेख त्याच्या मुलाने कोरलेल्या शिलालेखात आढळतो. हा राजा साधारणतः इ.स. ९२१ च्या काळात होऊन गेला.

नागलोकांनी उच्च दर्जाची सांस्कृतिक पातळी गाठली होती. एवढेच नाही, तर भारताच्या बऱ्याच भागावर त्यांचे शासन होते, असे इतिहासावरून दिसून येते. महाराष्ट्र हा नागांचा मायदेश होता हे सांगण्याची गरज नाही. तेथील लोक व राजेही नागवंशीयच होते.

आंध्रप्रदेश आणि त्याच्यालगतचा प्रदेश इसवी सनाच्या सुरुवातीच्या काळात नागलोकांच्या शासनाखाली होते, हे अनेक पुराव्यांवरून सूचित होते. सातवाहन आणि त्यांच्यामागून येणारे राजे चुटकूल व सातवर्णी यांचे रक्तही कमीअधिक नागवंशातीलच होते. डॉ.ए.सी. रॉय चौधरी यांनी म्हटल्याप्रमाणे द्वात्रिमासात्पुकलित्ताने सालीवहरण राजाला त्याने रचलेल्या कथेमध्ये ब्राह्मण व नागवंशाचे मिश्र रक्ताचे दर्शविलेले असून हा सालीवहरण राजा सातवाहन वंशाचा पुराण पुरुष म्हणून मानण्यात येतो. त्यांच्या घराण्यामध्ये नागवंशामध्ये आढळणारी जी विशिष्ट नावे आढळून येतात त्यावरूनही हे सहजपणे सिद्ध होते. सातवाहन शसानाच्या अखेरच्या काळात नागलोक अति सामर्थ्याशाली बनले हेही अनेक घटनांनी सिद्ध होते. सातवाहन वंशाच्या मुख्य शाखेतील अखेरचा राजा पुलुमवी याच्या कारर्कीर्दीमध्ये स्कंदनाग नावाचा प्रमुख बेल्लारी जिल्ह्यात शासन चालवीत होता. याशिवाय चुटू राजाच्या मुलीने एक नागपुरुष व शिवकंद नागश्री नावाचा आपला मुलगा भेट म्हणून दिला, असा उल्लेख आढळतो. या वंशातील सर्व नावे नाग परंपरेतील असून त्यांचा नाग घराण्याशी जवळचा संबंध असल्याचे सिद्ध होते. तिसरी गोष्ट म्हणजे, सौरिनगोई प्रदेशाच्या राजधानीचे नाव उरगपूर होते. हे केवळ नागांचे अल्पकाळाचे राज्य असून त्या प्रदेशात बराच लांब काळपावेतो तेथे नागांची वस्ती असल्याचे त्यावरून सूचित होते.

सिलोन व सयामच्या बौद्ध परंपरेनुसार आपणाला असे दिसून येते की कराचीजवळ मजेरिक नावाचा नागदेश होता. तिसऱ्या व चौथ्या शतकाच्या पूर्वार्धात उत्तर भारतही अनेक नाग राजांच्या अधिपत्याखाली होता, ही बाब पुराणे, प्राचीन शिक्के व शिलालेखांवरून सिद्ध होते. विदिशा, चंपावती अथवा पाद्मवती आणि मथुरा या तीन स्वतंत्र गटांचा उल्लेख अशा विशेष तऱ्हेने केलेला आहे की त्यांच्या महत्त्वासंबंधी थोडादेखील संशय राहात नाही. भारशिव वंशातील ज्ञात असलेला एकुलता एक नवनाग राजाही नागवंशाशी संबधित होता, असे दिसते. दुसऱ्या गटातील नागांशी संबंधित असलेल्या वादविवादात येथे आपणास शिरणे शक्य नाही किंवा अच्युत गणपती नागाशी वा अलाहाबाद येथील स्तंभावर कोरलेल्या नागसेनाशी या



पौराणिक नागराजांचे एकत्व स्थापित करण्याचीही आपणास आवश्यकता नाही. भारताच्या प्राचीन इतिहासात उल्लेख आलेल्या सर्व नाग राजांमध्ये नवव्या शतकातील उत्तर भारतातील नाग परिवार अत्यंत महत्त्वाचे असून ऐतिहासिकदृष्ट्या वास्तविक आहेत. लाहोरच्या ताम्रमुद्रेवर उल्लेखित असलेले नागभट्ट व त्याचा पुत्र महाराज मोहेश्वर हे या तीन गटांपैकीच होते की त्यांचा आणखी वेगळा नाग परिवार होता हे आपणास कळण्यास मार्ग नाही.परंतु उत्तर भारतातील चौथ्या शतकात असलेल्या कुसान राज्यांना नव नागांनी जिंकल्यामुळे ते लुप्त झाले, या डॉ.सी.सी. रॉय चौधरी यांच्या मताला वरील पुराव्यावरून पुष्टीच मिळते, उत्तरपथाच्या विभिन्न भागात या नाग राजांची राज्ये असावीत. पुढे समुद्रगुप्ताच्या प्रभावशाली सैन्याने जिंकून त्यांची वाताहत केली.

तथापि समुद्रगुप्ताच्या काळापर्यंतही अंतवेदीमध्ये एक सर्वनाग नावाच्या नागवंशातील शासक आढळून येतो. सौराष्ट्राच्या अवतीभवती आणि विशेषतः भरुकच्छामध्ये सहाव्या शतकापर्यंत नागांना महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले होते, असे दिसते. विद्रोही नागांशी स्कंद गुप्ताला निकराचा सामना करावा लागला, असे जुनाडाच्या शिलालेखावरून दिसते.

इ.स. ५७० मध्ये गुर्जर राजा प्रथम दहा याने नागांची वाताहत केली त्या वेळी त्यांना वन्य टोळ्या असे म्हणण्यात येत होते व त्यांच्या राजाचे नाव बिहुल्लक किंवा ब्रोच से सांगण्यात येते. द्वितीय ध्रुवसेनाच्या ६४५ इ.स. च्या दानपत्रात प्रमात्री श्रीनागाचा उल्लेख 'दूतक' म्हणून करण्यात आला आहे.

नवव्या शतकामध्ये विशेषतः मध्य भारतात नाग राज्यांचे पुन्हा पुनरुज्जीवन झालेले दिसते. इ.स. ८०० मध्ये कोसलमधील श्रीपूरच्या महाराज तिवरदेवाने बहुतेक एखाद्या नागलोकांच्या टोळीला जिंकले असावे. यानंतर बंगालच्या शिलालेखात नागलोकांशी संबंधित दोन उल्लेख आपणास आढळतात. महामंडलिक ईश्वर घोषाच्या रामगंज दप्तराज आपणास ढेक्करीच्या घोषनाग परिवाराची माहिती मिळते. हा घोष परिवार अकराव्या शतकातील आहे. बाराव्या शतकातील हरिवर्मदेवाच्या भट्ट भवदेव नावाच्या मंत्र्याने लिहिलेल्या भुवनेश्वर प्रशस्तीमध्ये त्याने नागांचा निःपात केला, असा उल्लेख आहे. भवभूषण वंशाचे उत्कलचे राज्य रामपलाने जिंकल्याचे रामचरित सांगते. परंतु हा उल्लेख नागलोकांसंबंधी आहे की चांद्र लोकांसंबंधी आहे हे स्पष्टपणे कळत नाही. तथापि हा उल्लेख नागलोकांसंबंधी असण्याचीच जास्त शक्यता आहे. कारण तेच अधिक सुप्रसिद्ध होते.

स्वतःला भोगावतीचे राजे व नागवंशीय मानणारे सेन्द्रक, सिन्द किंवा सिन्द्रक अशा वेगवेगळ्या परिवाराचे लोक दहाव्या ते बाराव्या शतकात मध्य भारताच्या बऱ्याच भागात व मुख्यतः बस्तरच्या भागात हळूहळू पसरले होते. बेगुरच्या

नागत्तरांचाही उल्लेख दहाव्या शतकातील शिलालेखात आढळतो. हा नागत्तर, एरियप्पा नावाच्या गंग राजाच्या बाजूने वीर महेन्द्राच्या विरुद्ध लढला व शूरपुरुष म्हणून मान्यता पावला. याच काळामध्ये सिंधुराज परमारशी जिचे लग्न झाले होते त्या शशिप्रभा नामक नागकन्येचा पिताही नर्मदा तटावरील रत्नावती येथे राज्य करीत असला पाहिजे. आता द्रविड लोक कोण आहेत, ते पाहू. ते नागलोकांपेक्षा भिन्न वंशांचे लोक आहेत काय? की एकाच वंशाच्या लोकांना दिलेली ती वेगवेगळी नावे आहेत? द्रविड आणि नाग हे भिन्न वंशांचे लोक आहेत, असा सर्वसाधारण समज आहे. या माझ्या विधानाने अनेकांना धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. तथापि द्रविड आणि नाग ही एकाच वंशातील लोकांची वेगवेगळी नावे आहेत हे विधान थोडेच लोक मान्य करतील. हे नाकारता येण्यासारखे नाही आणि त्यातही द्रविड लोक व नागलोक एकच असल्यामुळे केवळ दक्षिण भारतच त्यांनी व्यापला नव्हता तर उत्तर भारतही त्यांनी व्याला होता, हे विधान फारच थोडे लोक मान्य करतील. काहीही असो, परंतु हे ऐतिहासिक सत्य आहे, हे खरे.

यासंबंधी तज्ज्ञांची काय मते आहेत ते आपण पाहू. दक्षिण भारतातील एक प्रसिद्ध विद्वान श्री. दीक्षितयार आपल्या ''रामायणातील दक्षिण भारत'' या ग्रंथात म्हणतात :

''नागाला आपल्या वंशाचा मूळ पुरुष मानून त्याची पूजा करणारी दुसरी एक नाग टोळी तक्षशिलेपासून वायव्या प्रांतापर्यंत आणि आसामपर्यंत सर्व भारतभर पसरली होती. इतकेच नव्हे, तर सिलोन व दक्षिण भारतातही पसरली होती. एकेकाळी ते अत्यंत शक्तिशाली असले पाहिजेत. यादवांच्या काळात किंवा त्यांच्या राजकीय पाडावानंतर दक्षिण भारतात नागलोकांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. केवळ सिलोनचा काही भागच नव्हे, तर प्राचीन मलबारचा काही प्रदेश नागलोकांनी व्यापला होता. इसवी सनाच्या सुरुवातीच्या शतकातील ख्रिस्त धर्मीय मातामी लोकवाङ्मयात नागनाडूसंबंधी वारंवार उल्लेख सापडतो. नागपूजेचे अवशेष अजूनही मलबारमध्ये दिसून येतात आणि दक्षिण त्रावणकोरमधील नागरकॉईल येथील देवालय आजही नागपूजेला वाहिलेले आहे. यावरून निष्कर्ष निघतो की, नागलोक दर्यावर्दी होते. त्यांच्या स्त्रिया सौंदर्यासाठी प्रसिद्ध होत्या. इसवी सनाच्या सुरुवातीच्या काळात उदयास आलेल्या व प्रसिद्धीस पावलेल्या चेर घराण्यामध्ये हे नागलोक मिसळून गेले असावेत, हे उघड आहे.''

या विषयावर सी.एफ. ओल्डहॅम यांनी अधिक प्रकाश टाकला आहे. त्यांनी या विषयावर गंभीर अभ्यास केला होता. ओल्डहॅम म्हणतात :



''प्राचीन काळापासून द्रविड लोकांचे विभाजन चेर, चोल आणि पांड्य या तीन घराण्यांमध्ये झाले होते.

चेर किंवा सेर (जुन्या तामिळ भाषेत – सरई) हे नाग, चेरमंडळ, नागद्वीप किंवा नागदेश या शब्दांचे पर्यायी शब्द होत. दक्षिणेकडील द्रविड लोक मूलतः असुर होते, हे यावरून स्पष्ट दिसून येते. परंतु याशिवाय स्वतःला चेरस किंवा सेओरिस म्हणवून घेणारे व स्वतःला नागदेवाचे वंशज म्हणविणारे लोक अजूनही गंगेच्या खोऱ्यात दूरपर्यंत वास्तव्य करून आहेत. चेरस लोकांचे कुळ अत्यंत पुरातन आहे आणि त्यांनी गंगेच्या खोऱ्यातील बऱ्याच मोठ्या प्रदेशावर शासन चालविले, अशी समजूत आहे. हा प्रदेश नागलोकांच्या ताब्यात होता हे आपण याआधी पाहिलेले आहेच. मुसलमानी स्वाऱ्यांच्या धामधुमीच्या काळात या चेरस लोकांचा ऱ्हास होऊन क्रमाक्रमाने त्यांना गंगेच्या खोऱ्यातून हाकलून देण्यात आले. सध्या अतिशय गरीब व भूमिहीन अवस्थेत आहेत. हे लोक द्रविड चेरस लोकांच्या वंशातीलच असले पाहिजेत, याबद्दल शंकेला जागा नाही.

चेरस लोकामध्ये विशिष्ट प्रकारचे अनेक रीतिरिवाज आहेत आणि या रीतिरिवाजांपैकी एक असाही आहे की त्यावरून त्यांचा संबंध लिच्छवी व नेपाळमधील नेवार लोकांशी जुळतो. हा रिवाज असा : प्रत्येक पाच किंवा सहा घरांमिळून एक राजा निवडण्यात येई व अभिषेक करून त्याला अधिकार देण्यात येई. या अभिषेकाचे वेळी त्याच्या कपाळावर राजतिलक लावण्यात येई. दक्षिणेतील द्रविड लोकांशी साम्य असलेले अनेक रीतिरिवाज लिच्छवी आणि नेवार या दोन्ही लोकांमध्ये होते. प्रत्येकाला सर्पाबद्दल पूज्यभाव होता. नेपाळमध्ये कारकोटक नाग पूज्य मानला जात होता, तर काश्मीरमध्ये नील नाग पूज्य मानला जाई. लिच्छवी लोकांची राजधानी असलेल्या वैशाली नगरची रक्षकदेवता नाग हीच होती. लिच्छवी आणि नेवार लोकांमधील विवाहाच्या प्रथा तामिळ लोकांतील प्रथेशी मिळत्याजुळत्या असून या प्रथांचा उगम एकच असला पाहिजे, असे दिसते.

नेवार लोकांच्या संपत्तीवर कुटुंबातील स्त्री सभासदांची वारसा मालकी असे. एकेकाळी पंजाबातील अरट्टबहिक व तख लोकांतही अशीच प्रथा होती. त्यांच्यामध्ये स्वतःची नव्हे, तर बहिणीची मुले वारस ठरत असत. द्रविड लोकांमध्ये अजूनही ही रूढी आहे. सारांश, अगदी अलीकडच्या काळातील एका बाळकृष्ण नायर नावाच्या द्रविड लेखकाचे असे मत आहे की वैशिष्ट्यपूर्ण प्रत्येक रूढीवरून पाहता त्यांचे लोक नेवार लोकांचे नातेसंबंधीच दिसतात.

याशिवाय दक्षिणेकडील नागलोक व उत्तर भारतातील लोक यांना जोडणारे अनेक दुवे आहेत. चंबळ नदीजवळ कर्नल टॉड यांना सापडलेल्या एका

शिलालेखानुसार पाहता सलिंद नावाचा एक सरया वंशाचा राजा ताख्त लोकांवर राज्य करीत होता. हे सरया घराणे अतिशय सामर्थ्यसंपन्न असल्याबद्दल प्रसिद्ध होते.

ह्युएनत्संग याने भेट दिलल्या व यापूर्वीच उल्लेख आलेले पंजाबातील ताख्य किंवा तख राज्य हेच होय हे उघड आहे. म्हणून ताख्य राज्यातील नागलोकच सरया नावानेही ओळखले जात होते, असे यावरून दिसून येते.

याशिवाय, हिमालयाच्या पायथ्याशी सतलज व बियास नद्यांच्या खोऱ्यात सराज किंवा सेआराज नावाचा एक प्रदेश आहे. या प्रदेशामध्ये मुख्यतः नागदेवतेचीच विशेषकरून पूजा केली जाते.

चिनाब नदीच्या उत्तर खोऱ्यात आणखीही एक सेओराज नावाचा प्रदेश असून हासुद्धा नागपूजा करणाऱ्या लोकांनीच व्यापला आहे.

कर्नल टॉडच्या शिलालेखातील 'सरया' हे नाव व सराज किंवा सेओराज ही नावे सारखीच दिसतात आणि गंगा खोऱ्यातील चेर लोकांच्या नावाचाच दुसरा पर्याय सेवरी असावा, असे दिसते. याशिवाय आपण आधीच पाहिलेल्या सेराई (चेरा किंवा नागलोकांचे जुने तामिळ नाव) या नावाशी सेवरी हे नाव मिळतेजुळतेच दिसते. म्हणून सेरया किंवा ताख्य, सतलज खोऱ्यातील सराज लोक, गंगा खोऱ्यातील सेओरी किंवा चेरालोक, दक्षिण भारतातील सेरा किंवा केरला लोक हे नागपूजा करणाऱ्या लोकांच्या केवळ भिन्न शाखा होत.

हिमालय प्रदेशातील काही बोलीभाषांमध्ये किरा किंवा किरी या शब्दाचा अर्थ साप असा आहे हेही या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. या शब्दापासूनच 'किरात' हा शब्द बहुतेक बनलेला असून हिमालयातील लोकांना तो बहुधा लावण्यात येतो. हा शब्द 'राजतरंगिरणी'मध्येही आला असून तो काश्मीरमधील किंवा काश्मीरजवळील लोकांसाठी वापरला आहे. वराह मिहिरानेही किरा लोकांचा उल्लेख केला असून प्रो. किलहार्न यांनी प्रसिद्ध केलेल्या ताम्रपटावरही त्यांचा उल्लेख आला आहे.

कांग्रा खोऱ्यातील बैजनाथ देवालयाच्या शिलालेखात त्या स्थळाचे पूर्वीचे नाव किराग्राम असल्याचा उल्लेख आहे. स्थानिक बोलीमध्ये याचा अर्थ 'सापाचे गाव' असा असावा. वैजनाथला आणि त्यालगतच्या संपूर्ण प्रदेशात अजूनही नागदेवतेची सार्वत्रिक पूजा करण्यात येते. अशा तऱ्हेने किरा हा शब्द नाग या शब्दाचा समानार्थी शब्द असून हिमालयातील सर्पपूजा करणारे किरा लोक द्रविड किरा लोकांशी म्हणजे चेरा किंवा केरला या दक्षिणेतील लोकांचे जवळचे नातेवाईक आहेत. याबद्दल क्वचितच शंका राहू शकते. नावांच्या सारखेपणावर नेहमीच विश्वास ठेवण्यात येत नाही. परंतु या ठिकाणी आपणाजवळ काही जास्तीचे पुरावे आहेत.



उघडपणे सारखी सारखी नावे असलेले हे लोक सूर्यवंशी असून ते सर्वच त्यांच्या वंशाची मूळ देवता म्हणून फणाधारी नागाची पूजा करतात.

वरील विवेचनावरून दक्षिण भारतातील द्रविड लोक व उत्तर भारतातील नाग किंवा असुर लोक हे एकाच वंशाचे आहेत. हे निर्विवादपणे विश्वनीय ठरते.''

यावरून हे स्पष्ट आहे की नाग आणि द्रविड लोक हे एकच आहेत. हे पुरावे जमेस धरूनही काही लोक ही उपपत्ती मान्य करण्यास तयार होणार नाहीत. ही उपपत्ती मान्य करण्यातील मुख्य अडचण म्हणजे दक्षिण भारतातील लोक सध्या 'द्रविड लोक' या नावाने ओळखण्यात येतात. दक्षिण भारतातील लोक जर खरेच नागलोक असतील तर केवळ त्यांच्यासाठी 'द्रविड लोक' हे दुसरे नाव का अस्तित्वात आले, अशी शंका येणे स्वाभाविकच आहे. टीकाकार निश्चितच विचारतील की जर द्रविड व नागलोक हे एकच आहेत, तर दक्षिण भारतातील लोकांसाठीही 'नागलोक' हे नाव का उपयोगात आणले जात नाही? हे एक कोडेच आहे, यात शंका नाही. परंतु हे कोडे सोडविणे असाध्य नाही. काही बाबी ध्यानात बाळगल्यास हे कोडे सुटू शकते.

पहिली बाब म्हणजे भाषाविषयक परिस्थिती होय. आज दक्षिण भारतातील लोकांची भाषा उत्तर भारतातील लोकांच्या भाषेहून वेगळी आहे. हे असे नेहमीच होते काय? या मुद्यावरून श्री. ओल्डहॅम यांचे निष्कर्ष लक्षात घेण्याजोगे आहेत ते म्हणतात :

''उत्तर भारतातील भाषेशी द्रविड प्रदेशातील भाषेचा जवळचा संबंध आहे. असे जुन्या संस्कृत व्याकरणकारांचे म्हणणे असल्याचे स्पष्टच आहे आणि त्यांच्या मतानुसार आपण याआधीच पाहिलेल्या असुर वंशातील लोकांच्या भाषेशी तर अधिकच संबंधित आहे. तसेच 'सहस्र चंद्रिका' या ग्रंथामध्ये लक्ष्मीधर असे म्हणतो की पैशाची भाषा पांड्या, केकय, वाल्हिक, सह्य, नेपाल, कुंतल, सुदेश, भोट, गांधीर, हैव आणि कनोज या पैशाची देशांमध्ये बोलली जाते. सर्व बोलीभाषांमध्ये पैशाची भाषेत संस्कृतची भेसळ फारच कमी प्रमाणात आहे, असे सांगण्यात येते.

मूलःत असुर लोक बोलत असलेली भाषा आर्य लोकांच्या भाषेहून वेगळी होती हे उघडपणे दिसते. असुरांच्या भाषेला 'मृदावाक्' म्हणून संबोधणारे ऋग्वेदातील क्रित्येक उतारे प्रो. मूर यांनी उद्धृत केले आहेत. (R vi 74 -2V. vi 3; V vii. 6) या उताऱ्यामध्ये आलेल्या 'मृदावाक्' या शब्दाचा अर्थ प्रो. मूर यांनी 'तीक्ष्ण बोलणारा'' असा केला असून सायनाने 'मृदावाक्' या शब्दाचे स्पष्टीकरण ''वाचा बसललेला'' असे केले आहे. असुराची भाषा आर्यांना समजण्यास कठीण जात होती म्हणून या शब्दाचा मूळ अर्थ आर्यांसाठी दुर्बोध असाच निःसंशयपणे असला पाहिजे यात शंका

नाही. हेच स्पष्टीकरण ऋग्वेदातील दुसऱ्याच ठिकाणी आलेल्या उताऱ्यालाही लागू होते. त्यात म्हटलेले आहे. ''इंद्राला प्रसन्न करून आम्ही अपशब्द बोलणाऱ्या लोकांना जिंकण्यास समर्थ व्हावे.''

सतपथ ब्राह्मणावरून आपणास असे दिसून येते की, असुरांना बोलता येत नसल्यामुळे त्यांना कसलेच महत्त्व उरले नव्हते. ते केवळ 'हेलवा हेलवा' असे ओरडत. ते बोलत असलेली भाषा अशी दुर्बोध होती आणि अशा प्रकारे बोलणाऱ्यांना म्लेंच्छ म्हणत असत. म्हणून कोणाही ब्राह्मणाने अशा प्रकारची रानटी भाषा बोलू नये. कारण ती असुरांची भाषा आहे, असे सतपथ ब्राह्मणाचे म्हणणे आहे.

मनूने लिहिले आहे की जे लोक चातुर्वर्ण्याच्या चौकटीबाहेरच आहेत, म्हणजे जे ब्रह्माच्या मुखापासून, बाहूपासून, मांड्यापासून आणि पायापासून निर्माण झालेल्या लोकांपेक्षा भिन्न आहेत ते म्लेंच्छ भाषा बोलोत की आर्य भाषा बोलोत बाहेरचे त्यांना 'दस्यु' असेच संबोधण्यास येते. यावरून असा निष्कर्ष निघतो की मनूच्या काळात म्लेंच्छ किंवा असुर भाषा आणि आर्य भाषा या दोन्हीही प्रचारात होत्या; तथापि महाभारतामध्ये ज्या काळात वर्णन आहे त्या काळी आर्यीकरण झालेल्या टोळ्यांमध्ये असुरांची भाषा बहुतकरून नष्ट झाली असावी. कारण युधिष्ठिराशिवाय इतरांना कळू नये म्हणून विदूर युधिष्ठिराशी म्लेंच्छ भाषेत बोलल्याचा उल्लेख महाभारतात आहे.

परंतु यानंतरच्या काळात राम तर्कवागीश या व्याकरणकाराने 'नागलोकांप्रमाणे बोलणाऱ्यांचा' उल्लेख केला आहे. यावरून असे दिसून येते की, काही आर्यीकरण झालेल्या नागलोकांनी आपल्या पूर्वजांची भाषा बोलणे सोडून दिलेले असले तरी काही काही अपरिवर्तीत नागलोकांनी आपल्या पूर्वजांची भाषा व धार्मिक रीतिरिवाज तसेच चालू ठेवले. या अपरिवत्रीत टोळ्यांमधील लक्षात भरण्याजोगी बाब म्हणजे पैशाची भाषा त्यांच्या वापरात होती आणि आपण याआधीच पाहिल्याप्रमाणे द्रविड पांड्य हे लोक अशा लोकांपैकीच होते.

तामिळ आणि तिला संलग्न असलेल्या भाषा प्राचीन असुर भाषेवर अधिष्ठित आहेत, हे मत ब्रहुरी लोकांची भाषा लक्षात घेतल्यास अधिकच बळकट ठरते. सिंधूच्या सरहद्दीवर राहणाऱ्या या ब्रहुरी लोकांची भाषा व तामिळ परिवारातील भाषांचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. या बाबतीत डॉ. कल्डवेल म्हणतो : **''ब्रहुरी भाषेवरून सिंधू नदीपलीकडील मध्य आशियाच्या दक्षिण प्रदेशातील द्रविड वंशीय लोकांचा मागमूस आपणाला मिळू शकतो.**

आपण वर पाहिल्याप्रमाणे हा प्रदेश असुर किंवा नागलोकांचे माहेरघर होता आणि द्रविड राज्यांचे संस्थापक हेच लोक होत.



आतापर्यंत पुढे आलेले पुरावे लक्षात घेता दक्षिण भारतातील द्रविड लोक आणि उत्तरेकडील असुर किंवा नागलोक हे एकाच वंशातील लोक आहेत, असा एकच संभवनीय निष्कर्ष त्यावरून निघू शकतो.''

ध्यानात बाळगण्यासारखी दुसरी बाब म्हणजे 'द्रविड' हा मूळ (तत्सक) शब्द नसून 'तामिळ' या शब्दाचे संस्कृतीकरण होऊन तो बनलेला आहे. 'तामिळ' हा शब्द जेव्हा संस्कृत भाषेत आला तेव्हा प्रथम त्याचे रूप 'दामिल' असे झाले व त्यानंतर 'दामिल'चे रूप हळूहळू 'द्रविड' असे बनले. 'द्रविड' हे त्या लोकांच्या भाषेचे नाव असून ते त्या लोकांच्या वंशांचे संबोधन नव्हे.

**लक्षात घेण्यासारखी तिसरी गोष्ट अशी की तामिळ किंवा द्रविड ही भाषा केवळ दक्षिण भारतातील नसून आर्य येण्यापूर्वी संपूर्ण भारताची ती भाषा होती आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत बोलली जात होती. संपूर्ण भारतातील नागलोकांची ती भाषा होती, अशी खरी वस्तुस्थिती आहे.** या पुढील मुद्दा असा की, आर्य आणि नागलोक यांच्यातील परस्परसंबंध आणि त्या संबंधामुळे नागलोकांच्या भाषेवर झालेले परिणाम लक्षात घेतले पाहिजेत. आर्यांच्या सहवासामुळे उत्तर भारतातील नागलोकांच्या भाषेत घडून आलेला बदल भिन्न स्वरूपाचा आहे, ही बाब मोठी चमत्कारिक वाटते. उत्तर भारतातील नागांनी आपली मातृभाषा पूर्णतः टाकून दिली आणि तिच्या जागी त्यांनी संस्कृतचा स्विकार केला. परंतु दक्षिणेतील नागांनी आपली मातृभाषा पूर्णतः टाकून दिली आणि तिच्या जागी त्यांनी संस्कृतचा स्वीकार केला. परंतु दक्षिणेतील नागांनी आपली मातृभाषा म्हणून तामिळ भाषेचे रक्षण केले आणि आर्यांच्या संस्कृत भाषेचा स्वीकार केला नाही. हा फरक लक्षात घेतला तर केवळ भारतातील लोकांसाठीच 'द्रविड' हा शब्द का वापरण्यात येतो हे स्पष्ट होईल. उत्तर भारतातील नागलोकांना 'द्रविड' म्हणून संबोधण्याची वस्तुतः काही आवश्यकता उरली नव्हती. कारण त्यांनी 'द्रविड' भाषा बोलण्याचे बंद केले होते. परंतु उत्तरेकडील नागलोकांनी द्रविड भाषा बोलण्याचे बंद केल्यामुळे व दक्षिणेकडील नागलोक द्रविड भाषेलाच चिकटून राहिल्यामुळे व दक्षिणेतील केवळ तेच लोक आता द्रविड भाषा बोलत असल्यामुळे 'द्रविड' हा भिन्नत्वदर्शक शब्द वापरणे भाग पडले. दक्षिण भारतातील लोकांना 'द्रविड' का म्हणण्यात येते याचे खरे कारण हे असे आहे.

तथापि दक्षिण भारतातील लोकांसाठी 'द्रविड लोक' असा खास शब्द वापरण्यात येत असला तरी नाग व द्रविड लोक हे एकाच वंशाचे लोक आहेत, याचा विसर पडता कामा नये. ती एकाच वंशातील लोकांची दोन वेगवेगळी नावे आहेत. नाग हे वांशिक किंवा सांस्कृतिक नाव असून द्रविड हे त्यांचे भाषिक नाव होते.

अशा प्रकारे दास म्हणजेच नागलोक होत आणि नागलोक म्हणजेच द्रविड लोक होत. भारतातील लोकांच्या वंशासंबंधी आपणाला हेच दुसऱ्या शब्दांत असेही सांगता येईल की भारतामध्ये जास्तीत जास्त दोनच वंशाचे लोक राहात आलेले आहेत; ते वंश म्हणजे आर्य आणि नाग हे होत. यावरून राईसचा सिद्धांत कोलमडून पडतो, हे उघडत आहे. कारण येथे तीन वंश अस्तित्वात असल्याचे राईस गृहीत धरतो; परंतु वस्तुस्थिती पाहता येथे दोनच वंशांचे लोक आहेत, असे दिसून आले आहे.

## २

तथापि द्रविड लोक येण्यापूर्वी तिसऱ्या एका आदिवासी वंशाचे लोक भारतात वास्तव्य करून होते; असे घटकाभर गृहीत धरले तर आजच्या अस्पृश्य लोकांचे ते पूर्वज होते असे म्हणता येईल काय? यातील सत्य शोधण्यासाठी आपणाला दोन कसोट्या वापरता येण्यासारख्या आहेत. पहिली कसोटी मानवाच्या भिन्नवंशीय शारीरिक मोजमापासंबंधीची (Anthropomeric) असून दुसरी मानववंशशास्त्रीय (Ethnological) आहे.

शारीरिक मोजमापाच्या दृष्टीकोनातून पाहावयाचे झाल्यास प्रो. घुर्ये यांनी आपल्या 'भारतातील जाती आणि वंश' या ग्रंथात अत्यंत मनोवेधक माहिती दिली आहे. पुढील उतारा त्यातूनच घेतलेला आहे.

''संयुक्त प्रांतातील ब्राह्मण हा प्राचीन आर्यांचा प्रातिनिधिक नमुना आहे असे समजून त्याच्याशी इतरांची तुलना करण्यापासून आपण सुरुवात करू या. आपण भारतीय लोकांच्या नासिका सूचित्राकडे पाहिले, तर संयुक्त प्रांतातील ब्राह्मणाच्या नासिकेचा (Index) पंजाबातील चुहडा व खत्री यांच्या अंकापेक्षा कमी आहे, असे दिसून येते. संयुक्त प्रांतातील खत्री जातीपेक्षाही त्याच्या नासिकेचा निर्देशांक कमीच आहे. संयुक्त प्रांतातील ब्राह्मण आणि पंजाबातील चुहडा यांच्या नासिका निर्देशांकामध्ये जेवढा फरक आहे त्यापेक्षाही थोडा कमी फरक खत्री व चुहडा याच्या नासिका निर्देशांकामध्ये आहे. याचा अर्थ असा की संयुक्त प्रांतातील ब्राह्मण केवळ उच्च दर्जाची खत्री ही जात वगळता त्या प्रांतातील कोणत्याही जातीपेक्षा शारीरिक दृष्टीने पंजाबातील चुहडा व खत्री यांचा जवळचा नातेवाईक आहे. आपण जर संयुक्त प्रांतातील ब्राह्मण आणि अन्य प्रांतातील ब्राह्मणाच्या नासिका निर्देशांकाकडे पाहिले, तर पंजाबातील चुहडा व संयुक्त प्रांतातील ब्राह्मणामध्ये असलेले हे घनिष्ठ नाते अधिकच स्पष्ट होते. आर्य संस्कृतीच्या विस्ताराचा इतिहास लक्षात घेतला तर बिहारातील ब्राह्मण व संयुक्त प्रांतातील ब्राह्मण यांचे नाते जवळचे असावे अशी



अपेक्षा कोणीही करतो. परंतु चुहडा व संयुक्त प्रांतातील ब्राह्मणात जेवढा फरक आहे तेवढा फरक बिहारमधील ब्राह्मणातही आहे. ऐतिहासिकदृष्टीने संयुक्त प्रांतातील व बिहारातील ब्राह्मणाचा नासिका निर्देशांक एकच असावयास हवा होता. त्या प्रांतातील कूर्मी हा ब्राह्मणाच्या अधिक जवळचा ठरतो आणि चांभार व डोम हे त्याच्यापासून बरेच दूरचे ठरतात. परंतु संयुक्त प्रांतातील डोम तेथील ब्राह्मणापेक्षा जितका दूरचा ठरतो, तितका बिहारातील चांभार तेथील ब्राह्मणापेक्षा दूरचा ठरत नाही. बंगालच्या निर्देशांक तक्त्यावरून असे दिसून येते, की ज्याच्या स्पर्शानेही विटाळ होतो असा समाजव्यवस्थेमध्ये सहावा क्रमांक असलेला चांडाळ तेथील ब्राह्मणापासून फारसा दूरचा ठरत नाही. त्याचप्रमाणे समाजव्यवस्थेत दुसरा क्रमांक असलेल्या कायस्थामध्ये व ब्राह्मणामध्ये कोणताही म्हणण्यासारखा फरक नाही. मुंबई प्रांतातील देशस्थ ब्राह्मण त्याच्याच जातीतील चित्पावन ब्राह्मणाशी जितका जवळचा आहे, तितकाच सोनकोळी या मासे पकडणाऱ्या जमातीच्याही जवळचा आहे. महाराष्ट्रातील अस्पृश्य-महाराचा क्रमांक शेतकरी कुणब्याच्या नंतर जवळच लागतो. त्यानंतर शेणवी ब्राह्मण, नागर ब्राह्मण व उच्च कुलातील मराठे यांचा अनुक्रम लागतो. हे निष्कर्ष काहीसे जुनेच आहेत. सर्वसामान्य सिद्धांताच्या भाषेत सांगायचे झाल्यास याचा अर्थ एवढाच होतो की, मुंबई इलाख्यातील जातवार सामाजिक दर्जा आणि त्यांच्या शरीररचनेतील भिन्नत्व यांचा परस्पर काहीच संबंध नाही.

सरतेशेवटी आपण मद्रासकडे वळू. या प्रांतात विचार करताना आपणाला वेगवेगळा विचार केला पाहिजे, कारण वेगवेगळ्या प्रदेशांत भिन्न भिन्न सामाजिक पायऱ्या आहेत. रिसले आणि ईथर्स्ट यांनी दिल्याप्रमाणे सामान्यतः जातवार नासिका निर्देशांक पुढीलप्रमाणे आहे.

कपू साले, मल्ल, गोल्ला, मदिगा, फगोटा आणि कोमटी यांचा सामाजिक दर्जाप्रमाणे अनुक्रम पुढीलप्रमाणे आहे :

ब्राह्मण, कोमटी, गोल्ला, कपू, इतर आणि साले, फगोटा व इतर त्यांचा सामाजिक दर्जा सर्वांत खालचा आहे.

कानडी लोकांच्या नासिका निर्देशांकानुसार त्यांचा अनुक्रम पुढीलप्रमाणे लागतो.

कर्नाटक स्मार्त, ब्राह्मण, बन्ट, विल्लीव, मांड्य ब्राह्मण, वक्कलिंग, गणिंग, लिंम्बाणाजिग, पांचालकुण्हा, होलेया, देशस्थ ब्राह्मण, तोरेय आणि बेडर.

**त्यांच्या सामाजिक दर्जानुसार त्यांचा अनुक्रम असा** : ब्राह्मण, बन्ट व वक्कलिंग, थोरेया इत्यादी, कुरूबा व गणिग, बादगा व कुबा आणि सोलगा, बिल्लीव, वेडा, होलेया. कानडी प्रदेशातील अस्पृश्य गणल्या गेलेल्या होलेयचा नासिका निर्देशांक

लक्षात घेतल्यास या तुलनेला अधिकच महत्त्व प्राप्त होते. कानडी ब्राह्मणाचा नासिका निर्देशांक ७१.५ आहे, परंतु होलेयचा त्याच्याहीपेक्षा जास्त म्हणजे ७५.१ आहे. याशिवाय जंगली मानलेल्या कुबा व सोलगा यांचा अनुक्रमे ८६.१ आणि ८५.१ इतका आहे. हा निर्देशांक त्यांना धर्मात सामावून घेण्यात आले तेव्हाचा आहे, हे ध्यानात घेण्याजोगे आहे.

नासिका निर्देशांकाप्रमाणे तामिळ जातीचा अनुक्रम पुढीलप्रमाणे लागतो : अंवत्तन, वेल्लई, इडियायान, अगमूदियान, तामिळ, ब्राह्मण, पल्ली, मल्याळी शनात आणि परयान वैशिष्ट्यपूर्ण चार मल्याळी जातींच्या नाकाचा निर्देशांक असा : तियान् ७२, नंबुद्री ७५.५, नायर ७६.७, चेरूमन ७७.२ यांच्यामधील सामाजिक दर्जा क्रमांक असा : नंबुद्री, नायर, तियान् आणि चेरून, कनिकर नावाच्या त्रावणकोरमधील जंगली टोळीचा नासिका निर्देशांक फक्त ८४.३ आहे. यावरून दिसून येईल की तामिळ प्रदेशातील अस्पृश्य गणला गेलेला चेरूमन हा कनिकर लोकांच्या वंशाचा न ठरता ब्राह्मणाच्या वंशामधीलच ठरतो.''

अन्य जातीसंबंधी वर जे विवेचन आले आहे ते वगळून केवळ अस्पृश्यांशी संबंधित माहितीकडे लक्ष दिल्यास असे दिसून येते की पंजाबातील चुहडा (अस्पृश्य) व संयुक्त प्रांतातील ब्राह्मण यांचा नासिका निर्देषांक एकच आहे; बिहारातील चांभाराच्या (अस्पृश्य) व ब्राह्मणाच्या नासिका निर्देशांक कर्नाटकातील ब्राह्मणाच्या निर्देशांकापेक्षा कितीतरी अधिक आहे. आणि तामिळ प्रदेशातील परियापेक्षाही खालच्या दर्जाचा गणल्या गेलेल्या चेरूमन या अस्पृश्याचा नासिका निर्देशांक तामिळनाडूमधील ब्राह्मणांच्या निर्देशांकाइतकाच ठरतो. विभिन्न वंशांचा निर्णय घेण्याचे वांशिक शरीर रचनाशास्त्र (Anthropomentry) हेच खरे शास्त्र असेल तर हिंदू समाजातील विभिन्न जातींना या शास्त्राची कसोटी लावून पाहिल्यास अस्पृश्य हे आर्य आणि द्रविड वंशापेक्षा भिन्न वंशाचे लोक आहेत, हा सिद्धांत कोलमडून पडतो. या मोजमापावरून हे सिद्ध होते आहे की ब्राह्मण आणि अस्पृश्य हे एकाच वंशाचे लोक आहेत. जर ब्राह्मण हे आर्य असतील, तर अस्पृश्यही आर्यच आहेत. ब्राह्मण जर द्रविड असतील तर अस्पृश्यही द्रविडच आहेत. ब्राह्मण हे जर नागवंशाचे असतील तर अस्पृश्यही नागवंशाचेच आहेत. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे राईस यांनी मांडलेली उपपत्ती चुकीच्या पायावर उभारली आहे, असे म्हणणे भाग आहे.

## ३

अस्पृश्यतेची वंशावर आधारलेली उपपत्ती केवळ वांशिक शरीररचना-शास्त्राच्या निष्कर्षाच्या विरुद्ध आहे, एवढेच नव्हे, तर भारतीय लोकांच्या वंशासंबंधी



जरी माहिती आपणाला आहे तिचेही या उपपत्तीला फारच थोडे समर्थन मिळते. एकेकाळी भारतीय लोक टोळ्यांच्या स्वरूपात होते, ही सुप्रसिद्ध बाब आहे. आणि जी टोळ्यांचे रूपांतर जातीमध्ये झालेले असले तरीसुद्धा जुनी टोळ्यांची संघटन पद्धती अजूनही शाबूत आहे. जुन्या काळची प्रत्येक टोळी सध्या कुळामध्ये विभागलेली असून या कुळामध्ये काही कुटुंबांचा समावेश झालेला आहे.

प्रत्येक कुळाचे सजीव आणि निर्जीव असे काही ना काही कुलदैवत आहे. ज्यांना ज्यांना अशा प्रकारचे एकच कुलदेवत आहे त्यांचा त्यांचा एक गट झालेला असून त्याला कुळ किंवा गोत्र असे संबोधण्यात येते. हे एका कुळाचे लोक आपल्या कुळाबाहेरच्या लोकांशीच विवाह करतात. त्यांना आपल्या कुळातील व्यक्तीशी विवाह करण्याची मनाई असते. कारण त्यांचा उगम एकाच पूर्वजापासून झालेला असल्यामुळे त्यांचे रक्त सारखेच आहे, असे समजण्यात येते. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली व विभिन्न जातींमध्ये अस्तित्वात असलेली कुलदेवते तपासून पाहिली तर वंशशास्त्रीय नियमानुसार वंशाचा निर्णय घेण्यास आपणाला बरीच मदत होईल.

दुर्दैवाने वेगवेगळ्या जमातींमधील कुलदैवताच्या अशा प्रकारच्या अभ्यासाकडे समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी आजपर्यंत पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. याला मुख्यतः शिरगणती अधिकाऱ्यांचा प्रचलित दृष्टिकोन कारणीभूत आहे. कारण शिरगणती अधिकाऱ्यांनी भारतीय समाजाचा एकसंघ घटक म्हणून पोटजातीला मान्यता दिली आहे. पोटजातीतील विवाहसंबंध केवळ त्या पोटजातीमध्येच होतात. त्यामुळे अशा प्रकारचा निर्णय शिरगणती अधिकाऱ्यांनी घेतला आहे. परंतु यापेक्षा दुसरी कोणतीच ढोबळ चूक असू शकत नाही. भारतीय समाजाचा एकसंघ घटक पोटजात हा नसून गटबाह्य विवाहाच्या (Exogamy) तत्त्वावर तयार झालेले कुळ हाच भारतीय समाजातील एकसंघ घटक होय. या अर्थाने हिंदू समाज हा मूलतः जुन्या टोळ्यायुक्त समाजतत्त्वावर आधारलेला असून पोटजातीवर उभारलेली समाजव्यवस्था नव्हे. हिंदू कुटुंबात विवाहाच्या वेळी मुख्यतः आपले कुल आणि गोत्र विचारात घेण्यात येते; आणि त्यानंतरच जात आणि पोटजातीचा विचार करण्यात येतो. प्राचीन समाजामध्ये प्रत्येक टोळीमध्ये कुलदैवताला जेवढे महत्त्व असे तेवढे महत्त्व हिंदू कुटुंबामध्ये कुळाला आणि गोत्राला देण्यात येते. यावरून दिसून येते की हिंदू समाजाचे संघटन अजूनही प्राचीन गट पद्धतीवरच आधारलेले असून कुटुंब हा त्याचा लहानात लहान घटक आहे. आणि गटबाह्य विवाहाचा नियम अजूनही कुळ व गोत्राच्या आधारावर पाळण्यात येतो. जाती आणि पोटजाती या संस्था सामाजिक असून कुटुंबप्रधान हिंदू समाजरचनेवर मागाहून लादण्यात आल्या आहेत आणि गोत्रबाह्य विवाहाचा नियम पाळून जात्यंतर्गत विवाह करण्याचा नियम करण्यात आला असल्यामुळे या दोन परस्परविरोधी नियमांचे

पालन परस्परास बाधा न आणता करता येतो.

पोटजात ही भारतीय समाजाचा मूलभूत घटक नसून कुटुंब हा मूळ घटक आहे. हे मान्य करण्याचे महत्त्व उघडच आहे. कारण त्यामुळे हिंदू कुटुंबामध्ये प्रचलित असलेल्या कुळाचा व गोत्रांचा अभ्यास करणे आवश्यक होईल. आणि भारतीय लोकांच्या वंशाबद्दल निर्णय घेण्यासाठी या अभ्यासासाठी फारच मदत होईल. वेगवेगळ्या जातींमध्ये जर सारखे कुळ व गोत्र आढळून आले तर या जाती सामाजिक दृष्टीने वेगवेगळ्या असल्या तरी वांशिक दृष्टीने एकच आहेत असा निष्कर्ष काढता येईल. अशाप्रकारचे दोन प्रयत्न करण्यात आले आहेत. त्यांपैकी एक रिस्ले यांनी महाराष्ट्रात केला असून दुसरा ह्यू रोज यांनी पंजाबात केला आहे. आणि अस्पृश्य लोक हे द्रविड किंवा आर्य लोकांहून भिन्न वंशाचे आहेत या मताला पूर्णतः विरोधी असे त्यांचे निष्कर्ष आहेत. महाराष्ट्रातील फार मोठी लोकसंख्या मराठा जातीची आहे. महार हे महाराष्ट्रातील अस्पृश्य आहेत. मानववंशशास्त्रीय संशोधनावरून असे आढळून आलेले आहे की या दोघांचेही 'कुळ' एकच आहे. यांच्यातील साम्य इतके मोठे आहे की महार लोकांत आढळणारे असे एकही कुळ नाही की जे मराठा जमातीत सापडत नाही आणि मराठ्यांत असलेले असे एकही कुळ नाही की जे महारांत आढळून येत नाही. त्याचप्रमाणे पंजाबातील प्रमुख लोकसंख्या जाटांची असून मझबी शीख पंजाबातील अस्पृश्य आहेत व त्यांच्यापैकी बहुतेक चांभार जातीचे आहेत. मानव-वंशशास्त्रीय संशोधनावरून दिसून येते की या दोघांचेही गोत्र एकच आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर अस्पृश्य हे वेगळ्या वंशाचे लोक आहेत, असा युक्तिवाद कसा करता येईल? मी आधीच सांगितल्याप्रमाणे कुलदैवत, कुळ आणि गोत्र यांना जर काही महत्त्व असेल तर सारखे कुलदैवत असणारे लोक नातेसंबंधी असले पाहिजेत, असाच निष्कर्ष यावरून निघतो. आणि ते जर परस्परांचे नातेवाईक असतील तर ते भिन्न वंशांचे लोक असू शकत नाहीत.

म्हणूनच अस्पृश्यतेच्या वंशभेदावर आधारलेल्या उपपत्तीचा त्याग केला पाहिजे.

◆◆◆



# ८. अस्पृश्यतेचे मूळ-उद्योगधंदे

आता आपण अस्पृश्यतेच्या उद्योगमूलक उपपत्तीकडे वळू या. श्री. राईसच्या मतानुसार अस्पृश्यांच्या गलिच्छ व घाणेरड्या धंद्यांमध्ये अस्पृश्यतेचा उगम आढळून येतो. ही उपपत्ती म्हणून तिचा स्वीकार करण्यात काही अडचणीही आहेत. अस्पृश्य करीत असलेले गलिच्छ व घाणेरडे उद्योगधंदे जगातील सर्व समाजामध्येही आहेत. प्रत्येक मानवी समाजामध्ये हे धंदे करणारे लोक आहेतच. जगाच्या अन्य भागांत या लोकांना अस्पृश्यांसारखी वागणूक का देण्यात येत नाही? दुसरा प्रश्न असा : अशा धंद्यांबद्दल किंवा हे धंदे करण्याबद्दल द्रविड लोकांना घृणा वाटत होती काय? या मुद्याच्या समर्थनासाठी कोणताही पुरावा उपलब्ध नाही. आर्यांच्या बाबतीत मात्र असे पुरावे आपणाला आढळून येतात. या पुराव्यावरून असे दिसून येते की आर्य लोकांमध्ये पवित्रता व अपवित्रतेच्या भावना अन्य समाजांतील लोकांप्रमाणेच आहेत. आणि त्या प्राचीन लोकांच्या भावनांपेक्षा भिन्न स्वरूपाच्या नाहीत. आर्य लोकांना घाणेरडे धंदे करण्यात विधिनिषेध वाटत नव्हता, हे नारदस्मृतीतील पुढील उतारे वाचणाऱ्यास सहज दिसून येईल. स्मृतीच्या पाचव्या अध्यायात नारदाने नोकरीसंबंधीच्या कराराच्या उल्लंघनाबद्दल ऊहापोह केलेला आहे. या अध्यायात पुढील श्लोक आहेत :

*शुश्रूषकः पञ्चविधीः शास्त्रे दष्टो मनीषिभिः ।*
*चतुर्विधः कर्मकरास्तेषां दासः त्रिपञ्चका ।।१ ।।*
*शिष्यान्तेवासिप्रभृतकाश्चतुर्थस्त्वधि कर्मकृत् ।*
*एते कर्मकरा ज्ञेयः दासास्तु गृहजादयः ।।२ ।।*
*सामान्यमस्वतन्त्रत्वमेषामाहुर्मनीषिणः ।*
*जातिकर्मकृतस्तूक्ती विशेषो वृत्तिव च ।।३ ।।*
*कर्मापि द्विविधं ज्ञेयमशुभं शुभमेव च ।*
*अशुभं दासकर्मोक्ते शुभं कर्मकृतां स्मृतम् ।।४ ।।*
*गृहद्वाराशुचि स्थानरस्थ्यावस्कर शोधनम्*
*गुह्याङ्ग स्पर्शतोच्छिष्टविण्मूत्रग्रहणोज्झनम् ।।५ ।।*
*इच्छितः स्वामिश्चाङ्गै ह्यु पस्थानमथान्ततः ।*
*अशुभं कर्म विज्ञेयं शुभमन्यदतः परम् ।।६ ।।*
*शुभकर्मकरासत्वेते चत्वारः समुदाहताः ।*
*जघन्यकर्मभाजस्तुशेषा दासास्त्रिपञ्चकाः ।।७ ।।*

**अर्थ –** (१) धर्मनियमानुसार ऋषींनी सेवकांचे पाच प्रकार सांगितलेले आहेत. यांपैकी चार प्रकारचे सेवक असून पाचवे दास आहेत. या दासांचे पंधरा प्रकार आहेत.

(२) (सेवकांचे चार प्रकार असे :) विद्यार्थी, शिकाऊ उमेदवार, मजुरीने काम करणारा आणि चौथा कार्यालयीन अधिकारी.

(३) या सर्वांची स्थिती परावलंबी तर आहेच, परंतु त्यांचा दर्जा व त्यांची प्राप्ती त्यांच्या जातीवर व धंद्यावर अवलंबून असते, असे ऋषींनी घोषित केले आहे.

(४) स्वच्छ व घाणेरडे असे दोन प्रकारचे धंदे असतात याची जाणीव ठेवा. जे उद्योग घाण आहेत ते दास लोक करतात आणि जे उद्योग स्वच्छ आहेत ते शूद्र लोक करतात.

(५ व ६) दरवाजे, संडास, रस्ते झाडणे, कचऱ्याचे ढीग उचलणे; शरीराच्या गुप्त भागाची मालिश करणे, उष्टे, खरकटे व मलमूत्र एकत्र करून फेकणे आणि मालकाच्या इच्छेनुसार त्याच्या अंगाची मालिश करणे ही कामे गलिच्छ स्वरूपाची समजली जावीत. याव्यतिरिक्त इतर सर्व कामे शुद्ध आहेत.

(२५) याप्रमाणे शुद्ध कामे करणाऱ्या सेवकांची ही यादी करण्यात आली आहे. यावाचून बाकीचे इतर दास आहेत; ते पंधरा प्रकारचे आहेत.

गलिच्छ स्वरूपाचे काम दासांकडून करून घेण्यात येत होते आणि त्यात संडास साफ करण्याचा समावेश आहे हे उघड आहे. परंतु प्रश्न असा की हे दास होते तरी कोण? ते आर्य होते की अनार्य होते? आर्य लोकांमध्ये गुलामगिरीची प्रथा होती यात शंका नाही; परंतु एक आर्य दुसऱ्या आर्याचाही गुलाम असू शकतो. तो आर्य कोणत्याही वर्णाचा असला तरीही तो गुलाम होऊ शकतो. क्षत्रिय व वैश्यही गुलाम होऊ शकत होता. इतकेच नव्हे, तर ब्राह्मणही या गुलागिरीच्या नियमापासून अबाधित नव्हता. जेव्हा संपूर्ण देशात चातुर्वर्ण्याला कायद्याच्या रूपाने मान्यता मिळाली तेव्हा या दास प्रथेमध्ये काही परिवर्तन झाले. हा बदल कोणत्या स्वरूपाचा होता हे नारदस्मृतीतील पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होते :

*वर्णानां प्रतिलोम्येन दानत्वं न विधीयते।*
*स्वधर्मात्यागिनोऽन्यज दारवद्दासता मता।।३९।।*

**अर्थ –** वर्णाच्या उलट्या क्रमात दासप्रथा लागू होत नाही. जर एखादा मनुष्य आपल्या वर्णधर्माचे पालन करीत नसेल तरच त्याला या नियमाचा अपवाद समजावा. अशा परिस्थितीत पत्नीच्या बाबतीत जे नियम लागू होतात तेच नियम करावेत. याज्ञवल्क्याचेही म्हणणे आहे की :

*वर्णानामनुलोम्येन दास्यं तु प्रतिलोमतः। (१४, १८३)*

**अर्थ –** दासप्रथा अनुलोम क्रमानुसार असते, प्रतिलोम क्रमानुसार नव्हे!



याज्ञवल्क्य स्मृतीवर विज्ञानेश्वराची मिताक्षरा नावाची टीका आहे. तेथे याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे :

*ब्राह्मणादीनां–वर्णानामानुलोम्येन दास्यम्। ब्राह्मणस्य*
*क्षत्रियादयः। क्षत्रियस्य वैश्यशूद्रो वेशश्य शूद्रः*
*इत्येवनानुलोम्येन दासभावो भवति न प्रतिलोम्येन।*

**अर्थ –** ब्राह्मण आणि अन्य वर्णांमध्ये दासप्रथा अनुलोम क्रमाने राहील. क्षत्रिय आणि बाकीचे सर्व ब्राह्मणाचे दास होऊ शकतात. वैश्य आणि शूद्र हे क्षत्रियाचे दास होऊ शकतात. शूद्र वंश्याचा दास होऊ शकतो. (अशा प्रकारे) ही दास पद्धती अनुलोम क्रमानुसारच लागू होऊ शकते, प्रतिलोम क्रमाने नव्हे.

हा बदल म्हणजे केवळ दासप्रथेचे पुनर्संघटन होते. आणि त्याद्वारे चातुर्वर्ण्याचा प्राण असलेल्या चढत्या क्रमातील विषमतेला त्यांना खंबीर रूप द्यावयाचे होते. साररूपात हेच सांगायचे म्हणजे; ब्राह्मण मालक क्षत्रियाला, वैश्याला किंवा शूद्रालाही दास बनवू शकतो हे या नव्या नियमाद्वारे घोषित करण्यात आले. वैश्याला केवळ वैश्य व शूद्रालाच गुलाम म्हणून ठेवता येत असे आणि शूद्राला केवळ एखाद्या शूद्रालाच गुलाम म्हणून बाळगता येऊ शकत होते. हे सर्व असूनही दासप्रथा अस्तित्वात राहिली आणि ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा एखादा शूद्र जर गुलाम झाला, तर त्या सर्वांना हा नियम सारखाच लागू होता.

गुलामांना नेमून देण्यात आलेली कामे लक्षात घेतली तर कायद्यान्वये घडून आलेला हा बदल मुळीच महत्त्वाचा ठरत नाही, त्याचा अजूनही असाच अर्थ होतो की एखादा ब्राह्मण किंवा क्षत्रिय अगर वैश्य जर गुलाम असेल तर तो संडास सफाईचे काम करीत असे. एखादा ब्राह्मण क्षत्रियाच्या, वैश्याच्या किंवा शूद्राच्या घरचा संडास साफ करू शकत नव्हता. एवढाच त्याचा अर्थ आहे. तथापि त्याला ब्राह्मणाच्या घरचा संडास साफ करावा लागत असे. त्याचप्रमाणे एखादा क्षत्रिय गुलाम ब्राह्मणाच्या किंवा क्षत्रियाच्या घरचा संडास साफ करीत असे. कवेळ शूद्राच्या घरीच तो तशा प्रकारची कामे करीत नसे. यावरून उघडपणे दिसून येते की आर्य म्हणून मान्य असलेले ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हेसुद्धा अत्यंत गलिच्छ समजले जाणारे संडास साफ करण्याचे काम करीत होते. संडास साफ करण्याचे काम जर आर्यांना घृणास्पद वाटत नव्हते, तर अस्पृश्यतेचे मूळ कारण गलिच्छ उद्योग करणे हे आहे, असे कसे म्हणता येईल? म्हणून अस्पृश्यतेचे मूळ कारण म्हणून सांगण्यात येणारी 'गलिच्छ उद्योगांची उपपत्ती' समर्थनीय नाही.

◆◆◆

## भाग चार

## अस्पृश्यतेच्या उगमाबद्दलच्या नवीन उपपत्ती

# ९. अस्पृश्यतेचे मूळ बौद्ध धर्माचा तिरस्कार

भारतात १८७० सालापासून दर दहा वर्षांनी शिरगणतीचा अहवाल शिरगणती कमिशनद्वारा प्रसिद्ध करण्यात येत असतो. त्यामध्ये भारतातील जनतेच्या सामाजिक व धार्मिक जीवनासंबंधी अत्यंत उपयुक्त माहिती असते. अन्यत्र इतकी उपयुक्त माहिती उपलब्ध होणे असंभवच आहे. १९१० पूर्वीच्या शिरगणतीच्या तक्त्यामध्ये शिरगणती अधिकाऱ्यांनी 'धर्मवार लोकसंख्या' असा एक रकाना घातला होता. या रकान्यामध्ये १. मुसलमान, २. हिंदू आणि ३. ख्रिश्चन इत्यादींची लोकसंख्या दिलेली असे. १९१० च्या शिरगणतीच्या अहवालामध्ये ती प्रचलित पद्धती सोडून एक नवी पद्धती स्वीकारण्यात आली. त्याला प्रथमतःच हिंदूंचे विभाजन तीन वर्गांमध्ये करण्यात आले : १. हिंदू २. प्रकृतिजनक आदिवासी आणि वन्य जमाती व ३. दलित वर्ग किंवा अस्पृश्य. तेव्हापासून हे नवीन वर्गीकरण अद्यापही चालू आहे.

२

आधीच्या शिरगणती अधिकाऱ्यांच्या धोरणामध्ये हा जो बदल करण्यात आला त्यातून तीन प्रश्न उद्भवतात. पहिला: या नवीन वर्गीकरणाचा शिरकाव करण्याची आवश्यकता १९१० सालच्या शिरणती अधिकाऱ्याला वाटण्याचे कारण काय? दुसरा: या वर्गीकरणासाठी कोणती कसोटी स्वीकारण्यात आली? आणि तिसरा वरीलप्रमाणे हिंदूंना तीन वेगवेगळ्या गटांमध्ये विभाजित करण्यास कारणीभूत ठरलेल्या घटनांची कारणे कोणती?

पहिल्या प्रश्नाचे उत्तर १९०९ साली आगाखान यांच्या नेतृत्वाखाली तेव्हाच व्हाईसरॉय लॉर्ड मिन्टो यांना जे निवदेन दिले, त्यामध्ये आपणाला आढळून येते. त्यामध्ये त्यांनी मुसलमानांसाठी विधानसभेत, मंत्रिमंडळात व सरकारी नोकऱ्यांत स्वतंत्र आणि पुरेशा प्रतिनिधित्वाची मागणी केली होती. या निवेदनपत्रामध्ये पुढील उतारा आहे.

''१९०१ च्या जनगणनेनुसार भारतातील मुसलमानांची संख्या ६ कोटी २० लाखावर असून ब्रिटिश भारताच्या संपूर्ण लोकसंख्येच्या ती एक पंचमांश व एक चतुर्थांश याच्या दरम्यान आहे. आणि **'वन्य जमाती व अन्य धर्मीय' या नावाच्या**



**सदराखाली नोंद करण्यात आलेल्या तसेच ज्यांचे ढोबळ मानाने हिंदू म्हणून वर्गीकरण करण्यात आले असले तरी वस्तुतः जे मुळीच हिंदू नाहीत अशा लोकांची संख्या हिंदूंच्या लोकसंख्येतून कमी केल्यास हिंदूंच्या तुलनेत मुसलमानांच्या संख्येचे प्रमाण अधिकच मोठे ठरते.**[८२] यामुळे आम्ही निवेदन सादर करू इच्छितो की ज्या जमातीची लोकसंख्या रशिया वगळता युरोपातील कोणत्याही प्रथम दर्जाच्या राष्ट्राच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे अशा जमातीबद्दल विस्तृत किंवा मर्यादित प्रतिनिधित्वाचा विचार अभिप्रेत असता, राज्यातील एक महत्त्वाचा घटक म्हणून तिला योग्य व पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, असा न्याय्य हक्क ती जमात सांगू शकते.

हुजुरांच्या परवानगीने याहीपुढे एक पाऊल टाकून आम्ही आग्रहपूर्वक विनंती करू इच्छितो की या देशातील लोकांना जे काही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रतिनिधित्व मिळेल अथवा ज्या कार्यवाहीमुळे मुसलमानांच्या दर्जावर आणि प्रभुत्वावर काही परिणाम होण्याची शक्यता असेल; त्यामध्ये मुसलमानांना मिळणारे प्रतिनिधित्व केवळ त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मिळाल्यास पुरेसे ठरणार नाही, तर त्यांचे राजकीय महत्त्व व साम्राज्य रक्षणासाठी त्यांनी केलेले साहाय्य लक्षात घेऊन त्यांना प्रतिनिधित्व देण्यात यावे; तसेच एका शतकापूर्वी या जमातीचे भारतामध्ये असलेले महत्त्वपूर्ण स्थान अजूनही या जमातीच्या विस्मरणातून गेलेले नाही. तेही अशा प्रसंगी हुजूर बहादूर ध्यानात घेतली अशी आम्ही आशा बाळगतो.''

वरील जाड पत्रामधील मजकुराला विशेष अर्थ आहे. मुसलमानांच्या लोकसंख्येची तुलना हिंदूंच्या लोकसंख्येशी करताना आदिवासी, वन्य जमाती आणि अस्पृश्यांची लोकसंख्या त्यांच्या लोकसंख्येतून कमी करावी हे सुचविण्याकरिता तो मजकूर त्यांनी निवेदन पत्रामध्ये घातलेला आहे. १९१० च्या शिरगणती अधिकाऱ्यांनी शिरगणतीच्या तक्त्यामध्ये हिंदूंचे वर्गीकरण दर्शविणारा नवीन रकाना का घातला याचे कारण मुसलमानांच्या या विभक्त प्रतिनिधित्वाच्या मागणीमध्ये असून त्यांचा हा एक युक्तिवाद होता. हे काहीही असो, परंतु हिंदूंनी मात्र त्याचा अर्थ तसाच घेतला होता.

मौजेची गोष्ट अशी की 'वर्गीकरणाच्या पद्धतीमध्ये शिरगणती अधिकाऱ्यांनी असा बदल का घडवून आणला' हा पहिला प्रश्न दुसऱ्या प्रश्नापेक्षा कमी महत्त्वाचा आहे. हिंदूमधील १) शंभर नंबरी हिंदू कोणते व २) जे शंभर नंबरी हिंदू नव्हते त्यांचे विभाजन करण्यासाठी शिरगणती अधिकाऱ्यांनी जे निष्कर्ष वापरले ते माहीत करून घेणे महत्त्वाचे आहे.

या विभाजनासाठी शिरगणती अधिकाऱ्यांनी जे आधार वापरले ते

शिरगणतीच्या वेळी काढलेल्या पत्रकामध्ये आढळून येतात. त्यामध्ये हे वरील दोन वर्ग वेगवेगळे करण्यासाठी त्यांनी काही खास कसोट्या दिलेल्या आहेत. ३) त्यापैकी शंभर नंबरी हिंदू नसलेल्या जातीची व जमातीची निवड पुढील बाबी लक्षात घेऊन करण्यात आली :

१) ब्राह्मणांचे सर्वश्रेष्ठत्व अमान्य करणारी.

२) जे कोणाही ब्राह्मणाकडून अथवा अन्य मान्यवर हिंदू गुरुकडून 'गुरूमंत्र' घेत नाहीत.

३) वेदांचे प्रामाण्य नाकारणारे.

४) हिंदू देवदेवतांची पूजा न करणारे.

५) चांगले ब्राह्मण ज्यांचे पौरोहित्य मुळीच नाहीत.

६) ज्यांच्यामध्ये ब्राह्मण पुरोहित मुळीच नाहीत.

७) हिंदू देवळामध्ये ज्यांना प्रवेश नाकारण्यात आला आहे.

८) ज्यांच्या स्पर्शामुळे किंवा काही ठरावीक अंतराच्या जवळ आल्यास त्यामुळे विटाळ होतो.

९) ज्यांच्यामध्ये प्रेत पुरण्याची रूढी आहे.

१०) जे गोमांस खातात व गाईला पूज्य मानत नाहीत. या दहा कसोट्यांपैकी काही हिंदूंना वन्य जमाती व आदिवासी यांच्यापासून वेगळे करतात. बाकीच्या हिंदूंना अस्पृश्यापासून वेगळे काढतात. अस्पृश्यांना हिंदूपासून वेगळ्या करणाऱ्या कसोट्या २, ५, ६, ८ आणि १० व्या क्रमांकाच्या आहेत. आपला संबंध मुख्यतः त्यांच्याशीच आहे.

अधिक स्पष्टतेसाठी या कसोट्यांचे काही भागामध्ये विभाजन करून त्यांचा वेगवेगळा विचार करणे अधिक चांगले होईल. या प्रकरणामध्ये केवळ २, ५ आणि ६ व्या क्रमांकाच्या कसोट्यांचा ऊहापोह करतो.

२, ५ आणि ६ व्या कसोटीनुसार शिरगणती अधिकाऱ्यांना मिळालेली उत्तरे अशी : १) अस्पृश्य लोक ब्राह्मणाकडून गुरुमंत्राचा स्वीकार करीत नाहीत. २) अस्पृश्यांना श्रेष्ठ ब्राह्मणाची सेवा मुळीच उपलब्ध होत नाही. आणि ३) अस्पृश्यांनी त्यांच्यातील स्वतःच निर्माण केलेले उपाध्याय त्यांच्यामध्ये आहेत. या वस्तुस्थितीसंबंधी सर्व प्रांतांतील शिरगणती अधिकाऱ्यांचे एकमत आहे.

या तीन प्रश्नांपैकी तिसरा अतिशय महत्त्वाचा आहे. दुर्दैवाने शिरगणती अधिकाऱ्यांनी हे तितकेसे ध्यानी घेतले नाही. कारण चौकशी करीत असताना त्याच्या मुळाशी कोणती कारणे असावीत याचा शोध घेण्यात ते अयशस्वी ठरले. अस्पृश्य लोक ब्राह्मणांकडून गुरुमंत्र का स्वीकारीत नव्हते? अस्पृश्यांचे कौटुंबिक उपाध्याय



म्हणून ब्राह्मण अस्पृश्यांची सेवा का करीत नव्हते? आपले स्वतःचे उपाध्याय असणेच अस्पृश्यांनी का पसंत केले? ही वस्तुस्थिती प्रत्यक्ष अस्तित्वात होती या मुद्यापेक्षाही हा त्यांच्यामागील 'का?' हा प्रश्न महत्त्वाचा आहे. या वस्तुस्थितीतील या 'का' चे उत्तर शोधून काढले पाहिजे. कारण अस्पृश्यतेच्या उगमाचा धागादोरा त्याच्यामागे लपलेला आहे.

प्रत्यक्ष संशोधनाला सुरुवात करण्यापूर्वी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे ती म्हणजे शिरगणती अधिकाऱ्यांनी केलेली चौकशी एका अर्थाने एकपक्षीयच आहे. अस्पृश्यही ब्राह्मणांचा तिरस्कार करतात, ही बाब त्यांनी प्रकाशात आणली नाही. तथापि वस्तुस्थिती मात्र तशीच आहे. ब्राह्मण लोक अस्पृश्यांपेक्षा उच्च दर्जाचे आहेत आणि ब्राह्मणांपेक्षा आपण खालच्या दर्जाचे आहोत हे अस्पृश्यांनाही मान्य असल्याची विचारसरणी लोकांच्या इतकी पचनी पडलेली आहे की अस्पृश्यही ब्राह्मणाकडे नीच दृष्टीने पाहतात हे विधान निश्चितच त्यांच्या आश्चर्याची बाब ठरेल. परंतु ज्यांनी अस्पृश्यांमध्ये रूढ असलेल्या सामाजिक चालीरीतीचे निरीक्षण केले आहे, त्यांच्या ही बाब लक्षात आलेली आहे. या संबंधात काही शंका असलीच तर तिच्या निवारणासाठी त्यांच्या लेखनातील पुढील उताऱ्याकडे मी लक्ष वेधू इच्छितो.

ॲब ड्यूबॉयसने याची नोंद घेतली आहे. तो म्हणतो :

''आज परियाला ब्राह्मणाच्या घरासमोरून जाण्यास कोणी मज्जाव करीत किंवा करू शकला नसला तरी आजही कोणीही परिया गावातील ब्राह्मण गल्लीतून जाऊ शकत नाही. त्यांच्या बाजूने पाहिल्यास आपल्या झोपडपट्टीतील रस्त्यावरून (पाराचेरीस) परियाही ब्राह्मणाला काहीही झाले तरी जाऊ देणार नाही. कारण त्यामुळे त्यांचा विनाश ओढवेल, अशी त्यांची पक्की खात्री आहे.''

तंजावर जिल्ह्यातील 'गॅझेटिअर' पत्राचा संपादक श्री, हेमिंग्वे म्हणतो: ''चक्किलियन– तंजावर जिल्ह्यातील जाती जोरदार विरोध करतात. कारण त्यामुळे त्यांना विनाश होईल, अशी त्यांची श्रद्धा आहे.''

म्हैसूरच्या हसन जिल्ह्यातील होलेया लोकांसंबंधी सांगायचे तर कॅप्टन जे. एस. एफ मॅकेन्झी म्हणतो :

''होलियार लोकांच्या वस्तीचे स्थान अशी होलिगिरी प्रत्येक खेड्यामध्ये आहे. होलियार हे लोक पूर्वी शेतावर काम करणारे दास होते आणि खेड्यांच्या गावकुसाबाहेर ते होलिगिरी मध्ये राहात होते. याचे कारण त्यांना अस्पृश्य समजण्यात येत होते हे असावे असे मला वाटले. कारण यांच्या स्पर्शाचाही विटाळ मानण्यात येतो.''

होलियार लोकांच्या हातून कोणतीही वस्तू घेण्यास नकार देणारे ब्राह्मण

साधारणतः अशीच कारणे देत असतात. आणि असे असूनही या होलिगिरीमधून कसलाही अपमान न होता जाता आले तर आपले भाग्य उजळेल असे ब्राह्मणांना वाटते. याला होलियार लोकांचा जोरदार विरोध असतो आणि एखाद्या ब्राह्मणाने त्यांच्या वस्तीत शिरण्याचा प्रयत्न केला, तर फार मोठ्या संख्येने ते त्याच्यावर धावून जातात आणि त्याला चपला जोड्यांनी बडवून काढतात. पूर्वीच्या काळी तर ठार मारत असत, असे सांगण्यात येते. अन्य जातीचे लोक जास्तीत जास्त दरवाजापर्यंत जाऊ शकतात; परंतु त्यांना घरामध्ये प्रवेश करू नये, कारण त्यामुळे होलियार लोकांवर दुर्भाग्य ओढवेल, असा त्यांचा समज आहे. जर चुकीने अन्य जातीची व्यक्ती होलियार माणसाच्या घरात शिरली तर घरमालक त्या अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीचे कपडे फाडून त्याच्या एका टोकाला मीठ बांधून देण्याची काळजी घेतो व त्याला घराबाहेर हाकलतो. त्या आगंतुक व्यक्तीच्या घरात शिरण्यामुळे जे सौभाग्य उजळ होणार होते ते व त्या घरमालकावर जे दुर्भाग्य ओढवणार होते ते या मीठ बांधण्यामुळे नष्ट होऊन जाते असा त्यांचा समज आहे.

या वैचित्र्यपूर्ण रूढीचा अर्थ काय? याच्या स्पष्टीकरणाचा मेळ, अर्थातच अगदी सुरुवातीच्या स्थितीशी म्हणजे जेव्हा अस्पृश्य लोक अस्पृश्य नव्हते, तर केवळ वाताहत झालेले लोक होते त्या वेळच्या स्थितीशी बसला पाहिजे. या वाताहत झालेल्या लोकांच्या धार्मिक कार्यक्रमात पौरोहित्य करण्याचे ब्राह्मणांनी का नाकारले, असा प्रश्न आपण उपस्थित केला पाहिजे. ब्राह्मणांनी पौरोहित्य करण्याचे नाकारले अशी वस्तुस्थिती आहे काय? की या वाताहत झालेल्या लोकांनी त्यांना बोलावण्याचे नाकारले? वाताहत झालेले हे लोक अपवित्र आहेत असे ब्राह्मणांनी का ठरविले? या वाताहत झालेल्या लोकांनी ब्राह्मणाला अपवित्र का मानले? परस्परांबद्दलच्या या तिरस्काराचा आधार कोणता?

हे वाताहत झालेले लोक बौद्धधर्मीय होते, असे गृहीत धरल्यास या परस्पर तिरस्काराचा उलगडा होऊ शकतो. तो बौद्धधर्मीय असल्यामुळे ब्राह्मणांना पूज्य मानीत नव्हते, त्यांना पौरोहित्याचे काम देत नव्हते आणि त्यांना अपवित्र समजत होते. दुसरी बाजू न पाहता ते बौद्धधर्मीय असल्यामुळे ब्राह्मणही त्यांचा द्वेष करीत होते आणि त्यांच्याबद्दल द्वेष व तिरस्काराचा प्रसार आपल्या प्रवचनांतून करीत होते. याचा परिणाम असा झाला की या वाताहत झालेल्या लोकांना अस्पृश्य मानण्यात आले.

हे वाताहत झालेले लोक बौद्धधर्मीय होते याचा प्रत्यक्ष पुरावा आपणाकडे उपलब्ध नाही. ज्या अर्थी या देशातील बहुसंख्य हिंदू बौद्धधर्मीयच होते, त्या अर्थी अशा पुराव्यांचीही वस्तुतः काहीच आवश्यकता नाही व यामुळे ते बौद्धधर्मीय होते असे समजून चालण्यास काहीच हरकत नाही.



हिंदूंच्या मनात बौद्धांबद्दल तिरस्कार आणि अतिद्वेष भरलेला होता आणि ही भावना ब्राह्मणांनी लोकांच्याही मनात निर्माण केली हे विधान निराधार नाही.

नीलकांत या लेखकाने आपल्या 'प्रायश्चित्त मयूख' या ग्रंथात मनुस्मृतीतील एक श्लोक उद्‌धृत केला आहे. त्याचा अर्थ असा :

'एखाद्या व्यक्तीने बौद्धधर्मीयाला किंवा पाशुपताच्या फुलाला, नास्तिकाला अथवा एखाद्या महापातक्याला स्पर्श केला तर स्नान करण्याने तो शुद्ध होतो.

अपरार्क यांनी आपल्या स्मृतीमध्ये या मताचा प्रचार केला आहे. व्रद्ध हरित याही पुढे जाऊन असे म्हणतो की बुद्धविहारामध्ये जर एखाद्याने प्रवेश केला तर शुद्धीकरणासाठी त्याने स्नान करणे आवश्यक आहे.

बुद्धाच्या अनुयायांसंबंधीची द्वेष व तिरस्काराची वृत्ती किती विस्तृत होती हे संस्कृत नाटकातील प्रसंगाच्या चित्रणावरून दिसून येऊ शकते. बौद्धांसंबंधीच्या या वृत्तीचे अत्यंत लक्षवेधक उदाहरण 'मृच्छकटिक' नाटकामध्ये दिसून येते.

या नाटकाच्या सातव्या अंकामध्ये नाटकाचा नायक चारुदत्त आणि त्याचा मित्र मैत्रेय गावाबाहेरच्या उद्यानामध्ये वंसतसेनेची प्रतीक्षा करीत आहेत, असा प्रसंग दाखविला आहे. ती तेथे येऊ न शकल्यामुळे चारुदत्त तेथून निघून जाण्याचे ठरवितो. ते तेथून निघत असताना त्यांना एक साम्वाहक नावाचा बौद्ध भिक्खू दिसतो. त्याला पाहून चारुदत्त म्हणतोः

'चारुदत्त–सखे मैत्रेय! वसंतसेनादर्शनोत्सुको ऽ यं – जनः – तदेहि प्रच्छावः! (परिक्रम्य) कथयभिमुखमना

*भ्युदायिकं श्रमणक दर्शनम्। (विचार्य) प्रविशत्वयमनेनपथा।*
*वयमप्यनेनव पथा गच्छावः। (इतिनिष्क्रान्तः)'*

**अर्थ –** मित्र मैत्रेय मी वसंतसेनेला भेटण्यासाठी उत्सुक आहे. चल आपण निघू या. (थोडे दूर गेल्यावर) अरऽऽ हा तर अपशकुन झाला आहे. एक बौद्ध श्रमण आपणाकडेच येत आहे! (थोडा विचार करून) ठीक आहे! त्याला येऊ दे, आपण या दुसऱ्या रस्त्याने निघून जाऊ. (निघून जातात.)

आठव्या अंकामध्ये हाच भिक्खू राजाचा साला शकार याच्या उद्यानामधील तलावात आपले कपडे धूत असण्याचा प्रसंग आहे. विटासोबत शकार तेथे येतो व भिक्खूकडे धावत जाऊन त्याला ठार मारण्याची धमकी देतो. त्यांच्यामधील पुढील संभाषण विशेष प्रकाश टाकणारे आहे :

शकार – चिट्ठ! ले दुट्ठ शमणक, चिट्ठ।
भिक्षु – अश्चर्यम्। एष स राज श्यालसंस्थानक आगतः।

एकेन भिक्षुणऽपराधे कृतेऽन्यमपि यत्र यत्र
भिक्षु पश्यति, तत्र तत्र गामिव नासिकां विद्धवऽप वाह्याति ततृ कुत्राशरणः
शरणं गमिष्यामि! अथवा भट्टारक एव बुद्धो मे शरणम्

शकार – तिष्ठ, रे दुष्ट श्रमणक, तिष्ठ! आपानकमध्य प्रविष्टस्येव रक्त मूलकस्य शीर्य ते भङ्ःक्ष्यामि (इति ताडयति)

विट – काणेली मातः। न युक्तं निर्वेदधृतकषायं भिक्षुं ताडियितुम

भिक्षु – स्वागतम् प्रसीदतूपासकः।

शकार – मित्र, पश्य पश्य। आक्रोशति माम्।
विट किं ब्रवीति?

शकार – उपासक इति मां भणति, किमहं नापितः?

विट – बुद्धोपासक इति भवन्त स्तौति।

शकार – भाव, तत्किमर्थमेष इहागतः?

भिक्षु – इदं चीवरं प्रक्षालयितुम्!

शकार – रे दुष्ट श्रमणका! अहमपि प्रदरपुरूषो
मनुष्य को न स्नामि– तत्वामेक प्रहारिक करोमि।''

**अर्थ –** शकार – थांब। अरे दुष्ट श्रमणा, थांब!

भिक्षु – ओ! राजाचा सल्ला आहे! कोणत्या तरी भिक्षूने याचा अपराध केल्यामुळे आता तो कोणत्याही श्रमण आढळला तरी त्याला मारत सुटतो.

शकार – थांब एखाद्या खानावळीतील आचारी लाल मुळा जसा ठेचून काढतो त्याप्रमाणेच मी तुझे मुंडके ठेचून काढतो.

विट – मित्रा! संसाराचा त्याग करून काषाय वस्त्र परिधान करणाऱ्या श्रमणाला मारणे उचित नाही.

भिक्षु – (स्वागत असो) उपासक आनंदी असोत.

शकार – मित्रा, पाहा. हा मला शिव्या देत आहे

विट – तो काय म्हणत आहे?

शकार – तो मला उपासक म्हणतो. मी न्हावी आहे की काय?

विट – ओह! वस्तुतः बुद्धाचा उपासक संबोधून तो तुझी प्रशंसा करीत आहे.

शकार – तो येथे कशाला आला?

भिक्षू – हे चीवर धुण्यासाठी.

शकार – अरे दुष्टा श्रमणा, मी स्वतःसुद्धा या तळ्यात स्नान करीत नाही. एका तडाख्यातच मी तुला ठार मारीन!

बरीच मारपीट केल्यानंतर त्या भिक्खूला सोडून देण्यात आले. येथे हिंदूंनी



घेरलेल्या एका बौद्ध भिक्खूचे चित्रण केलेले आहे. त्याला टाळण्यात व बहिष्कृत करण्यात आले आहे. त्याच्याबद्दलची तिरस्काराची भावना इतकी तीव्र आहे की ज्या रस्त्याने भिक्खू जात आहे तो रस्ताही हे लोक टाळतात. दूर राहण्याची भावना इतकी जोरदार आहे की एखाद्या बौद्धाचा एखाद्या स्थळी प्रवेश झाला, तर हिंदूंना तेथून निघून जाण्यास पुरेसे कारण ठरत होते. बौद्ध भिक्खू हा तुलनेने ब्राह्मणाच्या बरोबरीचा असतो. मृत्युदंडापासून ब्राह्मण मुक्त असतो. इतकेच नव्हे, तर शारीरिक दंडापासूनही मुक्त आहे. परंतु कसलीही खंत न बाळगता आणि त्यात काहीही गैर नाही असे समजून बौद्ध भिक्खूवर हल्ला करून त्याला मारपीट करण्यात येते.

हे वाताहत झालेले लोक बौद्धधर्मीय असून जेव्हा ब्राह्मणी धर्माचा बुद्ध धर्मावर वरचष्मा झाला तेव्हाही ते ब्राह्मण धर्मात इतरांप्रमाणे सहजगत्या परत येण्यास नाखूश होते हे जर आपण मान्य केले तर आपणाला दोनही प्रश्नांचे स्पष्टीकरण मिळते. अस्पृश्य लोक ब्राह्मणांना अशुभ का मानतात; त्यांना आपले उपाध्याय का नेमत नाहीत आणि आपल्या वस्तीमध्ये शिरण्यास त्यांना मनाई का करतात याचा यावरून उलगडा होतो. याशिवाय या वाताहत झालेल्या लोकांना अस्पृश्य का मानण्यात आले याचाही उलगडा यामुळे होतो. वाताहत झालेल्या या लोकांनी ब्राह्मणांचा तिरस्कार करण्याचे कारण म्हणजे ब्राह्मण बौद्धधर्मीयांचे शत्रू होते आणि ब्राह्मणांनी या वाताहत झालेल्या लोकांवर अस्पृश्यता लादण्याचे कारण म्हणजे त्यांनी बौद्ध धर्म सोडला नाही. या अनुमानावरून असा निष्कर्ष निघतो की जे लोक बौद्ध होते त्यांच्याबद्दल ब्राह्मणांनी पसरविलेला द्वेष व तिरस्कार हे अस्पृश्यतेच्या उगमाच्या कारणांपैकी एक कारण आहे.

हे वाताहत झालेले लोक अस्पृश्य बनले याचे एकमेव कारण म्हणून बौद्ध व ब्राह्मण यांच्यामधील द्वेष हेच आहे, असे मानता येऊ शकेल काय? निश्चितच तसे करता येण्यासारखे नाही. कारण ब्राह्मणांनी बौद्धधर्मीयांविरुद्ध केलेला तिरस्काराचा प्रचार सर्वच बौद्धधर्मीयांविरुद्ध असून तो केवळ वाताहत झालेल्या लोकांविरुद्ध नव्हता. ज्या अर्थी केवळ वाताहत झालेल्या लोकांनाच अस्पृश्यता चिकटून राहण्यास अन्य परिस्थितीही कारणीभूत झाली असली पाहिजे, हे उघड आहे. ही परिस्थिती कोणती असावी? याचा निर्णय घेण्याच्या दृष्टीनेच आपण यापुढील प्रयत्न केला पाहिजे.

◆◆◆

# १०. अस्पृश्यतेचे मूळ–गोमांस भक्षण

शिरगणती अधिकाऱ्यांच्या तक्त्यामध्ये १० व्या क्रमांकाच्या कसोटीचा आता आपण विचार करू या. मागील प्रकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे या कसोटीचा संबंध गोमांस भक्षणाशी आहे.

शिरगणतीच्या अहवालावरून असे दिसून येते की अस्पृश्य मानण्यात आलेल्या जमातीचे प्रमुख खाद्य मृत गाईचे मांस हेच आहे. हिंदूंमधील कोणतीही जात, मग ती कितीही हलक्या दर्जाची असली तरी, गोमांसाला स्पर्श करणार नाही. याउलट मृत गाईशी जिचा मुळीसुद्धा संबंध येत नाही अशी कोणतीही जमात खऱ्या अर्थाने अस्पृश्य मानली जात नाही. काही तिचे मास खातात, काही तिचे चमडे काढतात तर काही तिच्या कातड्यापासून व हाडांपासून वस्तू तयार करतात.

शिरगणती अधिकाऱ्यांच्या पाहणीवरून अस्पृश्य लोक गोमांस खातात ही गोष्ट प्रमाणित झालेली आहे; तथापि प्रश्न असा : गोमांस भक्षणाचा अस्पृश्यतेच्या उगमाशी काही संबंध आहे काय? किंवा अस्पृश्यांच्या आर्थिक जीवनातील ती केवळ एक सामान्य घटना आहे? वाताहत झालेले लोक गोमांस भक्षण करीत असल्यामुळे त्यांना अस्पृश्यांप्रमाणे वागविण्यात येत होते, असे आपण म्हणू शकू काय? या प्रश्नांना होकारार्थी उत्तरे देण्यासाठी कां–कू करण्याची आवश्यकता नाही. आपल्या माहितीशी दुसऱ्या कोणत्याही उत्तराचा मेळ बसत नाही.

पहिली गोष्ट अशी की अस्पृश्य लोक किंवा अस्पृश्यातील प्रमुख जाती मृत गाईचे मांस खातात आणि जे मृत गाईचे मांस खातात, त्यांनाच अस्पृश्यतेचा कलंक लागलेला असून इतरांना नाही अशी वस्तुस्थिती आहे. मृत गाईचा उपयोग आणि अस्पृश्यता यांच्यामधील संबंध इतका घनिष्ठ व मोठा आहे की हेच अस्पृश्यतेचे मूळ कारण आहे, ही उपपत्ती निर्विवाद दिसते. दुसरी बाब अशी : अस्पृश्यांना हिंदूंपासून विभक्त करणारी जी एखादी कोणती बाब असेल तर ती गोमांस भक्षणच होय. हिंदूंचे निषिद्ध अन्नाबद्दलचे नियम वर जरी पाहिले तरी त्याच्या दोन निषेधात्मक आज्ञा लक्षात आल्यावाचून राहात नाहीत. मांस खाण्याच्या निषेधासंबंधीची एक आज्ञा आहे. तिच्यामुळे शाकाहारी हिंदू आणि मांसाहारी हिंदू यांचे विभाजन होते. दुसरीही एक निषेधाज्ञा असून ती गोमांस न खाण्यासंबंधीची आहे. तिच्यामुळे गोमांस खाणारे व न खाणारे असे हिंदूंचे विभाजन होते. अस्पृश्यतेच्या दृष्टिकोनातून पहिली निषेधाज्ञा मुळीच महत्त्वाची नसून केवळ दुसरीच आहे. कारण ती स्पृश्यांना अस्पृश्यांना पूर्णतः वेगळे करते. सर्वच स्पृश्य मग ते मांसाहारी असोत की शाकाहारी असोत गोमांस न खाण्याच्या



बाबतीत त्यांचे एकमतच आहे. या बाबतीत अस्पृश्य त्यांच्या विरोधात असल्यामुळे ते असल्याही संकोचाविना गोमांस भक्षण करतात आणि वस्तुस्थिती सांगायची म्हणजे ते केवळ सवयीमुळे व परिपाठामुळेच गोमांस भक्षण करतात.

संदर्भ असा असल्यामुळे ज्या लोकांना गोमांस भक्षणाची किळस येत होती त्यांनी गोमांस भक्षण करणाऱ्यांना अस्पृश्य ठरविले. हा निष्कर्ष काही ओढून ताणून काढलेला ठरत नाही.

वस्तुतः अस्पृश्यतेचे गोमांस भक्षण हे प्रमुख कारण आहे की नाही याबद्दल तर्काच्या खोलात शिरण्याची आवश्यकता नाही. कारण या माझ्या नव्या उपपत्तीला हिंदू शास्त्रांचाच पाठिंबा आहे. वेदव्यास स्मृतीमध्ये पुढील अर्थाचा श्लोक आहे. त्यामध्ये अंत्यजांच्या वर्गामध्ये समावेश होणाऱ्या जातीचा उल्लेख असून त्यांचा या वर्गामध्ये समावेश करण्याचे कारणही सांगितले आहे :

*'चांभार, भट्ट, भिल, रजक, पुरस्वर, नट*
*व्रात्य, मेव, चांडाळ, दास, सोपाक आणि*
*कोलिक त्याचप्रमाणे गोमांस भक्षण करणारे*
*इतरही अंत्यज म्हणून ओळखले जातात.'*

सामान्यतः स्मृतिकार आपले मताबद्दल 'का व कसे' याचे स्पष्टीकरण देण्याची कधीही फिकीर करीत नाहीत. परंतु येथे अपवाद आहे. कारण या ठिकाणी वेदव्यास अस्पृश्यतेचे कारण देत आहेत. या ठिकाणी ''त्याचप्रमाणे गोमांस भक्षण करणारे इतरही'' हा वाक्यखंड अतिशय महत्त्वाचा आहे. अस्पृश्यता गोमांस भक्षणामुळे पाळण्यात येते. हे स्मृतिकारांना माहीत होते हे या वाक्यखंडावरून दिसून येते. वेदव्यासांच्या या वचनामुळे सर्व वितर्क बंद होणे भाग आहे. हा स्वतःच्या घरचा अहेर असून त्यातही मुद्याची गोष्ट अशी की तो बुद्धिसंगतही आहे. कारण आपणास माहीत असलेल्या वस्तुस्थितीशी तो चपखल बसतो.

अस्पृश्यतेच्या उगमासंबंधीच्या या नव्या संशोधनाच्या दृष्टिकोनामुळे अस्पृश्यतेची दोन कारणे हाती लागली. त्यापैकी पहिले म्हणजे ब्राह्मणांनी बौद्धधर्मीय लोकांसंबंधी तिरस्काराची आणि घृणेची भावना पसरविली. हे सर्वसाधारण कारण आहे. दुसरे असे की वाताहत झालेल्या लोकांनी आपला गोमांस भक्षणाचा परिपाठ तसाच चालू ठेवला. पूर्वीच सांगितल्याप्रमाणे पहिले कारण वाताहत झालेल्या लोकांच्या कपाळी अस्पृश्यतेचा कलंक लावण्यास पुरेसे ठरू शकले नसते. कारण बौद्धधर्मीय लोकांसंबंधी ब्राह्मणांनी दर्शविलेला तिरस्कार व घृणा अत्यंत सामान्य स्वरूपाची असून ती फक्त वाताहत झालेल्या लोकांसंबंधी नव्हती. तर सर्वच बौद्धधर्मीयांविरुद्ध होती. फक्त वाताहत झालेले लोकच अस्पृश्य का गणले गेले याचे कारण म्हणजे

बौद्धधर्मीय असण्याच्या जोडीलाच त्यांनी आपली गोमांसभक्षणाची सवय सुरू ठेवली. यामुळे ब्राह्मणांना आणखीच दुखविण्यास ते कारणीभूत ठरले. कारण ब्राह्मणांनी गाईसंबंधीचा पूज्यभाव व प्रेम नव्यानेच सुरू केले होते. त्यामुळे गोमांसभक्षकांना त्यांनी अस्पृश्य मानणे तर्कसंगतच ठरते. अशा तऱ्हेने, वाताहत झालेले लोक बौद्धधर्मीय असल्यामुळे ते ब्राह्मणांच्या तिरस्काराला व घृणेला कारणीभूत ठरले आणि त्यांच्या अस्पृश्येतेचे प्रमुख कारण म्हणजे त्यांचे गोमांस भक्षण होय, असा यावरून आपण निष्कर्ष काढू शकू.

अस्पृश्यतेचे मूळ म्हणून मांडलेल्या या गोमांसभक्षणाच्या उपपत्तीपासून अनेक प्रश्न उद्‌भवतात. टीकाकार निश्चितच विचारतील : गोमांस भक्षणाबद्दल हिंदूंना किळस वाटण्याचे कारण काय? हिंदू नेहमीच गोमांसभक्षणाच्या विरुद्ध होते काय? जर नसतील तर त्याविरुद्ध त्यांच्या मनात अशी किळस निर्माण होण्याचे कारण काय? अस्पृश्य लोक अगदी आरंभापासूनच गोमांस खात होते काय? हिंदूंनी गोमांस-भक्षणाचा त्याग केल्यानंतर त्यांनीही तसे का केले नाही? अस्पृश्य लोक हे नेहमीच अस्पृश्य होते काय? अस्पृश्य लोक गोमांस-भक्षण करीत असूनही ते अस्पृश्य नव्हते असा जर एक काळ असेल तर नंतरच्या काळात गोमांसभक्षणामुळे अस्पृश्यतेचा उदय कसा काय झाला? जर हिंदूही गोमांस खात असतील तर त्यांनी ते केव्हा सोडून दिले? हिंदूंच्या मनात गोमांसभक्षणाबद्दल असलेल्या घृणेची प्रतिक्रिया जर अस्पृश्यता आहे, तर हिंदूंनी गोमांस खाणे सोडून दिल्यानंतर किती काळानंतर अस्पृश्यता अस्तित्वात आली? या प्रश्नांची उत्तरे दिली नाही तर ही उपपत्ती संदिग्धच राहील. ती संभवनीय आहे हे कदाचित मान्यही होईल; परंतु निर्णायक उपपत्ती म्हणून तिला मान्यता मिळणार नाही. मी या उपपत्तीचे प्रतिपादन केल्यामुळे या प्रश्नांची उत्तरे देणे मला भागच आहे. पुढील शीर्षकांचा ऊहापोह करावा अशी माझी यापुढील योजना आहे.

१. हिंदूंनी गोमांस कधीही खाल्ले नाही काय?
२. हिंदूंनी गोमांसभक्षणाचा त्याग करण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत ठरली?
३. ब्राह्मणांनी शाकाहारी बनण्याचे कारण काय?
४. गोमांसभक्षणामुळे अस्पृश्यतेचा उदय का झाला?
५. अस्पृश्यतेची उत्पत्ती कधी झाली?

◆◆◆



## भाग पाच

## नवीन उपपत्ती व काही प्रश्न

# ११. हिंदूंनी गोमांस कधीही खाल्ले नाही काय?

हिंदूंनी कधीतरी गोमांस भक्षण केले काय, या प्रश्नाला ब्राह्मण असो की अब्राह्मण असो तो 'कधीही नाही' असेच उत्तर देईल. एका अर्थाने त्याचे म्हणणे बरोबरही आहे. बऱ्याच काळापासून कोणत्याही हिंदूने गोमांस भक्षण केले नाही, असाच जर स्पृश्य हिंदूंच्या वरील उत्तराचा गर्भित अर्थ असेल तर त्यावर भांडण करण्याचे काहीच कारण नाही. परंतु, हिंदूंनी कधीही गोमांस भक्षण तर केले नाहीच पण ते नेहमीसाठी गाईला पवित्रच मानत आले आणि गोहत्येचाही ते नेहमीच विरोध करीत आले असा युक्तिवाद जेव्हा विद्वान ब्राह्मणही मांडतात, तेव्हा त्यांचे हे मत मान्य करणे अशक्य ठरते.

हिंदूंनी कधीही गोमांस भक्षण केले नसून ते नेहमीच गोहत्येला विरोध करीत आले, या मताला समर्थक असे पुरावे कोणते आहेत?

या मताचा आधार म्हणून मांडण्यात येणारी दोन प्रकारची प्रमाणे ऋग्वेदामध्ये आहेत. यांपैकी एका प्रकारच्या गाईला 'अघ्न्य' असे म्हणण्यात आले आहे. ते असे – ऋग्वेद १.१६४, २७; ४–१.६; ५–८२.८; ७–६९, ७१; १०–८७. 'अघ्न्य' या शब्दाचा अर्थ–मारण्यासाठी अयोग्य, यावरून असा युक्तिवाद करण्यात येतो की गाईच्या हत्येविरुद्धची ही प्रतिबंधक आज्ञा आहे आणि ज्या अर्थी वेद हेच धर्म विषयात अंतिम प्रमाण आहेत, त्या अर्थी आर्य गाईची हत्या करूच शकले नाहीत. मग तिचे मांस खाण्याचा प्रश्न तर दूरच राहिला. दुसऱ्या प्रकारच्या प्रमाणामध्ये गाईला 'पवित्र' मानण्यात आलेले आहे. ते असे : ऋग्वेद ६–२८, १.८, अणि ८–१०, ११.५ या ऋचांमध्ये गाईला रूद्रमाता, वसुकन्या, आदित्य–भगिनी आणि अमृताचा केंद्रबिंदू असे संबोधण्यात आले आहे. याबाबत ऋग्वेदात आणखी एके ठिकाणी उल्लेख आहे. (ऋग्वेद ८–१०१.१६) तेथे गाईला 'देवी' असे म्हटले आहे.

ब्राह्मण्ये व सूत्रामधूनही काही उतारे पुराव्याच्या स्वरूपात पुढे मांडण्यात येतात.

पशु–यज्ञ आणि गोमांसभक्षण या विषयांशी संबंधित दोन उत्तरे सत्पथ ब्राह्मणामध्ये आहेत. त्यांपैकी एक अध्याय ३–१, २, २१ मध्ये असून तो असा :

*'अथै शालां प्रपादयति। सधैन्वै चानडूहश्र्च नाश्नीयाद्*
*धेन्वनडुहौ वा इदं सर्व्वम्विभृतस्ते देवा वब्रुवन् धेन्वनडुहो*

*वा इंद सर्व विभृतो हन्त यदन्येषा वयसांवीर्य्य*
*तद्धेन्वनडुहयोर्दधामोति या यदन्येषां वयसां*
*वीर्यमांसीतद्धेन्वनडुहयोरदधुस्तसमाद्धेनुश्चै वानड्-वांश्च*
*भयुयिष्ठ भुक्तस्तद्धैतत सर्वश्चमिव यी धेन्वडुहयोरश्नी*
*यादन्य गतिरिव तं हादभतमभिचनितोर्जयाय गर्भ*
*निरवधीदिति षापमकदिती पापी कीर्तिस्तस्माद्धेन्वनडुह*
*योर्न्नाश्निीयात्' (श.प.)*

**अर्थ –** 'नंतर तो (अध्वर्यू) त्याच्या मंडपात प्रवेश करवितो. त्याने गाय अथवा बैलाचे मांस खाऊ नये. कारण पृथ्वीवरील सर्व वस्तूंचा आधार निःसंदेहपणे गाय आणि बैल हेच आहेत. देवतांनी गाईला व बैलाला या पृथ्वीवरील सर्व वस्तूंचा निःसंदेह आधार असे म्हटलेले आहे. या अन्य योनीची (पशु) जी शक्ती आहे, ती आपण गाय आणि बैलालाच देऊ या. म्हणूनच गाय आणि बैलच अधिक खातात. यामुळे कोणी जर एखाद्या गाईचे किंवा बैलाचे मांस खात असेल, तर तो सर्व काही खातो किंवा सर्वांच्या विनाशाकडेच जातो. म्हणून त्याने गाय व बैलाचे मांस खाऊ नये.'

दुसरा उतारा १, २, ३, ६ मध्ये आहे. तेथे नैतिक पायावर पशुयज्ञाच्या विरोधी मत मांडलेले आहे.

आपस्तंभ धर्मसूत्राच्या १-५, १७-२९ उताऱ्यांमध्येही असेच मत मांडलेले आहे. तेथे गाईचे मांस खाण्यावर सर्वसामान्य प्रतिबंध घातलेला आहे.

हिंदूंनी गोमांस कधीही खाल्ले नाही या मताचे समर्थक पुरावे हे असे आहेत. या पुराव्यांवरून कोणता निष्कर्ष निघू शकतो?

ऋग्वेदातील पुराव्यांचा विचार करता त्यावरून काढलेला निष्कर्ष चुकीच्या वाचनावर व गैरसमजावर आधारलेला आहे.

ऋग्वेदामध्ये गाईसाठी वापरण्यात आलेला 'अघ्न्य' या विशेषणाचा अर्थ असा आहे की गाय दूध देत असल्यामुळे तिला मारणे अयोग्य आहे. ऋग्वेदामध्ये गाईला पवित्र मानण्यात आलेले आहे हे अर्थातच खरे आहे. परंतु हा आदर व पूज्यभाव केवळ शेती करणाऱ्या हिंदू आर्य लोकांकडूनच अपेक्षित होता. गाईची ही उपयोगिता आर्यांना भोजनासाठी गाय कापण्याच्या आड येऊ शकत नव्हती. खरे सांगावयाचे म्हणजे गाईला पवित्र मानण्यात येत असल्यामुळेच तिची हत्याही करण्यात येत होती. श्री. काणे लिहितात :

**'वेदकाळात गाईला पवित्र मानण्यात येत नव्हते, असे नाही. ती पवित्र**



**असल्यामुळेच तिचे मांस भक्षण करावे, अशी वाजसनेयी संहितेची आज्ञा आहे.'**

ऋग्वेद काळातील आर्य खाण्यासाठी गाईची हत्या करीत होते आणि तिचे मांस खात होते, हे खुद्द ऋग्वेदावरून चक्कपणे स्पष्ट होते. (१०-८६, १४) इंद्र म्हणतो – 'ते एकासाठी १५ अधिक २० बैल शिजवितात. 'ऋग्वेदाचे आणखी कथन आहे की, अग्निदेवतेसाठी घोडे, बैल, सांड, वांझ गाई आणि बकऱ्यांचा बळी दिला.' (१०-९१, १४) ऋग्वेदाच्या १०-७२, ६ ऋचांवरून दिसून येते की गाई तलवारीने किंवा कुऱ्हाडीने मारण्यात येत असत.

शतपथ ब्राह्मणांच्या प्रमाणाबद्दल विचार करावयाचा झाल्यास त्याला निर्णयात्मक मानता येऊ शकेल काय? तसे करता येण्यासारखे नाही, हे उघड आहे. कारण अन्य 'ब्राह्मणां'मध्ये भिन्न मत दर्शविणारे अनेक उतारे आहेत.

एकच उदाहरण देतो. तैतरीय ब्राह्मणात काम्येष्टी यज्ञाचे वर्णन दिले आहे. तेथे केवळ गाई व बैलांना यज्ञामध्ये बळी देण्याची आज्ञाच नाही, तर कोणत्या प्रकारच्या गाईचा वा बैलाचा बळी कोणत्या देवाला दिला पाहिजे, हेही आपणास सांगण्यात आले आहे. **उदा. विष्णूसाठी बळी द्यावयाचा असेल तर खुजा बैल निवडला पाहिजे; इंद्र वृत्राचा नाश करणारा असल्यामुळे त्याच्यासाठी खाली वाकलेल्या शिंगाचा व माथ्यावर लाल रंग असलेला बैल घ्यावा. पुशानासाठी काळी गाय. रूद्रासाठी लाल गाय व याप्रमाणेच इतरही निवड करावी. तैतरीय ब्राह्मणांतच पंचशारदीय सेवा यज्ञाचा निर्देश आलेला आहे. यातील अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यात १७ वशिंडरहित खुज्या गोऱ्ह्यांचा व तितक्याच तीन वर्षांच्या आतील वयाच्या कालवडीचा बळी द्यावा असे सांगितले आहे.**

आपस्तंभ धर्मसूत्रांच्या पार्श्वभूमीवर पुढील गोष्टी नमूद करण्यासारख्या आहेत. पहिली गोष्ट अशी की, १-५, १४, २९ या सूत्रांतच परस्परविरोधी विधान आले आहे. आपस्तंभ धर्मसूत्र म्हणते :

''गाय आणि बैल पवित्र असल्यामुळे त्यांचे भक्षण करण्यात यावे.''

गुह्यसूत्रामध्ये सांगितलेला मधुपर्काचा विधीही लक्षात घेण्याजोगा आहे. महत्त्वाच्या पाहुण्यांचे स्वागत करण्याचे औपचार आर्यांमध्ये रूढीवजा स्थिर झालेले असून त्यांना धार्मिक विधीचे रूप आले होते. त्यापैकी मधुपर्क हा अत्यंत महत्त्वाचा स्वागत विधी होता. अनेक गुह्यसूत्रांमध्ये अनेक तपशीलवार सूचना देण्यात आलेल्या आढळतात. बहुतेक गुह्यसूत्रांनुसार ज्यांना मधुपर्काचे आतिथ्य मागण्याचा हक्क आहे असे सहा पाहुणे आहेत. ते असे – (१) ऋत्विज म्हणजे याविधी करण्यासाठी निमंत्रित ब्राह्मण, (२) आचार्य अर्थात गुरू, (३) नवरदेव, (४) राजा, (५) स्नातक

म्हणजे ज्याने गुरुकुलातील अभ्यास नुकताच पूर्ण केला आहे असा विद्यार्थी आणि (६) यजमानाला प्रिय असणारी कोणतीही व्यक्ती. कोणी या यादीत अतिथीचाही समावेश करतात. ऋत्विज, राजा आणि आचार्य यांना वगळता बाकीच्यांना वर्षातून फक्त एकदाच मधुपर्क अर्पण करावयाचा असे. ऋत्विज, राजा आणि आचार्याला मात्र ते घरी आले असता, प्रत्येक वेळी अर्पण करावयाचा असे.

हा मधुपर्क केलेला तरी कशाचा असे? या मधुपर्काच्या उपाहारामध्ये कोणकोणत्या वस्तूंचे मिश्रण असावे याबद्दल मतभेद आहेत. अश्वलायन गुह्यसूत्र आणि अपरार्क गुह्यसूत्रः (१३.१०) मध आणि दही किंवा तूप आणि दही यांचे मिश्रण करावे असे सांगतात. पाराय गुह्यसूत्रांसारखी इतर सूत्रे दही, मध आणि लोणी या तीनचे मिश्रण करावे असे सांगतात. १३) अपरार्क गुह्यसूत्राने या तीन वस्तूंबरोबर तळलेले यव व बाली यांचेही मिश्रण करण्याबद्दल इतर काहींचे मत असल्याची नोंद केली आहे. (१३-११-७२) हिरण्य गुह्यसूत्र (१-१२, १०, १२) दही, मध, तूप, पाणी आणि पीठ किंवा यांपैकी कोणत्याही तीनचे मिश्रण करावे. असा पर्याय दिला आहे. कोशिकसूत्र नऊ प्रकारच्या वस्तूंच्या मिश्रणाबद्दल सांगते ते असे : ब्रह्म (मध आणि दही), ऐंद्र (दूध व भात-पायस), सौम्य (दही व तूप), पौष्ण (तूप व ताक) सारस्वत (दूध व दही), मौसल (मद्य व तूप यांचा उपयोग केवळ सौत्रमणी व राजसूर्य गृहयज्ञातच होत असे), परिव्राजक (सरसूचे तेल व ढेप) मात्र गुह्यसूत्राचे (१-९, २२) म्हणणे असे की मधुपर्क मांसाशिवाय होऊच शकत नाही, असे वेदांचे म्हणणे असून गाईला मुभा द्यावयाची असल्यास बकऱ्याचे मांस किंवा पायसाचा मधुपर्क अर्पण करण्यात यावा. हिरण्य गुह्यसूत्राचे म्हणणे असे की जेव्हा गाईला सूट देण्यात आली असेल तेव्हा बकऱ्याच्या किंवा मेंढ्यांच्या मांसाचा मधुपर्क अर्पण करावा; निदान जंगलातील हरणासारख्या प्राण्यांचे मांस अर्पण करावे; कारण मांसाशिवाय मधुपर्क असूच शकत नाही. परंतु कोणी जर मांस अर्पण करण्यास असमर्थच असेल तर शेंगदाणे शिजवून अर्पण करावेत.

अशा तऱ्हेने मधुपर्कामधील आवश्यक वस्तू मांस हीच असून त्यातही विशेषतः गाईचे मांसच आहे.

पाहुण्याच्या सत्कारासाठी गाय कापण्याची प्रथा इतक्या स्तराला पोचली होती की पाहुण्याला 'गोघ्न' म्हणजे गायमाऱ्या असे म्हणण्यात येत असे. गाईची ही कत्तल टाळण्यासाठी आपस्तंभ गुह्यसूत्राने (१-२४, २५) असे सुचविले आहे की जेव्हा घरी पाहुणा आला असेल तेव्हा घरच्या गाईला मोकाट सोडून द्यावे व या औपचारांच्या नियमाची टाळाटाळ करावी.

आपस्तंभ धर्मसूत्राने शवाची विल्हेवाट लावण्यासंबंधी सांगितलेला धार्मिक



विधीही या संबंधात उल्लेख करण्यासारखा आहे. या सूत्राचे म्हणणे असे :

१. त्यानंतर त्याने पुढील यज्ञ - साहित्य मृताच्या शवावर ठेवावे.

२. उजव्या हातात 'गुहू' (चमचा) ठेवावा.

३. डाव्या हातात 'उपभृत' नावाचा दुसरा चमचा ठेवावा.

४. त्याच्या उजव्या बाजूला 'स्फिआ' नावाचे लाकडी यज्ञीय हत्यार व डाव्या बाजूला 'अग्निहोत्र हवनी' (हवन टाकण्याची पळी) ठेवावी.

५. त्याच्या छातीवर ध्रुव नावाचा मोठा यज्ञीय पळा ठेवावा. त्याच्या डोक्यावर ताटे व त्याच्या दातावर दगड ठेवावे.

६. त्याच्या नाकाच्या दोन्ही बाजूला स्त्रूवा नावाचे दोन यज्ञीय चमचे ठेवावेत.

७. किंवा जर एकच स्त्रूवा असेल तर त्याचे दोन तुकडे करून दोन बाजूंना ठेवावेत.

८. त्याच्या दोन्ही कानांवर दोन 'प्रसित्रहरणे' (ब्राह्मणांना यज्ञीय भोजन देण्याचे पात्र) ठेवावीत.

९. किंवा जर एकच प्रसित्रहरण असेल तर त्याचे दोन तुकडे करून दोन कानांवर ठेवावेत.

१०. त्याच्या पोटावर 'पात्री' नावाचे भांडे ठेवावे.

११. यज्ञीय भोजन बाजूला काढून ठेवण्याच्या प्यालाही त्याच्या पोटावरच ठेवावा.

१२. त्याच्या गुप्तांगावर 'साम्य' नावाची काठी ठेवावी.

१३. त्याच्या मांड्यांवर दोन जळते कोलीत ठेवावे.

१४. त्याच्या पायावर उखळ किंवा मुसळ ठेवावे.

१५. त्याच्या पावलांवर दोन टोपल्या ठेवाव्यात.

१६. किंवा जर एकच टोपली असेल तर तिचे दोन तुकडे करून ठेवावेत.

१७. प्रवाही पदार्थ ठेवण्याच्या पोकळ वस्तूंवर तूप शिंपडावे.

१८. मृत व्यक्तीच्या मुलाने जात्याचा खालचा व वरचा पाटा घ्यावा.

१९. त्याचप्रमाणे तांबे, लोखंड आणि मातीची भांडीही त्यानेच घ्यावीत.

२०. मादी जनावराच्या पोटातील पातळ झिल्ली पडदा काढून त्याने मृताचे डोके व तोंड झाकावे व तसे करीत असताना ''गाईपासून प्राप्त होणाऱ्या या पडद्याच्या चिलखतामुळे तुझे अग्नीपासून संरक्षण होईल'' (ऋग्वेद १०-१६.७) ही ऋचा म्हणावी.

२१. त्याच पशूचे मूत्रपिंड काढून मृत व्यक्तीच्या दोन्ही हातात ठेवावे व तसे करताना ''सरमास पुत्रांपासून दोन्ही हातांची सुटका होवो.'' (ऋग्वेद १०-१४-

१०) ही ऋचा म्हणावी. उजव्या हातात उजवा मूत्रपिंड व डाव्या हातात डावा मूत्रपिंड ठेवावा.

२२. मृत व्यक्तीच्या हृदयावर त्या पशूचे हृदय ठेवावे.

२३. काही आचार्यांच्या मतानुसार भाताचे किंवा कणकीचे दोन गोळे मृताच्या हातावर ठेवावेत.

२४. परंतु मूत्रपिंड प्राप्त न झाल्यासच असे करावे, असे त्या आचार्यांचे मत आहे. अवयव मृताच्या त्याच अवयवावर ठेवल्यानंतर आणि त्याला चामड्याने झाकल्यानंतर त्याने ज्या अर्थी प्रणितेचे पाणी पुढे नेण्यात येते आहे, त्या अर्थी हे अग्नी, या प्याल्याला तू उलटवू नकोस, ही ऋचा म्हणावी. (१०-१६.८)

२६. डावा गुडघा टेकवून दक्षिणा अग्नीमध्ये त्याने यज्ञीन हवन टाकावे. तसे करताना 'अग्नयेस्वाहा, कामाय स्वाहा, लोकाय स्वाहा, अनुमतये स्वाहा' हा मंत्र म्हणावा.

२७. मृताच्या छातीवरील पाचव्या आहुतीच्या वेळी 'यामधूनच तुझा जन्म झाला आहे. आता तो तुझ्यापासून जन्म घेवो. स्वर्ग लोकाय स्वाहा' हा मंत्र म्हणावा.

वर उद्‌धृत केलेल्या अश्वलायन गृह्यसूत्राच्या उताऱ्यावरून हे स्पष्ट होते की जेव्हा प्राचीन हिंदी आर्यातील एखादी व्यक्ती मरण पावत असे तेव्हा एक पशू मारण्यात येत असे आणि त्या पशूचे अवयव मृत व्यक्तीच्या त्या त्या अवयवावर ठेवून नंतरच ते शव जाळण्यात येत असे.

गोहत्येसंबंधी व गोमांस भक्षणासंबंधी आढळणारे पुरावे हे अशा प्रकारचे आहेत. यांपैकी कोणते पुरावे सत्य म्हणून स्वीकारता येण्याजोगे आहेत? शतपथ ब्राह्मण व आपस्तंभ धर्मसूत्रामध्ये गोहत्याविरोधी व गोमांस भक्षणविरोधी जो भाग आला आहे तो केवळ गोहत्येच्या अतिरेकाला आळा बसावा म्हणून उपदेशपर असून गोहत्येला प्रतिबंध घालणारा नाही, असे मानणे हाच या बाबतीत यथार्थ दृष्टिकोन ठरतो. या आग्रहाच्या उपदेशावरूनही हेच सिद्ध होते की गोहत्या आणि गोमांस भक्षणाची प्रथा सर्वत्र रूढ झाली होती. परंतु या आग्रहाच्या उपदेशानंतरही गोहत्या आणि गोमांस भक्षण चालूच राहिले. बहुधा या उपदेशाकडे दुर्लक्ष करण्यात येत असे. हे आर्यातील एका याज्ञवल्क्य नावाच्या मोठ्या ऋषीच्या वर्तनावरून सिद्ध होते. म्हणजे वर उल्लेखलेला शतपथ ब्राह्मणातील पहिली उतारा वस्तुतः याज्ञवल्क्याला केलेला आग्रहाचा उपदेशच होय. परंतु याज्ञवल्क्याने त्याला कोणते प्रत्युत्तर दिले? हा आग्रहाचा उपदेश ऐकून घेतल्यावर याज्ञावल्क्याने दिलेल उत्तर असेः

''माझ्यापुरते सांगायचे तर, मी ते खातो. मात्र ते कोवळे असले पाहिजे.''

एके समयी हिंदू गोहत्या करीत होते व गोमांस भक्षण करीत होते. हे बौद्ध



सूत्रांमध्ये यज्ञाची जी वर्णने आली आहेत त्यावरून ही निखालसपणे सिद्ध होते. ही सूत्रे वेद व ब्राह्मणे यांच्यापेक्षा बऱ्याच नंतरच्या काळातील परिस्थितीबद्दल आहेत. गाईच्या व अन्य पशूंच्या हत्येचे प्रमाण अवाढव्य होते. धर्माच्या नावावर ब्राह्मणांनी किती गाईची कत्तल केली याची मोजदाद कोणत्याही मापाने करता येण्याइतकी नाही. तथापि या कत्तलीची काहीशी कल्पना बौद्ध वाङ्मयातील उल्लेखांवरून येऊ शकते. उदाहरणादाखल कूटदंत सूत्राचा उल्लेख करण्यासारखा आहे. या सूत्रामध्ये बुद्धांनी कूटदंत ब्राह्मणाला पशुयज्ञ न करण्याबद्दल उपदेश केला आहे. बुद्ध उपहासाच्या सुरात बोलत असले तरी त्यावरून वैदिक यज्ञामध्ये करण्यात येणाऱ्या धार्मिक विधींची वा त्या काळच्या रूढींची कल्पना उत्तम प्रकारे येते. बुद्ध म्हणतात :

'आणि त्यानंतर हे ब्राह्मणा, त्या यज्ञामध्ये एकाही बैलाची, बकऱ्याची कोंबड्यांची, एखाद्या लठ्ठ डुकराची कत्तल करण्यात आली नाही; किंवा एकाही जीवधारी प्राण्याला ठार मारण्यात आले नाही; किंवा खांबासाठी एकही झाड कापण्यात आले नाही; किंवा बलिस्थानाच्या भोवती विखुरण्यासाठी दर्भ (गवत) कापण्यात आले नाही. इतकेच नव्हे, तास दंडुक्याने मारण्याच्या भीतीमुळे काम करीत नव्हते; आणि कामे करताना ते रडतही नव्हते व त्यांच्या चेहऱ्यावरून अश्रूंचे ओघळही वाहात नव्हते.'

कूटदंताने बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतर व भगवान बुद्धाने आभार मानल्यानंतर या विषयाबद्दलचा आपलाही अनुभव सांगून यज्ञामध्ये बळी देण्यात येणाऱ्या घोर प्रसंगाचे वर्णन केले आहे. तो म्हणतो :

'मी पूज्य बुद्ध, धर्म आणि संघाला शरण आलो आहे. आजपासून आजीवन उपासक म्हणून भगवंतानी माझा स्वीकार करावा. हे पूज्य गौतमा, मी आजच सातशे बैल, सातशे गोऱ्हे, सातशे कालवडी, सातशे बकरे आणि सातशे मेंढे यांना मुक्त करीत आहे. त्यांचे जीवन मी तुमच्या स्वाधीन करीत आहे, त्यांनी यापुढे स्वच्छंदाने मुक्त हवा, पाणी व गवत यांचा आस्वाद घ्यावा.

संयुक्त निकायात (३-१.९) कोशल राजा प्रसेनजिताने केलेल्या एका यज्ञाचे वर्णन दिलेले आहे. तेथ लिहिलेले आहे की पाचशे बैल, पाचशे वासरे आणि पुष्कळशा कालवडी, बकरे व मेंढे यज्ञात बळी देण्यासाठी यूप स्तंभापर्यंत नेण्यात आले होत.

हे पुरावे पाहिल्यानंतर, एकेकाळी सर्व हिंदू-ब्राह्मण आणि अब्राह्मणही मांस खात होते. इतकेच नाही, तर गोमांस खात होते याबद्दल कोणालाही शंका घेता येणे शक्य नाही.

◆◆◆

# १२. ब्राह्मणेतरांनी गोमांस भक्षणाचा त्याग का केला?

हिंदूंच्या निरनिराळ्या जातींतील खाण्यापिण्याच्या सवयी त्यांच्या धार्मिक रीतिरिवाजाप्रमाणेच स्थिर व ठरीव होऊन गेलेल्या आहेत. रीतिरिवाजाच्या आधारावर जसे हिंदूंचे वर्गीकरण करता येते, तसेच त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयीवरूनही त्यांचे वर्गीकरण करता योण्यासारखे आहे. हिंदू एकतर शैव तरी आहेत किंवा वैष्णव तरी आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्यातील काही मांसाहारी व काही शाकाहारी आहेत.

हिंदूंचे हे शाकाहारी व मांसाहारीमध्ये केलेले वर्गीकरण सामान्य परिस्थितीसाठी पुरेसे असले तरी ते सर्वसामावेशक नसून हिंदू समाजामध्ये अंतर्भूत असलेल्या सर्व जातींचा त्यात समावेश होत नाही, हेही मान्य केलेच पाहिजे. सर्वसमावेशक वर्गीकरणासाठी मांसाहारी हिंदूंचे पुन्हा दोन पोटविभाग करावयास हवेत. ते असे : (१) जे मांस खातात पण गाईचे मांस खात नाहीत. आणि (२) जे गाईचे मांस व इतरही मांस खातात ते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे खाण्यापिण्याबद्दलच्या विटाळाच्या कल्पनेवरून हिंदूंचे तीन विभाग पडतात ते असे : (३) गाईच्या मांसासह मांसाहार करणारे. या वर्गीकरणाशी मेळ बसू शकेल असेच तीन वर्ग आपणाला हिंदू समाजात आढळून येतात. ते असे : (१) ब्राह्मण, (२) ब्राह्मणेतर आणि (३) अस्पृश्य, हे वर्गीकरण चातुर्वर्ण्य या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वर्गीकरणाशी चपखल बसत नसले तरी ते प्रत्यक्षातील वस्तुस्थितीशी तंतोतंत जुळणारे आहे. कारण ब्राह्मणांमध्ये मुख्यतः शाकाहारी लोक आहेत; ब्राह्मणेतरांमध्ये मांस खाणारे, पण गोमांस वर्ज्य मानणारे लोक आहेत आणि अस्पृश्यांत गाईच्या मांसासह मांसाहार करणारे लोक आहेत.

अशा प्रकारे हे त्रिविध प्रकारे वर्गीकरण मजबूत स्वरूपाचे असून ते वस्तुस्थितीशीही सुसंगत आहे. या वर्गीकरणाकडे कोणीही ध्यानपूर्वक लक्ष दिले तर ब्राह्मणेतरांच्या स्थितीसंबंधी त्याला आश्चर्य वाटल्याशिवाय राहाणार नाही. शाकाहारी असणे हे कोणालाही समजून येण्यासारखे आहे. मांसाहारी असणेही समजून घेण्यासारखे आहे. परंतु मांसाहार घेणाऱ्या व्यक्तीने केवळ एकाच प्रकारच्या मांसाला, म्हणजे गाईच्या मांसाला विरोध का करावा हे समजणे कठीण आहे. ही विसंगत बाब असून तिचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. ब्राह्मणेतरांनी गोमांस भक्षणाचा त्याग का केला? यासाठी या विषयासंबंधीचे नियम तपासून पाहिले पाहिजेत. या संबंधातील नियम एकतर अशोकाच्या आज्ञांमध्ये किंवा मनूच्या नियमांमध्येच असले पाहिजेत.



## २

अशोकापासून सुरुवात करू या. या विषयाशी संबंधित अशोकाचे तीन लेख आहेत. शिलालेख क्रमांक १ आणि स्तंभलेख क्रमांक २ व ५. पहिल्या क्रमांकाच्या शिलालेखातील मजकूर असा :

*''इयं धंमलिपी देवानं पियेन पियदसिना*
*राजा लेखायिता ङः इध न किंचि जीवं*
*आरभित्वा प्रजूहितत्वं न च समाजो*
*कतथवा बहुकं हि दोसं समाज हि*
*पसति देवानं पियो पियदसि राजा।*
*अस्ति पितु एकचा समाजा साधुमता*
*देवानं पियस पिपदसिनो राजो,*
*पुरा महानखं हि देवानं पिय*
*पियदसिनो राजो अनुदिस बहुनि*
*प्राणसतसहस्त्रानि आरभिसु सूपाथाय,*
*आज यदा धंमलिपी लिखिता ती एवं*
*प्राणा आरभरे सूपाथाय द्वो मोरा एको*
*मगो सोपि मगो न धूवो एते पि त्रि*
*प्राणा पछा न आराभसरे।''*

**अर्थ –** ''हा धर्मलेख देवांना प्रिय असलेल्या प्रियदर्शी राजाने लिहविला आहे. येथे (हे राज्य व त्याच्या राजधानीत) कोणत्याही जिवाला मारून होम करण्यात येऊ नये; आणि 'समाज' (उत्सव) करण्यात येऊ नये. कारण देवतांना प्रिय असलेल्या प्रियदर्शी राजाला अशा 'समाजात' (उत्सवात) अनेक दोष आढळून आले आहेत. तथापि देवांना प्रिय प्रियदर्शी राजाला पसंत असणारेही असे काही 'समाज' आहेत. पूर्वी देवांना प्रिय अशी प्रियदर्शी राजाच्या पाकशाळेत (सूप) रस्सा बनविण्यासाठी दररोज हजारो जिवांची हत्या होत असे. परंतु हा धर्मलेख लिहिण्यास सुरुवात झाल्यापासून केवळ तीनच प्राणी मारले जातात. ते म्हणजे : दोन मोर आणि एक हरीण. त्यातही दररोज हरीण असतेच असे नाही. यापुढे या तीन प्राण्यांचीही हत्या करणे बंद होईल.''

*स्तंभलेख क्रमांक २ तधील मजकूर असा :*
*देवानं पिये पियदसि जाला हेवं आहे-धमें*

*साधू कियं च धंमे ति अपासिनवे बहुकयाने*
*दया दाने सचे सोचय, चखूदान पि मे बहुविधे*
*दिने दुपद चतुपदसु पखिवालिचले सुविविधे*
*मे अनुग्रह करे आपान दाखिनाये अंनानि*
*पि च मे बहूनि कयानानि करानि एताय*
*मे अठाये इयं धंमलिपी लिखायता हवं*
*अनुपरिजंतु चिल पितिका च होतूतीति,*
*येच हवं संवटिपजीसति से मुकट कद्दतीति*

**अर्थ –** देवांना प्रिय असा प्रियदर्शी राजा म्हणतो :

''धर्म (करणे) उत्तम आहे. परंतु धर्म कशात असतो? चित्त क्लेश कमी करणे, अनेक शुभ कार्य, दया, औदार्य, सत्य आणि शौच (पवित्रता) यांचे पालन करण्यात धर्म असतो. अनेक प्रकारे मी ज्ञानदानही केलेले आहे. द्विपाद, चतुष्पाद, पक्षी आणि जलचर यांच्यावर अनुग्रह करून त्यांना मी प्राण दिले व त्यांच्यावर अन्य अनेक उपकार केले. लोकांनीही याप्रमाणेच आचरण करावे व तो चिरस्थायी व्हावा या उद्देशाने मी हा लेख लिहविला आहे. जो यानुसार आचरण करील त्याला सुकृत प्राप्त होईल.''

**स्तंभ लेख क्रमांक ५ वरील मजकूर असा :**

*''देवाने पिये पियदसि लाजा हवं आह–सदुबिसति*
*बस अभिसितेन मे इमानि जातानि अवधियानि*
*करानि से यथा सुके सालिका अलूसे चकवाके*
*हवे नंदीमुखे, गालाटे जातूका, अंवाक–पीलिका,*
*दडी, अनठीक मछेवेदवेयके, गगापुपुटके, संकुजमछे*
*कफरसयके, पंनससे, सिमले, संडके, ओकपिंड पलसते*
*सेतकपोते, गामकपोते सवे चतुपदय परिभाग नो*
*एति न च खादियादि एडका च सूकनी चा गामिनी*
*व पयमना वा अवधिप पतके पिच कानि आसमांसिके*
*वधिकुकुटे नो कर वेये; तुसे सजीवे नो झापेतविये;*
*दावे अम ठाये वा विहिसाये*
*वा नी झापेतविये, जीवेन जीवे नो पुसितविये तीस्*
*चातुमांसिसु तिसाय पुनमांसियं तिनि दिवसानि*



*चातुदसं पंनउसं परिपदाये धुवाये चा*
*अनुपोसथ मछे अबधिये नोपी विकतविये,*
*एतानि चेव दिवरानिं नागबानसि केवट भो–पसियानि*
*अंनानि पि जीवनिकायानि नो हंत वियानि*
*अठमी परवाये चातुदसाचे पंनउसाय तिसाय*
*पुनावसने तिसु चातुंमांसीसु सुदिवसाये गौने*
*नो नीलखितविये अजके; एडये सूकले एवापि*
*अंने निलखियति ना नीलखितविये, तिसाके पुनावसुने*
*चातंमांसिये चातुमांसि परवाये, अस्वसा गोनसा*
*लखने नो करविये, याव सड्डवीसति वस*
*अभिसितेन मे एताये अंतलिकाये पंनवीसति*
*बन्धन मोरवानि करनि''*

**अर्थ –** ''देवांना प्रिय अशा प्रियदर्शी राजाचे म्हणणे असे आहे :

राज्याभिषेक झाल्यापासून २६ वर्षांनंतर पुढील प्राण्यांची हत्या करण्यास मी बंदी घातली आहे. ते असे :

पोपट, सारिका, अरुण, चकोर, हंस, नंदीमुख, गेलाट, वटवाघूळ, अंबाकपीलिका (राणी मुंगी?) कासवी, निष्कंटक मासा, विदवेयक (?) गंगापुपुटक (?) शंखमांसा, कासव, साळिंदर, खार, बाराशिंगा (सांबर), सांड, वानर, गेंडा, पांढरे कबुतर, गावकबुतर आणि ज्यांचा कोणत्याही प्रकारे उपयोग होत नाही किंवा ज्यांचे मांस खाण्यासाठी उपयुक्त नाही ती सर्व चतुष्पाद जनावरे.

गाभण किंवा दूध पाजणारी बकरी, मेंढी व डुकरीण आणि त्यांच्या सहा महिने वयाच्या आतील पिलांना मारू नये. कोंबड्यांची झुंज लावू नये. जिवंत प्राण्यांनी युक्त असलेला भुसा जाळू नये. केवळ मौज म्हणून किंवा जंगलातील प्राण्यांचा नाश करण्याच्या हेतूने जंगलाला आग लावू नये.

एका प्राण्याला मारून दुसऱ्या प्राण्याला खाण्यास देऊ नये. प्रत्येक ऋतूच्या (उन्हाळा, पावसाळा, हिवाळा) मध्यभागी येणाऱ्या तीन पौर्णिमांना, पौष पौर्णिमेला व प्रत्युक चतुर्दशीला, अमावस्येला, प्रतिपादेला आणि उपोसथाच्या प्रत्येक दिवशी हत्तीच्या जलक्रीडेच्या जलाशयात किंवा अन्य तलावात मासे पकडू नये किंवा अन्य प्राणांचीही हत्या करू नये.

प्रत्येक पंधरवड्याच्या आठव्या, चौदाव्या व पंधराव्या दिवशी तसेच पुष्प आणि पुनर्वसु नक्षत्रांच्या दिवशी आणि अन्य उत्सवांच्या दिवशी बैल, बकरे, मेंढे,

डुक्कर किंवा अन्य प्राण्यांना खच्ची करू नये. पुष्य व पुनर्वसु नक्षत्रांच्या दिवशी चातुर्मासीय पौर्णिमेच्या दिवशी व प्रत्येक पौर्णिमेच्या दिवशी बैलांना व घोड्यांना तप्त लोखंडाने डाग देऊ नये.

माझ्या राज्याभिषेकाच्या या २६ व्या वार्षिक उत्सवापर्यंत मी २५ वेळा तुरुंगातील कैद्यांना मुक्त केले आहे.''

येथपर्यंत अशोकाच्या आज्ञांविषयी विवेचन संपले.

### ३

आता आपण मनूकडे वळू या. मांस भक्षणासंबंधी त्याच्या कायद्यामध्ये पुढील तरतुदी आहेतः

*क्रव्यादाञ्छकुनान्सर्वास्तथा ग्रामनिवासिनः।*
*अनिर्दिष्टांश्चेकराफांषट्टिभं च विवर्जयेत।।५-११*

*कलविङ्कं प्लवं हंसं चक्रांगं ग्रामकुक्टम्।*
*सारसं रज्जुवालं य दात्यूहं शुकसारिके।।५-१२*

*प्रतुदाञ्जालपादांश्च कोयष्टि नखविष्किरान्।*
*निमज्जतश्च मत्स्यादा त्रशौनं वल्लूरमेव च।।५-१३*

*बकं चैव बलाकां कोकोल खंजीरटकम्।*
*मत्स्यादान्विड्वराहंश्च मस्यानेवच सर्वशः।।५-१४*

*यो यस्य मांसमश्नाति स तन्मांसाद उच्चते।*
*कत्स्यादः सर्वमांसादस्तस्मान्मत्स्यान्विवर्जयेत।।५-१५*

*पाठीनरोहितवाद्यौ नियुक्ती हव्यकव्ययोः।*
*राजीवां सिंह तुण्डाश्च सशल्कांश्चैव सर्वशः।।५-१६*

*स्वाविधं शल्यकं गोधां खंडकूर्मशशांस्तथा।*
*भक्ष्यन्पत्र्चनखे ष्वाहुरनुष्ट्रांश्चैकतोदत।।५-१८*

**अर्थ –** क्रव्यादी, (गिधाड इत्यादीचे कच्चे मांस खाणारे) अपशकुनी व गावात राहणारे पक्षी यांचे मांस खाऊ नये. त्याचप्रमाणे ज्यांचा नामनिर्देश केलेला नाही असे गाढवासारखे एका खुराचे प्राणी व टिटवीचे मांस वर्ज्य करावे. (५-११).

उंच झाडाच्या शेंड्यावर राहणारे पक्षी (चिमणी, खार इत्यादी), पाणकोंबडा, हंस, चक्रवाक, गावकोंबडा, सारस, रज्जवाल, दात्यूह, पोपट व मैना या पक्ष्यांचे मांस खाऊ नये. (५-१२)



सुतार पक्षी, पायाची बोटे पातळ चामडीने सांधलेली असणारे जलपक्षी, नखांनी फाडून खाणारे ससाण्यासारखे पक्षी, पाण्यात बुडी मारून मासे खाणारे पक्षी यांचे मांस व त्याचप्रमाणे वधस्थानचे व सुकलेले मांस वर्जित आहे. (५-१३)

बगळा, बलाक, डोमकावळा, खंजनपक्षी, मासे खाणारे जलचर (मगर इ.) गावडुक्कर आणि सर्व प्रकारचे मासे खाऊ नयेत. (५-१४)

जो ज्याचे मांस खातो त्याला 'लमासांद' म्हणतात. मासा हा सर्व प्रकारचे मांस खातो म्हणून जो मासे खातो तो सर्वप्रकारचे मांस खाणारा ठरतो. यासाठी मासे खाऊ नयेत. (५-१५)

परंतु पाठीत व रोहित मासे हव्यकव्यासाठी प्रशस्त मानलेले आहेत. राजीव सिंहतुण्ड व जाड चामडीचे मासे नेहमीसाठीचे भक्ष्य आहेत. (५-१६)

एकटे फिरणारे व एकटे राहणारे प्राणी, अज्ञात नावांचे पशू व पक्षी तरी भक्ष्य खाण्याच्या वर्गात पडले असले तरी ते अभक्ष्यच समजावेत. त्याचप्रमाणे पाच नखे असलेले पशुपक्षी अभक्ष्य आहेत. (५-१७)

शालशिंदर, शळू, घोरपड, गेंडा, कासव व ससा हे पंचनख प्राण्यांपैकी भक्षणास योग्य आहेत. तसेच एका जबड्यात दात असणाऱ्या प्राण्यांपैकी उंट सोडून बाकीचे प्राणी भक्ष्य आहेत, असे ऋषीचे म्हणणे आहे. (५-१८)

### ४

अशोक व मनू यांच्या आज्ञामध्ये आलेले प्राणी हत्येसंबंधीचे नियम हे असे आहेत. अर्थातच आपल्या विषयाचा संबंध तत्त्वत; गोहत्येशी आहे. अशोकाच्या आज्ञा तपासून पाहिल्यावर निर्माण होणारा प्रश्न असा : गोहत्येला त्याने बंदी घातली काय? या मुद्यावर मतभेद असल्याचे दिसून येते. अशोकाने गोहत्येला बंदी घातली नव्हती, असे प्रो. विन्सेन्ट स्मिथ यांचे मत आहे. अशोकाच्या लेखांवर टीका-टिप्पणी करीत असताना या मुद्यावर प्रो. स्मिथ म्हणतात :

'लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे अशोकाचे नियम गोहत्येवर प्रतिबंध घालीत नसून ती बाब कायदेशीर असल्यामुळे प्रचलित राहिली, हे उघड आहे.'

प्रो. राधकुमुद मुकर्जी या मुद्यावर प्रा. स्मिथशी असहमत होऊन म्हणतात की, अशोकाने गोहत्येला बंदी घातली. स्तंभलेख ५ मध्ये चतुष्पाद प्राण्यांना मारण्यात येऊ नये, असा जो उल्लेख आलेला आहे त्याचा आधार प्रो. मुकर्जी घेतात आणि या नियमाद्वारे गोहत्येला अशोकाने बंदी घातली होती, असा युक्तिवाद मांडतात. स्तंभलेखाच्या चुकीच्या वाचनाचा हा परिणाम आहे. स्तंभलेखातील विधान मर्यादित स्वरूपाचे आहे. त्याचा संबंध सर्व चतुष्पाद प्राण्यांशी नसून केवळ ज्यांचा कोणत्याही

प्रकारे उपयोग होत नाही किंवा ज्यांचे मांस खाण्यासाठी उपयुक्त नाही, अशा प्राण्यांशी आहे. गाय हा उपयुक्त प्राणी नाही किंवा तिचे मांस खाण्यासाठी उपयुक्त नाही, असे म्हणता येण्यासारखे नाही, अशोकाने गोहत्येवर बंदी घातली नाही, हे प्रो. विन्सेन्ट स्मिथचे म्हणणेच बरोबर वाटते. या पेचातून बाहेर पडण्यासाठी प्रो. मुकर्जी म्हणतात की, अशोकाच्या काळी गोमांस खाण्यात येत नव्हते. त्यामुळे त्यांच्या मनाई आज्ञांमध्ये गोहत्याबंदीचा उल्लेख आला नाही. परंतु हे त्यांचे विधान उघडपणे हास्यास्पद आहे. कारण त्या काळी सर्व वर्गाचे लोक गायीचे मांस सर्रास खात होते.

मुकर्जीप्रमाणे स्तंभलेखाचा हवा तसा आडमुठा अर्थ लावून जणू काही गोहत्येला बंदी घातली होती, असे प्रतिपाद न करणे निखालसपणे व्यर्थ आहे. अशोकाला खास गाईसंबंधी विशेष प्रकारचा लागाबांधा मुळीच नव्हता. आणि तिच्या हत्येविरुद्ध बंदी घालणे हे त्याला आपले खास कर्तव्य आहे, असेही वाटत नव्हते. अशोकाला मानवी तसेच अन्य जिवांचे पावित्र्य महत्त्वाचे वाटत होते. जेथे कोठे प्राणिहत्या अनावश्यक आहे तेथे प्राणहत्या होऊ नये अशी मनाई आज्ञा काढणे हे आपले कर्तव्य आहे, असेही वाटत नव्हते. अशोकाला मानवी तसेच अन्य जिवांचे पावित्र्य महत्त्वाचे वाटत होते. जेथे कोठे प्राणिहत्या अनावश्यक आहे तेथे प्राणहत्या होऊ नये अशी मनाई आज्ञा काढणे हे आपले कर्तव्य आहे, असे त्याला वाटले. यामुळेच त्याने यज्ञातील प्राणिहत्येवर बंदी घातली आहे. कारण ती त्याला अनावश्यक वाटली. त्याचप्रमाणे जे प्राणी अनुपयुक्त आहेत व ज्यांचे मांसही खाण्याच्या उपयोगी पडत नाही, त्यांची हत्याही त्याला अनावश्यक वाटली. या बाबतीतील बौद्ध परंपरेचा दृष्टिकोन आपण समजून घेतला तर अशोकाने गोहत्येला बंदी घातली नाही, याबद्दल त्याला दोष देता येणार नाही.

मनूकडे पाहिल्यास निःसंदेहपणे दिसून येते की त्यानेसुद्धा गोहत्येला बंदी घातली नाही. या उलट गाईचे मांस काही प्रसंगी खाणे त्याने अपरिहार्य ठरविले आहे.

तर मग अब्राह्मणांनी गोमांस खाणे का सोडून दिले? या त्यांच्या तत्त्वच्युतीला कोणतेही ठळक कारण दिसून येत नाही. तथापि त्यामागे काहीतरी कारण असलेच पाहिजे. याचे कारण मला असे सुचवावेसे वाटते की ब्राह्मणांच्या अनुकरण करण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीमुळे त्यांनी गोमांस भक्षणाचा त्याग केला. ही उपपत्तीत नवीन वाटेल; परंतु ती अशक्य कोटीतील मात्र नाही. ग्रॅब्रेल तार्द या फ्रेंच लेखकाच्या मताप्रमाणे पाहता समाजातील उच्च दर्जाच्या आचारविचारांचे अनुकरण सामान्य लोक करीत असल्यामुळे संस्कृतीचा विस्तार होत असतो. या अनुकरणाचा प्रवाह इतका नियमबद्ध असतो की निसर्गनियमाप्रमाणेच त्याचेही कार्य स्वयंसिद्धपणे आपोआप चालू राहते. गॅब्रेल तार्दने अनुकरणाचे काही नियम सांगितले आहेत. श्रेष्ठ वर्गाच्या लोकांचे अनुकरण



कनिष्ठ वर्गाचे लोक करतात, हा त्यांपैकी एक नियम आहे. हा प्रश्न सर्वसामान्य स्वरूपाचा असल्यामुळे कोणतीही व्यक्ती त्याच्या यथार्थतेबद्दल संदेश बाळगताना दिसत नाही.

ब्राह्मणेतरांमध्ये गोपूजा व गोमांस न खाण्याची प्रथा ब्राह्मण वर्गाचे अनुकरण करण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे रूढ झाली. कारण ब्राह्मणांनीही गोपूजेचा जोरदार प्रचार केला, हेही तितकेच खरे आहे. गायत्री पुराण हे या प्रचाराचे ठळक असे उदाहरण आहे. तथापि ब्राह्मणेतरांनी गोमांस वर्ज्य करण्याचे मुख्य कारण म्हणजे ही अनुकरण प्रवृत्तीच होय. परंतु यामुळे आणखी दुसरा एक प्रश्न निर्माण होतो, तो असा : ब्राह्मणांनी गोमांस खाणे का सोडून दिले?

◆◆◆

# १३. ब्राह्मण शाकाहारी कशामुळे बनले?

ब्राह्मणेतरांमध्ये एक प्रकारची क्रांती घडून आली हे उघड आहे. कारण पूर्वी गोमांस खाणाऱ्यांनी गोमांस भक्षणाचा त्याग करणे ही निश्चितच एक क्रांतीच आहे. परंतु अब्राह्मणांना केवळ एकच क्रांती करावी लागली असली तरी ब्राह्मणांना मात्र दोन क्रांत्या कराव्या लागल्या. त्यांनी गोमांस भक्षणाचा त्याग करणे ही एक क्रांती असून पूर्णतः मांसाहाराचा त्याग करून शाकाहारी बनणे ही दुसरी क्रांती होती.

ही क्रांती होती ही गोष्ट निर्विवाद आहे. कारण याआधीच्या प्रकरणात दर्शविल्याप्रमाणे एकेकाळी ब्राह्मण सर्वांपेक्षा जास्त प्रमाणात गोमांस भक्षक होते. अब्राह्मण गोमांस खात असले तरी दररोज खात नव्हते. गाय हे एक अतिशय महाग जनावर होते आणि त्यामुळे केवळ भोजनासाठी तिला मारणे त्यांना आवडत नसे. त्यांचा एखादा धार्मिक विधी असल्यास किंवा त्यांच्या व्यक्तिगत हितासाठी एखाद्या देवतेला बळी देणे अनिवार्य असल्यासच ते अशा खास प्रसंगी गाय मारीत असत. परंतु ब्राह्मणाच्या बाबतीत असे नव्हते. उपाध्याय होता. धार्मिक कर्मकांडांनी लदबदलेल्या त्या काळी कोणाही अब्राह्मणाच्या घरी असा गाईला बळी देण्याचा धार्मिक कार्यक्रम नाही व त्यामुळे ब्राह्मणांना निमंत्रण मिळाले नाही असा दिवस क्वचितच असे. ब्राह्मणांसाठी प्रत्येक दिवसच गोमांसंहाराचा दिवस होता. म्हणून ब्राह्मण सर्वांत जास्त गोमांस भक्षक होते. धर्माच्या नावावर चालणारे ब्राह्मणांचे यज्ञ म्हणजे केवळ निपराध प्राण्यांच्या हत्येशिवाय अन्य काहीही नव्हते. हे यज्ञ अत्यंत थाटामाटाचे उत्सव असत आणि आपली गोमांसाची लालच लपविण्यासाठी त्यावर रहस्यमय आवरण चढविण्यात येत असे. या रहस्यमतेची, ढोंगाची व थाटामाटाची थोडीशी कल्पना ऐतरेय ब्राह्मणांमध्ये यज्ञीय पशूच्या हत्येसंबंधी ज्या सूचना दिलेल्या आहेत त्यावरून येते.

पशूची हत्या करण्यापूर्वी लांबलचक व वेगवेगळ्या मंत्रांचे पठण करून प्रारंभिक संस्कार करण्यात येत असे. त्यांचे तपशीलवार वर्णन देणे अशक्य आहे. तथापि यज्ञातील मुख्य व्यवहाराचे वर्णन दिले तरी पुरेसे होईल. यज्ञाचा आरंभ यूप नावाचा यज्ञीय खांब उभारण्याने सुरू होतो.

पशूची कत्तल करण्यापूर्वी याच यूपाला त्याला बांधण्यात येत असे. या यूपाची आवश्यकता प्रतिपादन केल्यानंतर ऐतरेय ब्राह्मणाने तो यूप कशाचे प्रतीक आहे हे सांगितले आहे. तो मजकूर असा :



*''वज्रो वा एष यदयूपः सोऽष्टाश्रिः कर्तव्योऽष्टाश्रिवै*
*वज्रस्तं तं प्रहरति द्विषते भ्रातृव्याय वधं योऽस्य*
*तृत्यस्तस्यै स्तर्तवै, इति।*
*वज्रो वै यूपः स एष द्विषतो वध उद्यतरितष्ठति*
*तस्माद्वार येत्तर्हि यो द्वेष्टि तस्याप्रिय भवत्य-*
*मुष्यायं इति दृष्ट्वा, इति।।''*

**अर्थ** – ''यूप हे एक वज्र आहे. त्याच्या टोकाला आठ धारा असाव्यात. कारण व्रजाला (किंवा लोखंडी गदेला) आठ धारा असतात. जेव्हा जेव्हा तो याचा प्रहार शत्रूवर किंवा विरोधकावर करतो तेव्हा तेव्हा त्याला तो ठार मारतो. अशा तऱ्हेने ज्याला ठार मारावयाचे असेल त्याला ठार करण्यासाठी हे वज्र उपयोगी पडते. या यूपही शत्रूला ठार मारणाऱ्या वज्राचेचे प्रतीक आहे. यामुळे यज्ञकर्त्याचा एखादा शत्रू जर यज्ञाच्या आड येऊ शकत असेल तर या यूपाकडे पाहिल्यामुळे त्याच्यावर सर्व प्रकारची संकटे कोसळतात.''

यूपासाठी वापरावयाचे लाकूड यज्ञकर्त्याच्या विभिन्न उद्देशांनुसार वेगवेगळ्या प्रकारचे वापरण्यात येत असे. याबाबत ऐतरेय ब्राह्मणाचे म्हणणे असे :

*''खादिरं यूपं कुर्वीत स्वर्गकामः खादिरेण वै*
*यूपेन देवाः स्वर्ग लोक मजयस्तथैवेतद्यजमानः*
*खादिरेन यूपेन स्वर्ग लोकं जयति, इति।''*

**अर्थ** – ज्याला स्वर्गप्राप्ती हवी असेल त्याने खैराच्या लाकडाचा यूप करावा. कारण देव खैराच्या यूपानेच दिव्य लोकावर विजय प्राप्त करतो. त्याचप्रमाणे यज्ञकर्ताही खैराच्या यूपामुळे दिव्य लोकांवर विजय प्राप्त करतो.

*''बिल्वं यूप कुर्वीतान्नाद्यकामः पुष्टिकामः समां*
*समां वै बिल्वो गृभीतस्तदन्नाद्यस्य रूपमामूलाच्छा-*
*खाभिरनुचितस्तत्पुष्टेः, इति।''*

**अर्थ** – ''जो अन्नाची कामना बाळगतो व लठ्ठ होऊ इच्छितो त्याने बेलाच्या लाकडाचा यूप करावा. कारण बेलाच्या झाडाला दरवर्षी फळे येतात. हे सुपीकपणाचे प्रतीक आहे. कारण तो मुळापासून फांद्यापर्यंत (दरवर्षी) आकाराने वाढत असतो. म्हणून तो लठ्ठपणाचेही प्रतीक आहे. जो हे जाणून बेलाच्या लाकडाचा यूप बनवितो त्याची मुले व गुरेढोरे लठ्ठ होतात.''

*''पुष्यति प्रजांश्च पशूंच य एवं विद्ववान्वैल्वं यूपं*
*कुरूते, इति। यदेव वैल्वां बिल्वं ज्योरिति वा*
*आचक्षते, इति। ज्योतिः स्वेषु भवित श्रेष्ठः स्वानां*
*भवति य एवं वेद, इति।''*

**अर्थ –** ''बेलाच्या लाकडाच्या यूपासंबंधी आणखी सांगण्यासारखी गोष्ट अशी की बेल हे प्रकाशाचे प्रतीक आहे. ज्याला हे माहीत आहे तो त्याच्या लोकांमध्ये 'प्रकाशमान' व श्रेष्ठ व्यक्ती बनतो.''

*''पालाश यूपं कुर्वींत तेजकसमो ब्रह्मवर्चसकामस्तेजो*
*वै ब्रह्मवर्चसं वनस्पतीनां पलाशः, इति।''*

**अर्थ –** ''ज्याला सौंदर्याची व पवित्र विद्येची कामना आहे, त्याने पळसाच्या लाकडाचा यूप करावा. कारण झाडामध्ये पळस हा सौंदर्याचे व पवित्र विद्येचे प्रतीक आहे. जो हे मानून पळसाच्या लाकडाचा यूप तयार करतो तो सुंदर बनतो आणि पवित्र विद्या प्राप्त करतो.''

*'यदेव पलाशं सर्वेषां वा वनस्पतीनां योनिर्य–*
*त्पलाशस्त्रतस्मात्पलाशस्यैव दलशनाऽऽ चक्षतेऽ मुष्य*
*पलाशमुण्य पलाशमिति, इति।*
*सर्वेषा हास्य वनस्पतीनां काम उपाप्तो भवति य एवं वेद, इति।''*

**अर्थ –** ''पळसाच्या लाकडाच्या यूपासंबंधी आणखी एक लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे पळस हा सर्व वृक्षांचा गर्भ आहे. यामुळे अन्य कोणत्याही झाडासंबंधी बोलावयाचे झाल्यास ते 'पलासम' असेच म्हणतात (कोणत्याही झाडाच्या पानांना 'पलासम' असे म्हणतात.) हे ज्ञान ज्याला प्राप्त झाले त्याच्या सर्व झाडांकडून फलद्रूप होण्यासारख्या अपेक्षा पूर्ण होतात.''

यानंतर या यूपामध्ये प्राणप्रतिष्ठा करण्याच्या संस्काराचे मार्गदर्शन येते.

*'अञ्जमो यूपमनुब्रू हीत्याहाध्वर्यूः, इति।*
*अञ्जन्ति त्वामधरे देवयन्त इत्यन्वाह, इति।*
*अध्वरे ह्येनं देवयन्तोऽञ्जन्ति, इति।*
*वनस्पते मधुना देव्येनेत्येत द्वै मधु देव्यं यदाज्यम, इति।*
*मदूर्ध्वस्तिष्ठा द्रविणेह धत्ताद्यद्वा क्षयो मातुरस्या उपस्य, इति।*
*यदिच तिष्ठासि यवि च शयासै द्रविणमेवास्मांसु*
*धत्तदित्येव तदाह, इति।'*



**अर्थ –** 'अध्वर्यू (हवन करणाऱ्याला) म्हणतो : 'आम्ही यज्ञीय खंबात (यूप) प्राणप्रतिष्ठा करीत आहोत. (आवश्यक) मंत्र म्हण' तेव्हा होता (हवन करणारा) मंत्र म्हणतो. 'अञ्जनित त्वा अधरे' – अर्थात हे वृक्षा! पुरोहित दिव्य मधूद्वारा तुझा अभिषेक करीत आहे. येथे जर तू सरळ उभा राहशील तर किंवा जर, तू पृथ्वीमातेवर लेटलेला राहशील तर आम्हाला संपत्ती दे. दिव्य मधू म्हणजे तापवलेले लोणी आहे. त्यानेच पुरोहित यूपाचा अभिषेक करतात. बाकीच्या अर्ध्या मंत्राचा 'आम्हाला दे' इत्यादीचा अर्थ असा; 'तू उभा अथवा पडलेला अस, आम्हाला धन दे.'

तेव्हा तो म्हणतो :

*'जातो जायते सुदिनत्वे आऱ्हमिति, इति।*
*जातो ह्येष एतज्जायते, इति।*
*समर्थ आ विदये वर्धमान, इति। वर्धयन्त्येवैनं तत् इति।*
*पुनन्ति धीरा अपसो मनीवेति पुनन्त्येवैनं तत् इति।*
*देवया वित्तं उदियतिं वाचसिति देवेभ्य एवैनं तान्निवेद यति, इति।'*

**अर्थ –** (तेव्हा होता म्हणतो) 'जन्म ग्रहण केल्यानंतर तो यूप आपल्या जीवनाच्या ऐन भरात असताना मर्त्य मानवाच्या यज्ञासाठी उपयोगी पडतो. शहाणे लोक त्याची (यूपाची) कौशल्यपूर्ण सजावट करण्यात कार्यरत आहेत. तो देवांच्या वाक्‌चतुर दूताप्रमाणे आपला स्वर उच्च करतो. देवांना (ऐकू यावे यासाठी) त्याला (यूपाला) 'जनम ग्रहण केलेली' असे म्हणण्यात येते. कारण तो या श्लोकाच्या पहिल्या चरणाच्या उच्चारामुळे जन्म पावतो. 'वर्धमान' या शब्दाद्वारे ते त्याला अशा प्रकारे वाढीस लागतात. 'पुनन्ति' (पवित्र करणे, संजविणे) या शब्दाद्वारे ते त्याला अशा प्रकारे पवित्र करतात. देवेया वित्तं उदियतिं वाचमिति इ. (देवांच्या वाक्‌चतुर देवाप्रमाणे इ.) या शब्द संहतीद्वारा तो देवांना यूपाच्या अस्तित्वाची सूचना देतो.'

नंतर होता (हवन करणारा) या यज्ञीय खांबाच्या प्राण–प्रतिष्ठेचा संस्कार पुढील श्लोक म्हणून पूर्ण करतो :

*'युवा सुवासाः परिवीत आगादित्युत्तमया परिदधाति, इति।*
*प्राणो वै युवा सुवासाः सोऽ यं शरीरैः परिवृत्ति; इति।*
*स उ श्रेयान् भवति जायमान इति श्रेयाच्छे यान्हयेष*
*एतद्भाति जायमानः इति।*
*तं धीरासः कवय उन्नयन्ति स्वाध्यो मनसा*
*देवयन्त इति ये वा अनूचानास्ते कवयस्त एवैनं*
*तदुन्नयन्ति, इति।' (३,८,४)*

**अर्थ –** रिबिनींनी शृंगारलेला युवक येऊन पोहचला आहे. यापूर्वीच्या सर्व वृक्षांपेक्षा तो अधिक उत्तम आहे. बुद्धिमान पुरोहित आपल्या अंतःकरणातील सुव्यवस्थित विचारांचे पठण करून त्याला उच्चत्व प्रदान करतात. रिबिनींनी सजविलेला हा युवक, जीवनदायी वायू (आत्मा) आहे. हा वायू शरीराच्या अवयवांनी अवगुंठित आहे. 'स उ श्रेयान्' (तो श्रेष्ठ आहे) इत्यादी शब्दांचा अर्थ असा की या मंत्रामुळे तो (यूप) अधिकाधिक उत्तम (सुंदर, श्रेष्ठ) होत आहे.'

यानंतरचा विधी बळीच्या पशूभोवती अग्नी घेऊन फिरण्याचा असतो. या संदर्भात ऐतरेय ब्राह्मणामध्ये पुढीलप्रमाणे सूचना दिल्या आहेत :

*'पर्यग्नये क्रियाणामनुबू हीत्याध्वर्यूः ; इति।*
*अग्निर्होता नो अध्वर इति तृचमाग्नेयं गायत्रमन्वाह*
*पर्याग्नि क्रिमाणे स्वयैवैनं तद्दैवतया स्वेनच्छान्दसा*
*समर्धति, इति।'*
*'वाजी सन्परिणीयत इति वाजिन मिव हयेनं सन्तं*
*परिणयन्ति, इति।*
*परित्रिविष्ट्यध्वरं यात्यग्नी रथीरिवेत्येष हि*
*रथीरिवाध्वरं परियाति, इति।*
*परिवाजपतिः कविरित्येष हि वाजानां पतिः इति।'*
*अर्ध्वर्यूः 'अतः उपप्रेष्य होतर्हव्या देवेभ्य इत्याहाध्वर्यूः इति।'*
*होतार : 'दैव्य शमितार आरभध्वमुत मनुष्या इत्याह,*
*ये चैव देवानां शमितारो ये च मनुष्यानां*
*तानेव तत्सशास्ति, इति।*
*उपनयत मेघ्या आशासाना मेध पतिभ्यां*
*मेधमिति, इति।'*
*'पशुवै मेधो यजमानो मेधपतिर्यजमानमेव*
*तत्सेव मेघेन समर्धयति, इति। अर्था खल्वा–*
*हुर्यस्यै वावकस्यैच देवतायै पशुरालभ्यते सैव*
*मेधपतिरिति, इति।''*
*''यद्यकदेवत्यः पशुः स्यान्मेधपतय इति ब्रूयाद्यादि*
*द्विवेवत्यो मेधपतिभ्यमिति यदि बहुदेवत्यो*
*मेधपतिभ्य इत्येतदेव स्थितम्, इति।''*



*''प्राष्मा अग्नि भरतेति, इति।*
*पशुवै नीयमानः स मृत्यं प्रापश्यत्स देवानान्व–*
*कामयतैतुं तं देवा अब्रू वम्रेहि स्वर्ग वै त्वा*
*लोकं गमिष्याम इति स तथेत्यब्रवीत्त्स्य*
*वै मे युष्माकमेकः पुरस्तादैत्वित तथेति*
*तस्याग्निः पुरस्तादेत्सोऽग्निमनुप्राच्यवत, इति*
*तस्मादाहुराग्नेयो वाव सर्वः पशुरग्निं हि*
*सोऽनुप्राच्यवतेति, इति। तस्माद्वस्थाग्नि*
*पुरस्ताद्धरन्ति, इति।''*
*''स्तृणीत वर्हिरित्योषध्यात्मा वं पशुः*
*पशुमेव तत्सवित्मानं करोति, इति।''*

**अर्थ –** ''जेव्हा पशूच्या सभोवार अग्नी फिरविण्यात येतो तेव्हा अध्वर्यू होत्याला (हवन करणाऱ्यास) म्हणतो : तुझ्या मंत्राचे पठण कर. तेव्हा होता गायत्री छंदामध्ये रचलेल्या पुढील तीन मंत्राचे पठण करतो : 'अग्निर्होता नो अघ्वरे इ.' (४,१५ १–३) अर्थ : १. आमचा पुरोहित घोड्याप्रमाणे अग्नीला वाहून नेत आहे. हा अग्नी देवांमध्ये यज्ञाचा देव आहे. २. एखाद्या सारथ्याप्रमाणे अग्नी यज्ञाजवळून जातो. तो देवांकडे आहुती घेऊन जातो. ३. अन्नाचा अधिष्ठाता 'अग्निऋषी' आहुतीच्या भोवती फिरला; तो याजकाला संपत्ती देतो.''

''जेव्हा (पशूच्या) भोवती अग्नी घेऊन फिरण्यात येते, तेव्हा त्याला आपल्या मंत्राद्धारा व देवतांद्धारा वर्धिष्णु करण्यात येते. तो एखाद्या घोड्याप्रमाणे वाहून नेण्यात येतो'' याचा अर्थ असा की तो जणू एखादा घोडाच आहे असे समजून ते त्याला सभोवती फिरवितात. ''एखाद्या सारथ्याप्रमाणे वेगाने यज्ञाभोवती फिरतो. त्याला वाजपती भोजनाचा अधिष्ठाता असे म्हणण्यात येते. कारण तो (नाना प्रकारच्या) अन्नाचा अधिष्ठाता आहे.''

**अध्वर्यू म्हणतो** : ''हे होत, देवांसाठी आहुती देण्याची पुनश्च आज्ञा द्या.''

**तेव्हा होता म्हणतो** : (वध करणाऱ्यांना) ''हे दिव्य वाधिकांनो तुमचे (कार्य) सुरू करा. त्याचप्रमाणे तुमचे मानवी कार्यही सुरू करा. याचा अर्थ असा की तो सर्व वाधिकांना– मग ते देवतांमधील असोत की मानवी असोत सर्वांनाच – आज्ञा देतो की त्यांनी आपले कार्य सुरू करावे. यज्ञाच्या दोन्ही स्वामींच्यावतीने तुम्ही यज्ञाची अनुमती देता म्हणून वध करण्याची तुमची शस्त्रे येथे घेऊन या.''

''पशू हा आहुती असून यज्ञकर्ता आहुतीचा स्वामी आहे. अशा प्रकारे

यज्ञकर्त्याला होता त्याच्या स्वतःच्या यज्ञकर्त्याच्या आहुतीद्वारा वर्धिष्णु बनवितो. म्हणूनच ते सत्यपणे म्हणतात : ''ज्या दैवतासाठी पशूचा वध करण्यात येतो तोच त्याचा स्वामी आहे. जर एकाच दैवतासाठी पशूचा बळी देण्यात येत असेल तर पुरोहिताने असे म्हणावे : 'मेधपतये' अर्थात यज्ञाच्या स्वामीकरिता (एकवचनी) जर दोन दैवतांना बळी देण्यात येत असेल तर त्याने यज्ञाच्या दोन्ही स्वामींसाठी असे म्हणावे (द्विवचनी) आणि जर अनेक दैवतांना बळी देण्यात येत असेल, तर त्याने यज्ञाया स्वामींसाठी असा अनेकवचनी प्रयोग वापरावा. हीच सनातन रूढी आहे.''

''तू त्याच्यासाठी अग्नी आण. पशूला जेव्हा वधस्थानाकडे नेण्यात आले तेव्हा त्याने मृत्यूला प्रत्यक्ष समोरासमोर पाहिले. तो दैवताकडे जाऊ इच्छित नव्हता. तेव्हा दैवते त्याला म्हणाली : 'ये! आम्ही तुला स्वर्गात पोहचवितो.' तेव्हा पशूला ते पटले व तो म्हणाला : 'तुमच्यापैकी एकाने माझ्यासमोर पुढे चालावे.' दैवतांनी मान्य केले. तेव्हा अग्नी पुढे चालू लागला व पशू त्याच्यामागे जाऊ लागला. यामुळेच असे म्हणतात की प्रत्येक पशूवर अग्नीचा अधिकार असतो. कारण पशू अग्नीच्या मागोमाग गेला. यामुळेच पशूच्या समोर अग्नी नेण्यात येतो.''

'पवित्र गवत पसरून द्या! पशू वनस्पतीवरच जगतो. अशा प्रकारे होता पशूला संपूर्ण आत्मा देतो (कारण वनस्पती हा त्याचाच (आत्म्याचा) अंश मानण्यात येतो.)

पशूच्या भोवती अग्नी फिरविण्याच्या विधीनंतर यज्ञासाठी हा पशू पुरोहिताच्या स्वाधीन करण्यात येतो. यज्ञासाठी पशूचे अर्पण कोणी करावे याबद्दल ऐतरेय ब्राह्मणाची आज्ञा अशी :

*अन्वेनं माता मन्यतामनु पितानु भ्राता सगर्भ्योऽनु*
*सखा सयूथ्य इति जनिवैरधैनं तत्समनु*
*मतमालभन्ते, इति।*

**अर्थ –** ''माता, पिता, भाऊ, बहीण, मित्र आणि अन्य आप्तेष्टांनी यज्ञात वध करण्यासाठी पशूचे समर्पण करावे. जेव्हा हे शब्द उच्चारले जातात तेव्हाच ते त्या पशूला पकडून घेतात. आणि तो पशू मातापिता इत्यादी द्वारा सर्वथा पत्यिक्त आहे असे मानण्यात येते.''

हे मार्गदर्शन वाचल्यानंतर कोणालाही आश्चर्य वाटते की यज्ञात पशूचे समर्पण करण्यासाठी इतक्या लोकांना कशाला गोळा व्यावे लागत होते! याचे कारण उघड आहे. यज्ञामध्ये भाग घेणाऱ्या अधिकारी पुरोहितांची एकूण संख्या १७ असे. ते मृतपशूचे संपूर्ण शव स्वतःसाठी घेण्याचा स्वाभाविकपणे प्रयत्न करीत असत. वस्तुतः त्यांना जर पूर्ण जनावराचे शव मिळाले नसते तर १७ जणांमध्ये ते त्यांना पुरेशा प्रमाणात



वाटूनही घेता आले नसते. जोपर्यंत त्या पशूवर अधिकार सांगणारी प्रत्येक व्यक्ती आपला हिस्सा सोडून देण्यास तयार होत नसे तोपर्यंत ब्राह्मण त्या संपूर्ण पशूवर आपला कायदेशीर अधिकार सांगू शकत नव्हते. यामुळेच वरील मार्गदर्शनामध्ये याज्ञकर्त्याच्या आप्तेष्टांनीही पशूच्या अर्पण विधीमध्ये भाग घ्यावा अशी सूचना दिलेली आहे.

यानंतर पशूला ठार मारण्याचा विधी येतो. ऐतरेय ब्राह्मणामध्ये पशुहत्येची पद्धती व तऱ्हेबद्दल तपशीलवार सूचना दिलेल्या आहेत. त्या अशाः

*'उदीचीनां अस्य पदो निधत्त, तू सूर्य चक्षुर्गभयतात्*
*वात प्राणमन्ववसृजतात। अन्तक्षरिमसू दिशः श्रोत्र*
*पृथिवीं शरीरमित्येष्वेवैनं तल्लोकेष्वादधाति।'*
*'एकधाऽस्य त्वचमाच्छयतात्म पुरा नाभ्या अपिशसोमु*
*वपामुत्खिदतादन्तरेवोष्माणं वारयध्वादिति पशुष्वेवे*
*तत् प्राणा दधाति।'*
*'स्येनमस्य वक्षः कृणुतातत् पशसा बाहू शला*
*दोषणी कश्यपेबांसाऽच्छिद्रे श्रोणी कवषोरू-*
*दष्ठीवन्ना षड् विंशतिरस्य वङ्क्रयस्ता अनुष्ठयां*
*च्यावयाताद् गात्र गात्रमस्या नूनं कृणुताः दित्यंगान्ये-*
*वात्य तद् गात्राणि प्रीणति।'*

**अर्थ –** 'याचे पाय उत्तरेकडे ठेवा. त्याचे डोके सूर्याकडे, त्याचा श्वास वायूकडे, त्याचे जीवन हवेकडे, त्याची श्रवणशक्ती दिशांकडे आणि त्याचे शरीर पृथ्वीकडे सोपवा. अशा प्रकारे होतृ त्याचा संबंध या विभिन्न विवांशी जोडून देतो.

'(न कापता) संपूर्ण चामडे काढून घ्या. बेंबी फाडून पोट उघडण्यापूर्वी आतड्यावरील पातळ पडदा फाडून काढा. (त्याचे तोंड बंद करून) त्याचा श्वास आतल्या आत रोखा. अशा प्रकारे तो (होतृ) पशूंमध्ये त्यांचा श्वास कोंडून देतो.'

'त्याच्या छातीचा एक तुकडा गरुडाच्या आकाराचा, त्याच्या मागील दोन पायांचे दोन तुकडे परशूच्या आकाराचे, पुढील पायाचे दोन तुकडे त्रिकोणी आकाराचे, त्याच्या खांद्याचे दोन तुकडे कासवाच्या आकाराचे, त्याच्या कमरेचा भाग अखंड, त्याच्या दोन्ही मांड्यांचे दोन तुकडे ढालीप्रमाणे, त्याच्या गुडघ्यांचे दोन तुकडे कण्हेरीच्या पानाप्रमाणे करून काढून घ्या. त्याच्या २६ बरगड्या अनुक्रमाने काढून घ्या. त्याचा प्रत्येक अवयव जसाच्या तसाच सुरक्षित ठेवावा. अशा प्रकारे तो (होतृ) त्याच्या सर्व अवयवांना लाभ प्राप्त करून देतो.'

यज्ञासाठी पशूची हत्या करण्याशी संबंधित असे आणखी दोन विधी शिल्लक

आहेत. त्यापैकी एक म्हणजे खाटकाचे काम करणाऱ्या पुरोहिताची हत्येच्या पापापासून सुटका करणे! तत्त्वतः ते खुनी गुन्हेगार ठरतात. कारण यज्ञीय पशू म्हणजे यज्ञकर्त्याचाच पर्याय असतो. त्यांना खुनाच्या दुष्परिणामापासून वाचविण्यासाठी ऐतरेय ब्राह्मणाने होतृला पुढीलप्रमाणे आज्ञा दिली आहे :

*''वर्निष्ठ मस्य वा राविंष्टोरूकं मन्यमाना नेटवतस्तीके*
*तनये रवितारवच्छमितार इति ये चैव देवानां शमितारो*
*येच मनुष्याणां तेभ्य ए वैनं तत् परिदधाति।''*

**अर्थ –** आतडीवरील पातळ पडदा काढून घेत असता घुबडाच्या आकाराप्रमाणे दिसणारी आतडी कापू नकोस. हे वध करणाऱ्या! ती आतडी कापणारा तुझ्या मुलांमध्ये किंवा त्यांच्याही पुत्रपौत्रामध्ये पुढेही कोणी निपजू नये. हे शब्द म्हटल्यानंतर तो देव आणि मानवामध्ये जे वध करणारे आहेत त्यांना ती आतडी देतो.

तेव्हा होतृ तीन वेळा म्हणतो :

*''अध्रिंगो शमीध्वं सुशमि शमीध्वं शमीध्वमध्रिगी*
*उ इति त्रिर्बूयादयापेति चाध्रिगुर्वै देवांना शमिताऽपापो*
*निग्रमीता शमितृभ्यश्चवैनं तन्निग्रमीतृभ्यश्च संप्रयच्छ ति!''*

**अर्थ –** हे अध्रिगु (आणि इतरांनो) (पशूचा) वध करा, तो चांगल्या प्रकारे करा. याचा वध करा. हे अध्रिगु! ''पशूची हत्या पूर्ण झाल्यावर त्याने तीन वेळा म्हणावे : ''(या हत्येचा दुष्परिणाम आमच्यापासून) दूर राहो. कारण देवांमधील अध्रिगुच पशूची तडफड थांबवितो आणि अपाप (पापमुक्त) राहतो. तोच त्याला खाली पाडतो. हे शब्द म्हटल्यानंतर तो पशू त्यांच्या ताब्यात देतो. तो (त्याचे तोंड बंद करून) त्याला निश्चल करतो व मारणाऱ्याच्या ताब्यात देतो.''

नंतर होतृ जप करतो. तो असा :

*''शमितारो यदत्रं सुकृतं कृणवथास्मासु तद् यद्दुष्कृत–*
*मन्यत्र तदित्याहाग्निर्वै देवांना होताऽसोत स एनं*
*वाचा व्यशात् वाचावा एनं होता विशास्ति यद्*
*यदर्वाग् यत्परः कृन्तानित यदुल्वणं गद्विथुरं*
*क्रियते शनितृभ्यश्चैवनतन्निग्रमीतृभ्यश्च समनुदिशाति*
*स्वत्स्ये व हो तोन्मुच्यते सर्वायुः सर्वायुत्वाय।*
*सर्वमायु–रति य एवं वेद।''*

**अर्थ –** ''हे वध करणाऱ्यांनो तुमचे सर्व पुण्य आम्हाला प्राप्त होवो (आणि) तुमचे पाप अन्यत्र निघून जावो.'' हे शब्द म्हटल्यानंतर होतृ (पशूला ठार मारण्याची)



आज्ञा देतो. कारण अग्नी जेव्हा देवांचा होतृ होता तेव्हा त्यानेही याच शब्दांनी (पशुहत्येची) आज्ञा दिली होती.

''या जपद्वारा होतृ पशूचा श्वास गुदमरून टाकणाऱ्या किंवा पशूची हत्या करणाऱ्या सर्वांचे पाप नाहीसे करतो. (त्याचप्रमाणे) पशूचे तुकडे करताना अति घाई झाली असेल अथवा फार वेळ लागला असेल किंवा काही तुकडे वाजवीपेक्षा मोठे व लहान झाल्यामुळे नियमाचे उल्लंघन झाले असेल तर त्याचाही दुष्परिणाम या जपामुळे नष्ट होतो. होतृ आनंदित होऊन स्वतःलाही सर्व पापापासून मुक्त करतो व पूर्ण आयुष्य प्राप्त करतो. त्याचप्रमाणे यज्ञकर्त्यालाही यामुळेच पूर्ण आयुष्य प्राप्त होते.''

यानंतर मृत पशूच्या शरीराच्या भागांची व्यवस्था लावण्याच्या प्रश्नाचा ऊहापोह ऐतरेय ब्राह्मण करते. या संदर्भातील त्याच्या आज्ञा अशा :

*'ऊवध्यगोह पार्थिवं खनतादिस्याहौषधं वा ऊवध्यमियं*
*वा ओषधीनां प्रतिष्ठा तदेनत्स्वायामेव प्रतिष्ठायामन्ततः*
*प्रतिष्ठापयितीति।'*
*'अस्ना रक्षः संसृजतादित्याह तुषेर्वै फलिकरणेर्दैवा*
*हविर्यक्षोभ्यो रक्षांसि निरभजन्नस्ना महायज्ञात्सः*
*यदस्ना रक्षाः संसृजतादित्याह रक्षांस्येव तत्स्वेन*
*भागधेयेन यज्ञान्निरवदयते, इति।'*
*तदाहुर्न यज्ञे रक्षसां कीर्तयेत्कानि रक्षांसृतेरक्षा*
*वे यज्ञ, इति। तदु वा आहुः कीर्तयेदेव इति।'*
*'यो वै गागिन भगान्न देत चायते वेन न चयतेऽथ*
*पुत्रमथ पौत्र चयते त्वेषै नमिती, इति।'*
*'स यदि कीर्तयेदुपांशु कीतयेत्तिर इव वा एतद्वाची*
*यदुपाशु तिर इवैतद्यद्रक्षांसि, इति।'*
*'अथ यदुच्चैः कीर्तयेदीश्वरी हास्य वाचो रक्षो भाषो जानितो, इति।'*
*'योऽयं राक्षसी वाचं वदति सः, इति।*
*यां व दृप्तो वदति यामुन्मतः सा वै राक्षसी वाक्, इति।*
*नाऽऽत्मना दृत्यादि् नाम्य प्रजायां दृप्तं आजायते एवं वेद, इति।'*

**अर्थ –** याच्या पोटातील शेण लपविण्यासाठी जमिनीत एक खड्डा खोदा. शाकाहारापासून शेण बनते व पृथ्वी हेच वनस्पतीचे (उगम) स्थान आहे. म्हणून होतृ त्याला (शेण) त्याच्या उचित जागी अंतिमतः ठेवतो. प्रेतात्म्यांना रक्त द्या. कारण

देवतांनी एकदा प्रेतात्म्यांना हविर्यज्ञाचा (पौर्णिमा व प्रतिपदेचा बळी) त्याचा हिस्सा न देता कवेळ धानाचा कोंडा व कणी देऊन हाकलून दिले. आणि मोठ्या यज्ञातही (सोम व पशुयज्ञ) त्यांना बाहेर हाकलून केवळ रक्त दिले. त्यामुळे होतृ (पुढील) मंत्राचा जप करतो : 'प्रेतात्म्यांना रक्त द्या' त्यांना हा हिस्सा देऊन यज्ञातील इतर कोणतीही वस्तू घेण्यापासून वंचित करण्यात येते, कोणी म्हणतात : 'प्रेतात्म्यांना यज्ञामध्ये स्थान देण्यात येऊ नये. राक्षस, असुर, प्रेतात्मा इत्यादी कोणीही असो, त्यांच्या विघ्नबाधेवाचून यज्ञ व्हावयास हवा.' परंतु अन्य काहींचे मत आहे की त्यांचेही स्मरण ठेवावे. कारण जर कोणी एखाद्याला त्याच्या हिश्श्यापासून वंचित करील तर त्या वंचित होणाऱ्याला दुःख होईल व दुःख देणारा जरी कदाचित त्याच्या पीडेपासून मुक्त राहिला तरी त्याच्या मुलाला पीडा होईल; व मुलगाही वाचला तर त्याच्या नातवाला पीडा भोगावी लागेल. अशा तऱ्हेने तुम्हाला होणारी पीडा तुमच्या मुलाला किंवा नातवाला भोगावी लागते.

'तथापि होतृ जर त्यांच्या (प्रेतात्म्यांच्या) नावाने संबोधन करीत असेल तर त्याने लहान आवाजात संबोधन करावे. कारण भूतात्मे व हळू आवाज हे दोन्हीही छुपे असतात. जर तो फार मोठ्या आवाजात बोलेल तर तो प्रेतात्म्यांच्या आवाजात बोलत असतो आणि तो राक्षसी आवाजही (भयानक आवाज) काढण्याची शक्यता असते.

क्रोधिष्ट व दारुडा माणूस जसा बोलतो त्याच्या वाणीत प्रेतात्माही बोलतो. ज्याला याची जाणीव आहे तो स्वतः क्रोधित होत नाही व त्याची संततीही तशी होत नाही.'

आता केवळ अंतिम विधी करावयाचा राहिलेला असतो. तो म्हणजे मृत पशूच्या शरीराचे विभिन्न तुकडे दैवतांना समर्पित करण्याच्या या विधीला मनोत असे म्हणण्यात येते. ऐतरेय ब्राह्मणाचे मत असे :

*मनातार्यै हविषोऽवादीयमानस्यानुब्रू हीत्याहाध्वर्युः इति।*
*त्वं ह्याग्ने प्रथमो मनोतेति सूक्तमन्वाह, इति।'*

**अर्थ : अध्वर्यू होतृला म्हणतो** : मनोतासाठी कापून काढलेल्या भागाचे समर्पण करण्याचा मंत्र म्हण, तेव्हा तो पुढील मंत्र दोनदा म्हणतो : 'हे अग्नी, तू पहिला मनोत आहेस.'

आता पशूच्या मांसाची विभागणी करण्याचा प्रश्न शिल्लक राहतो. यासंबंधी ऐतरेय ब्राह्मणाने पुढील प्रकारची व्यवस्था सांगितली आहे :



*'अथातः पशोर्बिभक्तिस्तस्य विभागं वक्ष्यामः इति.,।*
*हनु सजिव्हे प्रस्तोतुः श्येन वक्ष उद्गातुः*
*कण्ठ : काकुदः प्रतिहर्तुर्दाक्षिणं श्रोणिर्होतुः सण्या ब्रह्मणो दक्षिण पाश्व*
*मांसमध्यवर्यै सव्यं ब्राह्मणाच्छंसिनो*
*दक्षिण पाश्व मांसमध्यवर्योः सव्यमुपगातृणां*
*सव्योंऽसः प्रतिप्रस्थातुर्ददक्षिणं दोर्नेष्टुः सव्यं पोतुर्दक्षिण*
*ऊरूच्छावाकस्य सक्ष्य अग्नीध्रस्य दक्षिणो बाहुरा*
*त्रेयस्य सव्यः सदस्यस्य सदं चानुकं व गृहपतेर्दक्षिणौ*
*पादौ गृहपतेर्व्रात् पदस्य सव्यौ पादौ गृहपतिर्भार्यायै*
*व्रतपदस्ययौष्ठस्तयोः साधारणो भवतिं तं गृहपतिरेव प्रशिष्या–*
*ज्जघनी पत्नीभ्यो हरन्ति तां ब्राह्मणाय दधुः स्कन्धाश्च*
*मणिकस्तिस्त्रश्च कीकसा ग्रावस्तुतस्तिस्त्रश्चव कीकसा अर्ध*
*च वंकर्तस्योन्नेतुरार्ध चैव वैकर्तस्य क्लोमा व शमितुस्त–*
*द्ब्राह्मणाय दद्याद्यब्राह्मण न्याच्छिरः सुब्रह्मण्यावै यः श्वः*
*सुत्यां प्राह तस्वाजिनमिश्रा सर्वेषां होतुर्वा, इति''।*
*''ता वा एता षट्त्रिंशतमेकपका या वहन्ति षट्त्रिश–*
*दशक्षरा वै बृहती। वार्हताः स्वर्गा लोकाः प्राणाश्चैव*
*तत्स्वर्गाश्च लोकानाप्नुवंति प्राणेषु चैव तत्वगषु च*
*लोकेषु प्रातातष्ठन्तो यन्ति, इति''।*
*अर्थ येऽतोऽन्यथा तद्यथा सेलगा वा पापकृतो वा*
*पशु विमन्थीरंस्ताक्ततत्, इति।*
*तां वा एता पशोर्विभक्ति श्रौत ऋषिर्देवभागो विदां*
*चकार तामु हाप्राच्यैव वास्माल्लोकादुच्चक्रामत्, इति।*
*ताम् हा गिरिजाय बाभ्रयायामनुष्यः प्रोचाय ततो*
*हैनामेतदर्वाङ् मनुष्य अधीयतेऽधीयते, इति।*

**अर्थ –** ''आता पशूच्या विभिन्न भागांची विभागणी पुरोहितांमध्ये करून देण्याचा प्रश्न शिल्लक राहिला आहे. त्याचे वर्णन आता आम्ही करतो. जबड्याची दोन्ही हाडे व जीभ प्रस्तोताला देण्यात यावी. गरुडाच्या आकाराचा छातीचा तुकडा, उद्गात्याला, गळ्याचा व टाळूचा भाग प्रतिहर्त्याला, कमरेचा उजवीकडील भाग होतृला,

हा डावीकडील ब्रह्माला, उजवी मांडी मैत्र वरुणाला, डावी ब्राह्मणाच्छसीला, खांद्यासह उजवी बाजू अध्वर्यूला, डावी बाजू मंत्रोच्चारणामध्ये साथ देणाऱ्यांना डावा खांदा प्रतिस्थानाला, डाव्या बाजूला खालचा भाग नेष्टूला, डाव्या पायाचा खालचा भाग पोतृला, उजव्या मांडीचा वरचा भाग अच्छावाकला, डाव्या मांडीचा वरचा भाग अग्निधराला, पुढील कणा आणि मूत्राशय गृहपतीला, (यज्ञकर्ता) उजवा पाय मेजवानी देणाऱ्या गृहपतीला, डावा पाय मेजवानी देणाऱ्या गृहपतीच्या पत्नीला, वरील ओठ गृहपती व त्याच्या पत्नीला सारख्या प्रमाणात हिस्से करून द्यावा. पशूचे शेपूट गृहपतीच्या पत्यांनाना देण्यात यावे. परंतु त्यांनीही ते ब्राह्मणालाच परत द्यावे. मानेवरील मांसल भाग मणक्यांसह व तीन कीकस ग्राववस्तुताला, तीन कीकस व पाठीच्या मांसल भागापैकी उरलेला अर्धा हिस्सा आणि डावा क्लोमा (कानाचा भाग) वध करणाऱ्याला देण्यात यावा. जर वध करणारा स्वतः ब्राह्मण नसेल तर दुसऱ्या कोणत्याही ब्राह्मणाला देऊन टाकावा. सोम यज्ञाच्या वेळी (स्वः सुत्यां इ.) मंत्र म्हणणाऱ्या सुब्रह्मण्याला डोके देण्यात यावे. सोम यज्ञामध्ये यज्ञभोज म्हणून काढून ठेवलेला हिस्सा सर्व पुरोहितांच्या मालकीचा असतो. केवळ होतृसाठी मात्र तो ऐच्छिक असतो.''

''बळीच्या पशूच्या या सर्व तुकड्यांची संख्या ३६ असते. ज्या श्लोकांद्वारे यज्ञविधी पार पडतो त्यातील प्रत्येक शब्दाचा हा तुकडा प्रतीक असतो. बृहतो छंदात ३६ शब्दखंड असतात आणि स्वर्गीय शब्द बृहतीच्या स्वरूपाचेच असतात. अशा प्रकारे पशूचे ३६ तुकडे करून ते इहलोक व स्वर्गलोकात जीवन लाभ करतात. आणि दोन्ही लोकांत (स्वर्गलोक व इहलोक) प्रतिष्ठित होऊन ते तेथे चालतात.''

''उपर्युक्त पद्धतीने जे पशूच्या मांसाची विभागणी करतात त्यांच्यासाठी ते स्वर्गाचे द्वारच ठरते, परंतु जे चुकीचे हिस्से करतात ते भोंदू व ठगाप्रमाणे असून ते केवल आपली मांस भक्षणाची आसक्ती तृप्त करण्यासाठी त्या पशूला ठार मारतात. यज्ञीय पशूचे हे विभाजन ऋषीने (देवभाग, श्रृताचा पुत्र) शोधून काढले आहे. जेव्हा तो इहलोक सोडून जाऊ लागला तेव्हा त्याने हे रहस्य कोणालाही सांगितले नव्हते. परंतु एका अलौकिक व्यक्तीने बभ्रुचा पुत्र गिरिजाला ते रहस्य सांगितले. त्याच्या काळापासूनच मानव याचे अध्ययन करतात.''

ऐतरेय ब्राह्मणमध्ये जे काही सांगण्यात आले त्यामुळे दोन बाबी वादातीत होतात. एक अशी की बळीच्या पशूचे संपूर्ण मांस ब्राह्मणच स्वतःसाठी घेत होते. एक लहानसा तुकडा सोडला तर यज्ञ करणाऱ्या गृहस्थालासुद्धा ते काहीच देत नव्हते. दुसरी बाब अशी की पशूचा वध करण्यासाठी ब्राह्मण स्वतः खाटकाचेही काम करीत असतो. ज्या पशूचा यज्ञात बळी देण्यात येत असे त्याचे मांस तत्त्वतः ब्राह्मणांनी



खावयास नको होते. यज्ञाचा आधारभूत सिद्धांत असा की जो गृहस्थ आपले जीवन व शरीर देवतांना बलिदान करू इच्छितो तो आपला जीव वाचविण्यासाठी स्वतःच्या बदलीत पशूचा बळी देत असतो. याचा अर्थ असा की जो या यज्ञीय पशूचे मांस खातो तो अप्रत्यक्षपणे मनुष्याचेच मांस खात असतो. कारण यज्ञातील पशु मनुष्याच्या बदलीमध्येच घेतलेला असतो. यज्ञीय पशूचे संपूर्ण मांस हडपणाऱ्या ब्राह्मणांच्या स्वार्थावर वरील मतप्रणालीमुळे मोठी गदाच येणार होती. ऐतरेय ब्राह्मणाला वरील मतप्रणालीतील धोका लक्षात येऊन तिच्यामुळे यज्ञीय पशूच्या मांसाला ब्राह्मण मुकणार हे कळून चुकले होते. म्हणून ऐतरेय ब्राह्मणाने वरील मताला अमान्य करून वेगळे स्पष्टीकरण देण्याची तसदी घेतली आहे. ते म्हणतात :

*''सर्वाभ्यो वा एष देवताभ्य आत्मानमालभते तो दीक्षतेऽग्निः*
*सर्वा देवतः सोमः सर्वा देवतः स यदग्नीषोमीयं*
*पशुमालभते सर्वाभ्य एव तद्द वताभ्यो यजमान आत्मानं*
*निष्क्रीणीते, इति।''*
*'तदाहुर्नाग्नीपोमीयस्य पशोरश्नीयात्पुरूषस्य वां*
*एशोऽश्नाति योऽग्नीषोमीयस्य पशोरश्नाति यजमानो*
*हयेतेनाऽऽत्मान निश्क्रीणीत, इति'।*

**अर्थ –** ज्या मनुष्याला यज्ञातील रहस्याचा अनुभव येतो तो स्वतःला दैवतांना अर्पण करतो. अग्नी सर्व दैवतांचा प्रतिनिधी आहे. आणि सोमही सर्व दैवतांचा प्रतिनिधी आहे. जेव्हा तो (यज्ञकर्ता) अग्नी व सोमासाठी पशूचा बळी देतो तेव्हा सर्व दैवतांना (आपल्या बदली) पशूचा बळी देऊन स्वतःला मुक्त करून घेतो.

''काही लोक म्हणतात की अग्नी व सोमाला बळी दिलेल्या पशूचे मांस खाऊ नका. जो की या पशूचे मांस खातो तो मनुष्याचेच मांस खातो; कारण यज्ञकर्ता आपल्या बदली पशूचा बळी देऊन स्वतःला वाचवीत असतो. परंतु हे (मत) ध्यान देण्यालायक नाही.''

'वरील वस्तुस्थिती सांगितल्यानंतर ब्राह्मण केवळ गोमांस भक्षकच नव्हते तर ते खाटीकही होते.' या विधानाच्या समर्थनासाठी अधिक पुरावे देण्याची आवश्यकता नाही, असे वाटते.

तर मग ब्राह्मणांनी आपला पवित्रा का बदलविला? त्यांच्या या पवित्रा बदलविण्याच्या विषयाचा ऊहापोह आपण दोन पायऱ्यांनी करू या. पहिली अशी : त्यांनी गोमांस खाणे का सोडून दिले?

## २

याआधीच दर्शविल्याप्रमाणे अशोकाद्वारा गोहत्येला बंदी घालण्यात आली नव्हती. आणि त्याने तशी बंदी घातलीही असती तरी बौद्ध राजाने केलेला कायदा ब्राह्मणांनी स्वतःला बंधनकारक मानला नसता.

मनूने गोमांस भक्षणाला प्रतिबंध घातला काय? त्याने जर तसे केले असेल तर ते ब्राह्मणांना बंधनकारक झाले असेल आणि त्यांच्या पवित्रा बदलण्याचेही पुरेसे स्पष्टीकरण आपल्याला प्राप्त होईल. मनुस्मृती तपासून पाहिल्यास तिच्यामध्ये या संदर्भात पुढील श्लोक आढळतात :

*''यो बन्धतवधक्लेशान्प्राणिनां न चिकीर्षति।*
*स सर्वस्य हितप्रेप्सुः सुखमत्यन्तमश्नुते।।५-४६*
*यद्ध्यायति यत्कुरते धृतिं बध्नाति यत्रच।*
*तदवाप्नोत्ययत्नेन यो हिनस्ति न किंचन ।।५-४७*
*नाकृत्वा प्राणिनां हिसा मांसमुत्पद्यते क्वचित।*
*न चि प्राणिवधः स्वर्ग्यस्तस्मान्मांसं विवर्जयेत।।५-४८*
*समुत्पतिं हि मांसस्य वधबन्धौ च देहिनाम।*
*प्रसमीक्ष्य निवर्तेत सर्वमांसस्य भक्षणात्।।५-४९*

**अर्थ –** ''जो मनुष्य प्राण्यास उगीच बांधत नाही, मारीत वा त्रास देत नाही व सर्व प्राण्यांच्या हिताची इच्छा करतो तो सर्वश्रेष्ठ सुखास पात्र ठरतो. ५-४६

जो कोणत्याही प्राण्याला दुःख देत नाही, त्याला त्याच्या चिंतनाप्रमाणे, विचाराप्रमाणे व परिश्रमानुसार इच्छित फळ प्राप्त होते. ५-४७

प्राण्यांना मारल्याशिवाय मांस उपलब्ध होत नाही. आणि प्राण्यांना दुःख देण्याने स्वर्गप्राप्तीमध्ये बाधा निर्माण होते. म्हणून मांस भक्षणाचा त्याग करावा. ५-४८

माणसाच्या उत्पत्तीसंबंधी नीट विचार करून आणि प्राण्यांना बांधण्यातील व ठार मारण्याच्या कृत्यातील (क्रूरता) लक्षात घेऊन सर्व प्रकारचे मांस भक्षण करणे सोडून दिले पाहिजे. ५-४९

हे श्लोक म्हणजे विधायक आज्ञाच आहेत असे गृहीत धरले तरीसुद्धा ब्राह्मणांनी मांसाहार सोडला व ते शाकाहारी का बनले याचे पुरेसे स्पष्टीकरण आपणाला मिळते. परंतु या श्लोकांना कायद्याच्या स्वरूपातील आज्ञा मानून चालणे असंभव आहे. एकतर ते आग्रहाचा उपदेश तरी आहेत किंवा ब्राह्मण शाकाहारी बनल्यानंतर या बदलाचे स्तुतिस्तोत्र गाण्यासाठी ते मागाहून घुसडून तरी दिलेले आहेत. दुसरे मत अधिक बरोबर आहे, हे मनुस्मृतीच्या त्याच अध्यायात आढळणाऱ्या पुढील



श्लोकावरून सिद्ध होते :

*''प्राण स्यान्निमिद सर्व प्रजापतिरकल्पयत्।*
*स्थावरं जङ्गमं चैव सर्व प्राणस्य भोजनम्।।५-२८*
*चरणामन्नमचरा दंष्ट्रिणामप्यदंष्ट्रिणः।*
*अहस्ताश्च सहस्तानां शूराणां चैव भीखः।।५-५९*
*नात्ता दुष्यत्यदन्नाद्यान्प्राणिनोऽहन्यहन्यपि।*
*धात्रैव स्त्रष्टा ह्यद्यांश्च प्राणिनोत्तार एव च।।५-३०*
*न मांसभक्षणे दोषो न मद्येच नच मैथुने।*
*प्रवृत्तिरेषा भूतानां निवृत्तिस्तु महाफला।।५-५६*
*प्रेक्षितं भक्षयेन्मांसं ब्राह्मणनां च काम्यया।*
*यथाविधी नियक्तस्तु प्राणानामेव चात्यये।।५-२७*
*यज्ञाय जग्धिर्मांसस्येत्येष देवो - विधीः स्मृतः।*
*अतोऽन्यथा प्रवृत्तिसतु राक्षसी विधिरूच्यते।।५-३१*
*क्रीत्वा स्वर्य वाप्युत्पाद्य परोपकृतमेव वा।*
*देवंपितृंश्चर्ययित्वा खादन्मांसं न दुष्टत।।५-३२*
*एष्वर्थेषु पशून्हिसन्वेदतत्त्वार्थविद् द्विजः*
*आत्मानं च पशु चैव गमयतुमां गतिम्।।५-४२*
*यज्ञार्थ पशवः सृष्टा स्वयमेव स्वयंभुव।*
*यज्ञस्य भुत्यै सर्वस्य तस्माद्यज्ञे वधोऽवधा।। ६-३९*
*ओषध्यः पशवो वृक्षास्तिर्यचः परिक्षणास्तथा।*
*यज्ञार्थ निधनं प्राप्तः प्राप्नुवन्त्युत्सृतो पुनः।। ५-४८*

**अर्थ–** ''प्रजापतीने हे संपूर्ण जगत जीवन तत्त्वाच्या (ब्रह्म) अंशापासूनच बनविलेले असून स्थावर आणि जंगम अशा सर्वच वस्तू प्राण्यांचे अन्न आहेत. (५-२८) हालचाल करणाऱ्या प्राण्यांचे अन्न अचर (वनस्पती) हे आहे, (मोठमोठ्या) दाढा असणाऱ्यांचे अन्न लहान दातांचे शाकाहारी पशू हे आहेत; हस्तयुक्त प्राण्यांचे अन्न हस्तरहित प्राणी हे आहेत आणि शूरांचे अन्न भित्रे हे आहेत. ५-२९

म्हणून भक्षकाने भक्ष्य प्राण्यास दररोज खाल्ले तरी त्याला दोष लागत नाही. कारण ब्रह्मणानेच भक्ष्य व भक्षक या दोघांनाही निर्माण केले आहे, ५-३०

मांस खाण्यात, मद्य पिण्यात आणि मैथुनात कसल्याही प्रकारचा दोष नाही;

कारण ती प्राण्यांची सहज प्रवृत्ती आहे. परंतु तपासून निवृत्त राहणे महाफलदायी आहे. ५-५६

मंत्रयुक्त पाणी शिंपडून पवित्र केलेले मांस खाण्यास हरकत नाही. याशिवाय ब्राह्मणाची इच्छा असल्यास यथाविधी मांस खावे. इतर अन्न न मिळाल्याने मरण ओढवत असल्यास ब्राह्मणाने मांस खाण्यास हरकत नाही. ५-२७

यज्ञानिमित्त मांस भक्षण करणे हा दैवी-विधी आहे असे म्हणतात. परंतु ब्राह्मणांनी अन्य प्रसंगी मांस खाणे हा राक्षस विधी होय. ५-३१

खाटकाकडून मांस विकत आणून, स्वतः पशू मारून किंवा कुणी आणून दिल्यावर ते पितृ-देव इत्यादींना यथाविधी अर्पण केल्यानंतर शिल्लक उरलेले मांस खाल्ले तर खाणाऱ्याला दोष लागत नाही. ५-३२

वेद तत्त्वाला जाणणारा द्विज जेव्हा पूर्वोक्त मधुपर्कादि विधीसाठी पशूची हत्या करतो तेव्हा त्याला व पशूलाही उत्तम गती प्राप्त होते. ५-४२

स्वतः ब्रह्मानेच यज्ञासाठी व सर्व यज्ञांच्या समृद्धीसाठी पूशंची निर्मिती केली आहे. यामुळे यज्ञातील पशूची हिंसा ही अहिंसाच आहे. ६-३९

यज्ञामध्ये मारण्यात आलेले पशू, पक्षी, वनस्पती, वृक्ष व इतर प्राणी पुन्हा उत्तम योनीमध्ये जन्म ग्रहण करतात. ५-४८

मनू याच्याही पुढे जाऊन मांस-भक्षण अनिवार्य ठरवितो. पुढील श्लोक लक्षात घेण्याजोगा आहे :

*''नियुक्तस्तु यथान्यायं यो मांस नात्ति मानव।*
*स प्रेत्य पशुता याति संभवानेकविशतिम् ।।''* ५-३५

**अर्थ-** ''यथाविधी नियुक्ती झाल्यानंतर (यज्ञामध्ये पुरोहित म्हणून नियुक्ती झाल्यावर) जो मनुष्य मांस खाण्यास नकार देतो तो मेल्यानंतर २१ जन्मांपर्यंत पशू होतो.'' ५-३५

मनूने मांसाहारावर प्रतिबंध घातला नाही हे पुरेसे स्पष्ट आहे. मनूने गोहत्येलाही बंदी घातली नाही हे खुद्द मनुस्मृतीवरूनच सिद्ध होऊ शकते. पहिली गोष्ट अशी की मनुस्मृतीमध्ये गाईचा उल्लेख स्नातकासंबंधी जे नियम सांगितले आहेत केवळ त्यामध्येच आलेला आहे. ते नियम खाली दिले आहेत :

१. गाईने हुंगलेले अन्न स्नातकाने खाऊ नये.

२. ज्या दोराने वासरू बांधलेले असते तो दोर स्नातकाने ओलांडू नये.

३. गाईच्या गोठ्यामध्ये स्नातकाने लघवी करू नये.

४. गाईकडे तोंड करून स्नातकाने मल-मूत्र विसर्जन करू नये.



५. गाईच्या गोठ्यात शिरल्यावर स्नातकाने आपला उजवा हात वस्त्राबाहेर काढावा.

६. गाय वासराला दूधपाजत असल्यास स्नातकाने त्यात अडथळा निर्माण करू नये. त्याबद्दल इतरांनाही सांगू नये.

७. स्नातकाने गाईच्या पाठीवर बसू नये.

८. स्नातकाने गाईला त्रास देऊ नये.

९. जो स्नातक अशुद्ध असेल त्याने गाईला हाताने स्पर्श करू नये.

या उदाहरणावरून दिसून येईल की मनू गाईला पवित्र मानत नाही. याउलट त्याने गाईला अपवित्र मानलेले असून तिचा स्पर्श झाल्यास शुद्धीकरण करून घ्यावे लागत असे. मनुस्मृतीमध्ये काही असेही श्लोक आहेत की त्यावरून मनूने गोमांस भक्षण निषिद्ध ठरविले नाही, हे दिसून येते. या संदर्भात अध्याय ३ मधील तिसऱ्या श्लोकाचा उल्लेख करता येण्यासारखा आहे तो असा -

**अर्थ-** ''जो स्नातक स्वधर्मानुसार ब्रह्मचर्य व्रत धारण करित असेल, ज्याला वडिलांकडून वंशपंरपरेने ब्रह्मज्ञान प्राप्त झाले असेल, त्याला उत्तम आसनावर बसवावे व पुष्प माळ घालून आणि गाय देऊन त्याचा स्नमान करावा.''

प्रश्न असा की स्नातकाला गाय दान करण्याची शिफारस मनूने का केली आहे? मधुपर्कविधी करणे त्याला शक्य व्हावे यासाठीच मनूने अशी शिफारस केली आहे, हे उघड आहे. हे जर बरोबर असेल तर त्यावरून असा निष्कर्ष निघतो की ब्राह्मण गायीचे मांस खातात हे मनूला माहीत होते. आणि त्याला त्याचा विरोधही नव्हता.

दुसरे उदाहरण, कोणते मांस खावे व कोणते खाऊ नये याची चर्चा करताना मनुस्मृतीच्या अध्याय५ मधील १८ व्या श्लोकाचे घेता येईल. तो श्लोक असा -

*''स्वाविधं शल्यकं गोधां खड्ग्कूर्मशशांस्तथा।*
*भक्ष्यान्पञ्चनखेष्वाहुरनुष्ट्रांश्चैकतो दंत : ।। ५-१८''*

**अर्थ-** ''पाच नखे असणाऱ्या प्राण्यांपैकी शलाशिंदर, शाळू, घोरपड, गेंडा, कासव व ससा हे प्राणी भक्षण करण्यास योग्य आहेत. त्याचप्रमाणे एका जबड्यात दात असणाऱ्या प्राण्यांपैकी उंट सोडून बाकीचे पशूही भक्ष्य आहेत.''

या श्लोकामध्ये ज्यांच्या एकाच जबड्यामध्ये दात असतात अशा सर्व पाळीव पशूचे मांस खाण्याची सरसकट परवानगी मनू देतो. या नियमाला मनूने फक्त एकच अपवाद सांगितला आहे; तो म्हणजे फक्त उंट. पाळीव प्राण्यांच्या या वर्गामध्ये (एकाच जबड्यात दात असणारे) केवळ उंटच येतो असे नाही, तर गाईचाही समावेश होतो. गायीच्या बाबतीत मनूने अपवाद केलेला नाही ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी

आहे. याचा अर्थ असा की गाईचे मांस खाण्याला मनूचा विरोध नाही.

गाईची हत्या हे महापाप आहे असे मनूने ठरविलेले नाही. मनूने पापाचे दोन प्रकार सांगितले आहेत. (१) महापाप आणि (२) मामुली स्वरूपाचे पाप. महापापामध्ये मनूच्या मते पुढील गुन्ह्यांचा समावेश होतो –

*ब्रह्महत्या सुरापानंस्तेय गुर्वङ्गनागमः ।*
*महान्ति पातकायाहुः संसर्गश्चपि तैः सह ।।११-५४*

**अर्थ–** ''ग्रह्महत्या, मद्यपान, चोरी, गुरूपत्नीगमन या चारांना महापातक असे म्हणतात. आणि या पातक्यांचा संसर्गही महापातक आहे.''

मामुली पातकामध्ये मनूने पुढील अपराधांचा समावेश केलेला आहे.

*''गोवधोऽ याज्य-संयाज्यापारदार्यात्म विक्रयाः ।*
*गुरू = मातृ-पितृत्यागः स्वाध्यायाग्न्योः सुतम्य च''।। ११-५९*

**अर्थ–** ''गोवध, यज्ञाला त्याज्य असणाऱ्या व्यक्तींकडून यज्ञ करविणे, परस्त्रीगमन, स्वतःला विकणे, गुरू, मता व पिता यांच्या सेवेचा त्याग करणे, स्वाध्यायचा त्याग करणे, पवित्र अग्नीचा त्याग आणि मुलाचे पालन–पोषण न करणे.''

यावरून हे स्पष्ट होईल की मनूच्या मते गोवध हे मामुली स्वरूपाचे पाप आहे. गाईची हत्या एखाद्या समर्थक व पुरेशा कारणास्तव करण्यात आली नसेल तरच ती निंदनीय ठरत असे. त्यातही गोहत्या कदाचित पुरेशी समर्थनीय नसतानाही झाली असल्यास फारशी घृणास्पद ठरत नसे. याज्ञवक्क्याचेही मत असेच होते.

या सर्व बाबींवरून हेच– सिद्ध होते की ब्राह्मण पिढ्यान् पिढ्या गायीचे मांस खात आले होते. तर मग त्यांनी गोमांस भक्षणाचा त्याग का केला? याशिवाय पूर्णतः सर्व प्रकारच्या मांस भक्षणाचा त्याग करून व शाकाहारी बनून त्यांनी अतिरेकी पाऊल का उचलले? येथे दोन क्रांत्या परस्परात मिसळून गेलेल्या आहेत. आधीच दर्शविल्याप्रमाणे मनूच्या–त्यांच्या दिव्यगुरूच्या उपदेशाचा हा परिणाम नव्हे. मनूच्या उपदेशाविरहित व त्याच्या उपदेशाच्या विरूद्ध ही क्रांती घडून आली आहे. हे पाऊल ब्राह्मणांनी उचलण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत ठरली? एखाद्या सिद्धांतामुळे हे घडून आले काय? की अपरिहार्य युद्धनीतीचा हा परिणाम आहे?

या प्रश्नांची दोन उत्तरे देण्यात आलेली आहेत. त्यांपैकी पहिले असे की गाईचे हे दैवतीकरण अद्वैत तत्वज्ञानाच्या प्रभावामुळे घडून आले. या अद्वैत तत्वज्ञानानुसार या संपूर्ण विश्वामध्ये 'ब्रह्म' व्यापलेले असल्यामुळे मानवासहित सर्व प्राणी पवित्र आहेत. म्हणून हे उत्तर असमाधानकरक आहे हे स्पष्टच दिसते. पहिली गोष्ट अशी की हे उत्तर वस्तुस्थिति मेळ खात नाही. वेदांत सूत्रात विश्वातील या



एकत्वाची–ब्रह्माची ग्वाही देण्यात आली असली, तरी यज्ञासाठी प्रणिहत्या करण्यावर बंदी घातली नाही, हे दुसऱ्या अध्यायाच्या २८ व्या सूत्रावरून स्पष्ट दिसून येते. दुसरी गोष्ट अशी की वेदांताची आज्ञा प्रत्यक्ष आचरणात आणल्याचा जर हा परिणाम असेल तर तो केवळ गायीजवळच का थांबावा? अन्य इतर प्राण्यांतही या आज्ञेचा विस्तार पोहोचावयास हवा होता.

दुसरे स्पष्टीकरण तर याहीपेक्षा कौषल्यापूर्ण आहे. या स्पष्टीकरणानुसार, ब्राह्मणांच्या जीवनात हे परिवर्तन धडून येण्याचे कारण म्हणजे पुनर्जन्माच्या सिद्धांताचा उदय हे होय. हे स्पष्टीकरणसुद्धा वस्तस्थितीशी विसंगत आहे. बृहदारण्यक उपनिषदात पुनर्जन्माच्या सिद्धांताचा पुरस्कार करण्यात आला आहे. (६–२) तरीसुद्धा याच उपनिषदाचे असे म्हणणे आहे की एखाद्याला विद्वान पुत्र आपल्या पोटी जन्मांस यावा अशी इच्छा असेल तर त्याने बैलाचे किंवा इतर मांस आणि भात व तूप यांचे मिश्रण करून खावे. याशिवाय उपनिषदामध्ये उपदेशिलेल्या या सिद्धांताचा परिणाम मनूच्या काळापर्यंत–म्हणजे जवळ जवळ ४०० वर्षेपर्यंत ब्राह्मणांच्या आचरणावर काहीच कसा घडून आला नाही? म्हणून हे स्पष्टीकरण दिखाऊ आहे हे स्पष्ट दिसते. याशिवाय तिसरा मुद्दा असा की जर पुर्नजन्माच्या सिद्धांतामुळे ब्राह्मण शाकाहारी बनले तर मग ब्राह्मणेतरही त्यांच्याप्रमाणे शाकाहारी का बनले नाहीत?

**ब्राह्मणांनी गोमांस खाणे सोडून दिले आणि त्यांनी गाईची पूजा सुरू केली यात ब्राह्मणांचा डावपेच होता, असे मला वाटते. बौद्ध व ब्राह्मण यांच्यामध्ये चालू असलेल्या संघर्षात व त्याचप्रमाणे बौद्धांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी ब्राह्मणांनी जी साधने वापरली त्या साधनांमध्ये या गोपूजेच्या रहस्याचे मूळ आपण शोधले पाहिजे. बौद्ध व ब्राह्मणांतील संघर्ष ही भारतीय इतिहासातील कसोटीची निर्णायक घटना आहे. ही घटना समजून घेतल्याशिवाय हिंदू धर्माच्या काही वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण करता येणे असंभव आहे. भारतीय इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी या संघर्षाचे महत्त्व ओळखले नाही ही दुदैवाची गोष्ट आहे. भारतात ब्राह्मणीधर्म होता एवढेच ते जाणतात. परंतु या दोन धर्मांमध्ये पस्परावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी जो संघर्ष चालला होता आणि जो संघर्ष ४०० वर्षेपर्यंत चालून ज्याचा धर्मावर, समाजावर व भारताच्या राजकारणावर गंभीर परिणाम घडून आला त्याची जाणीव या अभ्यासकांना मुळीही दिसत नाही.**

या संघर्षाची तपशीलवार की सांगत बसणे हे या ठिकाणी अनुचित ठरेल. फार झाले तर येथे चार दोन महत्त्वाच्या मुद्द्यांचा उल्लेख करणे शक्य आहे.

एकेकाळी बौद्ध धर्म का अधिकांश भारतीयांचा धर्म होता. शेकडो वर्षेपर्यंत

तो भारतातील बहुसंख्य जनतेचा धर्म म्हणून ओळखला जात होता. पूर्वी कोणत्याही धर्माने केले नसतील असे आक्रमक हल्ले बौद्ध धर्माने ब्राह्मणी तत्वज्ञानावर केले. ब्राह्मणी तत्वज्ञानाचा ऱ्हास होऊ लागला होता; आणि ब्राह्मणी धर्म आपली चामडी वाचवून आत्मरक्षणाच्या प्रयत्नात होता. बौद्ध धर्माच्या प्रसारामुळे ब्राह्मणांची जनतेतील व राजदरबारातील प्रतिष्ठा नष्ट होऊन त्याची सर्व सत्ता संपुष्टात आली होती. बौद्ध धर्माद्वारे पराजित झाल्यामुळे दुःखी-कष्टी होऊन आपली गेलेली प्रतिष्ठा व सत्ता परत मिळविण्यासाठी वाटेल त्या प्रकारे ते प्रयत्न करीत होते. जनतेच्या मनावर बौद्ध धर्माचा प्रभाव इतका गडद होता व बौद्ध धर्माने जनतेची इतकी जबरदस्त पकड घेतली होती की बौद्ध धर्माची तत्वे आतमसात करून त्यांचे अतिरेकी प्रमाणात पालन करण्यावाचून बौद्ध धर्माशी टक्कर देण्याचा दुसरा कोणताही मार्ग अशक्य झाला होता. भगवान बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतरच्या त्यांच्या अनुयायांनी बुद्धांच्या प्रतिमा उभारणे व स्तूप बांधणे सुरू केले. ब्राह्मणांनी त्यांचे अनुकरण केले. त्यांनी आपल्या वतीने त्यांच्या देवतांची मंदिरे बांधली व त्यात शिव, विष्णू, राम, कृष्ण इत्यादी दैवतांची प्रतिष्ठापना केली. हे सर्व करण्यामागे बुद्धाच्या प्रतिमेची पूजा करणाऱ्या जनतेला आपल्या दैवतांकडे वळविण्याचा त्यांचा हेतू होता. ब्राह्मण धर्मात देवळे व मूर्तींना कसल्याही प्रकारचे स्थान नसूनही हिंदू धर्मात मात्र त्यांना स्थान प्राप्त झाले, त्याचे हेच मुख्य कारण आहे. प्राणिहत्या व विशेषतः गोहत्या करावयास सांगणाऱ्या यज्ञप्रधान ब्राह्मणी धर्माचा अव्हेर जनतेने केला होता. समाज मुख्यतः शेतकीप्रधान होता व गाय हे जनावर अतिशय उपयुक्त होते. बौद्ध धर्माने गोहत्येचा निषेध केल्यामुळे त्याने जनतेच्या मनाची पकड घेतली होती. गृहपती पाहुण्याला गोघ्न-म्हणजे गायमाऱ्या-असे म्हणून त्याचा तिरसकार करीत असे. कारण जेव्हा जेव्हा हा प्रतिष्ठित पाहुणा घरी येत असे तेव्हा तेव्हा त्याला त्याच्या मेजवानीसाठी गाय मारावी लागत असे. याच पद्धतीनं ब्राह्मणांनाही 'गायमारे' असे संबोधून त्यांचा तिरसकार करणे सुरू झाले होते असे असल्यामुळे, आपली परिस्थिती सुधारण्यासाठी व बौद्धांवर विजय मिळविण्यासाठी गोहत्या व यज्ञाद्वारे पूजा करण्याच्या पद्धतीचा त्याग करण्यावाचून ब्राह्मणांना गत्यंतर उरले नाही.

गोमांस भक्षणाचा त्याग करण्यामागे ब्राह्मणांचा हेतू बौद्ध भिक्षूंचे वर्चस्व हिसकावून घेण्याचा होता, हे ब्राह्मणांच्या शकाहारी होण्याच्या प्रक्रियेवरून सिद्ध होते. ब्राह्मण शाकाहारी का बनले? याचे उत्तर असे की बौद्ध धर्मामुळे नष्ट झालेली ब्राह्मणांची प्रतिष्ठा त्यांना शाकाहारी बनल्यावाचून परत मिळविता आली नसती. या संदर्भात हेही लक्षात घेतले पाहिजे की बौद्ध धर्माशी तुलना करता एका बाबबतीत ब्राह्मणी धर्म जनेतेच्या मनातून एकदम उतरला होता. ती बाब म्हणजे ब्राह्मणी धर्माचे



सारतत्त्व असलेला पशुयज्ञ ही होय. पशुयज्ञाला बौद्ध धर्माचा तीव्र विरोध होता. शेतकीप्रधान समाजामध्ये गाई व बैल यांच्यासहित अन्य प्राण्यांचीही कत्तल करणाऱ्या ब्राह्मणी धर्माबद्दल तिरस्कार व बौद्ध धर्माबद्दल आदर वृद्धिंगत व्हावा, हे पूर्णतः स्वाभाविकच आहे. गेलेली प्रतिष्ठा परत मिळविण्यासाठी यापेक्षा त्यांना अन्य काय करता येण्यासारखे होते? बौद्ध भिक्खूंच्याही पुढे एक पाऊल टाकून केवळ गाईचे मांसच नव्हे, तर सर्व प्रकारचे मांस सोडून पूर्णतः शाकाहारी होण्यावाचून त्यांना गत्यंतर उरले नाही; म्हणून त्यांनी बरोबर तेच केले. शाकाहाराचा स्वीकार करण्यामागे ब्राह्मणांचा हाच हेतू होता, हे अनेक प्रकारे सिद्ध करता येण्यासारखे आहे.

प्राणिहत्या करणे वाईट आहे, अशी खात्री पटल्यामुळे ब्राह्मणांनी आपले वर्तन सुधारण्याचे ठरविले असते तर केवळ पशुयज्ञाचा त्याग करणेच पुरेसे ठरले असते. त्यांनी पूर्णतः शाकाहारी बनण्याचे काहीच कारण नव्हते. त्यांनी शाकाहारी बनण्यापर्यंत मजल मारली यावरून त्यांचा हेतू अधिक सखोल होता, हे स्पष्ट होते. दुसरी बाब अशी की त्यांनी शाकाहारी बनणे अनावश्यक होते. कारण बौद्ध भिक्खू सुद्धा शाकाहारी नव्हते. बौद्ध धर्म व अहिंसा यांचा संबंध अत्यंत घनिष्ठ व अनिवार्य स्वरूपाचा आहे असा सर्वसाधारण समज असल्यामुळे माझे वरील विधान अनेकांना आश्चर्यकारक वाटेल. बौद्ध भिक्खू मांसाहार वर्ज्य मानतात असा सर्वसाधारण समज आहे. परंतु हा अपसमज आहे. या बाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की बौद्ध भिक्खूंना विशुद्ध असे तीन प्रकारचे मांस खाण्याची परवानगी देण्यात आली होती. नंतरच्या काळात ही परवानगी पाच प्रकारच्या मांसापर्यंत वाढविण्यात आली. चिनी प्रवासी ह्युएनत्संग याला यासंबंधीची जाणीव होती आणि तो या विशुद्ध मांसाचा उल्लेख 'सॅन-चिंग' असा करतो. भिक्खूंमध्ये चालू असलेल्या या प्रथेच्या उगमाचे स्पष्टीकरण थॉमस वाल्टर या लेखकाने केले आहे. तो म्हणतो :

''बुद्धाच्या काळी वैशाली नगरीमध्ये बौद्ध धर्माची दीक्षा घेतलेला सिंह नावाचा एक श्रीमंत सेनापती राहात होता. तो भिक्खूसंघाचा उदारदायक बनला होता. तो भिक्खू संघाला नेहमी मांसान्नाचे भोजन देत असे. मुद्दाम भिक्खूंसाठी बनविण्यात आलेल्या अशा प्रकारच्या भोजनाचा भिक्खू स्वीकार करतात ही गोष्ट जेव्हा लोकांना माहीत झाली तेव्हा जैन तीर्थंकरांनी त्यांची जनतेत निंदा करणे सुरू केले. जे भिक्खू संयमी व व्रतधारी होते त्यांनी ही गोष्ट भगवंतांना सांगितली. तेव्हा भगवंतांनी सर्व भिक्खूंना एकत्र बोलाविले व सांगितले - ''भिक्खूंनो ! तुमच्यासाठी तुमच्यासमक्ष एखाद्या पशूला मारण्यात आले असेल, तुमच्यासाठी हा प्राणी मारण्यात आला आहे असे तुम्ही ऐकले असेल तर त्या पशूचे मांस तुम्ही खाऊ नये.'' परंतु बुद्धांनी त्रिकोटी परिशुद्ध-अर्थात आपणासाठी मारण्यात आले हे प्रत्यक्ष पाहिले नसेल, ऐकले नसेल

किंवा तशी शंका आली नसेल तर असे मांस खाण्यात भिक्खूंना परवानगी दिली आहे. पाली भाषेमध्ये सुफेन–विनयपिटकात सिंह सेनापतीने बुद्ध आणि भिक्खू संघाला माध्यान्ह–भोजन दिल्याचा उल्लेख आहे. त्या भोजनासाठी बैलाच्या मांसान्नांची व्यवस्था करण्यात आली होती. निर्ग्रथांनी याबद्दल भिक्खूंची निंदा केली. त्यावेळी भगवान बुद्धांनी हा त्रिकोटि–परिशुद्धीचा नवीन नियम तयार केला. त्या वेळेपासून भिक्खू मांसान्नाचे भोजन स्वीकारू लागले. अशा मांसाला 'त्रिकोटि–परिशुद्ध' अथवा 'त्रिकोटी–परिशुद्ध मांस' असे म्हणण्यात येऊ लागले. अशा मांसाला थोडक्यात अदृष्ट अश्रुत व अपरिशंकित अथवा चीनी भाषांतराने पद्धतीने न पाहिलेले न ऐकलेले व संदेश नसलेले' असे म्हणण्यात येते. यानंतर आणखी दोन प्रकारचे मांसान्न भिक्खूंसाठी मान्य करण्यात आले. ते म्हणजे : नैसर्गिक रीतीने मृत्यू आलेल्या पशूचे मांस आणि एखाद्या शिकारी पक्ष्याने किंवा पशूने मारलेल्या जनावराचे मांस अशा प्रकारे हे पाच प्रकारचे मांस कोणताही बौद्ध बिनदिक्कतपणे खाऊ शकत होता. यानंतरच्या काळात 'अदृष्ट, अश्रुत आणि अपरिशंकित' मांसाचा एक वर्ग व 'स्वाभाविकपणे मृत्यू आलेल्या' 'पक्षिहत' अशा मांसाचा वेगळाच वर्ग करण्यात येऊन त्याला 'साग–चिंग' असे संबोधण्यात येऊ लागले.

ज्या अर्थी बौद्ध भिक्खू मांसान्न खात होते त्या अर्थी ब्राह्मणांनी त्याचा त्याग करण्याचे काहीही कारण नव्हते. तर मग मांसान्नाचा त्याग करून ब्राह्मण शाकाहारी का बनले? याचे कारण इतकेच आहे की जनतेच्या दृष्टीने बौद्ध भिक्खूंच्या पातळीवर उभे राहणे त्यांना नापसंत होते.

ब्राह्मणांनी केवळ यज्ञपद्धतीचा त्याग केला असता व गाईला बळी देणे बंद केले असते तर त्याचा परिणाम मर्यादित स्वरूपाचा झाला असता. त्यामुळे ब्राह्मणांना जास्तीत जास्त बौद्धांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त झाले असते. मांसान्न खाण्याच्या बाबतीत बौद्ध भिक्खूंसारखेच नियम त्यांनी पाळले असते, तर त्याचाही परिणाम वरील प्रमाणेच झाला असता. यामुळे ब्राह्मणांना त्यांच्या महत्त्वाकांक्षेप्रमाणे बौद्धांवर वर्चस्व प्रस्थापित करता आले नसते. गाईला बळी देण्याच्या प्रथेला विरोध करून जनतेच्या मनात बौद्धांनी जे आदराचे व प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त केले होते तेथून त्यांना पदव्युत करणे हा ब्राह्मणांचा हेतू होता. आपल्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी फुटलेल्या नावेतील नावाड्याप्रमाणे ब्राह्मणांना दुःसाहसी योजनांचा अवलंब करणे भाग होते. अतिरेकाने अतिरेक ठार मारण्याची ही नीती आहे. डाव्या पंथाच्या लोकांना नामोहरम करण्यासाठी उजव्या पंथाचे लोक नेहमीच या नीतीचा उपयोग करीत असतात. बौद्धांना हरवण्याचा एकच मार्ग उरला होता तो म्हणजे एक पाऊल पुढे जाऊन शाकाहारी बनणे !



बौद्धांना पराजित करण्यासाठी ब्राह्मणांनी गोमांस वर्ज्य करून गाईची पूजा सुरू केली व ते शाकाहारी बनले, या उपपत्तीच्या समर्थनासाठी आणखीही पुरावा देता येण्यासारखा आहे. तो म्हणजे गोहत्या करणे हे ज्या काळी महापाप ठरले त्या काळाचा होय. अशोकाने गोहत्येला गुन्हा ठरविले नव्हते हे सर्वपरिचितच आहे. अशोकाने गोहत्येला बंदी घालण्यासाठी पुढाकार घेतला असावा अशी अनेकांची अपेक्षा असते. प्रो. विन्सेट स्मिथ यांना ही बाब आश्चर्यकारक वाटते. परंतु त्यात विस्मय वाटण्यासारखे काहीही नाही.

बौद्ध धर्म सामान्यतः यज्ञातील पशुहत्येच्या विरोधी होता. त्याला गाईबद्दल विशेष ममता वाटण्याचे काहीही कारण नव्हते. म्हणूनच गाईला वाचविण्यासाठी अशोकाने कायदा करावा असे कोणतेच विशेष कारण नव्हते. याहीपेक्षा आश्चर्याची बाब म्हणजे गोहत्या हे 'महापाप' असल्याचे गुप्त राजांनी घोषित केले. गुप्त घराणे हे हिंदू धर्माचे पुरस्कर्ते होते आणि या धर्मातच यज्ञामध्ये गाईचा बळी देण्याची मुभा देण्यात आली आहे. डॉ. डी. आर. भांडारकर लिहितात [११५] :

**'आपणाला अवगत असलेल्या शिलालेखाच्या निर्विवाद पुराव्यावरून असे सिद्ध होते की पाचव्या शतकाच्या आरंभीच्या काळात गोहत्या करणे हा फार मोठा गुन्हा मानला जात होता. त्याला ब्राह्मणहत्येच्या बरोबरीचे स्थान देण्यात आले होते. गुप्त वंशातील स्कंद–गुप्त राजाच्या काळातील म्हणजे इ.स. ४६५ चे ताम्रपटावरील एक दानपत्र आपणाजवळ उपलब्ध आहे. त्यावरील अंतिम श्लोकामध्ये लिहिलेले आहे की –** ''या दानपत्राद्वारे देण्यात आलेल्या दानात जो हस्तक्षेप करील त्याला गोहत्या, गुरू–हत्या अथवा ब्राह्मणहत्येचे पाप लागेल. स्कंद गुप्ताचा आजा दुसरा चंद्रगुप्त याचाही गोहत्या व ब्रह्महत्या यांना सारख्या दर्जाचे पाप मानणारा एक लेख उपलब्ध आहे. त्यात गुप्तसंवत् ९३ दिलेले आहे ते इ.स. ४१२ च्या बरोबर आहे. मध्य भारतातील सांचीच्या स्तूपाच्या कठड्यावर हा कोरण्यात आलेला असून त्यात चंद्रगुप्ताच्या अधिकाऱ्याने केलेल्या दानाचा उल्लेख आहे. त्याचा शेवटचा भाग असा :

''जो कोणी या व्यवस्थापनामध्ये ढवळाढवळ करील त्याला गोहत्येचे, ब्रह्महत्येचे किंवा पंच आनन्तर्याचे पाप लागेल.'' या दानामध्ये बाधा आणणारा ब्राह्मणी धर्माचा असो की बौद्धधर्मीय असो, दोघांनाही धाक घालणे हा या विधानाचा हेतू आहे. पंच–आनन्तर्य ही बौद्धाची पंच महापातके आहेत. हे असे– ''मातृहत्या, पितृहत्या, अर्हतहत्या, बुद्धाच्या शरीरात रक्त वाहण्यास कारणीभूत होते आणि भिक्खू–संघात फूट पाडणे.'' ब्राह्मण धर्मीयांना ज्या महापातकांची भीती घालण्यात आली ती पातके फक्त दोनच आहेत, ते म्हणजे गोहत्या आणि ब्राह्मणाला ठार

मारणे. यातील दुसऱ्या नंबरचे म्हणजे ब्रह्महत्या हे निश्चित एक महापातक आहे. कारण त्याचा उल्लेख सर्वच स्मृतींमध्ये करण्यात आला आहे. परंतु पहिल्याचा मात्र 'उपपातक' असल्याचा उल्लेख आपस्तंभ, मनू, याज्ञवल्क्य आणि इतर स्मृतींनी केला आहे. परंतु वरील शिलालेखात मात्र त्याला ब्रह्महत्येशी जोडून दिल्यामुळे व बौद्धांच्या पंच आनन्तर्याच्या बरोबरीचे स्थान दिल्यामुळे पाचव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात त्याला महापातकाचा दर्जा देण्यात आला होता, हे स्पष्ट होते. अशा प्रकारे गोहत्या हे महापातक असल्याचे याच्याही आधी निदान शंभर वर्षांपूर्वीपासून म्हणजे चौथ्या शतकाच्या आरंभापासून मानण्यात येऊ लागले असावे.''

आता प्रश्न असा निर्माण होतो की मनुस्मृतीच्या विरोधात जाऊन गोहत्या हे महापाप आहे, असा कायदा करण्यासाठी हिंदू राजे पुढे का सरसावले असावेत? याचे उत्तर असे की बौद्ध भिक्खूंपेक्षा आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी ब्राह्मणांना आपल्या वैदिक धर्माला काही प्रमाणात तिलांजली देणे भाग पडले. विश्लेषण जर बरोबर असेल तर हे सिद्ध होते की बौद्ध धर्म व ब्राह्मण धर्म यांच्या संघर्षातून गोपूजेच्या प्रथेचा उगम झाला आहे. ब्राह्मणांनी आपली गेलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळविण्यासाठी उपयोजिलेले ते केवळ एक साधन मात्र होते.

◆◆◆



# १४. गोमांस भक्षणाने वाताहत झालेले लोक अस्पृश्य कसे बनले?

ब्राह्मणांनी व ब्राह्मणेतरांनी जेव्हा गोमांस भक्षण बंद केले व वाताहत झालेल्या लोकांनी जेव्हा ते चालू ठेवले तेव्हा जुन्या स्थितीहून एक नवीन परिस्थिती उद्भवली. या दोन स्थितीतील मुख्य फरक असा की जुन्या स्थितीत सर्वच लोक गोमांस खात होते; परंतु नव्या स्थितीत एक वर्ग गोमांस वर्ज्य मानीत होता तर दुसरा गोमांस खात होता. हा भेद नजरेत भरण्यासारखा होता व तो कोणाच्याही सहजपणे लक्षात येण्यासारखा होता. पूर्वी कशानेही समाजाचे असे दोन तुकडे पडले नव्हते. तरीसुद्धा अस्पृश्यतेच्या प्रथेमध्ये दिसून येणारे आत्यंतिक टोकच समाज विभाजन या भेदामुळे व्हावयास नको होते. तो केवळ एक सामाजिक भेद म्हणून राहावयास हरकत नव्हती. वेगवेगळ्या गटाचे लोक वेगवेगळे खाद्यान्न वापरीत असल्याची अनेक उदाहरणे एकाच समाजात आढळतात. एकाला जे आवडते ते दुसऱ्याला आवडत नाही आणि तरीसुद्धा या आवडीनिवडीमुळे दोन गटांमध्ये भेदाची दरी निर्माण होत नाही.

स्थायी लोक व वाताहत झालेले लोक यांच्यामध्ये केवळ गोमांस भक्षणाच्या प्रश्नावरून ही जी विभेदाची दरी निर्माण झाली त्याला अन्यही खास कारण असले पाहिजे. हे कारण कोणते? याचे उत्तर असे की गोमांसाचा प्रश्न जर धर्मनिरपेक्ष असता, म्हणजे गोमांस खाणे-न खाणे हा केवळ व्यक्तीच्या आवडीनिवडीचा प्रश्न असता तर गोमांस खाणारे व न खाणारे असा भेद निर्माण झाला नसता. दुर्दैवाची गोष्ट अशी की गोमांस खाणे-न खाणे या मुद्याकडे व्यक्तीच्या आवडीनिवडीचा एक धर्मनिरपेक्ष प्रश्न म्हणून पाहण्यात आले नाही - तर त्याला एक धार्मिक प्रश्न बनविण्यात आले. ब्राह्मणांनी गाईला पवित्र मानल्यामुळे असे घडून आले व त्यामुळेच गोमांस भक्षण हे धर्मभ्रष्टतेचे लक्षण ठरले. वाताहत झालेले लोक या धर्मभ्रष्टतेचे अपराधी ठरल्यामुळे ते समाजातून बहिष्कृत झाले.

समाजजीवनामध्ये धर्माच्या प्रभावाच्या विस्ताराबद्दल ज्यांना स्पष्ट कल्पना नाही त्यांना हे उत्तर पुरेसे स्पष्ट वाटणार नाही. ते विचारतील-धर्माने असा भेदाभेद करण्याचे कारण काय? धर्माच्या कार्यासंबंधी व प्रभावासंबंधी पुढील बाबी लक्षात बाळगल्या तर हा मुद्दा स्पष्ट होईल.

धर्माच्या व्याख्येपासून सुरुवात करू या. सर्व धर्मांमध्ये सामान्य स्वरूपाचे एक वैशिष्ट्य दिसून येते. हे तत्त्व प्रत्येक धर्माच्या श्रद्धा व आचरणामध्ये स्वीकृत झालेले असते. आचाराचा संबंध - १) पवित्र वस्तूसंबंधी व २) ते आचारविचार

मानणाऱ्या सर्व लोकांचा एक गट बनविण्याशी असतो. दुसऱ्या शब्दांत हेच असे सांगता येईल–प्रत्येक धर्मामध्ये दोन मूलभूत तत्त्वे असतात. पहिले असे की धर्माची व त्याच्या पवित्र वस्तूंची फारकत करता येत नाही व दुसरे – धर्म ही सांघिक बाब असून समाजापासून त्याला विभक्त करता येत नाही.

धर्माचे पहिले मूलतत्त्व असे गृहीत धरून चालते की जगातील सर्व वस्तू मग त्या वस्तू भौतिक असोत की काल्पनिक असोत–ज्या ज्या वस्तू माणसाच्या विचाराचा विषय बनू शकतील त्या सर्व दोन वर्गांमध्ये विभक्त करण्यात आलेल्या आहेत. त्या वर्गासाठी 'पवित्र' व 'अपवित्र' किंवा अधार्मिक असे सामान्यतः शब्द वापरण्यात येतात.

यात धर्माच्या विस्ताराचे स्पष्टीकरण होते. धर्माचे कार्य नीट समजून घेण्याच्या दृष्टीने पवित्र वस्तूसंबंधीच्या पुढील बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत :

अपवित्र वस्तूंपेक्षा पवित्र वस्तू केवळ योग्यतेच्या व आदराच्या दृष्टीनेच उच्च दर्जाच्या नसतात, तर त्या वस्तू त्यांच्यापासून पूर्णतः भिन्न असतात. 'पवित्र' आणि अपवित्र वस्तू एकाच वर्गामध्ये मोडत नसतात. त्यांच्यामध्ये पूर्णतः विरोध असतो. प्रो. दुर्खिन म्हणतात :

''चांगला व वाईट यांच्यामध्ये तो सनातन विरोध असतो तो या विरोधाच्या तुलनेत अगदीच नगण्य असतो. कारण 'वाईट' आणि 'चांगली' वस्तू या एकाच जातीतील दोन प्रकारच्या वस्तू असतात. उदाहरणार्थ : निरोगीपणा व आजारपण या एकाच जीवनक्रमातील दोन अवस्था आहेत. याउलट पवित्र आणि अपवित्र या दोन पूर्णतः भिन्न प्रकारच्या वस्तू आहेत, अशी सर्वत्र मानवी मनाची धारणा झालेली आहे. जणू काही ही दोन वेगवेगळी विश्वे असून त्यामध्ये साम्याचा पूर्णतः अभाव आहे.''

पवित्र आणि अपवित्र याच्यामध्ये अशा प्रकारचे भिन्नत्व मानवाच्या मनात कशामुळे निर्माण झाले हे जाणून घेण्याची जिज्ञासा एखाद्या चौकस माणसाच्या मनात निर्माण होण्याची शक्यता आहे. तथापि या चर्चेच्या खोलात शिरण्याचे आपणाला टाळणे भाग आहे. कारण आपल्या उद्दिष्टासाठी त्याची आवश्यकता नाही.

आपल्या विषयापुरती आपणाला मर्यादा घालून आणखी ध्यानात घेण्याजोगी बाब अशी की पवित्र वस्तूंच्या संख्येचा विस्तार निश्चित स्वरूपाचा नसतो. हा विस्तार भिन्न भिन्न धर्मानुसार भिन्न भिन्न असतो. केवळ देव व देवदूत हेच पवित्र आहेत असे नव्हे, तर एखाद्या खडक, झाड, जनावर, पाण्याचा झरा, दगडाचा तुकडा, लाकडाचा तुकडा, एखादे घर – एका शब्दात सांगावयाचे म्हणजे काहीही पवित्र असू शकते.

'पवित्र' वस्तूंचा संबंध नेहमीच 'निषेधां'शी असतो. त्यांनाच दुसऱ्या शब्दांत



'मनाई आज्ञा' असे संबोधण्यात येते. पुन्हा प्रो. दुर्खिनचे मत उद्धृत करतो. तो म्हणतो :

''ज्यांचे रक्षण निषेधाद्वारा करण्यात येते व निषेधामुळेच ज्या वस्तू इतर वस्तूंपासून विभक्त होतात त्यांना पवित्र वस्तू असे म्हणतात आणि ज्या वस्तूंवर हे निषेध लागू होतात व ज्यांना पवित्र वस्तूंपासून दूर ठेवण्यात येते त्यांना अपवित्र वस्तू असे म्हणण्यात येते.''

धार्मिक निषेध नाना रूपे धारण करीत असते. या सर्वांत महत्त्वाचा निषेध म्हणजे स्पर्शासंबंधीचा होय. जी वस्तू अपिवत्र आहे तिचा स्पर्श पवित्र वस्तूला होऊ नये, हेच स्पर्शनिषेधाचे मुख्य तत्व आहे. प्रत्यक्ष स्पर्शापेक्षा अन्य प्रकारचा संबंधही याच निषेधाखाली येऊ शकतो. 'नजर टाकणे' हाही संबंधाचा एक प्रकार आहे. यामुळेच काही बाबतीत 'अपवित्रा'च्या नजरेत 'पवित्र वस्तू' पडू नये असा दंडक घालण्यात आला आहे. उदाहरणार्थ–काही पवित्र वस्तू स्त्रियांना पाहू दिल्या जात नाहीत. शब्दानेही दुसऱ्या एका प्रकारचा संबंध प्रस्थापित होतो. (यात मनुष्याच्या श्वासोच्छ्वासाचाही अंतर्भाव होतो) यामुळेच 'अपवित्रा'ने पवित्र वस्तूचा उच्चार करणे अथवा तिच्या नावाने संबोधन करणे वर्ज्य समजण्यात येते. उदाहरणार्थ : ब्राह्मणानेच वेदांचा उच्चार करावा; शूद्राने करू नये. भोजनाने अन्नात व खाण्यात एक असाधारण स्वरूपाची समीपता निर्माण होते. त्यामुळे पवित्र जनावरांचे मांस खाण्याचा व पवित्र प्रकारच्या शाकाहाराचाही निषेध करण्यात आला आहे.

पवित्र वस्तूंशी संबंधित असलेल्या निषेधाज्ञांची चर्चा करण्यास मुभा नसते. त्या चर्चेच्या पलीकडच्या असतात आणि कसलीही शंका न घेता त्यांचा स्वीकार करणे भाग असते. 'पवित्र' वस्तूही एका अर्थाने 'अस्पृश्य' असते. कारण ती चर्चेच्या आटोक्याबाहेर असते. तिच्यासंबंधी आदर बाळगून निषेधांचे पालन करणे एवढेच लोकांच्या आटोक्यात असते.

अंतिम बाब अशी की पवित्र वस्तूसंबंधीचा निषेध सर्वांना सारखाच बंधनकारक असतो. ती तत्त्वे नव्हती. त्या आज्ञा होत. त्या बंधनकारक असतात, परंतु नेहमीच्या साध्या अर्थाने नव्हे. त्या अनुल्लंघनीय आज्ञा असतात. त्यांचे उल्लंघन हे एखाद्या गुन्ह्यापेक्षाही अधिक गंभीर असते. तो एक धर्मभ्रष्टपणा असतो. वरील विवेचन धर्माचे क्षेत्र व व्याप समजून घेण्यास पुरेसे ठरेल, असे वाटते. या विषयावर यापेक्षा अधिक क्षेत्रजोर देऊन जागा अडविणे अनावश्यक आहे. धर्माचा केंद्रबिंदू असलेल्या पवित्र वस्तूसंबंधीचे नियम त्यांच्या कार्यपद्धतीचे वरील विश्लेषण वाचून गोमांस भक्षणामुळे वाताहत झालेले लोक अस्पृश्य का बनले हे कोणाच्याही सहज लक्षात येईल व याबाबतचे माझे उत्तर बरोबर आहे, असेच तो म्हणेल. गाय ही एक 'पवित्र'

वस्तू आहे हे ध्यानात घेऊन पवित्र वस्तू संधीचे वरील विश्लेषण गाईला लावून निर्णय घेणे एवढेच काम करावयास हवे. म्हणजे पवित्र जनावराचे म्हणजे गाईचे मांस खाऊ नये या निषेधाचे उल्लंघन केल्यामुळे अस्पृश्यतेचा उदय झाला हे सहज दिसून येईल. आधीच सांगितल्याप्रमाणे ब्राह्मणांनी गाईला पवित्र जनावर बनविले. मृत गाय व जिवंत गाय असा भेद करणे त्यांना आवश्यक वाटले नाही. गाय मेलेली असो की जिवंत असो ती 'पवित्र'च होती. गोमांस भक्षण हा केवळ साधा गुन्हा नव्हता. जो कोणी गाईला 'मामुली वस्तू' समजत असेल तो पापाचा भागीदार होता व संबंध ठेवण्यास अपात्र ठरत होता, म्हणून ज्यांनी गोमांस खाणे सुरू ठेवले ते वाताहत झालेले लोक भ्रष्ट ठरले.

एकदा गाय हे पवित्र जनावर ठरल्यानंतर व वाताहत झालेल्या लोकांनी गोमांस खाणे सुरूच ठेवल्यामुळे ते संबंध ठेवण्यास अपात्र आहेत, असे समजून त्यांना 'अस्पृश्य' ठरविण्यावाचून गत्यंतर उरले नाही.

हा विषय संपविण्यापूर्वी या माझ्या उपपत्तीवर येऊ शकणाऱ्या संभवनी आक्षेपांचे उत्तर मी दिले पाहिजे. या माझ्या उपपत्तीवर दोन आक्षेप येतील हे उघड आहे. त्यांपैकी एक असा : वाताहत झालेले लोक मृत गाईचे मांस खात होते याला पुरावा काय आहे? दुसरा असा, ब्राह्मणांनी व ब्राह्मणेतरांनी गोमांस भक्षणाचा त्याग केल्यानंतर वाताहत झालेल्या लोकांनीही गोमांस खाणे का सोडले नाही? या ग्रंथामध्ये मांडलेल्या माझ्या या अस्पृश्यतेच्या उगमाच्या उपपत्तीवर हे दोन जोरदार आक्षेप येऊ शकतात... म्हणून त्यांची उत्तरे देणे आवश्यक आहे.

पहिला प्रश्न सुसंगत असून अडचणीत टाकणाराही आहे. वाताहत झालेले लोक जर अगदी सुरुवातीपासून गोमांस खात असतील तर ही उपपत्ती टिकू शकत नाही असे कोणीही म्हणेल. कारण ते जर सुरुवातीपासूनच गोमांस खात होते आणि तरीही कोणालाही अस्पृश्य मानण्यात येत नव्हते तर गोमांस खाण्यामुळे वाताहत झालेले लोक अस्पृश्य बनले, असे म्हणणे तर्कसंगत नसून निरर्थक ठरते. दुसरा प्रश्न अडणीत टाकणारा नसला तरी उचित आहे. जर ब्राह्मणांनी गोमांस सोडून दिले व ब्राह्मणेतरांनीही त्यांचे अनुकरण केले, तर वाताहत झालेल्या लोकांनीही तसेच का केले नाही? ब्राह्मण आणि अब्राह्मण गाईला पवित्र मानत असल्यामुळे गाय मारणे हे कायद्यानुसार महापाप ठरले तरीही वाताहत झालेल्या लोकांनी गोमांस भक्षण का सोडले नाही? त्यांच्या गोमांस खाण्यावर बंधने घालण्यात आली असती तर अस्पृश्यतेचा उगम झालाच नसता.

पहिल्या आक्षेपाचे उत्तर असे की जेव्हा गोमांस भक्षण सार्वत्रिकपणे स्थायी लोकांत व वाताहत लोकांत–दोघातही चालू होते. तेव्हासुद्धा स्थायी असलेल्या



लोकांनी ताजे गोमांस तर वाताहत लोकांनी मृत गाईचे मांस खावे अशी प्रथा वाढीस लागली होती. स्थायी जमातीच्या लोकांनी मृत गाईचे मांस कधीही खाल्ले नाही हे सिद्ध करण्यासाठी आपणाजवळ प्रत्यक्ष पुरावा नाही. परंतु मृत गाय ही राखीवपणे वाताहत झालेल्या लोकांच्या मालकीची होती, हे दर्शविणारा नकारात्मक पुरावा आपणाजवळ आहे. हा पुरावा महाराष्ट्रातील महार लोकांशी संबंधित असून त्यांचा उल्लेख यापूर्वीही आलेला आहे. याआधी सांगितल्याप्रमाणे मृत जनावरावर आपला मालकी हक्क आहे, असा अधिकार महाराष्ट्रातील महार अजूनही सांगतात. प्रत्येक खेड्यातील हिंदूंच्या विरुद्ध ते हा आपला अधिकार बजावीत असतात. याचा अर्थ असा की कोणाही हिंदूच्या मालकीचे जनावर मेले तर तो हिंदू त्या जनावराचे मांस हक्काने खाऊ शकत नाही. ते जनावर त्याला महारांनाच सोपवावे लागते. जेव्हा गोमांस खाणे सार्वत्रिक स्वरूपाचे होते, तेव्हा महार मृत गाईचे मांस खात होते व हिंदू ताजे मांस खात होते, हे सांगण्याचीच ही दुसरी पद्धती आहे. यात फक्त पुढील प्रश्न उद्भवतात : आज जी सत्य परिस्थिती आहे ती भूतकाळातही तशीच होती काय? महाराष्ट्रामध्ये असलेली वस्तुस्थिती संपूर्ण भारतातील वाताहत झालेल्या लोकांच्या सामाजिक व्यवस्थेचे प्रातिनिधिक उदाहरण म्हणून मान्य करता येणे शक्य आहे काय?

या संदर्भामध्ये जी परंपरागत समजूत चालत आलेली आहे तिचा उल्लेख करण्यासारखा आहे. या परंपरेप्रमाणे महारांचा असा दावा आहे की त्यांना बेदरच्या मुसलमान बादशहाने हिंदूंच्या विरोधात ५२ हक्क दिले होते. हे हक्क बेदरच्या बादशहाने दिले असे गृहीत धरले तरी कोणताही बादशहा अशा प्रकारे हक्क नव्याने प्रदान करू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. ते पुरातन काळापासूनच अस्तित्वात असले पाहिजेत. याचा अर्थ असा की वाताहत झालेल्या लोकांनी मृत जनावराचे मांस खाण्याची व स्थायी जमातीच्या लोकांनी ताजे मांस खाण्याची प्रथा पुरातन काळीच पडली असली पाहिजे. अशा प्रकारची व्यवस्था निर्माण होणे अत्यंत स्वाभाविकही आहे. स्थायी जमातीजवळ शेती व गुरेढोरे असल्यामुळे त्यांच्या चरितार्थासाठी ते पुरेसे समर्थ होते. वाताहत झालेले लोक दरिद्री होते. त्यांच्याजवळ चरितार्थाची कोणती साधने नव्हती. आणि जे चरितार्थासाठी पूर्णतः स्थायी जमातीच्या लोकांवर अवलंबून होते. या दोन्ही वर्गांचे मुख्य खाद्य गोमांस हेच होते. अन्नासाठी जनावर मारणे हे स्थायी जमातीच्या लोकांना शक्य होते. कारण त्यांच्या मालकीची जनावरे होती. परंतु वाताहत झालेले लोक तसे करू शकत नव्हते; कारण त्यांच्याजवळ काहीही नव्हते. अशा परिस्थितीत वाताहत झालेल्या लोकांनी केलेल्या खेड्यांच्या निगराणीच्या कामाच्या मोबदल्यात त्यांना मजुरी म्हणून स्थायी जमातीच्या लोकांनी आपली मेलेली गुरे द्यावीत हे अस्वाभाविक ठरू शकेल काय? निश्चितच नाही.

म्हणून त्या काळी स्थायी जमातीचे लोक ताजे गोमांस खात व वाताहत झालेले लोक मृत गाईचे मांस खात असत, असे समजून चालण्यास काही हरकत नाही. ही पद्धती केवळ महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नव्हती. तर संपूर्ण भारतात चालू होती.

पहिल्या आक्षेपाचे हे उत्तर झाले. आता दुसऱ्या आक्षेपाकडे वळू या. गुप्त राजांनी केलेला कायदा गोहत्या बंद करण्याच्या उद्देशाने करण्यात आला होता. तो वाताहत झालेल्या लोकांना लागू झाला नाही. कारण ते गाय मारत नव्हते. ते केवळ मृत गाईचे मांसच खात होते. गोहत्याबंदीच्या कायद्याशी त्यांच्या वर्तनाचा विरोध येत नव्हता म्हणून मृत गाईचे मांस खाण्याच्या प्रथेला परवानगी देण्यात आली. इतकेच नव्हे, तर अहिंसेचा व ब्राह्मण आणि अब्राह्मणांच्या गोमांस भक्षणाच्या त्यागाचा संबंध होता असे गृहीत धरले तरी वाताहत झालेल्या लोकांच्या वर्तनाने अहिंसेला बाधा येत नव्हती. गाय मारणे ही हिंसा होती. परंतु मृत गाईचे मांस खाल्ल्याने हिंसा होत नव्हती. म्हणूनच वाताहत झालेल्या लोकांनी मृत गाईचे मांस खाणे चालू ठेवण्यात त्यांना मनस्ताप होण्याचे कोणतेही कारण नव्हते. त्यांच्या वर्तनात कायद्यामुळे किंवा हिंसेमुळे बाधा निर्माण होत नव्हती. कारण ते जे आचरण करीत होते ते कायद्याच्या किंवा अहिंसा तत्त्वाच्याही विरोधी नव्हते.

त्यांनी ब्राह्मणांचे व ब्राह्मणेतरांचे अनुकरण का केले नाही, याचे उत्तर दुहेरी स्वरूपाचे आहे. पहिली बाब अशी की हे अनुकरण अत्यंत महाग पडणारे होते. ते तसे करू शकत नव्हते. मृत गाईचे मांस हेच त्यांच्या जीवन निर्वाहाचे मुख्य साधन होते. त्यावाचून त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली असती. दुसरी बाब अशी की सुरुवातीच्या काळी मृत गाईची व्यवस्था लावणे हा त्यांचा हक्क असला, तरी नंतर ती त्यांची जबाबदारी ठरली. मृत जनावर उचलून नेण्याची जबाबदारी ते टाळू शकत नव्हते. त्यामुळे पूर्वीप्रमाणेच मृत गाईचे मांस खाण्यातही त्यांना विशेष वाईट वाटले नाही.

◆◆◆



भाग सहा

## अस्पृश्यता आणि तिच्या उगमाचा काळ

# १५. अशुद्ध आणि अस्पृश्य

अस्पृश्यता अस्तित्वात केव्हा आली? अस्पृश्यतेचा उद्‌गम अति प्राचीन काळी झाला, असा सनातनी हिंदूंचा आग्रह आहे. या त्यांच्या मताच्या समर्थनासाठी ते असा मुद्दा समोर मांडतात की अस्पृश्यता पाळण्याबद्दल अलीकडच्या काळातील स्मृतीमध्येच आदेश आहेत असे नव्हे, तर त्यांच्याही कितीतरी काळापूर्वीच्या धर्म–सूत्रांमध्ये तसे आदेश दिलेले आहेत. आणि काही लेखकांच्या मते ही धर्मसूत्रे ख्रिस्तपूर्व काळात काही शतकांपूर्वी लिहिण्यात आलेली आहेत.

अस्पृश्यतेच्या उगमाचे संशोधन करण्याच्या हेतूने चालविलेल्या अभ्यासाची सुरुवात, धर्मशास्त्रज्ञांनी सुचविल्याप्रमाणे खरोखरच अस्पृश्यता 'तितकी जुनाट आहे काय?' या प्रश्नापासून करणे भाग आहे.

या प्रश्नाच्या उत्तरासाठी धर्मसूत्रामध्ये जेथे जेथे अस्पृश्यतेचा व अस्पृश्यांचा उल्लेख आलेला आहे तेथे तेथे त्यांचा अभिप्राय काय आहे हे निश्चित करण्याकरिता धर्मसूत्रे तपासून पाहिली पाहिजेत. आज आपण 'अस्पृश्यता' या शब्दाचा जो अर्थ घेतो तोच त्यांना अभिप्रेत होता काय? आज आपण ज्या अर्थाने एका वर्गासाठी 'अस्पृश्य' हा शब्द वापरतो, त्याच वर्गासाठी धर्मसूत्रेसुद्धा 'अस्पृश्य' हा शब्द वापरीत होते काय?

पहिल्या प्रश्नापासून सुरुवात करू या. धर्मसूत्राचे परीक्षण केल्यास असे निर्विवादपणे आढळून येते की ते एका वर्गाला 'अस्पृश्य' असे म्हणतात. या 'अस्पृश्य' शब्दाचा अर्थही 'स्पर्श करण्यास अयोग्य' असाच आहे, याबद्दलही शंका नाही. तरीसुद्धा धर्मासूत्रामध्ये उल्लेख आलेले अस्पृश्य व आधुनिक भारतामधील अस्पृश्य हे एकच आहेत की नाहीत हा प्रश्न शिल्लक राहतोच. धर्मसूत्रांमध्ये अस्पृश्य या शब्दाशिवाय 'अंत्य, अंत्यज, अंत्यवासी आणि बाह्य' हे शब्दही वापरलेले आहेत. हे लक्षात घेतले म्हणजे वरील प्रश्नाला अधिकच महत्त्व प्राप्त होते. हेच शब्द नंतरच्या काळातील स्मृतींनीही वापरलेले आहेत. वेगवेगळ्या सूत्रांमध्ये व स्मृतींमध्ये हे शब्द कसे व का वापरले आहेत याची थोडीशी माहिती करून घेतल्यास अधिक उपयुक्त होईल. याच हेतूने पुढील तक्त्यात ही माहिती दिली आहे.

### १ अस्पृश्य

| धर्मसूत्र | स्मृती |
|---|---|
| १ विष्णू ५-१०४ | १ कात्यायान श्लोक ४३३, ७८३ |

### २ अंत्य

| धर्मसूत्र | स्मृती |
|---|---|
| १ वसिष्ठ १६ - ३० | १ मनू ४-७९; ८-६८ |
| २ आपस्तंभ ३-१ | २ याज्ञवल्क्य १ १४८. १९७. |
| | ३ अत्री २५. |
| | ४ लिखित ९२ |

### ३ बाह्य

| धर्मसूत्र | स्मृती |
|---|---|
| १ आपस्तंभ १. २. ३९. १८ | १ मनू २८ |
| २ विष्णू १६. १४ | २ नारद १. १५५ |

### ४ अंत्यवासी

| धर्मसूत्र | स्मृती |
|---|---|
| १ गौतम ३१; २३; ३२ | १ मनू ४ - ७९; १०-३९. |
| २ वसिष्ठ १८.३ | २ महाभारत शांतिपर्व १४१; २९-३२ |
| | ३ मध्यमंगीरस (याज्ञवल्क्य स्मृतीवरील मिताक्षरी टीकेत उल्लेख) ३.२८० |

### ५ अंत्यज

| धर्मसूत्र | स्मृती |
|---|---|
| १ विष्णू ३६.७ | १ मनू ४५ ६१; ८-२७९ |
| | २ याज्ञवल्क्य १२-७३ |
| | ३ बृहद् याम स्मृती (मिताक्षरी टीकेत उल्लेख ३ - २६०) |
| | ४ अत्री १९९ |
| | ५ वेदव्यास १ - १२ - १३ |



## २

यापुढील प्रश्न असा : अंत्य, अंत्यज, अंत्यवासी आणि बाह्य या शब्दांमध्ये अभिप्रेत असलेला वर्ग व 'अस्पृश्य' या शब्दाच्या अर्थानुसार अभिप्रेत असलेला 'स्पर्श करण्यास अयोग्य' असा वर्ग हे दोन्ही एकच आहेत काय? दुसऱ्या शब्दांत हेच मांडायचे म्हणजे एकाच जनसमूहाची ही वेगवेगळी नावे आहेत की काय?

या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी आपणाला धर्मसूत्रांची मदत होऊ शकत नाही, ही दुर्दैवी वस्तुस्थिती आहे. अस्पृश्य हा शब्द एका सूत्रात व एका स्मृतीत असा दोन ठिकाणी आलेला आहे. परंतु त्यात कोणकोणत्या जातींचा समावेश होतो हे कोठेही सांगितलेले नाही. 'अंत्य' या शब्दाचीही अशीच दशा आहे. अंत्य हा शब्द सहा ठिकाणी आलेला असला तरी (दोन सूत्रांत व चार स्मृतींत) हे अंत्य लोक कोण आहेत याचा तपशील कोणीही दिलेला नाही. त्याचप्रमाणे बाह्य हा शब्द चार ठिकाणी आलेला असला तरी (दोन सूत्रांत व दोन स्मृतींत) कोणत्या जातींचा समावेश होतो याचा तपशील कोणीही दिलेला नाही. केवळ अंत्यवासी व अंत्यज या शब्दांचे स्पष्टीकरण तेवढे देण्यात आले आहे. त्यातही पुन्हा धर्मसूत्रामध्ये यासंबंधी मुळीच तपशील आढळत नाही. परंतु त्यांचा नवा तपशील स्मृतींमध्ये मात्र आलेला आहे. अंत्यवासी या शब्दाचा तपशील मध्यम अंगीरस नावाच्या स्मृतीमध्ये व अंत्यज या शब्दाचा तपशील वेदव्यास व अत्री नावांच्या स्मृतींमध्ये देण्यात आलेला आहे. हे लोक कोण होत, हे पुढील तक्त्यावरून स्पष्ट होईल :

| अंत्यवासी | अंत्यज | |
|---|---|---|
| मध्यम अंगीरस | अत्री | वेदव्यास |
| १. चांडाळ | १ नट | १ चांडाळ |
| २. श्वपच | २ मेद | २ श्वपच |
| ३. क्षत | ३ भिल्ल | ३ नट |
| ४. सूत | ४ रजक | ४ मेद |
| ५. वैदेहिक | ५ चर्मकार | ५ भिल्ल |
| ६. मागध | ६ बरूड | ६ रजक |
| ७. आयोगव | ७ कैवर्त | ७ चर्मकार |
| | | ८ विराट |
| | | ९ दास |
| | | १० भट्ट |
| | | ११ कोलिक |
| | | १२ पुष्कर |

या तक्त्यावरून स्पष्टपणे दिसून येते की अंत्यवासी आणि अंत्यज या शब्दांच्या उपयोगाबद्दल निश्चितताही नाही आणि एकवाक्यताही नाही. उदाहरणार्थ माध्यम अंगीरस आणि वेदव्यास स्मृतीनुसार चांडाळ आणि श्वपच हे दोघेही अंत्यवासी आणि अंत्यज या दोन्ही वर्गांमध्ये घालण्यात आले आहेत. परंतु माध्यम अंगीरस व अत्री या दोन स्मृतींची तुलना केल्यास त्यांना वेगवेगळ्या वर्गांत घालण्यात आले आहे. अशीच वस्तुस्थिती अंत्यजासंबंधीही आहे. उदाहरणार्थ, वेदव्यास स्मृतीप्रमाणे पाहता चांडाळ आणि श्वपच हे अंत्यज आहेत. परंतु अत्री स्मृतीनुसार ते अंत्यज नाहीत. अत्री स्मृतीनुसार बरूड व कैवर्त हे अंत्यज आहेत. परंतु वेदव्यास स्मृतीनुसार ते अंत्यज नाहीत. याशिवाय विराट, भट्ट, कोलिक व पुष्कर हे वेदव्यासानुसार अंत्यज आहेत; परंतु अत्री स्मृतीप्रमाणे ते तसे नाहीत.

आतापर्यंत घेतलेल्या आढाव्याचे सार सांगायचे झाल्यास : अस्पृश्य वर्गामध्ये कोणकोणत्या जातींचा समावेश करण्यात आला हे समजून घेण्यासाठी आपणाला धमधर्मसूत्रांची किंवा स्मृतींची मदत होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे अंत्यवासी, अंत्यज आणि बाह्य म्हणजे अस्पृश्य की काय याची निश्चिती करून घेण्यासाठी धर्मसूत्रे आणि स्मृती अनुपयुक्तच ठरतात. यांचा समावेश अस्पृश्यांत करण्यात आला होता की नाही याची निश्चिती करून घेण्यासाठी एखादा अन्य मार्ग उपलब्ध आहे काय? या वर्गातील प्रत्येकासंबंधी जी काही माहिती मिळू शकते ती गोळा केल्यास उपयुक्त ठरेल, असे वाटते.

'बाह्य' लोकांचे काय काय? ते कोण आहेत? ते काय काम करतात? ते अस्पृश्य आहेत काय? त्यांचा उल्लेख मनूने केला आहे. त्यांची स्थिती समजून घेण्यासाठी मनूच्या सामाजिक वर्गरचनेचा आढावा घेणे आवश्यक आहे. मनूने लोकांचे विभाजन अनेक गटांत केलेले आहे. प्रथमतः त्याने १) वैदिक व २) दस्यू असे दोन ढोबळ वर्ग पाडलेले आहेत. यापुढे त्याने वैदिकांचे विभाजन चार गटांत केले. ते असे : (१) चातुर्वर्ण्याच्या चौकटीत असलेले, (२) चातुर्वर्ण्याच्या चौटीबाहेरचे, (३) व्रात्य आणि (४) पतित किंवा जाति-बहिष्कृत.

एखादी व्यक्ती चातुर्वर्ण्याच्या चौकटीतील आहे की नाही या प्रश्नाचा निर्णय त्याच्या आईवडिलांच्या वर्णनावरून घेण्यात यावयाचा होता. समान वर्णाच्या माता-पित्याची जर तो संतती असेल तर तो या चातुर्वर्ण्याच्या चौकटीतील आहे, असे मानण्यात यावे असे त्याचे मत आहे आणि जर त्याचा जन्म मिश्र विवाहापासून किंवा मनू म्हणतो त्याप्रमाणे 'वर्णसंकारा'पासून झाला असेल तर तो चातुर्वर्ण्याच्या बाहेरचा समजला जाणार होता. चातुर्वर्ण्याच्या बाहेरच्या लोकांचे विभाजन मनूने पुन्हा दोन गटांत केले आहे. ते असे - (१) अनुलोम व (२) प्रतिलोम. ज्याचा पिता उच्च



वर्णाचा व माता खालच्या वर्णाची असेल तो अनुलोम आहे. याउलट ज्यांचा पिता खालच्या वर्णाचा असून आई उच्च वर्णाची असते ते प्रतिलोम होत. अनुलोम व प्रतिलोम हे चार्तुवर्ण्याच्या चौकटीच्या बाहेरचे असल्यामुळे सारख्याच दर्जाचे असले तरीही त्यांच्यामध्ये भेद करण्याचा प्रयत्न मनूने केलेला आहे. अनुलोमांना 'वर्णबाह्य' किंवा थोडक्यात 'बाह्य' असे तो संबोधतो, तर प्रतिलोमांना तो हीन असे नाव देतो. 'हीन' हे बाह्यातून खालच्या दर्जाचे आहेत तथापि बाह्यांना किंवा हिनांनाही मनू अस्पृश्य मानत नाही.

एक वर्ग या नात्याने अंत्यांचा मनुस्मृतीमध्ये अ. ४ श्लोक ७९ मध्ये उल्लेख आला आहे. परंतु मनूने त्यांच्या जातींची नावे दिलेली नाहीत. मेधतिथी आपल्या टीकेमध्ये असे सुचवितो की मेद इत्यादीसारखे म्लेंच्छ म्हणजेच अंत्य लोक होत. बुहलरने अंत्य या शब्दाचे भाषांतर लो-कास्ट-मॅन म्हणजे खालच्या जातीचा मनुष्य असे केले आहे.

अशा तऱ्हेने अंत्य म्हणजेच अस्पृश्य होय, हे दर्शविणारा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. जे लोक गावकुसाच्या बाहेर राहात होते, त्यांना दिलेले ते नाव होते, असे दिसते. त्यांना खालच्या दर्जाचे का समजण्यात आले हे बृहदारण्यक उपनिषदामध्ये आलेल्या कथेवरून स्पष्ट होते. १-(३) या कथेचा उल्लेख श्री. काणे यांनी केला आहे; ती अशी :

''सुर आणि असुरांचे युद्ध झाले. तेव्हा सुरांनी विचार केला की ते उद्गीथानाद्वारा असुरावर वरचढ होऊ शकतात. यामध्ये असा एक परिच्छेद आहे की ''या देवाने (प्राण) ते पाप (वाक् आदि) केले ते देवतासाठी मृत्यूरूपाने येथे पाठविले आहे. म्हणून कोणीही आर्यांच्या सीमेबाहेर किंवा 'दिशांच्या अंतला' जाऊ नये. असे करण्यामुळे 'पाप्मन' म्हणजे मृत्यूच्या हाती आपण सापडू, असा विचार करावयास हवा.''

या परिच्छेदामध्ये आलेल्या 'दिशाम् अंत' या शब्दाच्या अर्थावर अंत्य शब्द अवलंबून आहे. 'दिशाम् अंत' या शब्दसमूहाचे भाषांतर 'गावसीमेच्या टोकावरील' असे करता येण्यासारखे असेल व ते भाषांतर ओढूनताणून केलेले ठरत नसेल, तर 'अंत' या शब्दाचा मूळ अर्थ काय होता याचे स्पष्टीकरण आपणाला मिळते. अंत्य लोक अस्पृश्य होते असा अर्थ यातून सूचित होत नाही. ते गावकुसाच्या बाहेर राहात होते, इतकाच त्याचा अर्थ होतो.

अंत्यजांच्या प्रश्नाबाबत, 'ते अस्पृश्य होते' हे मत आपण उपलब्ध माहितीच्या आधारे पुरेशा प्रमाणात खोडून काढू शकतो, असे मला वाटते. पुढील वस्तुस्थितीकडे मी लक्ष वेधू इच्छितो.

महाभारताच्या शांतिपर्वात (१०९-९) अंत्यजांचा उल्लेख आलेला असून ते सैनिक असल्याचे तेथे सांगण्यात आले आहे. सरस्वती विलासानुसार पितामहाने रंजकाच्या सात जातींचा समावेश अंत्यजामध्ये 'प्रकृती' केलेला आहे. 'प्रकृती' या शब्दाचा अर्थ धोब्याचे काम करणाऱ्या व तशाच अन्यच जाती, असा आहे, हे संगमनेरच्या भिल्लम द्वितीय याच्या संवत् ९२२ च्या ताम्रपटावरून स्पष्ट होते. या ताम्रपटात १८ 'प्रकृतींना' एक गाव दान दिल्याचा उल्लेख आहे. वीरमित्रोदयाचे असे मत आहे की 'श्रेणी' या शब्दाचा अर्थ रंजक इत्यादींसारखा अठरा जाती असून त्यांना 'अंत्यज' असे सांघिक नाव देण्यात आले. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर अंत्याजांना अस्पृश्य मानण्यात येत होते, असे कसे म्हणता येईल?

आता अंत्यवासीचा समाचार घेऊ या. ते कोण लोक होते? ते अस्पृश्य होते काय? अंत्यवासी हा शब्द दोन वेगवेगळ्या अर्थाने वापरण्यात आला आहे. शिक्षण काळात आपल्या गुरूच्या घरी राहून विद्यार्जन करणाऱ्या ब्रह्मचाऱ्याचा पर्यायी शब्द म्हणून तो एके ठिकाणी वापरण्यात आला आहे. बहुधा तो सर्वांत शेवटी भोजन करीत असे म्हणून त्याला अंत्यवासी म्हणण्यात आले असावे. ते काहीही असो, परंतु या संदर्भात या शब्दाच्या अर्थाचा संबंध अस्पृश्य या शब्दाशी पोचू शकत नाही, हे निर्विवाद आहे. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्यही जर ब्रह्मचारी होऊ शकत होते, तर ते 'अस्पृश्य ठरूच कसे शकतील?' दुसऱ्या अर्थाने अंत्यवासी या शब्दाद्वारा ते लोकांच्या एका वर्गाचा उल्लेख करतात. परंतु या अर्थानेही त्यांना 'अस्पृश्य' हा अर्थ अभिप्रेत होता, हे शंकास्पदच आहे.

वसिष्ठ धर्मसूत्रानुसार (१८-३) अंत्यवासी हे शूद्र पिता व वैश्य मातेची संतती आहेत. परंतु मनुप्रमाणे पाहता (५-३९) ते चांडाळ पिता व निषाद मातेची संतती आहेत. त्यांच्या वर्गासंबंधी मिताक्षरा टीकेचे असे सांगणे आहे की, ते अंत्यजांचाच एक पोटवर्ग आहेत. याचा अर्थ असा की ते अंत्यजाहून वेगळे नाहीत. म्हणून अंत्यजांसंबंधी जी वस्तुस्थिती आहे तीच अंत्यवासीचीही आहे, असे समजण्यास हरकत नाही.

## ३

येथेच थोडा वेळ थांबून आपल्या प्राचीन साहित्यात अंत्यवासी, अंत्यज आणि अंत्य इत्यादीसंबंधी आपणाला जी माहिती उपलब्ध झाली आहे तिचा विचार केल्यास आज ज्या अर्थाने अस्पृश्य हा शब्द रूढ आहे त्या अर्थाने या गटांना अस्पृश्य समजता येणे शक्य नाही. तथापि अजूनही ज्यांच्या मनात शंका असेल त्यांच्या समाधानासाठी या विषयाचा ऊहापोह दुसऱ्याही एका दृष्टिकोनातून करण्यासारखा



आहे. त्यांनाच अस्पृश्य समजण्यात येत होते असे थोडा वेळ गृहीत धरून धर्मसूत्राच्या काळात अस्पृश्य या शब्दाचा मथितार्थ कोणता होता याचा छडा लावण्याचा आपण प्रयत्न करू शकतो.

या उद्देशाच्या पूर्तीसाठी धर्मसूत्रांनी नेमून दिलेल्या प्रायश्चित्ताच्या नियमांचे आपण परीक्षण केले पाहिजे. या नियमाच्या अभ्यासद्वारे या शब्दाचा आज तो अर्थ रूढ आहे तोच अर्थ धर्मसूत्रांना अभिप्रेत होता की नाही हे आपण समजू शकू.

अस्पृश्य मानलेल्या वर्गाचे प्रातिनिधिक उदाहरण म्हणून आपण चांडाळाचा विचार करू या. ध्यानात बाळगण्याजोगी पहिली बाब अशी की चांडाळ या शब्दाने कोणताही एकसंघ लोकांचा वर्ग सूचित होत नाही. लोकांच्या अनेक गटांना दिलेला तो एक शब्द असून ते परस्परांपासून पूर्णतः वेगवेगळे आहेत. शास्त्रांमध्ये उल्लेख आलेला वेगवेगळ्या लोकांचे एकूण पाच गट आहेत. ते असे : (१) शूद्र पिता व ब्राह्मण आई यांची संतती (२) लग्न न झालेल्या आईची संतती (३) सगोत्र स्त्रीपासून झालेली संतती (४) संन्याशाने पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारल्यामुळे झालेली संतती आणि (५) न्हावी पिता व ब्राह्मण माता यांची संतती.

कोणत्या चांडाळाचा स्पर्श झाल्यास 'शुद्धी करणे' आवश्यक होते, हे सांगणे कठीण आहे. सर्व चांडाळांचा स्पर्श झाल्यास शुद्धी करून घेणे आवश्यक होते, असे आपण गृहीत धरू. शुद्धीकरणांचा शास्त्रांनी नेमून दिलेला नियम कोणता?

आपल्य धर्मसूत्रात गौतमाने (अ. १४ श्लो. ३०) त्यांचा उल्लेख पुढीलप्रमाणे केला आहे :

''बहिष्कृत जातीची व्यक्ती, एखादा चांडाळ, बाळंतपणामुळे अपवित्र झालेली स्त्री, रजस्वला स्त्री व प्रेत किंवा त्याला स्पर्श करणारे लोक यांना स्पर्श करणाऱ्याने सचैल स्नान करून (वस्त्रांसह) स्वतःस शुद्ध करून घ्यावे.''

वसिष्ठ धर्मसूत्राने सांगितलेला नियम पुढे दिला आहे. (अ. ४-३८)

''यज्ञस्तंभ, चिता, स्मशानभूमी, रजस्वाला व सद्य-प्रसूता स्त्री, अपवित्र व्यक्ती अथवा चांडाळ इत्यादींचा स्पर्श झाल्यास पाण्यामध्ये डोक्यासहित बुडी मारावी.''

बौधायन वसिष्ठाशीच सहमत आहे. कारण तोसुद्धा त्याच्या धर्मसूत्रात तसेच म्हणतो. ते असे - (प्रश्न १ अ. ५ स्कंध ६ श्लो. ५)

''पवित्र स्थानी असलेला वृक्ष, चिता, यज्ञस्तंभ, चांडाळ व वेद विकणाऱ्याला जर एखाद्या ब्राह्मणाने स्पर्श केला असेल तर त्याने सचैल स्नान करावयास हवे.''

मनुस्मृतीमध्ये असलेले नियम पुढीलप्रमाणे :

*दिवाकीर्तिमुदक्यां च पतितं च सूतिका तथा।*
*शवं तत्स्पृष्टिनं चैव स्पृषवृह स्नानेन शुद्ध्यति।।* ५-८५

**अर्थ –** एखाद्या चांडाळ, रजस्वाला स्त्री, पतित, प्रसूता स्त्री, शव अथवा प्रेताला स्पर्श झालेल्या व्यक्तीस जर एखाद्या ब्राह्मणाने स्पर्श केला असेल तर तो स्नान करण्याने शुद्ध होतो.

*श्वभिर्हतस्य यन्मांसं शुचि तन्मनुखवीत।*

*क्रव्यादत्रिश्च हतस्यानैश्चांडालद्यैच्च दस्युभिः।। ५-१३१*

**अर्थ –** कुत्र्याने मारलेल्या पशूचे मांस, अन्य मांसाहारी पशूने मारलेल्या प्राण्याचे मांस अथवा चांडाळाने मारलेल्या पशूचे मांस (दासांनी मारलेल्या जनावराचे मांस) पवित्र असते.

*उच्छिष्टेन तु संस्पृष्टो द्रव्यहस्तः कथंच न।*

*अमिश्चायैव तद्द्रव्यामाचान्तः शुचिताभियात।। ५-१४३*

**अर्थ –** एखादी व्यक्ती काहीतरी वस्तू घेऊन जात असताना त्याला अपवित्र व्यक्ती किंवा वस्तूचा स्पर्श झाला असेल तर त्या वस्तूसह आचमन करण्याने तो शुद्ध होतो.

धर्मसूत्रातील व मनुस्मृतीतील उताऱ्यांवरून पुढील मुद्दे स्पष्ट होतात :

१) चांडाळाच्या स्पर्शामुळे केवळ ब्राह्मणच अशुद्ध होत होता.

२) संस्कार-विधीच्या प्रसंगीच बहुधा शुद्धी-अशुद्धीचा नियम पाळण्यात येत होता.

वरील निष्कर्ष बरोबर असतील तर वरील बाबी अस्पृश्यांशी संबंधित नसून पवित्रतेशी संबंधित आहेत, हे मान्य केले पाहिजे. अस्पृश्य आणि अपवित्र यातील भेद पूर्णतः स्पष्ट आहे. अस्पृश्यांचा सर्वांना विटाळ होतो, परंतु अपवित्राचा विटाळ केवळ ब्राह्मणांनाच होतो. अपवित्र वस्तूचा स्पर्श केवळ धार्मिक विधीच्या वेळीच विटाळाला कारणीभूत होतो. परंतु अस्पृश्यांचा स्पर्श मात्र सर्व काळी विटाळ होण्यास कारणीभूत ठरतो. आतापर्यंत करण्यात न आलेला आणखीही एक युक्तिवाद शिल्लक असून त्यामुळे धर्मसूत्रांमध्ये उल्लेख आलेल्या जाती अस्पृश्य होत्या, हे मत पूर्णतः कोलमडून पडते. सरकारच्या आदेशानुसार तयार करण्यात आलेल्या जातींची (ही यादी प्रकरण २ मध्ये देण्यात आली आहे.) तुलना या प्रकरणात आलेल्या स्मृतींनी सांगितलेली जातींशी केली असता हा युक्तिवाद निर्माण होतो. या तुलनेतून काय दिसून येते? कोणीही हे सहज पाहू शकतो. त्यावरून पुढील बाबी दिसून येतातः

१) स्मृतींमध्ये उल्लेखिलेल्या जातींची जास्तीत जास्त संख्या १२ आहे; परंतु सरकारी यादीत आलेल्या जातींची संख्या ४२९ आहे.

२) अशाही काही जाती आहेत की त्यांचा समावेश सरकारी यादीत करण्यात



आला आहे. परंतु स्मृतींनी दिलेल्या यादीत त्यांचा समावेश नाही. या ४२९ जातींपैकी जवळजवळ ४२७ जाती स्मृतिकारांना अपरिचित आहेत.

३) स्मृतीमधील यादीत समाविष्ट करण्यात आलेल्या काही जातींचा समावेश सरकारी यादीत मुळीच करण्यात आला नाही.

४) दोन्ही याद्यांत समावेश असलेली केवळ एकच जात आहे. ती म्हणजे चर्मकार.

अस्पृश्याहून अपवित्र हे वेगळे लोक आहेत. हे ज्यांना मान्य नाही, त्यांना वरील वस्तुस्थितीची जाणीव नाही, असे दिसते. परंतु त्यांना ती हिशेबात धरावीच लागेल. हे मुद्दे इतके महत्त्वाचे व बोलके आहेत की अपवित्र आणि अस्पृश्य या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत, हा निष्कर्ष काढण्यावाचून गत्यंतर उरत नाही.

पहिला मुद्दा घ्या. त्यातून अत्यंत महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. दोन्ही याद्या जर एकाच प्रकारच्या लोकांच्या आहेत, तर त्यांच्यात भेद का असावा व तो भेद इतका मोठा का? शास्त्रांमध्ये उल्लेख असलेल्या जातींची नावे सरकारी यादीत नाहीत हे कसे? याउलट सरकारी यादीमध्ये उल्लेखित जातींची नावे शास्त्रांनी दिलेल्या यादीत नाहीत हे कसे? आपणाला तोंड देणे भाग आहे, अशी ही पहिली अडचण आहे.

एकाच प्रकारच्या लोकांच्या या दोन्ही सूची आहेत, असे गृहीत धरले तर या प्रश्नाचे रूप अधिकच गंभीर होते. या सूची जर एकाच प्रकारच्या लोकांच्या असतील तर मूलतः १२ जातींपर्यंत मर्यादित असलेली अस्पृश्यता ४२९ जातींपर्यंत विस्तार पावली, असे म्हणावे लागेल! अस्पृश्यतेचे हे अफाट साम्राज्य कशामुळे वाढले? या ४२९ जाती तर शास्त्रांनी उल्लेखिलेल्या १२ जातींच्याच वर्गाच्या आहेत, तर कोणत्याही शास्त्राने त्यांचा उल्लेख का केला नाही? जेव्हा शास्त्रे लिहिण्यात आली तेव्हा या ४२९ जातींपैकी कोणतीही जात अस्तित्वात नव्हती, असे असू शकत नाही. त्या सर्वांच्या सर्व जाती त्या वेळी अस्तित्वात नसतीलही; परंतु निदान त्यांच्यापैकी काही जाती निश्चितच अस्तित्वात असल्या पाहिजेत. मग ज्या अस्तित्वात असतील त्यांचासुद्धा उल्लेख शास्त्रांमध्ये का नाही?

दोन्ही सूची एकाच प्रकारच्या लोकांच्या आहेत असे मानले, तर या प्रश्नांना कोणतेही समाधानकारक उत्तर देता येण्यासारखे नाही. याउलट या दोन सूची वेगवेगळ्या लोकांच्या आहेत, असे मानले तर हे सर्व प्रश्न नाहीसे होतात. या दोन याद्या वेगवेगळ्या आहेत; कारण शास्त्रांमध्ये असलेली यादी अपवित्र लोकांची आहे, तर सरकारी यादी अस्पृश्य लोकांची आहे. या दोन याद्यांत फरक का आहे,

याचे हे कारण आहे. या दोन सूचींमध्ये असलेल्या भेदावरून हेच सिद्ध होत आहे की शास्त्रांमध्ये उल्लेख आलेल्या जाती केवळ अपवित्र आहेत आणि त्यांचा समावेश आजच्या अस्पृश्यांमध्ये करणे चुकीचे आहे.

आता दुसऱ्या मुद्याकडे वळू या. जर अपवित्र आणि अस्पृश्य हे एकच लोक असतील तर ४२९ पैकी ४२७ इतक्या मोठ्या संख्येतील जाती स्मृतींना माहीतही नसाव्यात, हे कसे? स्मृतींच्या काळीही जातींच्या रूपात त्या अस्तित्वात असल्याच पाहिजेत. ते ज्या अर्थी आताही अस्पृश्य आहेत, त्या अर्थी त्या काळीही ते अस्पृश्यच असले पाहिजेत. तर मग त्यांचा उल्लेख करण्यास स्मृतिकार कसे चुकले?

तिसऱ्या मुद्यातून काय निष्पन्न होते? अपवित्र आणि अस्पृश्य हे एकच लोक असतील तर स्मृतीमधील यादीत ज्या जातींचा समावेश करण्यात आला आहे त्या जातींची नावे सरकारी यादीत का सापडत नाहीत? या प्रश्नांची दोन उत्तरे असू शकतात. एक : एकेकाळी ते अस्पृश्य असले तरी आता ते अस्पृश्य राहिलेले नाहीत. दुसरे : या दोन सूचींमध्ये आलेल्या जमातींची नावे पूर्णतः वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांची आहेत. पहिले उत्तर असमर्थनीय आहे. कारण अस्पृश्यता ही स्थायी स्वरूपाची असते. काळ तिला मिटवू शकत नाही. किंवा हटवू शकत नाही केवळ दुसरा निष्कर्षच संभवनीय आहे.

आता चौथा मुद्दा घेऊ या. या दोन्ही याद्यांमध्ये केवळ चांभारालाच स्थान का मिळाले? दोन्ही याद्या एकाच प्रकारच्या लोकांच्या असल्यामुळे असे झाले, हे त्याचे उत्तर नव्हे. हे जर खरे उत्तर असेल तर केवळ चर्मकारच नव्हे, तर स्मृतींनी दिलेल्या यादीत असलेल्या सर्व जातींचा उल्लेख दोन्ही याद्यांमध्ये असावयास हवा होता. परंतु तसा उल्लेख नाही. याचे खरे उत्तर असे की या दोन सूचींमध्ये दोन भिन्न प्रकारच्या लोकांचा समावेश आहे. अपवित्रांच्या यादीमधील काही नावे अस्पृश्यांच्या यादीमध्येही दिसतात. याचे कारण असे की एकेकाळी अपवित्र असलेले लोक पुढे अस्पृश्य बनले. अपवित्र आणि अस्पृश्य हे दोन्ही लोक एकच आहेत, हे सिद्ध करण्याचा एक पुरावा म्हणून चर्मकाराचे नाव दोन्ही याद्यांमध्ये येण्याच्या घटनेचा मुळीसुद्धा होण्यासारखा नाही. त्यावरून हेच सिद्ध होते की एकेकाळी चर्मकार ही जमात 'अपवित्र' होती, परंतु काळाच्या ओघात ती अस्पृश्य बनली व त्यामुळेच दोन्ही याद्यांमध्ये तिचा समावेश करण्यात आला. स्मृतींमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या १२ अपवित्र जातीपैकी केवळ चर्मकार या जातीचीच अस्पृश्याच्या दर्जापर्यंत अधोगती व्हावी या घटनेचे स्पष्टीकरण करणे कठीण नाही. चर्मकार व अन्य अपवित्र जाती यांच्यामध्ये असा फरक घडवून आणण्यास कारणीभूत ठरलेली घटना म्हणजे गोमांस भक्षणाची होय. अपवित्र जमातींपैकी केवळ हीच जात गोमांस भक्षण करीत राहिली. म्हणून



जेव्हा गाईला पवित्र मानण्यात आले व गोमांस भक्षण हे पाप ठरले तेव्हाच चर्मकार जात अस्पृश्य ठरली. केवळ चर्मकार हीच गोमांस खाणारी जमात आहे. त्यामुळेच ती दोन्ही सूचींमध्ये आढळते. चर्मकाराच्या प्रश्नाशी संबंधित असलेले हे उत्तर दोन दृष्टीने निर्णायक आहे. अपवित्र आणि अस्पृश्य हे भिन्न लोक आहेत असा एक निष्कर्ष त्यावरून निघतो. याशिवाय गोमांस भक्षण हेच अस्पृश्यतेचे मूळ आहे आणि त्यामुळेच अपवित्र व अस्पृश्य यांची फारकत होते, हेही त्यावरून सिद्ध होते.

अपवित्रता व अस्पृश्यता या दोन्ही बाबी एक नव्हेत, या निष्कर्षाचा महत्त्वाचा उपयोग अस्पृश्यतेच्या उगमाच्या तारखेचा निर्णय घेताना होणार आहे. त्याच्याशिवाय अस्पृश्यतेच्या उगमाची तारीख निश्चित करण्याचा कोणताही प्रयत्न म्हणजे रस्ता चुकणेच होय.

◆◆◆

# १६. वाताहत झालेले लोक अस्पृश्य केव्हा बनले?

एकेकाळी भारतातील खेड्यांमध्ये स्थायी जमातीचे लोक व वाताहत झालेले लोक राहात होते आणि पहिले गावकुसाच्या आत व दुसरे बाहेर, असे परस्परांपासून वेगवेगळे राहात असले तरी स्थायी जमातीचे लोक व वाताहत झालेले लोक यांच्यामधील सामाजिक व्यवहारावर कसलीही बंधने नव्हती, हे येथपर्यंत केलेल्या संशोधनावरून व चर्चेवरून सिद्ध झालेले आहे. जेव्हा गाय पवित्र बनली आणि गोमांस भक्षण निषिद्ध ठरले तेव्हा समाजाचे विभाजन दोन वर्गांमध्ये झाले. स्थायी जमातीचे लोक स्पृश्य झाले व वाताहत झालेल्या लोकांचा अस्पृश्य वर्ग बनला. या वाताहत झालेल्या लोकांना अस्पृश्य केव्हा मानण्यात आले? अस्पृश्यतेच्या जन्माची नक्की तारीख ठरविण्याच्या मार्गात अनेक सुस्पष्ट अडचणी आहेत. आता विचार करण्यासारखा हाच अंतिम प्रश्न उरलेला आहे. अस्पृश्यता हा एक सामाजिक मनोविज्ञानाचा विषय आहे. एका गटाने दुसऱ्या गटाबद्दल बाळगलेली ही एक प्रकारची सामाजिक किळस आहे. सामाजिक मनोविज्ञानाची ही देण असल्यामुळे या प्रथेला रूप व आकार येण्यासाठी बराच कालावधी लागला असावा. अस्पृश्यतेचा डाग प्रथमतः माणसाच्या मुठीएवढा लहान तयार झाला असेल, परंतु आज आपल्या माहितीप्रमाणे पाहता तो वाढत जाऊन एक सर्वव्यापी जगड्व्याळ आकाराचा बनला आहे. अशा रूढीच्या उगमाची नक्की तारीख सांगण्याचे धाडस कोणीही करणार नाही. या अस्पृश्यतेचे बीज केव्हा पेरण्यात आले असावे? याची तारीख नक्की करणे शक्य नसेल; परंतु जवळपासची तारीख ठरविता येणेही अशक्य आहे काय?

एक निश्चित तिथी सांगता येणे असंभव असले तरी जवळपासची तिथी देता येणे संभवनीय आहे. यासाठी ज्या तिथीची व ज्या काळात अस्पृश्यता अस्तित्वात आलेली दिसते अशा खालच्या भागाकडील एका तिथीची निश्चिती करण्यापासून या कामाला सुरुवात करावयास हवी.

याबाबतची वरील बाजूची मर्यादा निश्चित करण्यापासून सुरुवात करू या. ध्यानात बाळगण्यासारखी पहिली गोष्ट अशी की ज्यांना अंत्यज म्हणून संबोधण्यात येते त्यांचा उल्लेख वेदामध्ये आलेला आहे. त्यांना अस्पृश्य तर मानण्यात येत नव्हतेच; परंतु अपवित्रही मानण्यात येत नव्हते. या विधानाच्या समर्थनासाठी श्री. काण्यांचा पुढील उतारा उद्धृत करण्यासारखा आहे :

''प्रारंभिक वैदिक वाङ्मयामध्ये स्मृतिकार ज्यांना अंत्यज म्हणतात अशा



अनेक जातींची नावे आढळतात. ऋग्वेदामध्ये (८,८,३८) चमन्न जातीचा उल्लेख असून वाजसनेयी संहितेमध्ये चांडाळ व पौल्कस यांचा उल्लेख आहे. वेप किंवा वप्त (न्हावी) ऋग्वेदामध्ये, विदालकर किंवा बिडालकर (स्मृतीमधील बुरूडसदृश) वाजसनेयी संहितेत आणि तैतरीय ब्राह्मणामध्ये आलेले आहेत. वासहपलपुलीचा उल्लेख (धोबी, स्मृतीमधील रजक) वाजसनेयी संहितेत आहे. परंतु या लोकांच्या जाती तयार झाल्या असल्या तरी ते अस्पृश्य होते की नाही यबाद्दलचा साधा निर्देशही या परिच्छेदामध्ये आढळत नाही.''

अशा प्रकारे, वैदिक काळामध्ये कोणत्याही प्रकारची अस्पृश्यता नव्हती. धर्मसूत्रांच्या काळाकडे पाहिले तर त्या काळी 'अपवित्रता' असली तरी 'अस्पृश्यता' नव्हती हे आपण याआधी पाहिलेलेच आहे.

मनूच्या काळी मनुस्मृतीमध्ये एक उतारा असा आहे की त्यात तो केवळ चारच वर्ण असून पाचवा वर्ण नसल्याचे सांगतो. तो असा :

*ब्राह्मणः क्षत्रियोवैश्यस्त्रयोवर्णा द्विजातया।*
*चतुर्थ एक जास्तिस्तु शूद्रो नास्ति चु पंचम।। १०-४*

हा उतारा गूढ स्वरूपाचाच आहे. त्याचा अर्थ शोधून काढणे हे एक कठीण कार्य आहे. ज्या काळी मनूने हा श्लोक लिहिला त्या काळी यासंबंधी समाजामध्ये वाद चालू असला पाहिजे व तो मिटविण्यासाठी मनूने तो लिहिला हे स्पष्टच आहे. चातुर्वर्ण्याच्या पद्धतीमध्ये एका वर्गाच्या दर्जासंबंधीचा हा वाद होता हेही उघडच आहे. वादाचा केंद्रबिंदूही तितकाच स्पष्ट आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे, हा वर्ग चातुर्वर्ण्याच्या चौकटीतील मानावयाचा की त्याचा वेगळा पाचवा वर्ण मानावयाचा असा मुख्य मुद्दा होता, हे उघड आहे; तथापि कोणत्या वर्गासंबंधी हा वाद होता त्या विशिष्ट वर्गाच्या नावाचा उल्लेख मनू करू इच्छित नाही.

मनूने दिलेल्या संदिग्ध निर्णयामुळेही हा श्लोक अधिकच कूट झाला आहे. पाचवा वर्ण अस्तित्वातच नाही असा मनूचा निर्णय आहे. एक सर्वसामान्य विधान या अर्थाने पाहिले तर त्याला एक विशिष्ट अर्थ आहे व तो कोणाच्याही लक्षात येण्यासारखा आहे. परंतु ज्या वर्गाच्या दर्जासंबंधी हा वाद चालू होता त्याला जर हा निर्णय लावून पाहिला तर या निर्णयाचा अर्थ काय होता? त्याचे दोन अर्थ होऊ शकतात, हे उघड आहे. त्याचा एक अर्थ असा होऊ शकतो की चातुर्वर्ण्याच्या पद्धतीनुसार पाचवा वर्णच अस्तित्वात नाही आणि वादविषय झालेल्या वर्गाचा समावेश पूर्वीच मान्य असलेल्या चार वर्णांपैकी एका वर्णात व्हावयास पाहिजे. परंतु त्याचा दुसराही एक असा अर्थ होऊ शकतो की मूळ चातुर्वर्ण्य पद्धतीमध्ये पाचव्या वर्णात तरतूद नसल्यामुळे वादविषय बनलेला वर्ग या वर्ण पद्धतीच्या पूर्णतः बाहेर ठेवणे क्रमप्राप्त आहे.

सनातनी हिंदूंचे याबाबतचे परंपरागत मत असे की मनुस्मृतीतील या विधानात अस्पृश्यांचा निर्देश असून ज्यांच्या दर्जाबद्दल वाद चालू होता तो वर्ग अस्पृश्यांचाच होय आणि मनूच्या निर्णयाचा मुख्य रोख त्यांच्या दर्जासंबंधीच होता. हे स्पष्टीकरण इतके दृढमूल झालेले आहे की ते हिंदूंचे विभाजन दोन भागांत करण्यास कारणीभूत ठरले. ते दोन भाग म्हणजे : सवर्ण किंवा हिंदू (चातुर्वर्ण्यात समाविष्ट असलेले) आणि अवर्ण किंवा अस्पृश्य (चातुर्वर्ण्यातून वगळलेले). प्रश्न असा की, हे मत बरोबर आहे काय? मूळ श्लोकातील निर्देश कोणासंबंधीचा आहे? अस्पृश्यांबद्दलचा तो निर्देश आहे काय? या प्रश्नाची चर्चा काहीशी अनाठायी व विषयांतर करणारी वाटण्याचा संभव आहे. परंतु तशी नाही. कारण मनुस्मृतीमध्ये अस्पृश्यांचा उल्लेख आला असेल तर मनूच्या काळामध्ये अस्पृश्यता अस्तित्वात होती हे ओघानेच येते आणि हा निष्कर्ष आपल्या विचाराधीन असलेल्या मुद्याच्या गाभ्यालाच हात घालणारा ठरतो. म्हणून या मुद्याचा पाठपुरावा करणे भाग आहे.

वरील स्पष्टीकरण चुकीचे आहे, याबद्दल माझी खात्री आहे. या श्लोकाचा अस्पृश्यांशी सुतराम संबंध नाही, असे माझे मत आहे. ज्यांच्या दर्जाबद्दल वाद चालू होता आणि ज्यांच्या दर्जाबद्दल त्याने या श्लोकात निर्णय दिला तो पाचवा वर्ण कोणता याबद्दल मनू येथे बोलत नाही. तो अस्पृश्यांचा वर्ग होता की आणखी दुसरा कोणता एखादा वर्ग होता? या श्लोकात आलेला निर्देश अस्पृश्यांचा नाही या माझ्या मताच्या समर्थनासाठी माझी भिस्त दोन गोष्टींवर आहे. मनूच्या काळी अस्पृश्यता अस्तित्वात नव्हती, हा पहिला मुद्दा आहे. त्या काळी फक्त अपवित्रता पाळण्यात येत होती. मनूजवळ ज्याच्यासाठी तिरस्कारावाचून अन्य कोणतीही भावना नाही तो चांडाळसुद्धा त्या काळी केवळ 'अपवित्र पुरुष' होता. असे असल्यामुळे वरील श्लोकामध्ये अस्पृश्यांचा निर्देश असणे असंभवनीय आहे. श्लोकामध्ये आलेल्या निर्देशाचा संबंध अस्पृश्यांचा नसून दस्यूंशी आहे. या मताच्या समर्थनासाठी पुरावाही उपलब्ध आहे, ही दुसरी गोष्ट होय. उद्योगमूलक उपपत्तीचा विचार करताना नारद स्मृतीतील जो उतारा मी याच पुस्तकाच्या ८ व्या प्रकरणात उद्धृत केला आहे त्या उताऱ्याच्या भाषेवर हा माझा निष्कर्ष आधारलेला आहे. नारदस्मृती दस्यूंना पाचवा वर्ण म्हणून संबोधते, हे ध्यानात येईलच. ज्या अर्थी नारदस्मृतीतील 'पाचवा वर्ण' हे संबोधन दस्यूसंबंधीचे आहे त्या अर्थी मनुस्मृतीतील 'पाचवा वर्ण' हे संबोधन दस्यूंनाच का लागू होऊ नये, याचे मला कोणतेही कारण दिसत नाही. हा युक्तिवाद बरोबर असेल तर मनूच्या काळी अस्पृश्यता अस्तित्वात होती आणि तो त्यांना वर्ण पद्धतीमध्ये स्थान देण्यास तयार नव्हता. या मताचे मुळापासूनच खंडन होते. कारण मी दर्शविल्याप्रमाणे त्या श्लोकातील निर्देश अस्पृश्यांसंबंधीचा नाही व त्यामुळे मनूच्या



काळी अस्पृश्यता होती, असा निष्कर्ष काढण्यासाठी कोणताच पुरावा उरत नाही. अशा तऱ्हेने अस्पृश्यतेच्या उगमाच्या बाबतीत वरील भागाकडील मर्यादेची तिथी निश्चित करण्याबाबत आपण निश्चित होऊ शकतो. मनुस्मृतीने अस्पृश्यतेची आज्ञा दिलेली नाही, असे आपण निश्चयपूर्वक म्हणून शकतो; तथापि अजूनही एक महत्त्वपूर्ण प्रश्न शिल्लक उरतो, मनुस्मृतीचा निश्चित काळ कोणता? या प्रश्नाचे उत्तर दिल्याशिवाय कोणत्याही एका विशिष्ट काळामध्ये अस्पृश्यता होती किंवा नव्हती या विधानाचा संबंध सामान्य वाचकाला काळाशी जोडता येणे शक्य होणार नाही. मनुस्मृतीच्या काळाबद्दल पंडितांमध्ये मतैक्य नाही. काही पंडित तिला अतिशय प्राचीन समजतात, तर काही अगदी अर्वाचीन मानतात. सर्व घटनांचा विचार करून प्रो. बुहलर यांनी निश्चित केलेला काळ सत्याशी जुळणारा असावा असे वाटते. आज मनुस्मृती ज्या स्वरूपात उपलब्ध आहे त्या स्वरूपात ती इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात अस्तित्वात आली, असे बुहलरचे मत आहे. मनुस्मृतीसाठी इतका अर्वाचीन काळ सांगणारा प्रो. बुहलर हा केवळ एकटाच अभ्यासक नव्हे. श्री. दफ्तरी हेसुद्धा याच निष्कर्षावर येऊन पोचलेले आहेत. त्यांच्या मते मनुस्मृती इसवी सन पूर्व १८५ नंतरच्या काळात अस्तित्वात आली. त्यापूर्वी नव्हे. श्री. दफ्तरी यांनी याचे कारण असे दिले आहे की मनुस्मृतीचा व मौर्य वंशातील बौद्ध सम्राट बृहद्रथ याच्या खुनाचा घनिष्ठ संबंध आहे. खून बृहद्रथाचाच सेनापती पुष्यमित्र शुंग याने केला असून ही घटना ख्रि.पू. १८५ मध्ये घडली. म्हणून मनुस्मृती ख्रि.पू. १८५ नंतरच्या काळात लिहिली गेली, असा निष्कर्ष त्यांनी काढला. अशा प्रकारच्या महत्त्वाच्या निर्णयाच्या समर्थनासाठी पुष्यमित्राद्वारा झालेला बृहद्रथ मौर्याचा खून व मनुस्मृतीचे लेखन यांच्यामध्ये असलेला दुवा समर्थ आणि खात्रीलायक पुराव्यांनी सिद्ध व्हावयास पाहिजे. दुर्भाग्याने श्री. दफ्तरी यांनी याची काळजी घेतली नाही. परिणामतः त्यांचा हा निर्णय अधांतरी लटकत असल्यासारखाच वाटतो. अशा प्रकारच्या दुव्याची निर्विवाद स्थापना अत्यंत आवश्यक आहे. सुदैवाची गोष्ट म्हणजे या उद्देशासाठी पुराव्याची मुळीच कमतरता नाही.

पुष्यमित्राने केलेला बृहद्रथ मौर्याचा खून दुर्दैवाने दुर्लक्षितच राहिला आहे. किंवा ज्या प्रमाणात त्याकडे लक्ष द्यावयास हवे होते तितके देण्यात आलेले नाही. जणू काही दोन व्यक्तींच्या भांडणातून उद्भवलेली ती घटना असावी त्याचप्रमाणे इतिहास संशोधकांनी या घटनेला मामुली गणलेले आहे. तिचे परिणाम लक्षात घेतले तर ती युगांतरकारी घटना होती. शुंगांनी मौर्यावर मिळविलेला विजय असे समजून केवळ राजवंश बदलविणारी घटना अशा दृष्टीने तिच्या महत्त्वाचे मोजमाप करता येणे शक्य नाही. फ्रांसच्या राज्यक्रांतीपेक्षा मोठी नसली तरी तिच्या बरोबरीचीच ती एक

राज्यक्रांती होती. बौद्ध राजवटीचा निःपात करण्यासाठी ब्राह्मण संचालकांनी घडवून आणलेली ती एक क्रांती-रक्तरंजित क्रांती होती. पुष्यमित्रांकडून बृहद्रथाचा खून होण्याचा हाच गर्भितार्थ आहे.

या विजयोन्मादी ब्राह्मणवादाला अनेक बाबींची आवश्यकता होती. बौद्धांनी चातुर्वर्ण्याचे प्रामाण्य झुगारून दिल्यामुळे त्याचे पुनरुज्जीवन करून तो देशाचा कायदा म्हणून प्रमाण बनविणे त्यांना आवश्यक होते. बौद्ध कायद्यामुळे रद्द झालेला पशुयज्ञ ब्राह्मणवादाला हवा होता. परंतु यापेक्षा आणखीही काही गोष्टी त्याला पाहिजे होत्या. बौद्ध राजाच्या शासनाच्या विरोधात ही क्रांती घडवून आणून ब्राह्मणवादाने देशातील सर्वमान्य अशा दोन पवित्र व अनुल्लंघनीय नियमांचे उल्लंघन केले. पहिला नियम म्हणजे ब्राह्मणाने शास्त्र हातात धरणे हे पाप होते. दुसऱ्या नियमानुसार राजा हा पवित्र मानण्यात येत होता व त्याला ठार मारणे हे पाप होते. सर्वांना प्रमाण वाटेल व त्यांच्या पापकृत्यांचे समर्थन करील अशा एका पवित्र धर्मग्रंथाची विजयोन्मादी ब्राह्मणवादाला आवश्यकता होती. नजरेत भरण्यासारखे मनुस्मृतीचे एक वैशिष्ट्य असे आहे की ती चातुर्वर्ण्याला देशाचा कायदा बनवून थांबत नाही; ती केवळ पशुयज्ञालाच कायदेशीर ठरवीत नाही, तर याहीपुढे जाऊन ब्राह्मणाने शस्त्र हातात केव्हा धरावे आणि त्याने राजाला ठार मारणे केव्हा समर्थनीय ठरते, हेसुद्धा ती सांगते. या बाबतीत पूर्वीच्या कोणत्याही स्मृतीने जे केले नाही ते मनुस्मृतीने केलेले आहे. हा पूर्णतः नवीन सिद्धांत आहे. मनुस्मृतीने असे का करावे? पुष्यमित्राने केलेल्या क्रांतिकारक कृत्यावर तत्त्वज्ञानाचे आवरण चढवून त्याला पुष्टी देण्याचा त्याचा हेतू होता, हेच त्याचे एकमेव उत्तर आहे. पुष्यमित्र आणि मनूने प्रतिपादन केलेला नवा सिद्धांत यातील या परस्परसंबंधावरून दिसून येते की मनुस्मृती ख्रि.पू. १८५ नंतर काही काळाने अस्तित्वात आली. हा काळ प्रो. बुहलरने निश्चित केलेल्या काळाच्या फार दूर नाही. मनुस्मृतीचा काळ ठरल्यानंतर आपण असे म्हणून शकतो की इसवी सनाच्या दुसऱ्या शतकामध्ये अस्पृश्यता अस्तित्वात नव्हती.

आता अस्पृश्यतेच्या उगमाच्या खालच्या भागाकडील काळाच्या संभवनीय मर्यादारेषेकडे वळू, या उद्देशासाठी भारताला भेट देऊन येथील जनजीवनाचे निरीक्षण करणाऱ्या व त्यांची नोंद ठेवणाऱ्या चिनी प्रवाशांच्या समाचाराला गेले पाहिजे. या चिनी प्रवाशांपैकी फहियानाजवळ सांगण्यासारख्या काही विशेष गोष्टी आहेत. तो भारतात इ.स. ४०० मध्ये आला. त्याच्या प्रवास वृत्तांतामध्ये पुढील उतारा आला आहे :

''याच्या (मथुरेच्या) दक्षिणेस मध्यप्रदेश नावाचा प्रदेश आहे. येथील हवामान उष्ण व सम आहे. येथे धुके किंवा बर्फाचा वर्षाव होत नाही. लोक अत्यंत समृद्ध



आहेत. त्यांच्यावर व्यक्तिगत कर लावलेला नसून अधिकाऱ्यांच्या प्रतिबंधापासूनही ते तसे मुक्त आहेत. जे लोक सरकारी जमिनीची मशागत करतात त्यांनाच उत्पन्नाचा काही भाग सरकारला द्यावा लागतो. त्यापुढेही त्यांना या जमिनीवर शेती करावयाची इच्छा असेल तर ते करू शकतात. त्यांना ही शेती बंद करावयाची असेल तर ते बंदही करू शकतात. मृत्युदंड न देता राजा शासन चालवितो. परिस्थितीनुसार अपराध्यांना लहान किंवा मोठा दंड केला जातो. पुनः पुन्हा राजाविरुद्ध बंड केल्यावरसुद्धा बंडखोराचा केवळ उजवा हात तोडण्यात येतो. राजाच्या डाव्या व उजव्या बाजूला राहून त्याच्या शरीराचे रक्षण करणाऱ्या सेवकांनाही निश्चित पगार आहे. संपूर्ण देशभर कोणीही प्राणिहत्या करीत नाही किंवा मद्य पीत नाही किंवा कोणीही कांदा किंवा लसूण खात नाही. याला फक्त चांडाळच काय ते अपवाद आहेत. चांडाळांना 'कु-पुरुष' असे म्हणण्यात येते आणि ते इतरापासून दूर राहतात. त्यांना शहरात किंवा बाजारात प्रवेश करावयाचा असला म्हणजे स्वतःला इतरांपासून वेगळे राहण्यासाठी ते लाकडाच्या तुकड्यांचा आवाज करतात. या आवाजामुळे लोक त्यांना ओळखतात व त्यांच्या संपर्कात येण्याचे टाळतात. या देशातील लोक कोंबड्या किंवा डुकरे पाळत नाहीत आणि जनावरांची खरेदी-विक्री करीत नाहीत. त्यांच्या बाजारामध्ये कसायाची दुकाने किंवा मद्याची दुकाने नाहीत. खरेदी-विक्रीचे साधन म्हणून ते कवड्या वापरतात. फक्त चांडाळ लोक शिकार करतात व मांस विकतात.''

फाहियानच्या काळी अस्पृश्यता प्रचलित होती. याचा पुरावा म्हणून या उताऱ्याचा स्वीकार करता येणे शक्य आहे काय? चांडाळांना देण्यात येणाऱ्या वर्णनाचा काही विशिष्ट भाग या निष्कर्षाचा पाठपुरावा करताना दिसतो. हे वर्णन अस्पृश्यांचेच वाटते.

तथापि हा निष्कर्ष स्वीकारण्यामध्ये एक अडचण आहे. ती वस्तुस्थिती चांडाळाशी संबंधित असल्यामुळे ही अडचण निर्माण होते. अस्पृश्यतेचे अस्तित्व किंवा नास्तिक ठरविण्यासाठी 'चांडाळ' हे योग्य उदाहरण नव्हे. ब्राह्मण चांडाळांना परंपरागत शत्रू मानत आले आहेत. म्हणून ब्राह्मणांनी त्यांचे वर्तन घृणास्पद असल्याचा आरोप केला आहे; त्यांच्यासाठी नीच शब्दाचा प्रयोग केला आहे आणि त्यांच्या शत्रुत्वाला साजेल अशा प्रकारचे आचरणाचे कृत्रिम नियम त्यांच्यासाठी तयार केले आहेत. हे सर्व चांडाळाचा विचार करताना लक्षात घ्यावयास हवे. म्हणून चांडाळासंबंधी जे काही सांगण्यात आले असेल त्यावर नीट विचार करून मगच त्यावर विश्वास ठेवावयास हवा.

हा युक्तिवाद कोऱ्या तर्कावर आधारलेला नाही. ज्यांना हा युक्तिवाद विसंगत आहे, अशी शंका असेल त्यांनी चांडाळासंबंधी आलेले बाणाच्या कादंबरीतील

वर्णन पुरावा म्हणून पडताळून पाहावे.

कादंबरीची कथा अत्यंत गुंतागुतीची असून वस्तूतः आपला तिच्याशी फारसा संबंध नाही. ही कथा एका चांडाळकन्येने पाळलेल्या तिच्या लाडक्या पोपटाद्वारा शूद्रक राजाला सांगितलेली आहे, इतकी माहिती आपल्या उद्दिष्टाच्या दृष्टीने पुरेशी आहे. कादंबरीतून घेतलेले पुढील उतारे आपल्या उद्दिष्टाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. बाणाने केलेल्या चांडाळाच्या वस्तीपासून सुरुवात केल्यास उत्तम होईल. चांडाळांना देण्यात आलेली ती वागणूक आहे. ती अशी :

''मी रानटी लोकांची वस्ती पाहिली, दुष्कर्माचा साक्षात बाजार. चोहोबाजूला शिकारीत गुंग असलेली मुले विखुरली होती. त्यांची कुत्री मोकाट सुटली होती. ते आपल्या शिकारी पक्ष्याला शिकवीत होते, जाळे दुरुस्त करीत होते, हत्यारे घेऊन तयार होते व मासे पकडत होते. त्यांची वेशभूषा भुताप्रमाणे भयंकर होती. वेळूच्या घनदाट जंगलाने त्यांची वस्ती वेढलेली असून केवळ पिवळ्या धुरावरून तिच्या अस्तित्वाचे अनुमान काढावे लागते. वस्तीचे द्वारही बांबूंनी झाकाळून गेले होते. सभोवतीच्या परकोटांवर डोक्यांच्या कवट्या लटकविलेल्या होत्या (६२७). रस्त्यावरील कचऱ्याच्या ढिगात हाडे भरलेली होती. त्यांच्या झोपड्यांची अंगणे रक्ताने, चरबीने व मांसाच्या तुकड्यांनी माखलेली होती. त्यांचे जीवन शिकाऱ्याचे भोजन मांसाचे, तेल चरबीचे, कपडे जाड्याभरड्या तागाचे आणि त्यांची आसने वाळलेल्या चामड्याची होती. त्यांचे घरगुती नोकर म्हणजे कुत्री हेच होत. ते गाई–बैलावर बसतात. पुरुषांच्या करमणुकीची त्याची साधने म्हणजे स्त्रिया आणि मद्य हेच आहेत. ते देवांना रक्त अर्पण करतात; पशुहत्याही करतात. ती जागा नरकाची साक्षात प्रतिकृती होती.''

अशा प्रकारच्या वस्तीमधून चांडाळकन्या आपल्या पोपटासह शूद्रक राजाच्या महालात जावयास निघते. शूद्रक राजा आपल्या अधिकाऱ्यांसमवेत राजदरबारात बसलेला असतो. द्वारपालिका आत प्रवेश करून पुढीलप्रमाणे सूचना देते :

''महाराज, दक्षिणेतून आलेली चांडाळ–युवती राजद्वारावर उभी आहे. आकाशात चढण्याचा प्रयत्न करणाऱ्या ज्या त्रिशंकूला क्रोधित होऊन इंद्राने ठार मारून खाली पाडले त्या त्रिशंकूच्या वंशाची ती शोभा आहे. तिच्या हातातील पिंजऱ्यामध्ये एक पोपट असून तिने मला आपणास निवेदन करण्यास सांगितले की ''महाराज, आपण सागराप्रमाणे असल्यामुळे पृथ्वीवरील धनसंपत्तीचा स्वीकार करण्यास समर्थ आहात. हा पक्षी म्हणजे या जगातील एक अद्भुत आश्चर्य व अमूल्य रतन आहे, असे समजून आपणाला समर्पित करण्यासाठी मी तो आणला व आपले दर्शन घेण्यास उत्सुक आहे.'' हे राजन, आपण तिचा निरोप ऐकला आहे. आता



आपण आज्ञा द्यावी, असे म्हणून तिने आपले बोलणे थांबविले. राजाची जिज्ञासा जागृत झाली होती. आपल्या सभोवार असलेल्या अधिकाऱ्यांकडे पाहून राजाने 'तिला आत यावयास सांग' असे म्हणून आज्ञा दिली. नंतर द्वारपालिकेने त्या 'तिला आत यावयास सांग' असे म्हणून आज्ञा दिली. नंतर द्वारपालिकेने त्या चांडाळ युवतीला आत येण्यास सांगितले व तिने राजदरबारात प्रवेश केला.''

राजा व त्यांच्या अधिकाऱ्यांनी प्रथम तिच्याकडे लक्ष दिले नाही. राजाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यासाठी तिने रंगीबेरंगी फरशीवर बांबू आपटला. यानंतर बाण तिच्या सौंदर्याचे वर्णन सुरू करतो. ते असे :

''तेव्हा राजाने 'समोर पाहा' असे म्हणून द्वारपालिकेच्या निर्देशानुसार चांडाळ युवतीच्या वेशभूषेकडे एकटक लक्ष दिले. तिच्यासमोर एक पुरुष पुढे पुढे चालत होता. त्याचे केस वार्धक्यामुळे पिकले होते; त्याचे डोळे कमळाप्रमाणे लाल होते. तारुण्य निघून गेले असले तरी त्याचे शरीर नियमित परिश्रमामुळे ताठ होते; तो जातीने मातंग असला तरी त्याच्या शरीराचा बांधा तिरस्कारीय नव्हता आणि त्याने दरबारी रंगाची शुभ्र वस्त्रे परिधान केली होती. तिच्यामागे एक चांडाळ मुलगा होता. त्याच्या केसांची झुलप दोन्ही खांद्यांवर विखुरली होती, त्याच्या हातात एक पिंजरा होता. त्या पिंजऱ्याचे गज सोन्याचे असले तरी त्यावर पोपटाच्या पिसाऱ्याचे प्रतिबिंब पडल्यामुळे पाचूप्रमाणे चमकत होते. तिचा रंग सावळा असल्यामुळे दानवांकडून अमृताचे हरण करण्यासाठी विष्णूने घेतलेल्या मोहनीरूपाप्रमाणे ती भासत होती. नीलमची तयार केलेली बाहुली चालू लागावी तशी ती भासत होती. रुळणाऱ्या तिच्या निळ्या पदरावर लाल रेशमाची ओढणी होती. हे दृश्य निळ्या कमळावर सूर्यास्ताची किरणे पडावीत तसे भासत होते. तिच्या कानात लटकत असलेल्या बाळ्यांचे प्रतिबिंब गालावर पडल्यामुळे तिचे गाल उगवत्या चंद्रकिरणांनी रजनीचा रंग पालटावा त्याप्रमाणे चमकदार दिसत होते. तिच्या कपाळावर गोरेपणाची लहानसा तिलक होता. जणू काही तो तिसरा डोळाच वाटत होता. शंकराच्या पोशाखाच्या धर्तीवर पर्वतीय वेशभूषा केलेली ती पार्वतीच वाटत होती.

विष्णूच्या नीलवर्णाचे प्रतिबिंब वक्षस्थळावरील वस्त्रावर पडलेल्याल क्ष्मीप्रमाणे ती शोभायमान दिसत होती किंवा क्रोधित होऊन शंकराने जेव्हा मदनाचे दहन केले तेव्हा त्या धुरामुळे काळवंडलेली रती जशी दिसत होती तशीच ती दिसत होती किंवा बलरामाच्या हलाद्वारे ओढल्या जाण्याच्या भीतीमुळे घाबरून पळत सुटणाऱ्या यमुनेप्रमाणे ती भासत होती अथवा दुर्गादेवीने महिषासुराला पायांनी चिरडून टाकल्यानंतर त्याच्या रक्ताने तिचे पाय माखले असता ती जशी दिसत होती तशीच तीही लाल रंगाच्या फरशीच्या पार्श्वभूमीवर उमललेल्या नीलकमलाप्रमाणे भासत

होती.

तिच्या बोटांच्या लालीमुळे नखांचा रंग गुलाबी झाला होता. चित्रित केलेल्या फरशीचा स्पर्श तिच्यासाठी अति कठोर वाटत होता. कमळाच्या देठाप्रमाणे असलेली आपली नाजूक पावले फरशीवर टाकत ती पुढे आली.

तिने घातलेल्या वाळ्यातून निघालेली अग्निवर्ण किरणे तिच्यावर पडलेली असल्यामुळे अग्नीने तिला बाहूपाशात कवटाळल्यासारखे वाटत होते. जणू काही तिच्या सौंदर्यावर भाळून व तिच्या जन्मामुळे तिला लागलेला कलंक नाहीसा करून अग्नी विधात्याची चूक भरून काढीव होता. प्रीतिरूपी हत्तीच्या भुवया ताऱ्यांच्या माळेने सजवाव्यात त्याप्रमाणे तिचा कमरपट्टा भासत होता, तिच्या गळ्यात मोठमोठ्या तेजस्वी मोत्यांची माळ होती. ती गंगा व यमुनेच्या संगमाप्रमाणेच भासत होती.

शरदऋतूचा उद्गम व्हावा त्याप्रमाणे तिने आपले नीलकमलसदृश डोळे उघडले. पावसाळ्यातील ढगांच्या रंगाची तिची वेणा होती; मलयगिरीप्रमाणे तिचे शरीर चंदनाच्या उटण्याने सुगंधित होते. राशिचक्राप्रमाणे तिचे शरीर रत्नजडित होते; लक्ष्मीप्रमाणेच तिच्या हातांना नीलकमलाच्या वर्णाची शोभा आलेली होती, मूर्च्छेप्रमाणे ती हृदयावर कब्जा करीत होती, एखाद्या उपवनाप्रमाणे ती नैसर्गिक सौंदर्याने परिपूर्ण होती, एखाद्या देवकन्येप्रमाणे तिच्यावर कोणाचाही अधिकार नव्हता, निद्रेप्रमाणे ती सर्वांच्या डोळ्यांवर जादूचा अंमल चालवीत होती, एखाद्या हत्तीने कमलगुच्छाची जशी दशा करावी त्याप्रमाणेच तिचीही दशा मातंग जातीत जन्मल्यामुळे झाली होती; एखाद्या देवतेप्रमाणे ती अस्पर्शनीय होती; प्रेमपत्राप्रमाणे ती डोळ्यांना सुखदायी होती, वसंतऋतूप्रमाणे तिच्या अंगावरही जतीचेफल नव्हते. मदनाच्या धनुष्याप्रमाणे तिचीही कमर वितीने मोजण्याइतकी लहान होती, तिचे कुरळे केस अल्कापुरीच्या यक्षराजाच्या लक्ष्मीच्या केसासारखे होते. तिच्या तारुण्याचे पुष्प नुकतेच उमलले होते. त्यामुळे ती अत्यंत सुंदर दिसत होती. राजाला मोठे आश्चर्य वाटले व त्याच्या मनात विचार आला की, ''विधात्याने हे सौंदर्य अस्थानी निर्माण करण्यात आपले श्रम फुकट घालविते आहेत! कारण जरी तिला चांडाळपणाचा उपहास करण्यासाठी निर्माण करण्यात आले असले तरी जगातील सर्व सौंदर्यरूपी संपत्तीचा तिच्याद्वारा उपहास होत आहे. कोणालाही उपभोग घेता येऊ नये अशा जातीत तिचा जन्म का व्हावा? निःसंदेह प्रजातीने तिची रचना आपल्या कल्पनेने केली आहे. ती हातांनी घडविलेली नव्हे; कारण मातंग जातीला स्पर्श केल्यामुळे प्रायश्चित्त घ्यावे लागेल अशी त्याला भीती वाटली असावी. हातांनी घडविलेले सौंदर्य या अस्पर्शनीय सौंदर्याच्या तोडीचे झालेच कसे असते? याशिवाय तिच्या बांध्याची ठेवण सौंदर्यपूर्ण असली तरी तिच्या जन्मामुळे ती मुत्यूलोकातील लक्ष्मीच



बनली आहे. लक्ष्मीचा जसा देवांना धाक आहे, तसाच हिच्या अस्पृश्य सौंदर्याचाही विधात्याला धाक वाटला असावा.'' राजाच्या मनात जेव्हा हे विचार येत होते तेव्हा कानापर्यंत फुलांच्या माळांनी सुशोभित झालेल्या या युवतीने तिच्या वयाला न साजेशा धीटपणाने राजासमोर वाकून त्याला नमस्कार केला. राजाला नमस्कार करून ती जेव्हा त्या चितारलेल्या फरशीवरून पुढे जाऊ लागली तेव्हा तिच्या सेवक मुलाने पिंजऱ्यातील पोपट हाती घेतला व दोन पावले पुढे जाऊन तो त्याने राजाला दाखविला व तो म्हणाला, ''महाराज, या पोपटाचे नाव वैशंपायन आहे. हा सर्व शास्त्रांचा अर्थ जाणतो, तो राजकीय व्यवहारामुळे कुशल आहे, तो कथा, इतिहास व पुराणांचा पंडित आहे आणि ताल व सूर या संगीत तत्त्वांचा दर्दी आहे. तो अद्वितीय व सुंदर अशा आधुनिक ढंगांच्या प्रेमकथा, नाटके, कविता रचू शकतो व ऐकवू शकतो. त्याचप्रमाणे तो वाक्पटू असून वीणा, बासरी व मृदंग वादनात अद्वितीय आहे. नृत्यकलेतील वेगवेगळ्या हावभावांचे प्रदर्शन करण्यात कुशल असून तो चित्रकलेतही निष्णात आहे. तो खेळांमध्ये अत्यंत साहसी आहे आणि प्रेमकलहामध्ये प्रेयसीचे सांत्वन करण्यात त्याचा हातखंडा आहे. तो हत्ती, घोडे, पुरुष व स्त्रीच्या गुणांचा ज्ञाता आहे. संपूर्ण पृथ्वीवरील बेजोड असे हे रतन आहे. माझ्या मालकाच्या मते सर्व प्रकारच्या मोत्यांचे स्थान ज्याप्रमाणे सागर हेच आहे, त्याप्रमाणे पृथ्वीवरील संपत्तीचे आपणच स्वामी होत. म्हणून माझ्या स्वामीच्या मुलीने तो तुमच्या पायाजवळ आणलेला आहे. आपण त्याचा स्वीकार करावा.''

चांडाळकन्येचे हे वर्णन वाचल्यानंतर अनेक प्रश्न उद्भवतात. पहिला फहियानने केलेल्या वर्णनापेक्षा हे वर्णन कितीतरी भिन्न का? दुसरा असा : बाण हा वात्स्यायन ब्राह्मण आहे. या वात्स्यायन ब्राह्मणाने चांडाळ वस्ती तितकी निष्कृष्ट असल्याबद्दल प्रथम वर्णन केले; परंतु नंतर या चांडाळकन्येचे अशा वक्तृत्वपूर्ण व डौलदार भाषेत वर्णन करण्यात त्याला कसलाच संकोच वाटताना दिसत नाही. या वर्णनाचा व ब्राह्मणाच्या मनात असलेल्या चांडाळाविषयीच्या अतीव तिरस्कारांचा मेळ बसू शकतो काय? जर चांडाळ हे अस्पृश्य होते तर अस्पृश्य-कन्या राजवाड्यात शिरली कशी? बाणाने वापरलेल्या उत्कृष्ट शब्दांत एखाद्या अस्पृश्याचे वर्णन करता येणे शक्य आहे काय? तिरस्कार तर दूरच राहो, पण बाणाच्या काळी चांडाळ राज्यकर्ते होते, असे बाणाचे म्हणणे दिसते. कारण चांडाळकन्येविषयी बाण चांडाळ राजकुमारी असा शब्द वापरतो. बाणाने ही कादंबरी साधारणतः इ.स. ६०० मध्ये लिहिली आणि त्या काळी चांडाळांना आजच्या अर्थाने अस्पृश्य ठरविण्यात आले नव्हते, असा त्याचा अर्थ होतो. यावरून पाहता फाहियानने वर्णन केलेली स्थिती अस्पृश्यतेच्या जवळपास येणारी असली तरी तिला 'अस्पृश्यता' म्हणता येण्यासारखे नाही, हाच

निष्कर्ष अधिक सुसंगत वाटतो. तो अपवित्रतेचाच अतिरेकी प्रकार असला पाहिजे. कारण पवित्रतेच्या नावावर अतिरेकी आचरण करण्याची ब्राह्मणांची नित्याचीच सवय आहे. फाहियान जेव्हा भारतात आला तेव्हा येथे गुप्त वंशाचे राज्य होते, हे आपण ध्यानात घेतले तर हे अधिकच समर्थनीय ठरते. गुप्त राजे हे ब्राह्मणवादाचे पुरस्कर्ते होते. तो विजयोन्मादाचा व ब्राह्मणवादाचा पुनरुज्जीवनाचा काळ होता. म्हणून फाहियानने ज्या स्थितीचे वर्णन केले ती अस्पृश्यता नसावी हे पूर्णतः संभवनीय आहे. ती अपवित्रतेबद्दलची सीमारेषा होती; कारण विशेषतः चांडाळाच्या बाबतीत जी अपवित्रता मानण्यात येत होती तिचाच अतिरेक करून तिला सीमारेषेपर्यंत पोचविण्याची ब्राह्मणांची धडपड चालू होती.

भारतात येणारा दुसरा चिनी प्रवासी ह्युएनत्संग हा आहे. तो भारतात इ. स. ६२९ मध्ये आला. तो भारतात १६ वर्षे राहिला आणि त्याने भारताच्या सर्व भागांतील स्थितीचे अचूक वर्णन लिहून ठेवले आहे. त्यात लोकांतील रूढी व आचारांच्या पद्धतीचाही समावेश आहे. भारतातील घरे व शहरांचे सामान्य स्वरूपाचे वर्णन करीत असताना तो लिहितो :

''त्यांच्या वस्त्या व शहरांच्या भोवतीच्या भिंती उंच व रुंद आहेत. (एका प्रतीप्रमाणे अनेक भागात) परंतु सडका मात्र अरुंद व वाकड्यांतिकड्या आहेत. दुकाने मुख्य रस्त्यावर असून रस्त्याच्या दोन्ही बाजूस खानावळी आहेत. खाटीक, कोळी, नट, नर्तक यांच्या वस्त्या एका निश्चित मर्यादेद्वारा वेगळ्या केलेल्या आहेत. त्यांना सक्तीने गावाबाहेर राहण्यास भाग पाडण्यात आले असून त्यांना गावात जावयाचे असल्यास डाव्या बाजूने व अंग चोरून जावे लागते.''

एक निश्चित निष्कर्ष प्रस्थापित करण्यासाठी वरील उतारा अगदीच लहान व तोकडा पडतो. तथापि त्यासंबंधी एक मुद्दा ध्यान देण्याइतका महत्त्वाचा आहे. फाहियानाच्या वर्णनात केवळ चांडाळाचाच उल्लेख येतो; परंतु ह्युएनत्संग याच्या वर्णनामध्ये चांडाळाशिवाय अन्य जातींचाही उल्लेख आहे. हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. चांडाळाशिवाय अन्य जातींनाही हा उतारा लागू होत असल्यामुळे फाहियानच्या वर्णनावर येणारा आक्षेप ह्युएनत्संगाच्या वर्णनाला लागू होत नाही. म्हणून ज्या काळी ह्युएनत्संग भारतात आला, त्या वेळी अस्पृश्यता नुकतीच उगम पावली असावी हेच संभवनीय वाटते.

वर जो निष्कर्ष काढला त्याच्या आधारे म्हणता येण्यासारखे आहे की इ. स. २०० मध्ये अस्पृश्यता जन्मास आली नसली तरी इ. स. ६०० च्या दरम्यान तिचा उगम झालेला होता.

अस्पृश्यतेचा उगम ठरविण्यासाठी वरची आणि खालची अशा या दोन



कालमर्यादा आहेत. आता आपण साधारणतः बरोबर असणारी एखादी अस्पृश्यतेच्या जन्माची तिथी ठरवू शकू काय? जर अस्पृश्यतेचे मूळ कारण असलेल्या गोमांस भक्षणाच्या मुद्यापासून आपण सुरुवात केली, तर आपण तसे करू शकू, असे मला वाटते. आपण गोमांस भक्षणाचा निषेध हा जर आपल्या चिंतनाचा मुख्य मुद्दा बनविला, तर त्याचा अर्थ असा होईल की, अस्पृश्यतेच्या जन्माची तिथी व गोहत्या व गोमांस भक्षणबंदीची तिथी याचा परस्पराशी घनिष्ठ संबंध आहे. गोहत्या हा अपराध केव्हा ठरला व गोमांस खाणे पाप केव्हा ठरले याचे उत्तर जर आपण देऊ शकलो तर आपण अस्पृश्यतेच्या जन्माची साधारणतः बरोबर असलेली तिथी ठरवू शकू.

गोहत्या हा अपराध केव्हा ठरला?

मनूने गोमांस भक्षणावर बंदी घातली नाही किंवा गोहत्या हा अपराध ठरविला नाही हे आपणास माहीत आहेच. त्याला गुन्ह्याचे स्वरूप केव्हा आले? डॉ. डी.आर. भांडारकर यांच्या मते गुप्त राजांनी साधारणतः इ.स.च्या सनाच्या चौथ्या शतकामध्ये गोहत्येला देहान्त शासनास योग्य असा गुन्हा ठरविले.

**म्हणून आपण काहीशा विश्वासाने असे म्हणू शकतो की अस्पृश्यतेचा जन्म अंदाजे इ. स. ४०० च्या दरम्यान झाला. ती बौद्ध धर्म व ब्राह्मणवाद यांच्या संघर्षातून जन्माला आली असून या संघर्षानेच भारताचा इतिहास घडविला, भारतीय इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी या संघर्षाकडे पूर्णतः दुर्लक्ष केले ही खेदाची बाब आहे.**

◆◆◆